चरित्र
६५८



REFBK-0008575

# मल्हार

## व्यक्ति - विचार

— वि. स. खांडेकर

# वामन मल्हार जोशी

## व्यक्ति आणि विचार

संपादक व प्रस्तावक

**वि. स. खांडेकर**

REFBK-0008575

किंमत ४॥ रुपये

प्रकाशक

रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
१९१, शनिवार
पुणें २

१ सर्व हक्क स्वाधीन.

२ मखपृष्ठावरील चित्र श्री. दिनानाथ दलाल यांचें आहे.

मुद्रक

न. वि. सरदेशपांडे
आदर्श मुद्रणालय
३९५/५ सदाशिव पेठ, पुणें २.

वामन मल्हार जोशी यांच्या व्यक्तित्वाचे निदर्शक असलेले हे निवडक उतारे त्यांच्या खालीं दिलेल्या पुस्तकांतून घेतले आहेत.

संदेश ( स्मृति लहरी )

आत्मज्ञानाची भूक ( नीतिशास्त्र प्रवेश )

ध्येयें म्हणजे दुःखें
नागे फुरशे फणा काढतात
भांडखोरपणाचा प्रश्न
स्त्रिया लतासारख्या; पुरुष वाघासारखे.
} ( इंदु काळे सरला भोळे )

राष्ट्रकार्याची गंगा ( विचार विलास )

केतकरांच्या कादंबऱ्या ( विचार सौंदर्य )

देशभक्त मेला, शाळेला सुट्टी ( इंदु काळे सरला भोळे )

मुलांची हसरी सृष्टि ( विचार विहार )

शत्रु ! छे ! मित्र ( आश्रम हरिणी )

वाङ्मय कला विषयक माझी दृष्टि ( विचार सौंदर्य )

ही सामाजिक व्यवस्था नव्हे, सामाजिक अनवस्था ( सुशिलेचा देव )

वाङ्मय चर्चा ( विचार विलास )

माझ्या अनुभवाचें सार ( विचार लहरी )

विचार विलास ( विविध छोटे उतारे )

# वामन मल्हार जोशी

बाळपण रम्य असतें ही कवींची आवडती उक्ति मीं अगदीं बाळपणापासून ऐकत आलों आहें. मी लहान होतों तेव्हां हें सुभाषित ऐकून मला वाटे—खोटें बोलणें हा काव्यशास्त्रांत गुन्हा नसावा! नाटकाचा खरा रसास्वाद नटापेक्षां प्रेक्षकच घेऊं शकतो अशी मनाची समजूत घालीत पुढें पुढें मी ही उक्ति खरी मानूं लागलों. पण तिच्यांत सत्यापेक्षां सौंदर्यच अधिक आहे अशी आतां माझी खात्री झाली आहे. प्रौढ मनुष्य आपल्या पूर्व जीवनाचें सिंहावलोकन करूं लागला म्हणजे त्याच्या मनांत ज्या गोड आठवणी जागृत होतात त्या बहुधा बाळपणांतल्या नसतात. लहानपणींचे अतिशय उत्कट अथवा तीव्र प्रसंग माणसाच्या मनांत घर करून राहतात, नाहीं असें नाहीं. पण त्यांचीं प्रतिबिंबें अंधुक असतात. स्मृतींतल्या त्यांच्या अस्पष्ट सावल्या संमिश्र भासतात. बाल्य व यौवन यांच्या दरम्यान जो मुग्धपणाचा काल असतो त्यांतल्या मधुर आठवणी मात्र जन्मभर मनुष्याची सोबत करीत राहतात.

निदान माझा तरी असा अनुभव आहे. कॉलेजचा विद्यार्थी म्हणून पुण्यांत १९१४ पासून पुढें मी जीं दोन तीन वर्षें काढलीं त्या वेळच्या अनेक आठवणी स्पष्टपणें अजून माझ्यासमोर उभ्या आहेत. ब्रिटिश सरकारनें लोकमान्य टिळकांना मंडालेहून अचानक मध्यरात्रीं गायकवाडवाड्यांत आणून सोडलें ही बातमी एके दिवशीं सकाळीं पुण्यांत घरोघर पसरली. राम वनवासाहून परत आल्यावर अयोध्येला जो आनंद झाला असेल तो पुण्यनगरीच्या प्रफुल्लित मुखावर झळकूं लागला. मग त्या दिवशीं कुठलं आलंय् कॉलेज आणि कोण लेकाचा करतोय् अभ्यास! आम्हा विद्यार्थ्यांचे थवेच्या थवे गायकवाडवाड्याकडे जाऊं लागले. तिथल्या अंगणांत मध्यभागीं उघडे बसलेले टिळक अजून मला आठवतात. तो माझ्या आयुष्यांतला एक अत्यंत पवित्र क्षण होता असें मला

वाटतें. आपल्याच तंद्रींत रस्त्यानें जात असतांना एकदम मागें परतून 'तुम्हांला ओळखलं नाहीं हं मी. क्षमा करा' असें म्हणून नमस्कार करून जाणारी त्या काळांतली बालकवींची ती साधीभोळी निष्कपट मुद्रा अद्यापिही माझ्या डोळ्यांपुढें उभी राहते. माडीवरल्या खिडकीपाशीं बसून समोरच्या पिंपळाच्या सळसळीलाही मागें टाकणारें गडकऱ्यांच्या बुद्धीचें तें तरल नृत्य अजूनही आपण पाहत आहोंत असा मला भास होतो. त्या वेळच्या अशा अनेक व्यक्तींच्या, स्थळांच्या आणि अनुभवांच्या मधुर स्मृतींतच वामनराव जोश्यांच्या 'रागिणी'ची मी गणना करतों.

मासिक 'मनोरंजनां'तून ही कादंबरी प्रसिद्ध होऊं लागली तेव्हां अच्युतराव कोल्हटकरांच्या 'संदेशा' प्रमाणें तिच्यावरही आम्हां विद्यार्थ्यांच्या उड्या पडूं लागल्या. चालू अंकांतलीं 'रागिणी'चीं प्रकरणें वाचलीं कीं पुढलीं प्रकरणें केव्हां वाचायला मिळतील असें त्या वेळीं मला होऊन जाई. महिन्याची पहिली तारीख झाली कीं अनेक विद्यार्थी घरून येणाऱ्या मनीऑर्डरची वाट पहात उभे राहत. मीही तसाच अधीरपणानें पोस्टमनाच्या पावलाची चाहूल घेत असें. पण ती मनी-ऑर्डरीसाठीं नव्हे, तर मासिक मनोरंजनाच्या अंकासाठीं! 'मनोरंजन' मासिक अनियमितपणाच्या बाबतींत नियमित असल्यामुळें माझ्यावर निराश होण्याचे प्रसंग फार येत. पण शेवटीं एकदां नवसानें नवा अंक हातीं पडला आणि त्यांतलीं 'रागिणी'चीं प्रकरणें वाचलीं कीं साऱ्या निराशेची भरपाई होई. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांपेक्षा कांहींतरी नवीन आपल्याला वाचायला मिळत आहे याबद्दल त्या वेळीं सुद्धां मला शंका नव्हती. 'रागिणींत' तरुण पिढीच्या बुद्धीला रिझविणारी भाषाशैली होती. तिच्यांत आमच्या सभोंवतीं चालणाऱ्या चर्चांचीं आणि दिसणाऱ्या माणसांचीं प्रतिबिंबें होतीं. त्या वेळीं पदवीधर स्त्रिया फार थोड्या होत्या. त्यामुळें लोकांना एम्. ए. पर्यंत पोंचलेली बाई हा बायकांचें राज्य स्थापन करणाऱ्या प्रमिलेचा विसाव्या शतकांतला अवतारच वाटे. अशी एखादी विदुषी सभेंत जोरजोरानें भाषण करतांना 'पुरुषांना चाबकानें फोडून काढलें पाहिजे' असें म्हणूं लागली कीं मला वामनरावांच्या बंडखोर उत्तरेची न कळत आठवण होई. नात्यापात्यांतल्या एखाद्या बालविधवेच्या मनाची कुचंबणा लक्षांत आली कीं

रागिणी नकळत डोळ्यापुढें उभी राही. आनंदरावाप्रमाणें विज्ञानाच्या साहाय्यानें देशोद्धार करण्याचे बेत तर त्या वेळीं खुद् मी स्वतःच करीत होतों!

'रागिणी'मुळें मी वामनरावांचा चाहता झालों. पण पुढें लवकरच मी पुणें सोडून गेल्यामुळें त्यांना प्रत्यक्ष पाहण्याचा योग दहा वर्षांनीं मला लाभला. १९२६ सालीं श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्याबरोबर मे महिन्याची सुट्टी घालविण्याकरितां मी पुण्याला गेलों. ज्या गांवीं जायचें तिथल्या सर्व मित्रमंडळींना अगदीं अगत्यपूर्वक भेटायचें असा श्रीपाद कृष्णाचा नियम असे. एखाद्या समारंभाच्या कार्यक्रम—पत्रिकेप्रमाणें त्यांचें हें भेटीगांठींचें काम नियमितपणें चाले. भाविक मनुष्यानें गुरुवारीं दत्त, शुक्रवारीं अंबाबाई, शनिवारीं मारुति वगैरे देवतांचीं जशीं न चुकतां दर्शनें घ्यावीं तसे ते आपल्या मुक्कामांत प्रत्येक मित्राला भेटत. त्यांच्या ह्या परिभ्रमणांत एके दिवशीं वामनरावांच्याकडे जायचें ठरलें. हिंगण्याला गेल्यावर वामनराव कुठें आहेत म्हणून मी चौकशी केली. कुणीतरी मला एक खोली दाखविली. कोल्हटकरांची दृष्टि फार अधू झाली असल्यामुळें त्यांना बाहेर उभें करून मी वामनराव आंत आहेत कीं काय हें पाहण्याकरितां पुढें झालों. खोलीचें दार मी हळूच उघडलें. आंत कोणीच नव्हतें. मात्र इकडे तिकडे बरेच कागद अस्ताव्यस्त पसरले होते. त्यांत वर्तमानपत्रें होतीं, विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिका होत्या; सर्व कांहीं होतें. खोलींत फारसें सामान नसूनहि ती अव्यवस्थित दिसत होती. जणुं कांहीं आगगाडीचा तिसऱ्या वर्गाचा डबाच! ही उपमा ज्यांना थोडीशी विचित्र वाटेल त्यांच्याकरितां माझ्या डोळ्यांपुढें त्या वेळीं उभ्या राहिलेल्या दुसऱ्या एका दृश्याचा उल्लेख करतों. मला वाटलें—ईशचिंतनांत दंग असलेल्या एखाद्या विरक्त साधूची मठी आहे ही! मी त्या मठीचें दर्शन घेऊन परत फिरणार इतक्यात वामनरावच तिथें आले. मी कोल्हटकरांना खोलींत घेऊन आलों. गप्पागोष्टी सुरू झाल्या. केळकरांप्रमाणें वामनरावही सावंतवाडीला आम्ही काढलेलें 'वैनतेय' वर्तमानपत्र नियमानें वाचीत असत. त्यांत 'गाढवाची गीता' ही माझी विनोदी लेखमाला नुकतीच येऊन गेली होती. तिच्यासंबंधीं केळकरांनीं 'गाढवाची गीता लिहिणारे खांडेकर तुम्हीच ना?' असा प्रश्न मला प्रथमदर्शनींच केला होता. वामनरावांची भेट होतांच त्यांनींही मला तेंच विचारलें. पण

त्यांची प्रश्न विचारण्याची प्द्धत निराळी होती. ते म्हणाले, 'वैनतेयामध्यें गीता येत होती ती तुमचीच ना ?'

विनोद करणारा मनुष्य नकळत मर्यादेचें उल्लंघन करतो असा सर्व-सामान्य अनुभव आहे. पण वामनरावांचें सौजन्य त्यांच्या विनोदबुद्धीहूनही मोठें आहे, हें मला त्या एका वाक्यावरून कळून चुकलें. किंबहुना आंतरिक अभिजात सौजन्य हाच त्यांच्या जीवनाचा आणि म्हणूनच वाङ्मयाचा स्थायी भाव होता. १९३० सालीं वामनराव मडगांवच्या साहित्यसम्मेलनाचे अध्यक्ष झाले. त्या वेळीं श्रीपाद कृष्ण कोल्हटकर समोर येतांच एखाद्या शिष्यानें गुरूसमोर किंवा धाकट्या भावानें वडील भावापुढें विनयानें उभें राहावें तसे ते चटकन् उठून उभे राहिले. ज्या सन्मानावर त्यांचा निःसंशय अधिकार होता, त्यानेंसुद्धां ते संकोचल्यासारखे झाले होते.

१९३५ पासून त्यांचा माझा अधिक निकट संबंध आला. आम्ही वारंवार भेटूं लागलों. कांहीं वेळां एके ठिकाणीं राहिलों. चार चार तास संभाषणांत आणि काव्यशास्त्र–विनोदात घालविले. खासगी, वाङ्मयीन व सार्वजनिक अशा अनेक विषयांवर ते नेहमीं अगदीं मनमोकळेपणानें बोलत. त्यांची विद्वत्ता, त्यांची रसिकता, त्यांचा त्याग, त्यांचा संयम, शास्त्रीय आणि ललित असें दोन्ही प्रकारचें वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मय निर्माण करण्याचें त्यांचें सामर्थ्य इत्यादि अनेक गोष्टींमुळें त्यांच्याविषयीं मला वाटणारा आदर पुढल्या आठ वर्षांत अधिकच वृद्धिंगत होत गेला. अनेक मोठ्या मानल्या जाणाऱ्या नेत्यांच्या, वक्त्यांच्या, कलावंतांच्या आणि कार्यकर्त्यांच्या बाबतींत प्रेक्षकाला दोन चष्मे वापरावे लाग-तात. एक जवळून पहायचा आणि दुसरा दुरून बघायचा. पण वामनरावांच्या बाबतींत आंत आणि बाहेर, दूर आणि जवळ हे शब्द एकरूप होते. तिथें अष्टौप्रहर एकच चष्मा चाले.

त्यांच्या या निरुपम व्यक्तित्वाचा आत्मा सर्वस्पर्शी सौजन्य हाच होता. विविध मोहक रंग असणाऱ्या एखाद्या पुष्पाच्या मंद सुगंधानें मन पुलकित व्हावें तसें त्यांच्या संगतींत वाटे. ते सत्याचे पूजक होते. पण सत्यशोधनाकरितां पदोपदीं मूर्तिभंजनाचा मार्ग त्यांनीं कधींच स्वीकारला नाहीं. एखाद्या निद्रित बालकाच्या तोंडावरलें पांघरूण त्याची आई जशी हलक्या हातानें दूर करते त्याप्रमाणें सत्यावर स्वार्थानें आणि सत्तेनें घातलेलीं आवरणें ते हलक्या हातानें

बाजूला करीत असत. सत्याइतकेच ते सौंदर्याचेही उपासक होते. पण त्यांच्या सौंदर्यपूजेंत भोगलोलुपतेचें प्राबल्य नाहीं; तिच्यांत रम्य आणि उदात्त अशी सात्त्विकता आहे. पौर्णिमेच्या चांदण्यांत समुद्राची भरती पाहण्यांत जो आनंद आहे तो त्यांच्या समतोल विवेचक बुद्धीच्या प्रकाशांत प्रत्येक प्रश्नाचे जे विविध पैलू दिसत ते पाहतांना होई. त्यांचें वाङ्मय वाचतांना व त्यापेक्षांही त्यांच्या सहवासांत वावरतांना मनाला न कळत शांति लाभे. देवघरांतल्या नंदादीपाच्या प्रकाशांत किंवा एखाद्या टेकडीवर बसून प्रातःकाळीं पाहिलेल्या सूर्योदयांत जी प्रशांत प्रसन्नता जाणवते तीच वामनरावांच्या संभाषणांत अनुभवाला येई. समाजांत मोठेपणा मिळविणाऱ्या कांहीं माणसांत बुद्धीची उंची दृष्टीला पडते, कांहीं व्यक्तींत प्रतिभेची भरारी आढळते, कांहीं आत्मे कर्तृत्वाचीं उत्तुंग शिखरें म्हणून आपल्याकडून मानाचे मुजरे घेतात. असें वैशिष्ट्य सांगायचें झालें तर 'नैतिक उंचीचा आदर्श', असाच मी वामनरावांचा उल्लेख करीन. मराठी साहित्याच्या अभ्यासकांपलीकडे त्यांच्या व्यक्तित्वाचा परिमल यापुढें पोंचणार नाहीं हें खरें. पण त्यांचा अनुक्रमांक कुठेंही लागला तरी ख्रिस्त आणि बुद्ध, एकनाथ आणि तुकाराम, आगरकर आणि गांधी यांच्याच वर्गांत महाराष्ट्राचे भावी इतिहासकार त्यांचें नांव घातल्याशिवाय राहणार नाहींत.

## २

वामनरावांच्या वाङ्मयांत जी सजीवता, जें ध्येयवादित्व आणि जी विचार-प्रेरकता आढळते त्यांचा उगम अशा प्रकारच्या विकसित व्यक्तित्त्वांत आहे. तें व्यक्तित्व इतकें प्रामाणिक होतें कीं 'तुमच्या वाङ्मयानें नवी स्त्री निर्माण केली' असें जर कोणी त्यांच्या तोंडावर म्हटलें असतें तर लगेच हातांतल्या सिगारेटचे दोन झुरके घेऊन मागच्या तक्क्यावर थोडेसे अधिक रेलत आणि स्मित करीत ते म्हणाले असते सत्यं ब्रूयात, प्रियं ब्रूयात हें वचन तुम्ही विसरलां आहांत असं दिसतं. अहो, वाङ्मय कितीही चांगलं झालं म्हणून तें कांहीं नवीन जग निर्माण करूं शकत नाहीं. तें काम निराळ्याच लोकांचें आहे. गांधींचा सत्याग्रहाश्रम या नांवाचा एक लेख मी फार पूर्वी लिहिला होता. तुम्ही बहुतेक तो वाचलाही नसेल म्हणा. मिल्टन न वाचतांच त्याची लोक फार स्तुति करीत म्हणे!

आमचं मोठेपणही तसंच आहे. त्या लेखाच्या आरंभीं मी जें लिहिलं होतं तेंच तुम्हाला सांगतों म्हणजे झालं—कांहीं लोक नुसते बोलत नाहींत तर आपल्या मताप्रमाणें सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. आणि या अशा कर्तृत्ववान लोकांच्याच म्हणण्याला किंमत आहे. इतरांच्या बोलण्यानें हवेमध्यें ज्या लाटा उत्पन्न होतील व लिहिण्यानें कागदावर जी शाई फासली जाईल त्यापेक्षां अधिक परिणाम जगांत दिसून येणार नसल्यामुळें त्यांच्या मताची किंमत बेताचीच समजली पाहिजे. कर्तृत्ववान पुरुषाचें मत हवेमध्यें उत्पन्न होऊन हवेंतच लय पावत नाहीं. तर तें निराळ्या प्रकारचे लोक निर्माण करतें किंवा करूं पहातें. जुन्या समजुतींना, प्रवृत्तींना व रूढींना तें मुळासकट हालवूं लागतें व एकंदरींत नवेंच जग निर्माण करीत असतें. अर्थात् जितकें कर्तृत्व अधिक तितका नव्या व जुन्या जगामध्यें फरक अधिक. मोहनदास करमचंद गांधींना दक्षिण आफ्रिकेंत दहा वर्षांपूर्वी जें जग आढळलें त्यामध्यें त्यांनीं किती तरी फरक घडवून आणला. प्रो. कर्वे यांनीं हिंगणें येथें लहानसें नवीनच जग निर्माण केलें आहे.' एवढें सांगून ते म्हणाले असते, 'अहो, खरी नवी स्त्री आमच्या अण्णांनीं निर्माण केली. ते सूत्रधार. आम्ही आपले पारिपार्श्वक. मधून आ करायचें—मधून फुलें उधळायचीं—'

ज्याला त्याला आपल्या धंद्याचा अभिमान वाटावा हें स्वाभाविकच आहे. पण या अभिमानाचें रूपांतर लवकरच अंध अहंकारांत होतें असा नेहमीं अनुभव येतो. चांगली टोपी किंवा चांगलें पायताण तयार करणें ही सुद्धां एक कला आहे यांत शंका नाहीं. पण असा कलावंत टोपीवाला माझ्या टोप्या नसत्या तर सारे लोक उन्हाच्या तीव्र झळा लागून बेशुद्ध पडले असते असें म्हणूं लागला किंवा चांगलीं पायताणें शिवणारा चांभार आपल्यामुळेंच लोक चालूं शकतात असें प्रतिपादन करूं लागला, म्हणजे त्यांचें जगांत हंसूं होतें. अनेक साहित्यिकही आपल्या कलेच्या, वाणीच्या, आणि लेखणीच्या सामर्थ्याविषयीं अशाच प्रकारच्या बेफाट कल्पनांनीं पछाडलेले असतात. केशवसुतांनीं 'आम्ही कोण ?' ही कविता आपल्याला उद्देशूनच लिहिली आहे असा त्यांना भास होत असतो. पण विचारशील वामनराव एकंदर साहित्याचें सामर्थ्य आणि त्यांतही आपल्या शक्तीच्या मर्यादा पूर्णपणें जाणून होते. म्हणूनच लेखनक्षेत्रांत पाऊल टाकतांनाच शब्द आणि कृति यांचें मूल्यमापन ते तटस्थपणानें करूं शकले. स्वतःकडे परक्याच्या दृष्टीनें पाहण्याचा दुर्मिळ गुण हा त्यांच्या व्यक्ति-

त्याचा सर्वांत मोठा विशेष मानतां येईल. त्यामुळें ते लेखनापुरतेच तत्त्वचिंतक राहिले नाहींत. अंतर्बाह्य, अष्टौप्रहर, आमरण ते अंतर्मुख आणि विचारशील होते. या अपूर्व वृत्तीमुळें सर्वसामान्य साहित्यिकाच्या ठिकाणीं स्वतःच्या कलाकृतीविषयीं आढळणाऱ्या अभिमानाचा उग्र दर्प वामनरावांच्यांत कधींही जाणवत नसे. एखाद्या व्यवहारचतुर कादंबरीकाराला 'तुमची सर्वांत आवडती कादंबरी कोणती?' असें कुणी विचारलें तर आपल्या प्रतिभेचें माहात्म्य सिद्ध करण्याकरितां 'माझ्या सर्व कादंबऱ्या मला सारख्याच आवडतात, त्यांत सरस नीरस असें कांहींच असू शकत नाहीं.' असें तो ताडकन् उत्तर देईल! पण याच विषयासंबधीं एकदां गोष्टी निघाल्या असतांना वामनराव मला म्हणाले होते, [ प्रत्येक लेखकाला आपली प्रत्येक कृति मोठी कलापूर्ण वाटत असते. आपला शब्द नि शब्द अमर वाङ्मयांत जमा होणारा आहे अशा धुंदींत तो लिहीत असतो. पण त्याची ही धुंदी पाहून बाजूला उभा असणारा काळपुरुष स्वतःशीं स्मित केल्याशिवाय राहत नाहीं. कार्तिकी पौर्णिमेला नदींत सोडून दिलेल्या दिव्यांपैकीं बहुतेक प्रथम चमकत आणि मग लुकलुकत थोड्याफार अंतरावर बुडून जातात ना? कलाकृतींची तशीच स्थिति होते. पहिलीं पांच दहा वर्षें त्यांचा खूप गाजावाजा होतो—प्रसंगीं केलाही जातो! पुढें हळुहळु विद्वान् लोकांच्या व्याख्यानांतून तेवढा त्यांचा उल्लेख कानांवर पडूं लागतो. आणखी कांहीं वर्षें लोटलीं कीं काळपुरुषाच्या अडगळीच्या खोलींत त्या कृती टाकल्या जातात.] माझें काय किंवा तुमचें काय एखादेंच पुस्तक पुढल्या पिढ्यांपर्यंत पोंचू शकेल! माझी 'रागिणी' किंवा 'इंदु काळे' तुमची 'उल्का'—

काळपुरुष इतक्या केठार दृष्टीनें त्यांच्या कृतींकडे पाहील असें मला वाटत नाहीं. 'नीतिशास्त्र-प्रवेश', 'इंदु काळे व सरला भोळे', 'सुशीलेचा देव', 'विचारसौंदर्य' आणि 'स्मृतिलहरी' हीं त्यांचीं पांच पुस्तकें भावी महाराष्ट्र मोठ्या आनंदानें वाचत राहील अशी माझी खात्री आहे. मात्र वामनरावांची ही न्यायनिष्ठुरता पाहिली म्हणजे, जो आनंदानें स्वतःचा शत्रु होतो तोच आपल्या आत्म्याचा चिरंतन मित्र होऊं शकतो, असा विचार मनांत आल्यावांचून रहात नाहीं!

हें मनाचें माधुर्य, हें विकसित आत्म्याचें सौजन्य वामनरावांच्यांत कसें निर्माण झालें हें पाहणें मोठें मनोरंजक आहे. ते श्रेष्ठ दर्जाचे शिक्षक होते,

पहिल्या प्रतीचे साहित्यिक होते, त्यागी सामाजसेवक होते! पण हे किंवा अशा प्रकारचे गुण अंगीं असणाऱ्या इतर अनेक व्यक्तींत कुठें अहंकार, कुठें अभिनिवेश, कुठें क्षुद्रपणा, कुठें चिडखोरपणा अशीं अनेक वैगुण्यें आढळतात. पण वामनरावांच्या डोळ्यांवर बुद्धीचा, त्यागाचा, कीर्तीचा कशाचाही धूर कधीं क्षणमात्र चढला नाहीं. धोंडोपंत बर्वे व विनायकराव भोळे या त्यांच्या मानसपुत्रांत त्यांच्या या अविस्मरणीय व्यक्तित्वाच्या अनेक छटा प्रतिबिंबित झाल्या आहेत हें खरें! पण कांहीं झालें तरी तें पाण्यांत पडलेलें इंद्रधनुष्याचें प्रतिबिंब आहे. तें आकाशांतलें विशाल आणि मोहक इंद्रधनु नव्हे. त्यांच्या या व्यक्तित्वाचा विकास कसा होत गेला हें कळायला त्यांनीं आत्मचरित्रच लिहायला हवें होतें. महात्मा गांधी किंवा लक्ष्मीबाई टिळक यांच्या आत्मवृत्तांइतकें तें निःसंशय सरस आणि जीवनदर्शी झालें असतें.

मात्र त्यांचें आत्मचरित्र उपलब्ध नसलें तरी त्यांच्या उदात्त व्यक्तित्वाची घडण कशी झाली याविषयीं त्यांच्या अनेक उद्गारांवरून अनुमानें काढणें फारसें कठिण नाहीं. एके ठिकाणीं ते म्हणतात, ‘ संसाराकडे पाहण्याची जी माझी एक बरी-वाईट, सदोष-निर्दोष दृष्टि व वृत्ति आहे व जी अर्थात् माझ्या लेखनामध्यें प्रतिबिंबित झाली असलीच पाहिजे, त्या वृत्तीचें मूळ माझ्या कौटुंबिक अनुभवांत आहे. माझी आई, माझ्या वहिणी व भाऊ ही मंडळी फार प्रेमळ असल्यामुळें व माझें लहानपणींचें तरी कौटुंबिक आयुष्य फार सुखांत गेल्यामुळें मुलाबाळांनीं व इतर माणसांनीं गजबजलेल्या कौटुंबिक जीवनाची मला मनापासून आवड आहे.’ या स्नेहशील कौटुंबिक जीवनक्रमांतच वामनरावांचे रसिक व विद्वान् वडील बंधु महादेव मल्हार जोशी यांचे संस्कार त्यांच्या मुग्ध मनावर झाले असावेत. महादेव मल्हार जसे मोठे पंडित तसेच तत्त्वचिंतक व साहित्यप्रेमी होते. ह्या सर्व गुणांचा वारसा वामनरावांनीं त्यांच्याकडून घेतला. बंगालची फाळणी आणि तिच्या आगेंमागें झालेल्या अनेक प्रक्षोभकारक घटना यांमुळें ज्या अनेक तरुणांच्या मनांत राष्ट्रीय विचारांच्या उत्तुंग लाटा उचंबळूं लागल्या होत्या त्यांत वामनरावही होते. त्यांच्यासारख्या विद्वान् मनुष्याला त्या वेळीं सुखासीन सरकारी नोकरी मिळणें मोठें सुलभ होतें. तशी नोकरी त्यांच्यापुढें चालूनही आली होती. तिच्याकडे पाठ फिरवून विजापूरकरांच्या ‘ विश्ववृत्ता’ला आणि राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या त्यांच्या

समर्थ विद्यालयाला वामनराव मिळाले. ही टिळक-आगरकरांची पवित्र परंपरा होती. देशांतली तरुण पिढी नवीन विचारांनीं भारली गेल्याशिवाय, तिचें जीवनविषयक तत्त्वज्ञान आमूलाग्र बदलल्यावांचून, राष्ट्राच्या पायांतल्या पारतंत्र्याच्या शृंखला तोडण्याचें सामर्थ्य तिच्यांत येणार नाहीं, या श्रद्धेतूनच समर्थ विद्यालय जन्माला आलें. वामनराव तत्त्वनिष्ठेनें प्रेरित होऊन तिथें शिक्षक झाले. त्यांच्या मनांतला हा देशभक्तीचा अंगार शेवटपर्यंत कायम होता. 'विश्ववृत्ता'वर खटला झाला तेव्हां आक्षेपार्ह ठरलेला लेख वामनरावांचा नसूनही त्यांनीं धैर्यानें तुरुंगाचा रस्ता सुधारला. कारागृहांतल्या हालअपेष्टांमुळें वामनरावांच्या मनांतल्या निखाऱ्यांचे कोळसे झाले अशी कांहीं लोकांची कल्पना आहे. पण तिच्यांत सत्यापेक्षां कल्पनेचाच भाग अधिक आहे. तुरुंगांतून बाहेर आल्यावर पुढें सात आठ वर्षें पुण्या-मुंबईतल्या वृत्तपत्रांत स्थिर होण्याचा वामनरावांनीं प्रयत्न केला; पण तो त्यांना साधला नाहीं. त्यांच्या बाबतींत तो यशस्वी होणें अशक्यच होतें. त्यांची वृत्ति काय किंवा लेखणी काय साहित्यिकाची होती; ती पत्रकाराची नव्हती. या काळांत बेकारीचीं दुःखेंही त्यांनीं भोगलीं. शेवटीं महर्षि कर्व्यांच्या शिक्षण-संस्थांत काम करायचें ठरवून ते तिथें आजीव सदस्य झाले. केवळ वर वर पाहणारे वामनरावांनीं प्रक्षुब्ध राजकारणाकडे पाठ फिरवून जिथें वादळी वाऱ्याचा फारसा त्रास होणार नाहीं असें निवांत कार्यक्षेत्र शोधून काढलें, असा या घटनेचा अर्थ करतात. पण या निवडीच्या मुळाशीं पळपुटेपणाची भावना अथवा स्वास्थ्याची आणि सुखवस्तुपणाची इच्छा नव्हती. प्रतिकूल परिस्थितींतही वामनराव आपल्या ध्येयाचीच पूजा करीत राहिले. ते हाडाचे देशभक्त होते हें खरें ! पण व्यासपीठावरलें अथवा वर्तमानपत्रांतलें धकाधकीचें आणि हाणामारीचें राजकारण त्यांच्या स्वभावाला मानवणें शक्य नव्हतें हें त्याहूनही खरें आहे.

तसें पाहिलें तर राजकारण नेहमींच एकाक्ष असतें. आणि वामनराव तर कुठलीही गोष्ट दोन्ही डोळ्यांनीं पाहणारे, एवढेंच नव्हे तर तिच्या दोन्ही बाजू पुनःपुन्हां पाहून मगच तिच्याविषयीं मत बनविणारे. वामनरावांच्यांत धैर्य होतें; पण तें रानावनांत ध्यानधारणेला बसणाऱ्या संन्याशाचें धैर्य होतें. रणगर्जना करीत शत्रूवर तुटून पडणाऱ्या आणि तलवार गाजविणाऱ्या माणसाच्या अंगीं जी अटीतटीची मनोवृत्ति असावी लागते, ती त्यांच्यांत नव्हती. त्यांनीं

सार्वजनिक क्षेत्रांत जें पहिलें पाऊल टाकलें तें शिक्षक म्हणून; पत्रकार म्हणून नव्हे ! लढाऊ राजकारण खेळणाराला एक प्रकारची बेडर वृत्ति लागते. त्याला विशिष्ट पक्षाचा अभिनिवेश अंगीं बाणून घ्यावा लागतो. तो स्वभावतःच त्यांच्यांत नव्हता. वामनरावांचें मन हें सोनें होतें. सोन्याचे सुंदर अलंकार घडवितां येतात. पण त्याचीं शस्त्रें होऊं शकत नाहींत. हत्यारें पोलादाचींच होतात. प्रकृति-धर्मांतलें हें अंतर लक्षांत घेतलें म्हणजे वामनराव राजकारणाच्या धकाधकीच्या मामल्यापासून पुढें कां अलिप्त राहिले हें उघड होतें. केवळ भावनेला आवाहन देण्याची वृत्ति त्यांच्यांत कधींच नव्हती. कोटीवर प्रतिकोटि करून शाब्दिक विजय मिळविण्याची शक्ति अंगांत असली तरी जन्मजात सौजन्यानें त्यांना तसें कधींच करूं दिलें नसतें. या बाबतींत त्यांनीं एके ठिकाणीं स्वतःविषयीं जें सांगितलें आहे तें विचार करण्याजोगें आहे. ते म्हणतात :

एका व्याख्यानांत कोणता तरी मुद्दा सांगतांना मी गाढवाचा दाखला दिला होता. त्या व्याख्यानाचा रिपोर्ट देतांना 'संदेश' मध्यें '**वामनराव व गाढव**' असा मथळा देऊन विनोद उत्पन्न करण्याचा अच्युतराव कोल्हटकरांनीं प्रयत्न केला होता. त्यावर उत्तर देण्याकरितां एक पत्र लिहावें व त्या पत्राला '**वामनराव व गाढव; वामनराव व अच्युतराव यांचा वाद**' असे मथळे द्यावेत, असें प्रथम वाटलें. पण अच्युतरावांनीं पुन्हां माझ्यावरतीच डाव उलटविला असता या भीतीनें (व इतर कारणांस्तव) मी तें पत्र लिहिलें नाहीं. याच 'इतर कारणांस्तव' वामनरावांनीं राजकारणात प्रत्यक्ष भाग घेतला नाहीं.

मात्र याचा अर्थ प्रचलित राजकारणाविषयीं त्यांना प्रेम वाटत नव्हतें असा मुळींच नाहीं. गांधींच्या व्यक्तित्वाची आणि कार्याची मीमांसा ठिकठिकाणीं त्यांनीं जितक्या डोळसपणानें तितक्याच सहृदयतेनें केली आहे. १९४२ च्या स्वातंत्र्य-संग्रामाच्या वेळीं प्रिन्सिपॉल या नात्यानें कॉलेजवर तिरंगी झेंडा उभारूं नका असें त्यांनीं विद्यार्थिनींना सांगितलें असलें तरी त्यावेळीं गुप्त चळवळ करणाऱ्या तरुण देशभक्तांना विश्रब्ध विचारविनिमयाकरितां रात्रीं आपली राहती जागा देण्याइतकें देशप्रेम आणि वात्सल्य त्यांच्या अंगीं होतें. अशा एका प्रसंगाचें वर्णन माझ्यापाशीं करतांना ते म्हणाले होते, 'अहो, आमच्या सारखीं माणसं ह्या चळवळीला मनांतून अनुकूल नाहींत असं का तुम्हांला वाटतं ? पण रंगभूमीवर माणसानं जो पार्ट घेतला असेल त्याला शोभेल असेच

हावभाव त्याला करावे लागतात. अगदीं जाडा संस्कृत पंडित असला तरी रंगभूमीवर गड्याचें काम करतांना कुणबाऊ भाषा बोलल्याशिवाय त्याच्या कामाला रंग चढणार नाहीं. तसेंच आहे हें ! दिवसा मी मुलींना 'असं करूं नका, तसं वागूं नका, चळवळींत भाग घेऊं नका' असं सांगत असलें तरी तीं कांहीं माझीं खरीं मतं असतात असं नाहीं. या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी ! एकदां काय झालं, तुमच्या या भूमिगत मंडळींपैकीं माझ्या ओळखीच्या एका तरुणाकडून मला एक चिठ्ठी आली. 'आम्हा कार्यकर्त्यांना रात्रीं एकत्र जमायचं आहे. पण आमच्यावर सध्यां पाळत ठेवली जात आहे. आमच्या भेटीगांठींच्या इतर जागा पोलिसांना कळल्या आहेत. म्हणून आज रात्रीं आम्ही तुमच्या घरीं जमणार आहोंत' असं त्या चिठ्ठींत त्यानं लिहिलं होतं. झालं ! रात्रीं एकामागून एक तीं मंडळी येऊं लागली. मी सर्वांच्या तोंडाकडे पाहून त्यांचे नमस्कार घेत होतों. हा अमका, तो लेकाचा तमका हें भराभर मी ओळखलें. मात्र कांहींचं वेषांतर बेमालूम झालं असल्यामुळं त्यांचे चेहरे पाहून मी गोंधळांत पडलों. आंत त्यांची बैठक सुरू झाली. मी बाहेर सिगारेट ओढीत फेऱ्या घालूं लागलों. एक प्रकारचा पहाराच करीत होतों म्हणाना मी ! त्यांची बैठक संपल्याबरोबर ते सारे लोक पुन्हां मला नमस्कार करून पटापट निघून गेले. ते सुखरूप गेले तेव्हां मला फार बरं वाटलं.'

वामनराव स्वभावतः साहसी नव्हते. विवेक आणि साहस ही जोडी सहसा एकत्र नांदत नाहीं हें सर्वश्रुतच आहे. पण ते भित्रे नव्हते किंवा राजकारणाविषयीं उदासीन झालेले नव्हते. त्यांचा प्रकृतिधर्म लढवय्याचा नव्हता. तो तत्त्वज्ञाचा होता. डायोजिनस या ग्रीक तत्त्वज्ञाला सम्राट अलेक्झांडरनें 'महाराज आपल्याला काय हवं ? आपण मागाल तें तत्काळ आपल्या सेवेला रुजू करतों' असें म्हटलें. तेव्हां डायोजिनसनें त्याला उत्तर दिलें, 'बाबा रे, मला दुसरं कांहीं एक नको. तूं मधें उभा राहिल्यामुळें माझ्यावर ऊन नीट पडत नाहीं. कृपा करून तूं जरा बाजूला हो. एवढंच माझं तुझ्याकडं मागणं आहे.'

डायोजिनसच्या या वैराग्यपूर्ण उत्तरांत एक प्रकारचें वीरत्व होतें हें नाकारतां येणार नाहीं. वामनरावांच्या प्रकृतींतही याच प्रकारच्या विवेकानें वृद्धिंगत होणाऱ्या, वैराग्याच्या पार्श्वभूमीवर खुलणाऱ्या, जगाकडे औदार्यानें

आणि वात्सल्यानें पाहून त्यांतले दोष पोटांत घालणाऱ्या, प्रशांत अशा वीरत्वाची झांक होती.

वामनरावांच्या मूळच्या चिंतनशील स्वभावाची अशा प्रकारच्या प्रसन्न आणि प्रशांत वीरत्वांत कशी परिणति झाली असेल याची अंधुक कल्पना त्यांच्याच एका आठवणीवरून करतां येईल. ते म्हणतात:

'मी तुरुंगांत असतांना रोज चाळीस पौंड म्हणजे रॉकेलचा मोठा डबा भरून कांहीं उरतील एवढे जोंधळे कांहीं दिवस दळण्याकरितां देत असत. माझें जातें खराब होतें. म्हणून माझ्या हातून तेवढे जोंधळे दळून होत नसत. पण माझ्यावर पहारा करण्याकरितां ठेवलेला कैदी पाहरेकरी ( Convict overseer ) जो होता तो बलुची मुसलमान होता. त्यानें आपल्या बायकोचा खून रागाच्या भरांत केला होता. पण तो फार सज्जन होता. . . . तो अतिशय धर्मवेडा होता. अशक्त झाला होता. पण त्याच्या रमजानच्या का कसल्या महिनाभर चालणाऱ्या रोजांच्या दिवसांत तो दिवसा तोंडांत पाण्याचा थेंब घालीत नसे. त्याच्या अंगांत अगदीं त्राण नव्हता. पण पोटांत अन्नपाणी नसतांना देखील तो मला चक्की पिसण्यांत मदत करीत असे. मदत करतांना त्याला कोणी पाहिलें असतें तर त्याची पिवळी पगडी गेली असती. ( म्हणजे ओव्हरसीअरच्या अधिकारावरून पदच्युत होऊन तो पुन्हां साधा कैदी झाला असता ) आणि त्यालाच चक्की पिसण्याचें काम करावें लागलें असतें! चक्की पिसतांना तो अगदीं धापा टाकीत असे आणि आतां यालाच घेरी येते कीं काय अशी मला भीति वाटत असे. पण तो आपला हट्ट सोडीत नसे. भत्त्याच्या वेळीं मला भाकरी मिळे आणि तो ओव्हरसीअर म्हणून त्याला पोळ्या मिळत. त्यांतली तो एक मला देत असे. हें देखील हुकुमाच्या विरुद्ध होतें. जर जेलरनें किंवा सुपरिंटेंडेंटनें पाहिलें असतें तर त्याची पिवळी पगडी गेली असती. पण त्याला 'नको, नको' म्हटलें तरी तो ऐकत नसे आणि मला पोळी खायला लावीत असे. त्याच्या अशा कितितरी गोष्टी सांगतां येतील.'

गुन्हेगार म्हणून तुरुंगांत आलेल्या व्यक्तीच्या आंतरिक सौजन्याचें वामनरावांना हें जें दर्शन झालें त्यानें त्यांच्या मनावर चिरंतन संस्कार केले. मनुष्य स्वभावतः दुष्ट नाहीं; अज्ञानामुळें, सामाजिक विषमतेमुळें, पदोपदीं पिळणूक झाल्यामुळें आणि योग्य वेळीं जगांतल्या मांगल्याचा साक्षात्कार न

झाल्यामुळें तो दुष्ट होण्याचा संभव असतो असें ते नेहमीं म्हणत. त्यांचें हें जीवनविषयक तत्त्वज्ञान मृत्यूच्या क्षणापर्यंत अभंग राहिलें. दुःख व दारिद्य यांचे चटके त्यांना आयुष्यांत कमी बसले असें नाहीं. अनेक कौटुंबिक आपत्तींनाही त्यांना वारंवार तोंड द्यावें लागलें. शेवटच्या दहा वर्षांत त्यांच्या शरीरानेंही त्यांच्याशीं असहकारिता सुरू केली. पण त्यांनीं हीं सर्व विषें विवेकाच्या बळावर हंसत पचविलीं. त्यांच्या मुखावरलें तें मंद पण मधुर स्मित कधींही ढळलें नाहीं. मधून मधून येणाऱ्या मनुष्य-स्वभावाच्या कटु अनुभवांनीं किंवा सामाजिक जीवनांत निर्माण होणाऱ्या दुष्ट चक्रांनीं त्याची जीवनाच्या मांगल्यावरली श्रद्धा कधींही विचलित झाली नाहीं. कुणाच्याही पोटांत शिरा, म्हणजे तुमच्या ओंठावर क्षमेचे शब्द आपोआप येतील. (To understand all is to forgive all) हें त्यांच्या जीवनसंगीताचें ध्रुवपद होतें. त्यामुळेंच रक्तक्षयाची भावना झाल्यावर एका डॉक्टरांनीं उटकमंडच्या हवेंत जाऊन राहण्याचा त्यांना सल्ला दिला तेव्हां ते म्हणाले:

> अहो, साऱ्या हिंदुस्थानांत रक्तक्षय काय मला एकट्यालाच झालाय् ? मुंबईच्या भिकार चाळींत एकेका खोलींत मजुरांचीं दहा दहा माणसं राहतात. त्यांतल्या किती लोकांना ॲनीमिया होतो याचा पत्ता चित्रगुप्ताला सुद्धां लागत नसेल ! ते कुठं उटकमंडला जातात ?

साहित्याच्या पवित्र क्षेत्रांत मोठ्या मोठ्या लोकांनीं चालविलेली धुळवड पाहून त्यांना फार वाईट वाटे. पण त्या गोष्टीविषयीं कोणी अतिशय तीव्रतेनें बोललें म्हणजे वामनराव म्हणायचे:

> अहो, सभ्यपणाची किंमत कळायला सुद्धां जगांत असभ्यपणाची जरूरी आहेच ना! अनुरूप पार्श्वभूमीशिवाय एखाद्या चित्राचं सौंदर्य कधीं खुललं आहे का ?

या विनीत आणि विकसित व्यक्तित्वामुळें कोणत्याही प्रश्नाचा तर्ककर्कश विचार करूं शकणाऱ्या त्यांच्यासारख्या तत्वज्ञाच्या स्वभावांत आईचें वात्सल्य आणि वाङ्मयांत कवीचें माधुर्य निर्माण होऊं शकलें. माणसाच्या हृदयांतल्या सौजन्यावर त्यांची श्रद्धा किती अपरंपार होती, आणि मानव जातीच्या भवितव्याविषयीं त्यांचा आशावाद किती जबरदस्त होता हें त्यांच्या खालील उद्गारांवरून दिसून येईल:

माझ्यावर जरी अनेक दुःसह प्रसंग आले असले तरी माझा एकंदरींत जगाचा अनुभव कटु नाहीं. जग हें वाईट माणसांनीं भरलें आहे असा माझा अनुभव नाहीं. माझे अनेक ठिकाणचे अनुभव मला असें सांगतात कीं, जगांत दुष्टपणापेक्षां अज्ञान व गैरसमज यांनीं हरतऱ्हेच्या आपत्ती ओढवतात व तंटे भांडणें उत्पन्न होतात. दुःखें जगांत आहेतच. दुष्टपणा पण आहे. परंतु प्रयत्न केला तर जग पुष्कळ सुधारेल अशी माझी कल्पना आहे. मला अशी आशा आहे कीं, पांच हजार, दहा हजार वर्षांनीं म्हणा, किंवा लाख वर्षांनीं म्हणा, असा एक दिवस येईल कीं जेव्हां सर्वांना खाण्यापिण्यास पोटभर मिळेल. क्षुल्लक तंटेबखेडे पुष्कळ कमी होतील. समाजांतील कृत्रिम भेद व त्यामुळें उत्पन्न होणारीं वैरें व युद्धें बंद होतील. ज्ञान व ज्ञानाची आवड, तसेंच कला व कलेची आवड हीं वृद्धिंगत होतील आणि खऱ्या नीतीचीं व धर्माचीं तत्त्वें साहजिकपणेंच लोकांना इतकीं प्रिय व आदरणीय होतील कीं त्यांच्या अम्मलबजावणीकरितां कृत्रिम निर्बंधांची, निषेधांची, कायद्यांची व तुरुंगांची आवश्यकता फारशी राहणार नाहीं.

या विचारसरणीचें प्रतिबिंबच त्यांच्या वाङ्मयांत सर्वत्र पडलें आहे.

## २

तत्त्वविवेचक व वाङ्मयविवेचक या दुहेरी भूमिकेंत वामनरावांनीं जें लेखन केलें आहे त्यामुळें मराठींतल्या पहिल्या प्रतीच्या निबंधकारांत आणि टीकाकारांत त्यांची सदैव गणना केली जाईल. त्यांच्या निबंधांचें बळ आकर्षक भाषाशैलींत, प्रचाराच्या तीव्रतेमुळें येणाऱ्या आवेशांत, सौंदर्यानें मनाला मोहून सोडणाऱ्या कल्पकतेंत, देशभक्तीसारख्या वाचकाच्या एखाद्या आवडत्या भावनेला मिळणाऱ्या आवाहनांत किंवा सर्वसामान्य मनुष्याला रंजक रीतीनें प्राप्त करून दिलेल्या ज्ञानांत नाहीं. विचार-प्रवर्तन हा त्यांच्या निबंधाचा आत्मा आहे. ताक घुसळून जसें लोणी काढावें त्याप्रमाणें 'ज्ञान हें विष कीं अमृत?' यासारख्या लेखांतून वामनराव अत्यंत समतोलपणानें सत्यसंशोधन करतात. सांकेतिक सत्यांची, रूढ विचारांची आणि परंपरागत कल्पनांची पिंजण त्यांच्या

इतक्या कुशलतेनें दुसऱ्या कोणी क्वचित्च केली असेल! विचार पारखून घेण्याची त्यांची ही असामान्य शक्ति लक्षांत घेतली म्हणजे त्यांचें स्थान राजवाडे, डॉक्टर केतकर वगैरेंच्या पंक्तींतच आहे हें त्यांना संशयात्मा म्हणणाऱ्या टीकाकारांनाही कबूल करावें लागेल. त्यांचा 'नीतिशास्त्र-प्रवेश' हा ग्रंथ एके काळीं गीतारहस्यासारख्या जो लोकप्रिय झाला होता तो कुठल्याही प्रश्नाचें सर्व पापुद्रे दूर करून प्रामाणिकपणानें त्याच्या गाभ्याला हात घालण्याच्या त्यांच्या या अपूर्व शक्तीमुळेंच! साक्रेटिसाच्या संवादासारखें त्यांचें पुस्तक दीर्घकाळ लोकांच्या वाचनांत राहिलें नाहीं. पण त्यांच्या नीतिशास्त्र-प्रवेशाला मराठी शास्त्रीय वाङ्मयांत नेहमींच मानाचें स्थान मिळेल.

या ग्रंथाचें वैशिष्ट्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या एका व्याख्यानांतील खालील संकलित उद्गारांवरून दिसून येईल. नीतिशास्त्र प्रवेश लिहिणाऱ्या वामनरावांच्या कर्तृत्वाचें मूल्यमापन करतांना ते म्हणतात :

> नीतीचा विकास कसा होत आहे याविषयीं वामनरावांचें उत्तर संशयवादी नाहीं. हळुवार मूल्यें, मधुर कल्पना आणि सुंदर विचार यांनीं नटलेलें सौजन्य वामनरावांच्या लेखणींत आहे. कोणाच्याही श्रद्धेला ते धक्का देत नाहींत. एखाद्या उच्च सर्जनसारखे ते कुशल आहेत. त्यांची पद्धत म्हणजे जणुं रोग्याला शस्त्रक्रियेसाठीं दिलेला क्लोरोफॉर्म! तींत वकिली नाहीं, अभिनिवेश नाहीं. मनुष्याचें जें पावित्र्याचें शिखर त्यावर उभें राहून मानवी संस्कृतीचा विकास होईल अशा दृष्टीनें ते जगाकडे पाहत आहेत. संदेश द्यायला ते धांवले नाहींत. तितके ते विनयी व खरे तत्त्वजिज्ञासु आहेत. सतत ते नीतीच्या प्रवाहांत राहिले आहेत. तर्काचे बंध कुठेंही सुटलेले नाहींत. तर्कांच्या तटांच्या मर्यादेंत त्यांची ज्ञानगंगा वाहत आहे. योग्य ठिकाणीं बर्गसाँ सारख्यांच्या तर्कटावर त्यांनीं आघात केले आहेत......त्यांनीं सुखवादावर केलेले आघात फार चांगले आहेत. मिलच्या जनहितवादावर ते थोडा वेळ स्थिर झाले. पुष्कळांचें पुष्कळ सुख नाहीं तर हित हा महत्त्वाचा मुद्दा ते मान्य करतात. इथपर्यंत जाऊन ते आत्मविकासाकडे परत येतात. पण त्यांचा आत्मा वेदांतला किंवा उपनिषदांतला निरहंकार, निर्गुण, निर्लेप, निराकार असा नाहीं. तो सगुण आत्मा आहे. अचिंत्य, अव्यक्त, अज्ञेय, असा

तो आत्मा नाहीं. तर विचार, विकार, इंद्रियवासना, मंगल भावना त्याला आहेत. त्याला चिच्छक्ति आहे, जाणीव आहे. संसारांतला आनंद घेणारा तो मानवी आत्मा आहे.

या आत्म्यांतून त्यांनीं विकासवादी नीतीचा पाया घातला आहे. स्वतःच्या जीवनाशीं आणि त्याच्या विकासाशीं जें संवादित्वानें जुळतें ती त्यांची नीति आहे. आत्मप्रामाण्य हा या नीतीचा बिंदु आहे. तिच्यांतून सर्व नीतीचीं मूल्यें निघतात. नुसता तार्किक नियम हा या ज्ञानाचा सांपळा आहे. त्यांत अनुभवाचा रस हवा.

ध्येय हा त्यांचा देव आहे. देव माणसानें निर्माण केला आहे. माणसाचें अंतःकरण हें त्या देवाचें मंदिर आहे. इतर ध्येयें बदलत असतील. पण, आत्मविकास हें ध्येय बदलत नाहीं.

वामनरावांच्या तत्त्वविवेचनाच्या पद्धतीवरून त्यांना संशयात्मा म्हणण्याची वहिवाट महाराष्ट्रांत पडली. पण वस्तुतः ते संशयवादी नाहींत. भावनेप्रमाणें बुद्धीच्याही मर्यादा ते ओळखतात एवढेंच! समाजरचना काय, किंवा नीति-नियम काय ज्या मनुष्यासाठीं बदलायचे त्याची विकासशक्ति किती आहे याचीहीं त्यांना कल्पना आहे. केवळ मूर्तिभंजनानें नवें जग निर्माण होत नाहीं. मानवी मन हें विचारापेक्षां भावनेला चटकन् वश होत असल्यामुळें जीवनांतल्या सर्व समस्यांचा उलगडा केवळ तर्कानें होऊं शकत नाहीं. या व अशाच प्रकार-च्या इतर गोष्टी लक्षांत घेऊन वामनराव कोणत्याही प्रश्नाविषयीं मत देतांना त्याच्या सर्व मर्यादा पाहतात. दुसऱ्या बाजूची प्रामाणिक जाणीव, मानवी मनाच्या अपूर्णतेची खात्री, हा जो त्यांचा महत्त्वाचा गुण तोच लोकांच्या दृष्टीनें त्यांचा मोठा अवगुण ठरला! पण तो खरोखर संशयवाद नव्हता; तात्त्विक दृष्ट्या तो सौजन्यवाद होता. आगगाडींतून उतारू परठिकाणीं सुरक्षितपणें घेऊन जायची जबाबदारी ज्याच्यावर असते तो इंजिनाइतकेंच ब्रेकलाही महत्त्व देतो. वामनरावांची विवेचकता अशी व्यवहारसन्मुख होती. प्रचलित विवाहसंस्थे-विषयीं त्यांनीं एके ठिकाणीं केलेलें विवेचन या मनोवृत्तीचेंच दर्शक आहे. ते म्हणतात :

विवाहसंस्थेंत अर्थ नाहीं, व्यभिचारांत कांहींच पाप नाहीं, किंबहुना व्यभिचार या शब्दाला अर्थच नाहीं, तत्कालीन प्रेरणेवर,

वासनेवर किंवा प्रेमावर स्त्री-पुरुषसंबंध आधारलेले असावेत हा उपदेश समाजाला अपायकारक आहे. आज विवाहसंस्थेमुळें कोंडमारा होत आहे वगैरे सगळ्या गोष्टी मान्य; पण आजचे निर्बंध अजिबाद काढून टाकले तर कोंडमारा आजच्यापेक्षां अधिक होईल अशी मला भीति वाटते. हें म्हणणें चमत्कारिक दिसेल, पण तें खरें आहे. आजचे निर्बंध कांहींसे अंगवळणीं पडलेले आहेत. लोकमताचा आणि कायद्यांचा त्यांना जबरदस्त पाठिंबा आहे. त्यामुळें मन कितीही ओढाळ असलें तरी तें आटोक्यांत ठेवणें सुलभ नाहीं तरी कांहीं अंशीं तरी शक्य होतें. पण निर्बंध दूर केल्यास कुठल्याही स्त्रीकडे कुठल्याही पुरुषाचें मन धांवेल आणि मग नियमन करण्याचीं सध्यांचीं कारणें नष्ट झाल्यामुळें आणि सर्व वासनांचें सर्व काळीं समाधान होणें शक्य नसल्यामुळें कोंडमारा अधिक होईल आणि तो अधिक जाचक होईल. मोटारी डाव्या बाजूनें न्याव्यात व भर रस्त्यांतून अमुक वेगापेक्षां अधिक वेगानें चालवूं नयेत, अशा प्रकारचे विधिनिषेधात्मक कृत्रिम समाजकृत नियम कित्येक वेळां नाहक जाचक होणारे असतील. पण सगळे लोक समंजस आहेत, ते स्वातंत्र्याचा दुरुपयोग करणार नाहींत, हें गृहीत धरणें साध्या मोटारी चालविण्याच्या बाबतींत जर धोक्याचें आहे, तर तें दुर्दमनीय अशा कामवासनेच्या बाबतींत किती धोक्याचें असेल याची कल्पना करावी ! ज्या नियमनांच्या योगें सुव्यवस्था राहते, आणि ज्यांच्या अभावीं सामाजिक अनवस्था प्रसंग येण्याचा संभव असतो तीं नियमनें इष्ट असतात. तीं असावींत, किंबहुना तीं राहूं द्यावींत असा आग्रह धरावा. इतकेंच नव्हे तर अशीं नियमनें असणें यांतच संस्कृति-रक्षणाचें व वर्धनाचें बीज असल्यामुळें—संस्कृति त्यामुळेंच शक्य असल्यामुळें— तीं नियमनें असणें हा एक आपल्या सामाजिक व्यवस्थेचा पाया आहे. 'Restraints are our rights' असें बर्कनें म्हटलें आहे तें याच अर्थानें !'

वामनरावांचे असले विचार वाचून ते सनातनी झालेले सुधारक होते असें म्हणण्याचा मोह अनेकांना होईल. पण ते सनातनीही नव्हते आणि क्रांतिकारकही नव्हते. ते सुधारक होते. स्वतः अधिक चांगलें होऊं इच्छि-

णाऱ्या, जगांतलीं दुःखें कमीं व्हावींत म्हणून प्रामाणिकपणें प्रयत्न करणाऱ्या सत्प्रवृत्त सामान्य मनुष्याचे ते प्रतिनिधि होते.

वामनरावांचे अशा प्रकारचे विवेचक लेख वाचीत असतांना राहून राहून एक गोष्ट मनांत आल्यावांचून रहात नाहीं. ती म्हणजे जोड, रसेल, हक्स्ले वगैरे निबंधकारांप्रमाणें सामाजिक प्रश्नांकडे समतोलपणानें पाहाणारा त्यांचा चिकित्सक दृष्टिकोन-सत्यसंशोधनाच्या एकमेव हेतूनें कुठल्याही गोष्टीचें पृथक्करण करण्याची त्यांची पात्रता. समाजांत मोठमोठीं मानलीं जाणारीं माणसें बहुधा तीव्र बुद्धीचीं पण उथळ मनाचीं असतात. तीं जुन्याची पूजा करोत वा निंदा करोत, नव्याचा स्वीकार करोत अथवा तिरस्कार करोत, त्यांच्या अभिप्रायाला शास्त्रीय दृष्टीचा, जीवनविषयक निश्चित तत्त्वज्ञानाचा अथवा प्रामाणिकपणानें घेतलेल्या विविध अनुभवांचा आधार असत नाहीं. मानवी जीवनांत चिरंतन व क्षणभंगुर मूल्यांचा संकर नेहमींच चाललेला असतो. क्षणभंगुरता चिरंतनाला पराभूत करीत आहे हें दृश्यही तिथें वारंवार दृष्टीला पडतें. तांदळांतले खडे जसे डोळे फोडून वेचून काढावे लागतात, तशीं शाश्वत मूल्यापासून क्षणिक मूल्यें विचारवंतांना निराळीं करून दाखवावीं लागतात. सामान्य मनुष्याच्या किंवा पैसा, प्रतिष्ठा, सत्ता इत्यादिकांच्या बळावर त्याचें पुढारीपण करणाऱ्या व्यक्तींच्या अंगीं ही सूक्ष्म दृष्टि सहसा असत नाहीं. पण ही दुर्मिळ गोष्ट स्वभावतःच वामनरावांना साध्य झाली होती. आयुष्यांतल्या अनुभवांनीं त्यांची ही दृष्टि सूक्ष्मतर केली. कालचीं फुलें आज निर्माल्य होतात. कालची नीति आणि कालच्या चालीरीतीही आज तशाच निरुपयोगी वाटूं लागतात. पण बकुळीचीं फुलें सुकलीं तरी त्यांचा सुगंध जसा दीर्घकाल टिकतो, त्याप्रमाणें परंपरागत संस्कृतींतही जीवनपोषक अशा अनेक गोष्टी असतात. वामनरावांना या सत्याची परिपूर्ण कल्पना होती. त्यामुळें नव्या विचारांचा पुरस्कार करतांनाही त्यांच्या मर्यादा आणि त्यांतून निर्माण होणारीं सुखें आणि संकटें यांचें ते चटकन् आकलन करूं शकत. 'सुशीलेच्या देवा' मध्यें लहानपणीं दगडी देवाच्या मूर्तीला नमस्कार करणाऱ्या मुलीचा जीवनविकास होतां होतां तिला ध्येय हाच आपला देव कसा वाटूं लागतो, याचें चित्र ते या शक्तीमुळेंच सहृदयपणानें रंगवूं शकले. त्यांच्या या शक्तीचा उगम तर्ककर्कश पण सहृदय, आत्मनिष्ठेला न दुखवितां वस्तुनिष्ठ होऊं शकणाऱ्या, मनुष्यमात्रांतल्या दोषांचा

तीं स्वाभाविक मानसिक व्यंगें आहेत असें मानून तिरस्कार न करणाऱ्या, आणि मनुष्य जसा नुसता बुद्धिजीवी होऊन सुखी होणार नाहीं तसें केवळ भावना-विवशतेनेंही त्याचें जीवन सफल होणार नाहीं हें ओळखणाऱ्या त्यांच्या श्रेष्ठ व्यक्तित्वांत होता. या व्यक्तित्वाचा आविष्कार करणारें विवेचनात्मक लेखन त्यांच्या हातून अधिक व्हायला हवें होतें. त्या लेखांनीं मराठी निबंध-वाङ्मय निःसंशय संपन्न केलें असतें.

४

वाङ्मयीन टीकाकार या नात्यानेंही वामनरावांचें स्थान असेंच मोठें आहे. त्यांचें वाङ्मयप्रेम हरिभाऊ आपटे, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि न. चिं. केळकर यांच्याइतकेंच उत्कट होतें. साहित्याची सूक्ष्म मीमांसा करण्याची त्यांची शक्तिही या थोर विवेचकांइतकीच सूक्ष्म आणि प्रगल्भ होती. 'विचार–सौंदर्य' या पुस्तकांतल्या 'केळकर व कांहीं साहित्यविषयक प्रश्न', 'कादंबरीकार डॉ. केतकर', 'वाङ्मयाची प्रवृत्ति व त्याचीं ध्येयें', 'वाङ्मय-कालनिष्ठ कीं व्यक्तिनिष्ठ?' या लेखांत त्यांच्या या शक्तीचा मनोहर विलास आढळतो. 'प्रेम कीं लौकिक', 'दुटप्पी कीं दुहेरी' वगैरे त्यांचीं परीक्षणेंही रसाळ व मार्मिक उतरलीं आहेत. 'वाङ्मयकलाविषयक माझी दृष्टि' या आपल्या लेखांत त्यांनीं अगदीं थोडक्यांत व्यक्त केलेलें कलेविषयींचें मत मराठी साहित्यिकांना दीर्घकाळ मार्गदर्शन करीत राहील यांत शंका नाहीं. ते म्हणतात —

> 'थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कला ही उपदेशगर्भ असलीच पाहिजे असें नाहीं, हें त्रिवार सत्य आहे. कलाकृतीमध्यें कलेचे नियम सांभाळले पाहिजेत, आणि हे नियम सांभाळून कलात्मक आनंद देणें हेंच कलावंताचें खरें कार्य! पण कलाकृतींत कलावंताच्या मनाची खोली, प्रगल्भता, विवेकशीलता, मार्मिकता ज्या मानानें दिसेल त्या मानानें त्या कलाकृतीची किंमत कमी अधिक ठरेल. या गुणांच्या अभावीं ती कलाकृति सुंदरही दिसूं शकेल. पण तें सौंदर्य दिखाऊ, पोकळ असण्याचा संभव आहे. क्वचित्प्रसंगीं हें सौंदर्य सापाच्या किंवा वाघाच्या किंवा कला-

वंतिणीच्या सौंदर्याप्रमाणें घातुकही होऊं शकेल. असें होऊं न देण्याचा प्रयत्न करणें अवश्य आहे. कलाकृति मोहक असावी. पण भलता मोह तिनें घालूं नये हें सर्वांगीण जीवनाच्या दृष्टीनें उचित आहे.'

वामनरावांची साहित्यविषयक दृष्टि जशी पढिक नव्हती तशी ती केवळ विश्लेषणात्मकही नव्हती. कलेच्या निर्मितींत संयोजनाचा भाग अधिक असतो ह्याची त्यांना, ते स्वतः श्रेष्ठ दर्जाचे ललित लेखक असल्यामुळें, पूर्ण कल्पना होती. मनाच्या समतोलपणामुळें कंपू, पक्ष, परंपरा, संप्रदाय इत्यादिकांच्या आहारीं ते कधींच गेले नाहींत. अवास्तव आत्मसमर्थन करण्याचा मोह सुद्धां त्यांना कधीं झाला नाहीं. जीवनाच्या गाभ्याचें दर्शन कलाकृतींत झाल्याशिवाय तिला चिरंतन सौंदर्य लाभूं शकत नाहीं, ही श्रद्धाही अंतर्मुख वृत्तीमुळें त्यांच्या ठिकाणीं अविचल होती. अशा विविध गुणांनीं संस्कारित झालेल्या विवेचक प्रतिभेच्या हातून साहित्यशास्त्रावरला अधिकारपूर्ण ग्रंथ निर्माण झाला असता तर आज त्या शास्त्रावरल्या अनेक नकली पुस्तकांना जें अकारण व अवास्तव महत्त्व प्राप्त झालें आहे, त्याला निःसंशय आळा बसला असता!

## ५

विवेचक निबंधकार म्हणून वामनरावांची योग्यता मोठी असली तरी अशा लेखनाचा वाचकवर्ग आपल्याकडे अद्यापि मर्यादित असल्यामुळें या क्षेत्रांत कार्य करणाऱ्या साहित्यिकाला लोकप्रियता मिळतेच असें नाहीं. पण वैचारिक वाङ्मयाची गोडी असणाऱ्या वाचकांप्रमाणें केवळ ललित वाङ्मय आवडीनें वाचणाऱ्या वाचकांतही वामनरावाचें नांव प्रेमादरानें उच्चारलें जातें तें मुख्यतः त्यांच्या कादंबऱ्यांमुळें! त्यांच्या गोष्टी फार मध्यम होत्या. आणि त्यांचें नाटक तर गोष्टींहूनही नीरस उतरलें. या दोन्ही क्षेत्रांत यशस्वी व्हायला प्रतिभेची जी घडण असावी लागते ती वामनरावांच्यांत जवळ जवळ अभावरूपानेंच होती. त्यांच्या कादंबऱ्यांत सुद्धां कथाकथन आणि नाट्यदर्शन या बाबतींत त्यांचें विशिष्ट असें चातुर्य कधींच प्रगट झालें नाहीं.

वामनरावांनीं जवळ जवळ तीस वर्षांच्या लेखनकालांत पांच कादंबऱ्या लिहिल्या. या पांचापैकीं 'नलिनी' ही कधींच लोकप्रिय होऊं शकली नाहीं.

ती ' रागिणी 'ची धाकटी बहीण असल्यामुळें मागें पडली अशी वामनरावांची समजूत होती. ' नकटं व्हावं पण धाकटं होऊं नये ' असे तिच्याविषयीं त्यांनीं वात्सल्यानें एके ठिकाणीं उद्गारही काढले आहेत. पण ' नलिनी ' लोकप्रिय न होण्याचीं कारणें मुख्यत: वाङ्मयीनच आहेत. या कादंबरींत थोडासा देश-भक्तीचा भाग असला तरी ' रागिणी ' सारखी किंवा ' सुशीलेच्या देवा ' सारखी बौद्धिक आनंद देण्याची शक्ति तिच्यांत नाहीं. ' रागिणी ' च्या कथा-नकांत अद्‌भुततेबरोबरच उदात्ततेच्याही छटा आहेत. भय्यासाहेबांचें प्रामाणिक धर्मवेड, पुनर्विवाह करावा कीं करूं नये या कोड्यांत पडलेली सालस रागिणी, जिभेवर नक्षत्र पडलेली पण मनानें नक्षत्राहूनही निर्मळ असलेली उत्तरा, इत्यादिकांमुळें ' रागिणींत ' जो गोडवा उत्पन्न झाला आहे तो ' नलिनींत ' आढळत नाहीं. नलिनीच्या कथेंत रहस्यमयता आहे. पण रहस्यपूर्ण कथानकाची आकर्षक मांडणी करायला जें कसब लेखकाच्या अंगीं असावें लागतें तें वामन-रावांच्या पाशीं नव्हतें. त्यामुळें केवळ कथानकाच्या ओढीमुळें एकदां हातीं घेतली कीं खालीं ठेववत नाहीं अशा तऱ्हेचीही ती कादंबरी होऊं शकली नाहीं. महाराष्ट्र ज्या वामनरावांवर प्रेम करतो त्यांचें दर्शन या कथेंत त्याला फार कमी प्रमाणांत होतें !

' आश्रमहरिणी ' वामनरावांची ' रागिणी 'पेक्षांही आवडती कादंबरी होती. मातापित्यांना आपलें कोणतें अपत्य अधिक आवडतें आणि तें कां आवडतें याविषयीं कांहीं निश्चित नियम सांगतां येणार नाहीं. पुस्तकांच्या बाबतींतही तसेंच घडतें. या कादंबरिकेंतलें कथानक लहान व सुटसुटीत आहे. एका आधुनिक सामाजिक प्रश्नाला पौराणिक वेष दिल्यामुळें व त्या पौराणिक वेषांत सर्वत्र व सर्वकाल सुसंगतता राखण्याची लेखकानें दक्षता बाळगल्यामुळें पहिल्या वाचनाच्या वेळीं रुचिपालट म्हणून ही कथा मन वेधून घेते. तिच्यांत थोडेंसें काव्यात्मक वातावरणही आहे पण वामनरावांची सर्वस्पर्शी वैचारिकता आणि वाचकाला ज्ञानगर्भ आनंद देणारी त्यांची मार्मिक तत्त्वचर्चा ह्या गोष्टी—या कथेचा विषय या गुणांना अनुकूल असूनही—तिच्यांत फार कमी प्रमाणांत आढळतात. एका स्त्रीनें दोन पतींची पत्नी म्हणून राहणें हा या कथेचा क्रमप्राप्त शेवट करायला वामनराव पहिल्यांदा कचरले. नंतरच्या आवृत्तींत त्यांनीं तो केला. पण या घटनेंत जी भावनांची विचित्र गुंतागुंत आहे, जो

विचारांचा विविध संघर्ष आहे, त्यांचा उठाव प्रसंगांच्या अथवा मानसिक द्वंद्वांच्या द्वारें वामनरावांनीं फारसा केलेला नाहीं.

त्यांच्या उरलेल्या तीन कादंबऱ्या मात्र त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तित्वाचा आणि विचारनिष्ठ प्रतिभेचा विकास कसा होत गेला हें अगदीं सहज दर्शवूं शकतात. हरिभाऊंनीं लोकप्रिय केलेली संमिश्र कथानकाची पद्धतिच त्यांनीं 'रागिणींत' स्वीकारली. पण हरिभाऊंची पल्लेदार प्रतिभा स्वभावतः कथाकाराची आहे. वामनरावांची अंतर्मुख प्रतिभा मानवताप्रेमी तत्त्वचिंतकाची आहे. कथाकार हरिभाऊंची कल्पकता एखाद्या स्वैरसंचारी रानपांखराप्रमाणें वाटते; कथाकार वामनरावांची कल्पकता कमळांत बंदिवान होऊन तिथें गुंजत राहणाऱ्या भृंगासारखी भासते. हा मोठा भेद दृष्टीआड केला तर या दोघा थोर कादंबरीकारांत अनेक साम्यस्थळें आहेत. दोघेही स्वभावानें मोठे सहृदय! भोंवतालच्या सुखदुःखाशीं चटकन् समरस होणारे! [समाजांत जिथें जिथें जुलूम चालला आहे, अन्याय थैमान घालीत आहे, असत्य उजळ माथ्यानें मिरवत आहे, तिथें तिथें त्याला विरोध करण्याकरितां उभें रहावें आणि साऱ्या ढोंगांचें, जुलमांचें, अन्यायांचें आणि असत्यांचें निर्मूलन करण्याची प्रेरणा सर्वसामान्य मनुष्यांत निर्माण करावी, ही प्रवृत्ति] दोघांतही सारखीच प्रबळ आहे. पण हरिभाऊंच्यांत श्रेष्ठ कथाकाराला आवश्यक असलेले बहुतेक सर्व गुण मोठ्या सुंदर रीतीनें सम्मीलित झाले आहेत. एकीकडे क्षणोक्षणीं उत्कंठा वाढविणारें कथानक गुंफीत असतांनाही दुसरीकडे मानवी मनाचे पापुद्रे आणि मनुष्यस्वभावांतल्या किचकट गुंतागुंती ते नाजुक हातानें उलगडून दाखवीत असतात. ऐतिहासिक कादंबरींतला एखादा भव्य किंवा उत्कट प्रसंग वर्णन करतांना त्यांची प्रतिभा जशी फुलून जाते, तशीच सामाजिक कादंबरींत एखाद्या दरिद्री पण स्वाभिमानी मुलाचें किंवा स्वतःच्या काडीचाही अपराध नसतांना सक्तीनें दुःखाला मिठी मारावी लागणाऱ्या तरुणीचें चित्रण करतांनाही, ती आपलें भान विसरून जाते. पहिल्या प्रतीच्या कथाकाराचें हें सव्यसाचित्व वामनरावांच्यांत नव्हतें. वामनरावांच्या मागून आलेले लोकप्रिय कादंबरीकार प्रो. फडके हे प्रतिभेच्या भव्यतेंत, विविध रसांच्या चित्रणांत, चिंतनामुळें येणाऱ्या द्रष्टेपणांत, किंवा सर्वसामान्य मनुष्याशीं समरस होण्याच्या शक्तीमुळें कथेमधें उत्पन्न होणाऱ्या जिव्हाळ्यांत हरिभाऊंची बरोबरी कधींच करूं शकले

नाहींत. पण प्रसन्न ओघवती भाषा, सुटसुटीत सांचेबंद कथानक व जनमनाला चटकन् आवाहन देणाऱ्या कांहीं स्थूल व सूक्ष्म भावनांचें रेखीव चित्रण हीं जीं प्रो. फडक्यांचीं वैशिष्ट्यें तींही वामनरावांच्यांत नाहींत. असें असूनही मराठी कादंबऱ्यांच्या इतिहासांत त्यांचें स्थान हरिभाऊ व फडके यांच्या इतकेंच महत्त्वाचें आहे. या तिघा कादंबरीकारांची तुलना करतांना माझ्या डोळ्यांपुढें तीन चित्रें नेहमीं उभीं राहतात. हरिभाऊ म्हणजे समुद्र-क्षितिजापर्यंत नाचत जाऊन मावळतें सूर्यबिंब पकडूं पाहणारी, पर्वतप्राय लाटांच्या खळखळाटानें क्षणोक्षणीं निनादून जाणारी, मोठमोठ्या गलबतांना आणि जहाजांना लीलेनें आपल्या पृष्ठभागावर खेळण्यांप्रमाणें नाचविणारी जीवनाची प्रतिनिधि असलेली शक्ति! प्रो० फडक्यांची कादंबरी म्हटलें कीं एक प्रसन्न विस्तीर्ण तलाव डोळ्यांपुढें उभा राहतो. या तलावांत कमळें फुलतात. तिथें चांदण्या रात्रीं नौकाविहार चालतो. या जलाशयाच्या कांठावर गुलहौशी मंडळी हवा खाण्याकरितां येऊन बसतात आणि वायुलहरींनीं त्याच्यावर उठणारे मंद मंद तरंग पाहून मोहून जातात. पण त्याच्यांत जसें सागराच्या भव्यतेचें दर्शन होत नाहीं, तसें नदीचें प्रवाहित्वही आढळत नाहीं. [वामनरावांची कादंबरी मात्र रानावनांतून वाहत येणाऱ्या एखाद्या नदीसारखी आहे. ती जातां जातां भोंवतालचा भूभाग समृद्ध बनविते, अनेक नगरांना जीवनदान करते, ठिकठिकाणची घाण पोटांत घालून ती निर्मळ करीत करीत ती आपला मार्ग आक्रमते. तिच्यांत सागराची विशालता नाहीं, आणि तलावाचा रेखीवपणा नाहीं. पण लहानशी का होईना ती गंगा आहे.]

• कथाकार वामनरावांचें हें स्वरूप 'सुशीलेचा देव' आणि 'इंदु काळे व सरला भोळे' या दोन कादंबऱ्यांत मोठ्या आकर्षक रीतीनें प्रगट झालें आहे. 'सुशीलेच्या देवांत' 'रागिणी' प्रमाणें केवळ काव्यशास्त्रविनोदात्मक अशा चर्चा नाहींत. [एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस जन्माला आलेल्या एका मध्यम वर्गीय महाराष्ट्रीय मुलीच्या मनांत आणि जीवनांत ज्या समस्या उत्पन्न होतात त्या सोडविण्याचा वामनरावांचा या कादंबरींतला प्रयत्न जितका प्रामाणिक तितकाच प्रतिभाप्रेरित आहे. जीवनविषयक महत्त्वाच्या प्रश्नांच्या अनेक बाजू या कादंबरींत मोठ्या परिणामकारक रीतीनें मांडल्या गेल्या आहेत. हिच्या पूर्वार्धापेक्षां उत्तरार्धांत विचारात्मक भाग अधिक आहे हें खरें! पण एका

आधुनिक तरुणीचा आत्मविकास हाच या कादंबरीचा आत्मा असल्यामुळें तो विस्तार कुठेंही अवजड अथवा अवास्तव वाटत नाहीं. [त्यांतलें विचारदर्शन दुधांत मिसळलेल्या साखरेसारखें आहे; तें कपड्याला लावलेलें अस्तर नाहीं.] 'रागिणी' किंवा 'नलिनी' प्रमाणें या कादंबरींत हरिभाऊंची संमिश्र कथानकाची पद्धत वामनरावांनीं स्वीकारली नाहीं. त्यांच्या प्रतिभेच्या स्वातंत्र्याचें हें मोठें लक्षण आहे. [ज्याला कांहीं पोटतिडिकेनें सांगायचें आहे असा प्रतिभासंपन्न लेखक आपल्या आविष्काराला योग्य असेंच तंत्र शोधीत जातो] हें या कादंबरीवरून सहज दिसून येईल. विशेषतः 'सुशीलेच्या टीपा व तिच्या आत्मचरित्रांतील भाग' अशा सारख्या प्रकरणांनीं वामनरावांनीं वास्तवतेचा जो आभास निर्माण केला आहे तो मोठा मजेदार आहे. [एका व्यक्तीचा मनोविकास चित्रित करतांना त्याच्या द्वारें अनेक गुंतागुंतीच्या सामाजिक प्रश्नांवर झगझगीत प्रकाश टाकण्याचें वामनरावांचें या कादंबरींतलें कौशल्य विचारप्रवण वाचकांना सदैव आल्हाद देत राहील. 'यशवंतराव खरे' मध्यें हरिभाऊंनीं असाच एक मनोविकासाचा मोठा मनोज्ञ आलेख काढला आहे. पण तो मुख्यतः भावनात्मक आहे. यशवंतरावाच्या मनाचे विविध पैलू व सामाजिक संघर्षांतल्या अनेक अनुभूतींच्या त्यांच्यावर होणाऱ्या क्रियाप्रतिक्रिया यांचें हरिभाऊंनीं केलेलें रेखाटन अतिशय सूक्ष्म आणि सरस आहे.] वामनरावांचें सुशीलेचें चित्रण त्या मानानें अधिक विचारप्रधान आहे. देवविषयक कल्पनांचा विकास या सूत्राभोंवतीं केलेली तिच्या जीवनाची गुंफण एखाद्याला थोडीशी कृत्रिमही वाटण्याचा संभव आहे. असें असलें तरी शिंप्यानें अंगाचें मोजमाप घेऊन कपडे बेतावेत त्याप्रमाणें एखादें तत्त्व प्रतिपादन करण्याकरितां तयार केलेलें कथानक असें मात्र या कादंबरीचें स्वरूप मुळींच नाहीं. तिच्यांत एक प्रकारची साहजिकता आहे; सजीवता तर निःसंशय आहेच आहे.

महाराष्ट्रांतल्या मध्यम वर्गांतल्या स्त्रीनें गेल्या दोन पिढ्यांत निरनिराळ्या मानसिक आणि सामाजिक संघर्षांना तोंड देत देत आपली जी प्रगति करून घेतली तिचें संकलित चित्रण सुशीलेच्या जीवनकथेंत आहे. समाजवादी तत्त्वज्ञानाचा मध्यमवर्गाच्या मनावर होऊं लागलेला परिणाम याच मराठी कादंबरींत पहिल्यानें चित्रित केला गेला असें म्हणायला हरकत नाहीं. 'रागिणी' तल्या तत्त्वचर्चेंत बौद्धिक कसरतीचा जो भाग होता तो या कथेंत सहसा दृग्गोचर

होत नाहीं. उलट मानवी मनाची विविधता, आर्द्रता आणि प्रगतिपरता चित्रित करण्यांत वामनरावांनीं ' रागिणी 'पेक्षां या कादंबरींत फार मोठी प्रगति केली आहे. ' सुशीलेच्या देवा'वरल्या आपल्या मार्मिक टीकेंत शेजवलकर म्हणतात,

' पात्रांचीं मनें व वाचकांचीं मनें क्षणभर तरी समरस होणें यांत कादंबरीकाराच्या वर्णनाचें कौशल्य सांठविलेलें असतें. असें कौशल्य दाखविणारे प्रसंग या कादंबरींत वरेच आहेत. सुनंदा तुरुंगांतून आल्या-नंतर जेव्हां त्याला कोणी भेटण्यासही धजत नव्हता, तेव्हां आपल्या ह्या बुद्धिमान शिष्यास—त्याचें आचरण आपल्या मताच्या अगदीं विरुद्ध असूनही—भेटीस बोलावणाऱ्या गिरिधररावांच्या मनाचें चित्र वामन-रावांनीं फारच हृदयस्पर्शी रीतीनें रंगविलें आहे. ' गप्प बैस, मला हें ऐकवत नाहीं. ' ( Don't talk of that. I cannot bear it. ) हे शब्द गहिंवरलेल्या गिरिधररावांच्या तोंडून बाहेर पडतात तेव्हां डोळ्यां-तून अश्रु न येणारा वाचक असेल असें आम्हांस वाटत नाहीं. '

असले छोटे पण हृदयंगम प्रसंग वर्णन करणाऱ्या लेखकाच्या अंगीं, हस्ति-दंताच्या लहानशा तुकड्यावर सुबक काम करायला लागणारें कौशल्य असावें लागतें. वामनरावांनीं तें हस्तगत केलें होतें. ज्यांत भावनेचें चांदणें फुललें आहे असे प्रसंग रंगविण्यांत ते चतुर नव्हते. पण विद्युल्लतेप्रमाणें क्षणभर चमकून आणि तेवढ्या वेळांत सारें आकाश उजळवून टाकणाऱ्या भावनेचें चित्रण मात्र त्यांना चांगलें साधे. ' देशभक्त मेला, शाळेला सुट्टी ' हें ' इंदु काळे व सरला भोळे ' मधलें छोटें प्रकरण या दृष्टीनें मोठें वाचनीय आहे.

किंबहुना जीवनांतली हृदयंगमता व हृदयविदारकता लहान सहान प्रसंगां-च्या द्वारानें चित्रित करण्यांत व्यक्त होणाऱ्या या कौशल्यामुळेंच ' इंदु काळे व सरला भोळे ' ही कादंबरी इतकी सरस झाली आहे. केवळ बाह्य घटनांवर, निरगांठ आणि सुरगांठसारख्या तंत्रावर, किंवा निवेदनाच्या सौंदर्यावर कादंबरी अवलंबून ठेवणाऱ्या एखाद्या लेखकाला ही कथा लिहायला तीनचारशें पानें सुद्धां पुरलीं नसतीं. तसें पाहिलें तर असल्या कलावंतांना खमंग वाटणारा माल-मसाला या कादंबरीच्या सांगाड्यांत भरपूर आहे. त्यांत तीन प्रेमकथा आहेत, दोन संसारकथा आहेत, तुरुंग आहे, केवळ कलेच्या आकर्षणामुळें परपुरुषा-

कडे ओढली जाणारी तरुणी आहे, सर्व कांहीं आहे. पण वामनरावांच्या अंतर्मुखतेमुळें या सर्व प्रसंगांतल्या भडकपणाला या कादंबरींत दुय्यम स्थान मिळालें आहे. त्यांचें सारें लक्ष बाह्य संघर्षापेक्षां आंतरिक संग्रामाकडे आहे, कृत्रिम परिणामकारकतेपेक्षां खरीखुरी जीवनमूल्यें पारखून घेण्याकडे आहे. माणसांवर कोणते प्रसंग येतात यापेक्षां त्या प्रसंगांत तीं कशीं वागतात, त्यांच्या मनावर सुखदुःखांच्या आणि संपत्तिविपत्तींच्या प्रतिक्रिया कशा होतात, मोठमोठ्या अपघातांपेक्षांही त्यांच्या मनांतले अंतःकलह जीवनाच्या दृष्टीनें किती महत्त्वाचे असतात, हें वामनरावांना सांगायचें असल्यामुळें आपल्या प्रकृतिधर्माला अनुरूप अशाच तंत्राचा आणि आविष्कारपद्धतीचा त्यांनीं या कादंबरींत अवलंब केला आहे. [चेकॉव्हनें एके ठिकाणीं म्हटलें आहे, ‘ माणसें उत्तर ध्रुवावर जाऊन मोठमोठ्या बर्फाच्या डोंगरावरून पडल्यामुळें कांहीं जीवनांतलें नाट्य उत्पन्न होत नाहीं ! तीं कोबीचा रस्सा खातात, कचेऱ्यांत आपापल्या कामाला जातात आणि स्वतःच्या बायकोवर जसें प्रेम करतात तशीं तिच्याशीं भांडतातही ! सर्वसामान्य जीवनक्रम हा असा आहे. यांतूनच हृदयंगम कथा उत्पन्न होतात. ’ उत्कंठा, विस्मय, नाट्य, वगैरे कथेला आवश्यक मानल्या जाणाऱ्या गुणांविषयीं वामनरावांचें मत थोडेंफार असेंच असावें !]

असहकारितेची चळवळ सुरू होतांच ‘इंदु काळे व सरला भोळे’ या कादंबरीचा नायक विनायकराव सत्याग्रहांत भाग घेतो, आणि त्याला दीड वर्षाची शिक्षा होते. वामनरावांनीं स्वतः कारागृहवासाचें दुःख अनुभवलें होतें. त्या दगडी भिंतींच्या आंत जो ओलावा असतो त्याची गोडीही त्यांनीं चाखली होती. विनायकरावाचें लग्न १९१९–२० मध्यें झालेलें. १९२१ अखेर तो तुरुंगांत जातो. त्याच्या संसारांतला तो वसंतऋतु होता. अशा वेळीं त्याला तुरुंगांत पत्नीची आठवण होणें कांहीं अस्वाभाविक नाहीं. पण या दीड वर्षाच्या तुरुंगवासांत विनायकरावानें आपल्या मेव्हण्याला अवघें एक पत्र लिहिलें आहे. आणि तें सुद्धां एवढेंच आहे––

*साबरमती जेल.*
*२१-१२-२२*

**मित्रवर्य भाऊसाहेब काळे यांस—**

साष्टांग नमस्कार वि. वि.

मला जेलमधील कांहीं किरकोळ शिक्षा झाल्यामुळें पत्र लिहिण्याचा माझा हक्क मी इतके दिवस गमावला होता. गेल्या तीन महिन्यांत जेलचा नियम माझेकडून मोडला गेला नाहीं. म्हणून आतां परवानगी मिळाली आहे. पण कांहीं लिहावेंसें वाटत नाहीं.

आप्पांची व घरच्या सर्व माणसांची प्रकृति कशी आहे तें कळवावें. बाकी इंदु, सरला व छोटू आणि इतर सर्व मंडळी खुशाल असतीलच! कारण मला वाईट वाटूं नये म्हणून तीं खुशाल आहेत असेंच आपण नेहमीं लिहिणार हें मी जाणून आहे! मी खुशाल आहें हें मात्र मी खरें लिहिलें आहे. मी सुटण्याच्या सुमारास जेलमध्यें कपडे पाठवावेत व कोठें येऊं तें कळवावें. खुशालीचेंही त्या वेळीं सविस्तर पत्र लिहावें.

*आपला,*
***विनायक भोळे***

मात्र या चिमकुल्या पत्रांतही वामनरावांचें अस्तित्व वाचकाला जाणवल्या-वांचून रहात नाहीं. ‘मला वाईट वाटूं नये म्हणून तीं खुशाल आहेत असेंच आपण नेहमीं लिहिणार हें मी जाणून आहें. मी खुशाल आहें हें मात्र मी खरें लिहिलें आहे’ असलीं वाक्यें फक्त वामनरावच लिहूं शकत असत.

वामनरावांच्या कादंबरीचें बीज प्रसंगात्मक अथवा स्वभावात्मक नसून विचारात्मक असतें हें या कादंबरींतल्या विनायकरावाच्या उद्गारांवरून स्पष्ट होतें. एका पत्रांत विनायकराव लिहितो,

‘मनुष्यजन्म हा ज्ञानप्राप्तीकरितां नसून देहधर्म सांभाळून शक्य तेवढें ज्ञान मिळवावें, शक्य तेवढा कलाविलासाचा आनंद उपभोगावा, शक्य तेवढें इतरांच्या उपयोगीं पडून त्यांना आनंद देण्याचा प्रयत्न करावा, एवढ्याकरितां मनुष्यजन्म आहे. केवळ देहसुखानें आपलें समाधान व्हायचें नाहीं; कारण आपण पशु नाहीं. केवळ ज्ञानमार्गानें समाधान

व्हायचें नाहीं; कारण आपल्याला जिज्ञासेशिवाय इतर आकांक्षाही आहेत. केवळ कलेच्या पाठीमागें लागून उपयोग नाहीं; कारण एकटी कला ज्ञानाची व नीतीची भूक भागवूं शकत नाहीं. केवळ कर्ममार्ग उपयोगाचा नाहीं. कारण ज्ञानाशिवाय मनुष्य आंधळा आहे व कलेशिवाय आयुष्य नीरस आहे!'

जीवनाच्या जाणिवेंतून स्फुरलेला आणि अनुभवांच्या मुशींत तावून सुलाखून निघालेला असा एखादा ठसठशीत तात्त्विक विचार वामनरावांच्या मनामध्यें प्रथम मूळ धरीत असे. दीर्घ चिंतनानें त्याचें रोप्यांत रूपांतर होई; अनुभवलेल्या, पाहिलेल्या आणि ऐकलेल्या असंख्य सुखदु:खात्मक प्रसंगांचें पाणी घालून ते या रोप्याची जोपासना करीत; आणि मग त्या रोप्याची कथावेल बनून ती फुलूं लागे, हें या छोट्या उताऱ्यावरून दिसून येतें. कथानकाची रचना करण्याची ही पद्धत एखाद्या सामान्य लेखकाच्या हातांत कृत्रिम व नीरस झाल्याशिवाय राहणार नाहीं. पण वामनरावांच्या विचारांत इतका जिव्हाळा व प्रामाणिकपणा होता कीं भावनांच्या रंगतीनें उत्पन्न होणारा आनंद वाचकाला त्यांच्या कादंबरींतल्या विचार–विलासांतूनही मिळूं शकतो.

'सुशीलेच्या देवा' पेक्षां 'इंदु काळे व सरला भोळे' ही कादंबरी कांकणभर सरस आहे यांत शंका नाहीं. एखाद्या अगदीं लहान आकाराच्या निसर्गदृश्यांत चित्रकारानें सृष्टीचें रम्य आणि रुद्र रूप विविध रंगांच्या लहान लहान फटकाऱ्यांच्या द्वारें जसें चित्रित करावें तसें या कादंबरींतलें मानवी जीवनाचें संमिश्र चित्रण वाटतें. जन्म, मृत्यु, त्याग, भोग, नीति, अनीति, इत्यादिकांच्या स्वैर वायुलहरींनीं विविध जीवन–प्रवाहांच्या पृष्ठभागावर निर्माण केलेले हर्षशोकांचे तरंग तिच्यांत मोठ्या सुंदर रीतीनें प्रतिबिंबित झाले आहेत. पत्र–पद्धतीमुळें या कथेंत तत्त्वचर्चेची लांबण कुठेंही लागलेली नाहीं. उलट वामनरावांच्या इतर कादंबऱ्यांत मधून केव्हां तरी आढळून येणारा घरगुती जिव्हाळा इथें अधिक प्रमाणांत प्रगट झाला आहे.

या कादंबरींत असे अनेक गुण असले तरी कथाकार या नात्यानें वामनरावांच्यांत असलेलीं वैगुण्यें हिच्यांतही दृग्गोचर होतातच. हरिभाऊ किंवा फडके अनेक पेड एकत्र करून सुंदर वेणी गुंफावी त्याप्रमाणें कथानकाची रचना करतात. वामनराव कथानकाचे अनेक धागे हातांत घेतात. पण ते प्रमाणबद्ध रीतीनें

आणि चातुर्यानें त्यांना गुंफतां येत नाहींत. कादंबरीच्या अंतरंगाच्या दृष्टीनें पाहिलें तर विनायकराव भोळे हा या कादंबरीचा नायक आहे. १९२० सालच्या आसपासचा एक सत्प्रवृत्त आणि बुद्धिमान् महाराष्ट्रीय तरुण गांधी आणि गांधीवाद ह्यांच्याकडे कसा आकर्षिला जातो, आपली जीवनश्रद्धा आचरणांत आणण्याचा तो किती कसोशीनें प्रयत्न करतो, समाजांतल्या मूर्खपणाचा आणि दुष्टपणाचा विरोध सहन करूनही तो आमरण ध्येयनिष्ठ कसा राहतो आणि व्यवहारदृष्ट्या त्याला अनेक दुःखें भोगावीं लागलीं तरी या धडपडींतच त्याचा आत्मविकास कसा होतो, हें चित्रित करणें हा या कथेचा मुख्य हेतु आहे. पण तिला वामनरावांनीं नांव दिलें आहे ' इंदु काळे व सरला भोळे, ' जणुं काहीं या दोन तरुणींच्या जीवनकथांतला विरोध हाच या कादंबरीचा आत्मा आहे ! विनायकरावाच्या जीवनविकासाशीं संपूर्णपणें संबद्ध अशीं उपकथानकें घेऊन आणि प्रसंग व स्वभावरेखाटन ह्या दोन्ही दृष्टींनीं तीं मूळ कथानकाशीं एकजीव करून वामनरावांनीं ही कादंबरी लिहिली असती तर ती सामान्य वाचकाला अधिक परिणामकारक वाटली असती. पण सरलेच्या जोडीनें इंदूचें जीवनचित्र रेखाटतांना जागृत झालेल्या सुशिक्षित तरुणींचे दोन स्थूल नमुने तेवढे वामनरावांनीं चित्रित केले. या कादंबरींत ह्या दोघींच्या जीवनविरोधाचा रसोत्कर्षाच्या दृष्टीनें किंवा तत्त्वप्रतिपादनाच्या दृष्टीनें त्यांनीं फारसा उपयोगच केला नाहीं.

> ' प्रश्न असा, आत्म्याची कलाविषयक जी भूक आहे ती लोकापवादाच्या भीतीनें, किंवा पतीला उगाच संशय येतो म्हणून दाबून टाकावी काय ? '

या इंदूनें विनायकरावाला विचारलेल्या प्रश्नांत फार मोठा अर्थ—प्रसंगीं अनर्थही—आणि तितकेंच मोठें दुःख भरलें आहे. तिचें कथानक विनायकराव आणि सरला यांच्या जीवनाशीं समांतर असें चित्रित करण्यापेक्षां तें अगदीं स्वतंत्र रीतीनें लिहिणेंच अधिक कलात्मक झालें असतें. पण वामनरावांच्यांत जो कलाकार होता त्याला असें पूर्ण स्वातंत्र्य कधींच मिळालें नाहीं. त्यांच्यांतल्या विचारवंताच्या पावलावर पावलें टाकूनच त्याला चालावें लागे. असें असूनही त्यांच्या प्रतिभेचें हें शेंडेफळ वाचकांना नेहमींच रसाळ वाटेल. सर्व हिंदी भाषांत जिचा अवश्य अनुवाद व्हावा अशी ही त्यांची कादंबरी आहे.

• कादंबरी नसूनही कादंबरीइतकेंच आकर्षक असलेलें ' स्मृति-लहरी ' हें वामनरावांचें अपत्यही ' इंदु काळे व सरला भोळे ' प्रमाणें त्यांच्या मधुर व्यक्तित्वाचा आणि विविध वाङ्मय-गुणांचा वाचकांना दीर्घकाल परिचय करून देत राहील. या पुस्तकाचें बाह्य स्वरूप आठवणीसारखें आहे. पण त्या आठवणी एका व्यक्तित्वसंपन्न विचारवंताच्या आहेत. असामान्य असूनही सामान्यांत मिसळणारी, आपल्या सुखदु:खांच्या गोष्टी सर्वांना हृदय उघडें करून सांगणारी, स्वत:च्या वैगुण्यांकडे आणि दुबळेपणाकडे हंसत हंसत पाहणारी आणि माणूस कितीही मोठा झाला तरी तो या जगांतल्या विशाल जीवनशृंखलेचा एक छोटासा दुवा आहे हें जाणून वागणारी ही व्यक्ति म्हणजे धोंडोपंत बर्वे !•

• वामनराव स्वभावानें अत्यंत सात्त्विक असले तरी प्रसंगीं किती मिस्किल होत याची कल्पना या पुस्तकावरून सहज येईल. या आठवणींत त्यांनीं स्वत:चें धोंडोपंत असें नामकरण केलें आहे. हेतु हा कीं धोंडोपंत कर्व्यां-प्रमाणें धोंडोपंत बर्वे या नांवाची एखादी व्यक्ति पुण्या-मुंबईत असावी असें वाचकांना वाटावें. हे धोंडोपंत वामनरावांच्या प्रमाणें प्रोफेसरच आहेत. पुस्तकांत धोंडोपंतांचें जें चित्र दिलें आहे तें पाहून वाचकाला हटकून वामनरावांचीच आठवण व्हावी अशीही योजना करण्यांत आली आहे. चित्रांतले धोंडोपंत वामनरावांच्या मानानें थोडे थोराड वाटले तरी विरळ केस झालेल्या डोक्याच्या पुढल्या भागापासून तर्द्रीत सिगारेट तशीच जळत ठेवणाऱ्या डाव्या हातापर्यंत त्यांचें वामनरावांच्याशीं साम्य आहे हें वाचकाच्या लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं. ते वामनरावच आहेत असें लोकांना वाटूं नये म्हणून चित्राच्या खालीं धोंडोपंत बर्वे अशी जी सही करण्यात आली आहे तिचें अक्षर अगदीं निराळें काढण्यांत आलें आहे. मात्र ती सही बहुधा वामनरावांनींच डाव्या हातानें केली असावी !

• धोंडोपंत बर्व्यांच्या या आठवणी जितक्या गोड तितक्याच जीवनावर सौम्य प्रकाश टाकणाऱ्या आहेत. त्यामुळें त्यांना मार्मिक व मजेदार लघु-निबंधांचें स्वरूप प्राप्त झालें आहे. फडक्यांनीं रूढ केलेल्या तंत्रबद्ध लघुनिबंधा-च्या भोक्त्यांना वामनरावांचे हे आठवणीवजा निबंध एखाद्या रानवेलीप्रमाणें स्वैर आहेत असें वाटेल. तीं बागेंतलीं फुलझाडें नाहींत हें तर उघडच आहे. पण लघुनिबंध हा आत्मचरित्राचाच एक भाग आहे हें लक्षांत घेतलें आणि

ॲडिसनसारख्या निबंधलेखकाचे विद्यार्थिदशेंत वामनरावांच्या मनावर जे संस्कार झाले असतील त्यांची परिणति या लेखनांत झाली आहे या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहिलें, म्हणजे या निबंधांत तंत्र नसलें तरी मंत्र आहे, बाह्य रेखीवपणा नसला तरी अंतःसौंदर्य आहे, अशी त्यांची खात्री होईल, या पुस्तकांतली 'विलक्षण तक्रार' ही आठवण वाचतांना वामनराव अगदीं मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभे राहतात. 'जगाची स्तुति आणि निंदा' किंवा 'संदेश' हे लेख वाचतांनाही आपण त्यांच्याशीं जणुं कांहीं संभाषण करीत आहों असा भास होतो.•

> 'गुळमुळीतपणा गोड दिसतो; पण व्यवहारांत तो फोल आहे. सडेतोडपणा वाटतो कडु; पण त्याचीं फळें गोड असतात. हें सगळें आमच्यासारख्यांना समजतें. पण स्वभाव एकदम कसा बदलणार?'

हे किंवा असेच इतर उद्गार केव्हां ना केव्हां तरी वामनरावांच्या तोंडून ज्यानें ऐकले नाहींत असा त्यांचा एक तरी स्नेही सांपडेल का?

•रूढ चाकोरी सोडूनही केवळ व्यक्तित्वाच्या प्रामाणिक व रसरशीत आविष्कारामुळें लघुनिबंध किती हृदयंगम होऊं शकतो, हें कुसुमावती देशपांडे यांचा 'चंद्रास्त' किंवा माट्यांचा 'हास्याचा शोध' हे निबंध वाचणारांना सांगायलाच नको. वामनरावांचें 'स्मृति-लहरी' हें पुस्तकही लघुनिबंधांच्या भोक्त्यांकडून असेंच मोठ्या गोडीनें वाचलें जाईल.

## ७

इंग्रजी राज्याच्या प्रारंभापासून हिंदुस्थान स्वतंत्र होईपर्यंत महाराष्ट्रांत जे कलावंत आणि विचारवंत लेखक झाले त्यांत वामनरावांचें स्थान निःसंशय पहिल्या पंक्तींत आहे. हरिभाऊ, श्रीपाद कृष्ण, गडकरी, डॉ. केतकर, इत्यादि समकालीनांच्या तुलनेंतही त्यांचें वैशिष्ट्य उठून दिसतें यांत शंका नाहीं. अशा प्रकारचा प्रभावी लेखक फार मोठा शैलीकार असला पाहिजे अशी सर्वसामान्य वाचकांची समजूत होणें संभवनीय आहे. चिपळूणकर, गडकरी व फडके या लेखकांची लोकप्रियता त्यांच्या अत्यंत आकर्षक शैलीनेंच निर्माण केली असल्यामुळें असले समज सहज दृढमूल होत जातात. शिवरामपंत परांजपे, अच्युतराव

कोल्हटकर, माडखोलकर, अत्रे, माटे इत्यादि लेखकांनींही वाचकांचीं मनें अंकित केलीं तीं आपल्या विशिष्ट शैलीनेंच ! पण कांहीं कांहीं ग्रंथकार शब्दांचा शृंगार, भाषेचा नखरा, शैलीचा विलास इत्यादिकांपैकीं कशाचेंही साहाय्य न घेतां वाचकांचीं मनें काबीज करूं शकतात. टिळक, देवल, हरिभाऊ आपटे वगैरेंची गणना या वर्गांत करतां येईल. वामनराव स्वभावतः या दुसऱ्या वर्गांतलेच लेखक होते. कल्पकतेमुळें परांजपे आणि गडकरी, विनोदामुळें अच्युतराव व अत्रे, रसरशीतपणामुळें माटे, लालित्यामुळें फडके, डौलदारपणामुळें माडखोलकर इत्यादि साहित्यिक रसिकांच्या डोळ्यांत झटकन् भरतात. पण वाचकांचें लक्ष चटकन् वेधून घेईल असा कोणत्याही प्रकारचा हुकमी भाषा-विलास वामनरावांच्यांत नाहीं. याचा अर्थ शैलीचा शृंगार त्यांना सर्वथैव असाध्य होता अथवा आवडत नव्हता असा मात्र नाहीं. दैनंदिन जीवनातला त्यांचा अव्यवस्थितपणा न कळत त्यांच्या भाषेंतही उतरला आहे. त्यामुळें त्यांच्या अगदीं तत्त्वात्मक किंवा रसात्मक वाक्यांतही फारसा रेखीवपणा आढ-ळत नाहीं. त्यांच्या लेखनाची प्रेरणा भराऱ्या मारणाऱ्या कल्पनेंत किंवा उचं-बळवून टाकणाऱ्या भावनेंत नाहीं. ती अंतर्मुख वृत्तीच्या एका सात्त्विक आत्म्याच्या चिंतनांत आहे. असा लेखक आपली भाषा काळजीपूर्वक शृंगारण्याचा अट्टाहास करील तरच तें अस्वाभाविक ठरेल. असें असलें तरी विचारांना गोडवा आण-णारी जी आकर्षकता वामनरावांच्या शैलींत उत्पन्न झाली आहे तिचें मूळ विनोद, विरोधाभास व बौद्धिक कोटिबाजपणा ह्यांचा सढळ हातानें उपयोग करण्याच्या त्यांच्या शक्तींत आहे. ‘ कलाकृति मोहक असावी, पण भलता मोह तिनें घालूं नये, ’ ‘ जोडे खाल्ले, पण जन्माचा जोडीदार झालों ’ या आणि अशासारख्या शाब्दिक कोट्यांपासून नाजुक व मार्मिक उपरोधा-पर्यंत विनोदाचे सर्व नमुने वामनरावांच्या लिखाणांत आढळतात. विनायकराव भोळे गांधींच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून कोंकणांत समाजसेवा करूं लागतो. तिथें लोकांकडून त्याची जी संभावना होते ती वामनरावांनीं एका छोट्या पत्राच्या द्वारें व्यक्त केली आहे. तें पत्र असें आहे--

*पांचबावडी*
*ता. १३/४/२६*

**महात्मा गांधी यांस—**

विनयपूर्वक साष्टांग नमस्कार वि. वि.

आम्ही सही करीत नाहीं. पण आमच्या पांचबावडी गांवांत कॉंग्रेसचें म्हणून काम करणारे विनायकराव भोळे हे मोठे धर्मबुडवे आहेत. आणि त्यांनीं स्त्रियांवरही अत्याचार करण्याचें ठेवलें नाहीं ही गोष्ट आपल्या नजरेस आणणें आमचें कर्तव्य आहे. म्हणून हें निनांवी पत्र लिहितों. त्यांच्या समाजसुधारणा सनातनी धर्माचीं पाळेंमुळें खणून काढीत आहेत. मुद्दाम मनुष्य पाठवून चौकशी करवावी. आम्ही गांवांतले सनातनी धर्माचे परंपरागत संरक्षक आहोंत. म्हणून हें कटु कर्तव्य करीत आहोंत. कळावें,

*आपले,*
*सनातनी धर्माचे अभिमानी*
अ, आ, इ, ई.

•वामनरावांना ही विनोददृष्टि उपजतच होती. तिनेंच त्यांच्या तत्त्वज्ञ मनाला आणि त्याचा आविष्कार करणाऱ्या शैलीला कधींही रुक्ष अथवा एकांगी स्वरूप येऊं दिलें नाहीं.• मात्र त्यांची भाषा वाचतांना श्रीपाद कृष्णांच्या भाषाशैलीची छाया त्यांच्यावर थोडीफार पडली आहे असा भास झाल्यावांचून रहात नाहीं! वामनरावांच्या विद्यार्थिदशेंत 'मूक–नायक', 'मति–विकार' सारख्या नाटकांनीं आणि 'सुदाम्याच्या पोह्यां'तल्या विनोदी लेखांनीं श्रीपाद-कृष्ण तत्कालीन सुशिक्षित आणि सुधारणाप्रिय तरुण पिढीच्या गळयांतील ताईत बनले होते. कल्पकता, सौंदर्यवाद, विनोदाचा अवखळपणा इत्यादि दृष्टींनीं गडकऱ्यांची मनोवृत्ति कोल्हटकरांच्याशीं पूर्णपणें जुळणारी असल्यामुळें ते त्यांचे पट्टशिष्य झाले. पण वामनरावांना कोल्हटकरांच्याविषयीं जो गुरुतुल्य आदर वाटे, त्याचा उगम इतर अनेक गोष्टींप्रमाणें कोल्हटकरांच्या शैलीनें संस्कारक्षम वयांत त्यांच्या मनाची जी पकड घेतली असेल तिच्यांत असण्याचा संभव आहे.

'केळकर चांगले आहेत, म्हणूनच त्यांना वाईटपणा आलेला आहे', 'लौकिक-दृष्ट्या ध्येयें म्हणजे दुःखें', 'लक्ष्मी काय किंवा विद्यादेवी काय अति भिरु व अति लज्जाशील मनुष्यावर कधींच प्रसन्न व्हायची नाहीं', 'कादंबरीकार आणि मुलीची आई यांना मुलींच्या लग्नाशिवाय दुसरा कांहीं विषयच दिसत नाहीं', 'केला असता कोप देवानें! पण तो देवीच्या पुढें काय करतो?', 'नदीचें पाणी आणि खाडीचें पाणी कधीं एक व्हायचें नाहीं' इत्यादि श्रीपाद कृष्णांच्या लेखनपद्धतीची आठवण करून देणारीं वाक्यें वामनरावांच्या वाङ्मयांत विपुल प्रमाणांत आढळतात.

प्रतिभासंपन्न लेखकावर पूर्वसूरींची जशी अस्पष्ट छाया पडते, तसें त्याचें लेखन पुढल्या प्रतिभावंतांना प्रेरक होत असतें. वाङ्मयांतले हे ऋणानुबंध दारिद्र्याचे दर्शक नसून बहुधा मनोवृत्तींचा समानधर्मच त्यांतून प्रगट झालेला दिसतो. वामनरावांच्या वाङ्मयानें इतर साहित्यिकांवर केलेले असे अनेक संस्कार सहज दाखवितां येतील. जीवनावर सायंकालीन सावल्या पसरल्यावर 'दुटप्पी कीं दुहेरी' सारखी जी चर्चात्मक कादंबरी श्रीपाद कृष्णांनीं लिहिली ती वामनरावांची 'रागिणी' त्यांची फार आवडती असल्यामुळेंच! 'भावबंधन' मधल्या 'लतिका' आणि 'मालती' या 'उत्तरा' आणि 'रागिणी' यांच्या सख्या बहिणी नसल्या तरी त्यांच्या तोंडवळ्यांतलें साम्य कुणाच्याही लक्षांत येण्याजोगें आहे. विशेषतः लतिकेच्या ज्या फटकळ बोलण्यावर गडकऱ्यांनीं आपल्या कथेंतल्या नाट्याचा उत्कर्ष आधारला आहे त्याच फटकळपणावर वामनरावांनींही उत्तरेच्या चित्रणांत जोर दिला आहे. वामनरावांच्या मागून डॉ. केतकर, देशपांडे, माडखोलकर वगैरे अनेक नामांकित कादंबरीकार उदयाला आले. त्या सर्वांमध्यें कथानकांतून राजकीय आणि सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह विस्तारानें करण्याइतका जो आत्मविश्वास निर्माण झाला, त्याचें मूळ 'रागिणी'च्या लोकप्रियतेंतच शोधावें लागेल.

वामनरावांच्या वाङ्मयांतल्या एका अनुकरणीय विशेषाची मात्र अजून मराठी साहित्यिकांनीं फारशी दखल घेतलेली दिसत नाहीं. तो म्हणजे त्यांच्या सूक्ष्म आणि सौम्य विनोदांतला उदात्तपणा! एके ठिकाणीं वामनराव म्हणतात,

'मराठींत धंदेवाईक विदूषकाचें सोंग घेतलें तरच सामान्यतः विनोद

ओळखूं येतो असें दिसतें, मराठींतला विनोद अजून अतिशयोक्तीच्या उलट्या सुलट्या कोलांट्या उड्या मारण्यांतच धन्यता मानीत आहे. कोल्हटकर, गडकरी, चिं. वि. जोशी, कॅ. लिमये, अत्रे, ताम्हनकर वगैरेंचीं विनोदी पुस्तकें वाचून मी आनंदित झालों आहें; पोट धरून हंसलोंही आहें. त्या त्या सर्वांचा मी चाहता आहें. पण भडक अतिशयोक्तीचे उंच लाकडी घोडे अलीकडे मला आवडत नाहींसे झाले आहेत. याचा अर्थ असा नव्हे कीं माझा विनोद मोठा सूक्ष्म आणि मार्मिक, आणि या सर्वांचा वाईट. माझ्या या म्हणण्यांत परनिंदेचा भाग नाहीं. आत्मस्तुतीचा थोडासा असल्यास तो मानवी दोष म्हणून क्षम्य समजावा. '

वामनरावांच्या या उद्गारांत आत्मस्तुति मुळींच नाहीं. केवळ सत्यकथन आहे. वामनरावांनीं उल्लेखिलेले अतिशयोक्तीचे उंच लाकडी घोडे अजूनही मराठी साहित्याच्या रंगणांतली विनोदाची शर्यत जिंकीत आहेत. वृत्तपत्रांच्या वाढीमुळें अशा क्षणभंगुर पण चुरचुरीत विनोदाला अवास्तव महत्व आलें आहे. भडक रंगाच्या यांत्रिक घोड्यांपेक्षां छोटें पण जिवंत सशाचें पिल्लू आवडून त्याच्या लीलांत आनंद वाटायला प्रेक्षकाचें मन प्रगल्भ व्हावें लागतें. अनेक विनोदी लेखकांच्या ठिकाणीं हा मनोविकास आढळत नाहीं. कोल्हटकरांनीं विनोद हें सनातनी समाजावरलें टीकेचें साधन म्हणून वापरल्यामुळें त्यांच्या हातांत त्याला साहजिकच हत्याराचें स्वरूप प्राप्त झालें. अतिशयोक्ति, उपहास, उपरोध, इत्यादिकांना त्यांच्या विनोदांत महत्त्वाचें स्थान मिळालें याचें कारण हें आहे. पण या बहिर्मुख विनोदाला लोकप्रियता लाभल्यानंतर त्याच्यापेक्षां भिन्न आणि सात्त्विक असा विनोदाचा एक अंतर्मुख प्रकार आहे या गोष्टीकडे मोठमोठ्या विनोदी लेखकांचें दुर्लक्ष झालें. कोल्हटकर-गडकऱ्यांच्या विनोदांतला कृत्रिमपणा व भडकपणा कमी करण्याचा प्रयत्न फक्त चिं. वि. जोशी तेवढे यशस्वी रीतीनें करूं शकले. पण विनोदी लेखन हेंच त्यांचें क्षेत्र असल्यामुळें त्यांच्या प्रयत्नांना साहजिकच अनेक मर्यादा पडल्या. सदैव विनोदी लेखन लिहिणाऱ्या मनुष्याला कांहीं झालें तरी कारुण्याच्या सीमेवर उभ्या असलेल्या विनोदाचा आश्रय पदोपदीं करता येत नाहीं.

•वामनरावांचा विनोद विषयाच्या, पात्रांच्या अथवा प्रसंगांच्या अनुरोधानें येत असल्यामुळें केवळ विनोदाकरितां विनोद करण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत कधींच वळावली नाहीं. त्यामुळें त्यांच्या लेखनांत ठिकठिकाणीं आढळून येणाऱ्या विनोदाच्या छटांत हास्योत्पादकतेपेक्षां सहानुभूतीवर अधिक भर आहे. सासूनें सुनेला टोंचून बोलावें तसा त्यांचा विनोद सहसा वाटत नाहीं. आईनें वात्सल्यानें मुलीला तिची चूक समजून सांगावी असें त्याचें स्वरूप आहे. तो हास्याचे फवारे उडवूं शकत नाहीं पण त्याच्या तुषारांनीं मन पुलकित होतें. कारण त्याचें अंतर्बाह्य स्वरूप मोठें प्रेमळ आणि सुसंस्कृत आहे. वामनरावांच्या क्षमाशील आणि चिंतनपर स्वभावाचा विकास या विनोदवृत्तीनें केला का त्यांच्या स्वभावामुळें ही विनोदवृत्ति त्यांच्यांत निर्माण झाली हें सांगणें मोठें कठिण आहे.

## ८

वामनरावांच्या कर्तृत्वाचें मूल्यमापन करतांना त्यांचें व्यक्तित्व आणि त्यांचें साहित्य यांचा एकत्र विचार केला पाहिजे. हीं दोन्ही एकमेकांचीं जणुं कांहीं प्रतिबिंबें आहेत. अनेक लेखक साहित्यनिर्मिति करतांना स्वतःच्या प्रामाणिक व्यक्तित्वाचा आविष्कार करण्याऐवजीं लोकप्रिय कल्पना आणि भावना ह्यांनीं नटलेलें एक कृत्रिम जग निर्माण करीत असतात. त्यांचें वाङ्मय कागदी फुलांसारखें असतें. नट म्हणून त्यांच्या बुद्धीचें कौतुक करायला कांहींच हरकत नाहीं. पण अशा लेखकांच्या कलेचें लावण्य हें ओष्ठरंग आणि अंगरंग लावून व नैसर्गिक भुवया काढून टाकून त्या ठिकाणीं कृत्रिम धनुष्याकृति भुवया रेखून आपल्या विभ्रमानें प्रेक्षकांचीं हृदयें विद्ध करायला निघालेल्या नटीचें सौंदर्य आहे. वामनरावांची साहित्यकला ही निसर्गकन्या होती. तिला ओष्ठरंग आणि अंगरंग यांचें फारसें ज्ञान नाहीं. ती फक्त अंतरंग जाणते. तिच्या पित्याच्या स्वभावाचे, बुद्धीचे, आणि हृदयाचे सारे गुणावगुण तिच्यांत प्रकर्षानें प्रतिबिंबित झाले आहेत.

•वामनरावांचें वाङ्मय हा त्यांच्या आत्म्याचा आरसा आहे. तो त्यानें

परिधान केलेला जाळीदार बुरखा नाहीं. त्यामुळें साहित्यावरून त्यांच्या व्यक्तित्वाची चिकित्सा करण्यांत त्यांना अन्याय होण्याचा संभव नाहीं. स्वच्छ पाण्यांत पडलेला अलंकार आंत बुडी मारतांच तळाशीं जसा स्पष्ट दिसूं लागतो, तसा त्यांच्या साहित्यांत अवगाहन करणाराला त्यांचा आत्मा—त्याचे सर्व पैलू आणि कंगोरे—दृग्गोचर होतो. असें असूनही त्यांच्या व्यक्तित्वाची मीमांसा करतांना प्रभाकर पाध्यांपासून र. धों. कर्व्यांपर्यंत अनेकांनीं निरनिराळीं मतें प्रकट केलीं आहेत. आण्णासाहेब कर्वे किंवा आप्पासाहेब पटवर्धन यांना अधिक यथार्थतेनें लागूं पडणारें तपस्वी हें विशेषण वामनरावांना लावून पाध्ये त्यांच्या जोडीला आगरकर व सानेगुरुजी यांना बसवितात.

> ‘ टिळकांची जनसेवाबुद्धि सुरुवातीस आगरकरांच्या इतकी प्रखर आणि निष्ठाशील नव्हती असें म्हणण्यास भरपूर आधार आहे. आणि पुढील जीवनांतही टिळकांची सेवाबुद्धि आणि त्याग हीं सत्ता अगर लोकप्रियता यांच्या अपेक्षेपासून आगरकरांच्या इतकी अलिप्त राहिली किंवा काय अशी शंका घेणें शक्य आहे.’

हें अति चिकित्सक वृत्तीलाच शोभणारें विधान करणारे पाध्ये वामनरावांच्या विषयीं लिहितांना मात्र विभूतिपूजेच्या भावनेनें भारावून गेलेले दिसतात. इतर देवांची फारशी पर्वा न बाळगणाऱ्या एखाद्या मनुष्यानें आपल्या कुलदैवताचें दर्शन होतांच गहिंवरून जावें तशी वामनरावांच्या बाबतींत त्यांची स्थिति असावी ! एके ठिकाणीं ते म्हणतात, ‘वामनरावांनीं जगाचा निरोप घेतला आणि महाराष्ट्र सारस्वतांतील पावित्र्य पोरकें झालें.’ ज्यांचें चारित्र्य वामनरावांच्या इतकेंच निर्मळ व उदात्त आहे आणि ज्यांच्या वाङ्मयांत वामनरावांच्यापेक्षां अणुमात्रही कमी पावित्र्य नाहीं अशा साने गुरुजींचा गौरव करणारा लेख आपल्या याच लेखापुढें पाध्यांनीं छापलेला असल्यामुळें त्यांच्या या अतिरंजित विधानाविषयीं निराळें लिहिण्याची जरूरी नाहीं. मात्र आगरकर, वामनराव व साने गुरुजी यांना तपस्वी म्हणून एका मालिकेंत गुंफण्यानें त्यांचें साहित्य किंवा त्यांचें व्यक्तित्व यांच्यावर कांहीं विशेष प्रकाश पडतो असें मुळींच नाहीं. आंबा, फणस व द्राक्ष हीं तिन्ही फळें गोड असतात. पण आकार आणि रंगरूप यांच्याप्रमाणें प्रत्येकाच्या अंतरंगांतल्या रसांतही

निराळेपणा असतोच असतो. या तीन लेखकांतही तसाच भेद आहे—अगदीं मूलभूत मोठा भेद आहे. आगरकर प्रखर बुद्धिवादी होते. बुद्धि व भावना यांचा संगम घडवून आणण्याकडे वामनरावांचा कल असल्यामुळें त्यांना विवेकवादीच म्हणणें अधिक योग्य होईल. उलट भावनाशीलता हाच साने-गुरुजींचा आत्मा आहे.

या विवेकवादानेंच वामनरावांच्या वृत्तींत आणि वाङ्मयांत मोठें सुखद सौजन्य निर्माण केलें. पण त्यामुळेंच त्यांच्या या दोन्ही क्षेत्रांतल्या कर्तृत्वाला कांहीं मर्यादा पडल्या. प्रखर बुद्धिवादांत मूठभर मावळ्यांच्या साहाय्यानें पावनखिंड लढविणाऱ्या बाजी प्रभूचें असीम साहस असतें. तीव्र भावना-वशतेंत जोहार करून स्वतःला जाळून घेणाऱ्या रजपूत रमणीची उत्कट निष्ठा दिसते. पण बुद्धि व भावना यांचा सद्भावानें संगम करूं इच्छिणाऱ्या आत्म्यांत अशी कृतीची तीव्रता आढळत नाहीं. त्याची विशालता वाढते; पण उत्कटता कमी होते. सारा समाज विरुद्ध उभा ठाकला असूनही कुडींत प्राण आणि टांकांत शाई असेपर्यंत ‘ इष्ट असेल तेंच बोलणार ’ अशी गर्जना करीत सामाजिक दोषांवर निर्भयपणानें प्रहार करणारे आगरकर किंवा मातेच्या वात्सल्यानें शिष्यांच्या शरीरांची आणि मनांची जोपासना करीत असतांना आयुष्यांतल्या एका अत्युत्कट क्षणीं राष्ट्राच्या स्वातंत्र्यसंग्रामांत उडी टाकतांच त्या क्षणा-पासून सतत दीड तप चंदनाप्रमाणें आपली वाणी, लेखणी आणि शरीर त्याच्याकरितां झिजविणारे साने गुरुजी यांचें वीरत्व वामनरावांच्यांत निश्चित नव्हतें.

मी हें वामनरावांचें वैगुण्य मानीत नाहीं. जीवनांत वीरत्वाचे अनेक प्रकार आढळतात. त्या सर्वांची आपणांला सारखीच जरूरी असते. हातावर लाठीचा तडाखा बसला तरी निशाणाची मूठ सैल न करणारी देशसेविका आणि मध्य-रात्रीं चोर पावलांनीं येणाऱ्या मृत्यूला रोग्यावर आपले पाश टाकतां येऊं नयेत म्हणून डोळ्यांत तेल घालून त्याच्या बिछान्यापाशीं पहारा करीत बसलेली परिचारिका या दोन्ही वीरस्त्रियाच आहेत. ‘ प्रत्येक मनुष्याच्या स्वभावघटनेंत—मग तो मनुष्य स्त्री असो अगर पुरुष असो—स्त्रीत्व आणि पुरुषत्व यांचें कमीअधिक प्रमाणांत मिश्रण असतें.’ असें श्रीपाद कृष्णांचें एक मार्मिक वाक्य आहे. कवित्व आणि साधुत्व यांच्याप्रमाणें वीरत्वांतही याच मिश्रणाचे

निरनिराळे नमुने आपल्या दृष्टीला पडतात. पुरुष गुणांची अधिकता असलेलें चारित्र्य साहसी व विजिगीषु असतें. स्त्री-गुणांचें प्राबल्य असलेलें वीरत्व न कळत सोशिक व संरक्षक बनतें. वामनरावांच्यामध्यें हें दुसऱ्या प्रकारचें वीरत्व होतें. त्यामुळेंच आगरकर व साने गुरुजी ह्यांच्यापेक्षां त्यांचें कर्तृत्व आणि साहित्य हीं दोन्ही निराळ्या प्रकारचीं झालीं.

र. धों. कर्व्यांनीं वामनराव आगरकरांच्यासारखे निर्भेळ बुद्धिवादी नव्हते असें म्हटलें आहे. या विधानांत निःसंशय सत्यांश आहे. जगाविषयींचीं व जीवनाविषयींचीं वामनरावांचीं मतें वास्तवाची अनुभूति व शुद्ध बुद्धिवाद एवढ्यावरच उभारलेलीं नव्हतीं. केवळ तर्कानें होणारें जगाचें ज्ञान किंवा निव्वळ शास्त्रीय दृष्टीनें सिद्ध होऊं शकणारे जीवनविषयक सिद्धांत हें संशोधकाच्या दृष्टीनें पूर्ण सत्य असेल. पण सामान्य मनुष्य अशा सत्यावर जगूं शकत नाहीं. त्याला सत्याभासही हवा असतो. शुद्ध चांदीचें चलनी नाणें होत नाहीं. तसेंच हें आहे. मानवी मन हें मूलतः कवीचें मन आहे—कलावंताचें मन आहे. तें शास्त्रज्ञाचें मन नाहीं. गूढतेचे आणि कल्पनारम्यतेचे अनेक कप्पे या मनाला आहेत. ते जेव्हां परिपूर्ण होतात तेव्हांच मनुष्य सुखी होतो. वामनरावांना या गोष्टीची जाणीव होती. मनुष्य जसा भाकरीवांचून जगूं शकत नाहीं, तसें केवळ भाकरीनेंही त्याचें समाधान होत नाहीं. मानवी जीवनांत श्रद्धेला मानाचें स्थान मिळतें तें यामुळेंच! वामनरावांच्यांत अशा प्रकारची श्रद्धा होती. मात्र ती आंधळी मुळींच नव्हती. त्यांच्या श्रद्धेला बुद्धीचा लगाम होता आणि बुद्धीवर श्रद्धेचें नियंत्रण होतें.

या वैशिष्ट्यामुळें कुठल्याही वादाच्या किंवा तत्त्वज्ञानाच्या आहारीं न जातां प्रत्येक गोष्टींतला चांगला भाग ते सदैव पाहूं शकले. त्यांचें अनुपम सौजन्य मनाच्या या ठेवणींतूनच निर्माण झालें. पण त्यामुळेंच त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनांत एक प्रकारचा दुबळेपणा निर्माण झाला हेंही मान्य केलेंच पाहिजे. हें वैगुण्य वामनरावांच्यांतच दिसून येतें असें नाहीं. अनादि कालापासून सौजन्याला दुबळेपणाचा शाप मिळाला आहे. जगांतलीं बहुतेक सज्जन माणसें हृदयशून्य व्यवहाराशीं टक्कर देतांना थोडीफार अपुरींच पडतात. तीं स्वतः दुःख भोगतील, त्रास सोसतील, जग चांगलें व्हावें म्हणून धडपडत

राहतील. पण जगाला कुरूप आणि रक्तबंबाळ करणाऱ्या दुर्जनांचा ताडकन् हात धरायला, त्यांना निकराचा विरोध करायला, आणि त्यांच्याशीं झुंज घ्यायला जी एक प्रकारची व्यावहारिक कठोरता अंगीं लागते, ती त्यांच्यांत स्वभावतःच असत नाहीं. अशीं माणसें हळुहळु जीवनांतल्या सर्व दोषांकडे सहानुभूतीनें पाहूं लागतात. स्वतःच्या सत्प्रवृत्तींचें प्रतिबिंब त्यांना सर्वत्र दिसत असल्यामुळें धर्मराजाच्या दृष्टीनें तीं जगांत वावरतात. पण मानवी जीवन हें धर्मराज आणि दुर्योधन यांच्या गुणावगुणांचें विचित्र मिश्रण आहे. केवळ आईचें अंध वात्सल्य त्याला सुधारूं शकत नाहीं. केवळ शस्त्रवैद्याचें कौशल्यही त्यांच्यांत बदल घडवून आणायला समर्थ होत नाहीं !

वामनरावांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान अपुरें वाटतें तें यामुळेंच ! 'जग हें वाईट माणसांनीं भरलेलें आहे असा माझा अनुभव नाहीं' असें ते म्हणतात. 'इंदु काळे व सरला भोळे' मध्यें इंदु व बिंदुमाधव यांचें परस्पराविषयींचें आकर्षण चित्रित करतांना 'इंदु तर मुळींच वाईट नाहीं; बिंदुमाधवही फारसा वाईट नाहीं' असें गृहीत धरून त्यांनीं स्त्रीजीवनांत निर्माण होणारा एक अत्यंत गूढ संघर्ष चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. पण हें चित्रण फिक्कट व गुळमुळीत वाटतें. असें होण्याचें कारण वामनरावांच्या वृत्तींतच आहे. मनुष्यांतल्या सैतानापेक्षां त्याच्यांतल्या देवावर त्यांचा अधिक विश्वास आहे. पण मनुष्य हा कितीही विचार करणारा प्राणी असला तरी जीवनांत तो कळत न कळत विकारांच्या आधीन होत असतो. आपलें मन हें सत् आणि असत् यांची अखंड संग्रामभूमि आहे याची जाणीव त्याला सहसा असत नाहीं. आणि एखाद्यांत ती जागरूक असलीच तरी आपली प्रत्येक प्रेरणा प्रामाणिक आहे अशी आत्मवंचना करून घेण्याइतका तो हळुहळु आत्मनिष्ठ बनतो. मानवी प्राणी निसर्गतः दुष्ट नसला तरी एखाद्या विकाराच्या किंवा वासनेच्या आहारीं जाऊन हां हां म्हणतां त्याचा अधःपात होऊं शकतो. जीवनांत पदोपदीं उभा राहणारा पापपुण्याचा प्रश्न हा बुद्धिबळाचा डाव नाहीं किंवा गणिताचा हिशेब नाहीं. तो व्यक्तींतल्या सुप्त ज्वालामुखीचा स्फोट असतो. नीती–अनीतीचीं कोडीं उलगडतांना महाकवी या दृष्टीनें जीवनाकडे पाहतात. शेक्सपीअर, भवभूति, टॉलस्टॉय किंवा झ्वाइग अशा प्रकारच्या

कलावंतांच्या निर्मितींत जीवनाचें जें उग्र, रम्य, भीषण व विराट स्वरूप दृष्टीला पडतें, आणि ज्याच्या जाणिवेमुळें हॅम्लेट, ऑथेल्लो, रोमिओ अँन्ड ज्युलिएट, उत्तररामचरित, ॲना कॅरेनिना, बीवेअर ऑफ पिटी अशा कलाकृती निर्माण होतात, त्यांचें आकलन वामनरावांच्या ललित प्रतिभेला झाल्याचा प्रत्यय कधींच येत नाहीं.• त्यांचीं पात्रें मध्यम वर्गाच्या चिमुकल्या जीवनाच्या रंगभूमीवर वावरतात. साहजिकच त्यांचे प्रश्नही तोकडे आणि कमी तीव्र वाटतात. ते सोडविण्याचे वामनरावांचे मार्गही मुख्यत: तर्कनिष्ठ आहेत. एखाद्या प्रचंड वादळांत भिरभिरणाऱ्या पानाप्रमाणें विविध संघर्षांच्या कल्लोळांत मानवी मन कसें गिरक्या खात जातें, आणि त्यांतून अद्भुत, भीषण, करुण व उदात्त नाट्य कसें निर्माण होतें याची कल्पना त्यांच्या लिखाणावरून वाचकाला सहसा होत नाहीं.• त्यांना मंत्रचळे म्हणणारे जसे एका टोंकाला गेले तसे त्यांना मंत्रद्रष्टे म्हणून संबोधणारे दुसरें टोंक गांठीत आहेत !• त्यांची प्रतिभा संसारी कवीची होती—ती महाकवीची नव्हती. त्यांच्या जीवन-विषयक तत्त्वज्ञानाला मध्यम वर्गाच्या मर्यादा पडल्या होत्या. समाजांतल्या वरिष्ठ वर्गांतल्या सुसंस्कृतीचा वारसा घेऊन आलेल्या त्यांच्या मनाला जगाच्या संमिश्र व भीषण स्वरूपाचें वास्तव आकलन संपूर्णपणें होऊं शकलें नाहीं. जगांत सज्जन माणसें थोडीफार असतात. पण त्यांना पराक्रमाची प्रेरणा क्वचित्च होते. जीवनांतल्या जंजाळाला कंटाळून गिरिकंदरांत जाऊन राहणाऱ्या साधूसारखीं तीं आपल्या घरकुलांत कालक्रमणा करीत बसतात. त्यांचें सौजन्य अंतीं वांझ ठरतें. जगांत मूर्ख माणसें पुष्कळ आढळतात. पण तीं मूर्खच असल्यामुळें सज्ज-नांचा पाठपुरावा करण्याऐवजीं दुर्जनांच्या हातचीं बाहुलीं होऊन बसण्यांत त्यांना धन्यता वाटते. आणि माणसें स्वभावत: दुष्ट नसतात हें खरें असलें तरी खुरटलेल्या आत्म्यांमुळें, बहुतेकांचा ओढा कष्टावांचून मिळणाऱ्या अमर्याद शारीरिक सुखोपभोगांकडे असल्यामुळें आणि भोग भोगून कधींच संपत नाहींत हा ययातीचा अनुभव महाभारत काळापासून आजतागायत कायम असल्या-मुळें दैनंदिन जीवनांत तीं हां हां म्हणतां लोभी, मत्सरी, कामुक, किंवा अहंकारी बनून थैमान घालूं लागतात. जगांतल्या अगणित दु:खांचें मूळ या मोहसुलभ मानवी वृत्तींत आहे. पण मानवी मनाची ही रस्सीखेंच, त्यांत पदोपदीं निर्माण होणारीं

विचित्र वादळें आणि त्यांतल्या पुष्पराशींत लपून बसणारे विविध विषारी सर्प वामनरावांच्या कलमानें सहसा रेखाटले नाहींत.

इंग्रजी अमदानींतल्या मध्यमवर्गाच्या विकासाच्या काळांत वामनराव जन्माला आले. त्यांच्या पिढींतला हा वर्ग सामान्यतः बुद्धिजीवी असल्यामुळें आणि परक्या सत्तेशीं झुंज घेतांना त्याचे अनेक गुण प्रगट झाल्यामुळें त्याची सोज्ज्वल बाजू ही विशाल जीवनाचीच एक बाजू आहे असें मानून वामन-रावांनीं आपलें कथालेखन केलें. त्यांच्या जीवन–विषयक तत्त्वज्ञानांत समतेच्या व्यावहारिक मार्गापेक्षां, तिच्या प्रस्थापनेकरितां कराव्या लागणाऱ्या भीषण संग्रामाच्या चित्रणापेक्षां, त्यागावर आणि सौजन्यावर जो भर दिला गेला आहे त्याचें मूळ त्यांच्या या मर्यादातच आहे. त्यामुळें त्यांचें वाङ्मय सत्प्रवृत्तींना चालना देणारें असलें तरी सामाजिक क्रांतीला आवश्यक असलेली प्रभावी प्रेरकता त्यांत नाहीं.

चिकित्सक दृष्टीनें विचार करणाराला वामनरावांच्या व्यक्तित्वाच्या आणि कर्तृत्वाच्या आणखीही कांहीं मर्यादा सांगतां येतील. पण त्या सर्व लक्षांत घेऊ-नही त्यांचें मोठेंपण अविस्मरणीय आहे, असेंच मराठी रसिकांच्या आजच्या पिढीप्रमाणें पुढल्या पिढ्यांनाही वाटत राहील.

बंडखोर आत्मे कुठेंही झाले तरी विरळच असतात. वामनरावांचा आत्मा बंडखोर नव्हता. पण तो सदैव जागृत होता. सत्यवानाचे प्राण हरण करण्या-करितां येणाऱ्या यमधर्मावर मात करण्यासाठीं सावित्रीनें जी दक्षता घेतली, ती त्यांच्याही आत्म्याच्या अंगीं होती. एखाद्या देवभक्त स्त्रीनें वादळी वाऱ्यांत पदराआड नीरांजन धरून त्याची ज्योत विझूं न देतां जशी देवाच्या मूर्ती-पर्यंत न्यावी त्याप्रमाणें आयुष्यभर वामनरावांनीं मानवी जीवन सुखी आणि समृद्ध करण्याकरतां सात्त्विक विचारांचें आणि मंगल भावनांचें संरक्षण आणि संवर्धन केलें. निर्मल चारित्र्य आणि त्यांतून प्रगट होणारें उदात्त साहित्य यांचा असा संगम क्वचित्च आढळतो. त्यामुळें त्यांच्या तोंडून सहजासहजीं निघालेल्या उद्गारांतून सुद्धां जीवनाचें ओझरतें पण सत्यदर्शन होतें. आयुष्यांत श्रेय आणि प्रेय यांची सांगड कशी घालावी, असामान्य होण्याची टोंचणी आपल्याला कशी लावून घ्यावी, याचें मूर्तिमंत

उदाहरण म्हणजे वामनरावांचें जीवन ! त्यांच्या एकसष्टीचा समारंभ मुंबईंत झाला तेव्हां जातां जातां त्यांनीं किती चिरंतन सत्यें सांगितलीं. ते म्हणाले, 'माझ्या दोन इच्छा अतृप्त राहिल्या आहेत. एक टेनिस खेळण्याची व दुसरी संशोधनात्मक वाङ्मय लिहिण्याची !' जीवन ही जशी क्रीडा आहे तशीच ती तपस्या आहे, माणसानें शरीराच्या भुका भागविल्या पाहिजेत आणि आत्म्याची क्षुधाही तृप्त केली पाहिजे, असेंच त्यांचें हें वाक्य सुचवीत नाहीं काय ? पुढें ते उद्गारले, 'खरं जीवन म्हणजे काय हें मला तुरुंगांत असतांना कळून आलं. आम्ही तिथं एकमेकांना मनुष्य म्हणून ओळखूं लागलों.' केवढें कटु-सत्य आहे हें ! संपत्तीनें मनुष्य अंध आणि उन्मत्त बनतो, आपली सामाजिक भूमिका विसरतो. पण संकटांत त्याचें मनुष्यत्व जागृत होतें. त्या भाषणाच्या शेवटीं वामनरावांनीं सांगितलें,

> 'वाङ्मय हें नुसत्या विद्वत्तेनें निर्माण होणार नाहीं. त्यासाठीं अनुभव पाहिजेत. चांगलें जीवन जगल्याशिवाय चांगलें वाङ्मय निर्माण होणार नाहीं. असें वाङ्मय कदाचित् सदोष असेल. पण तें लोकांना अधिक आवडेल.'

पुण्यांतल्या सत्काराच्या वेळीं त्यांनीं जे उद्गार काढले तेही मोठे मार्मिक व मार्गदर्शक होते. ते म्हणाले,

> 'माझ्यावर सर्वांचें प्रेम आहे. प्रेमाचा मुबलक अनुभव मला मिळाला आहे. कुठेंहि गेलों तरी प्रेमाची उणीव मला पडली नाहीं. दारिद्र्यांत दुःख नाहीं; पण प्रेमळ माणसें ज्याच्या सभोंवतीं नसतील तो माणूस मात्र खरा दरिद्री !'

वामनरावांना दिवंगत होऊन चार वर्षं होऊन गेलीं. या चार वर्षांत अगणित घडामोडी झाल्या. भारताच्या शिरावर स्वातंत्र्याचा मुगुट चढला. पण त्याचा देह छिन्नभिन्न झाला. एक जखम बरी होते न होते तोंच दुसरी चिघळावी अशी त्याची सध्याची स्थिति आहे. एका जखमी हातांत स्वतःच्या संरक्षणाकरितां तळपती तरवार घेऊन अष्टौप्रहर जागरूक रहायचें आणि दुसऱ्या रक्तबंबाळ हातांत समतेचा—धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक समतेचा—ध्वज घेऊन तो शिखरावर लावण्याकरितां सावधानतेनें पर्वताची बिकट चढण चढायची

हें दिव्य त्याला आतां केलेंच पाहिजे. समाजाच्या सर्व सत्प्रवृत्ती खडबडून जाग्या झाल्या, त्याच्या सुप्त पराक्रमाला आवेशपूर्ण आवाहन मिळालें, त्याच्या डोळ्यां-पुढची क्षितिजें विशाल झालीं, सर्वसामान्य मनुष्याची पायापुरतें पाहण्याची प्रवृत्ति लोप पावून तो समाजाच्या उज्ज्वल भविष्याचीं स्वप्नें पाहूं लागला तरच स्वतंत्र भारताला आपलें हें ध्येय साध्य करणें सोपें जाईल. जागृतीचें हें कार्य तत्त्वनिष्ठ राजकीय पुढाऱ्यांइतकेंच प्रामाणिक साहित्यिकांचेंही आहे. कारण वामनरावांनींच एके ठिकाणीं म्हटलें आहे : ‘असत्य, दुर्जनता व हरतऱ्हेची कुरूपता यांचा विनाश व सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचें संस्थापन करणें हें साहित्याचें अवतारकृत्य आहे.’

कोल्हापूर
१९–१–४८

वि. स. खांडेकर

# संदेश



मी कांहीं वडा साहित्यिक नाहीं हें तुम्हांला ठाऊक आहे. पण हे लेकाचे साहित्यिक संमेलनं भरवितात आणि वर्तमानपत्रांत त्यांचा मोठा गाजावाजा होतो. 'संमेलनाचा संदेश' म्हणून संमेलनानंतर व्याख्यानं होतात आणि आमच्या ओरिएन्टल कॉन्फरन्सचा कोणाला पत्ताहि नसतो! यांचं हें संमेलन म्हणजे काय प्रकरण आहे हें पाहावं म्हणून (आणि खरं बोलायचं म्हणजे तिकडचा प्रांत पाहावा म्हणून) मी एका संमेलनाला गेलों, आणि प्रीतीनिधींच्या निवासांतच उतरलों. अध्यक्षीय भाषणाच्या कार्यक्रमासाठीं जाण्याकरितां उपरणें, पगडी, वगैरे खोगीर चढवून अर्धा तास आधीं आमची स्वारी तयार झाली. आमच्या कंपूंतल्या आमच्यासारख्या मित्रमंडळीला 'तयारी करा! उठा, उठा' म्हणून आग्रह करीत होतों, इतक्यांत शाळेंतलीं आठ–दहा मुलं कोणी लांबोडं स्वाक्षरी पुस्तक घेऊन आणि कोणी कागदाच्यीं चिटोरीं घेऊन माझ्याकडे आलीं आणि 'स्वाक्षरी' द्या म्हणूं लागलीं. 'संदेश पण पाहिजे' एक दोघे म्हणाले. मीं म्हटलं, 'मी कांहीं मोठा साहित्यिक नाहीं, माझी पगडी पाहून फसलेले दिसतां तुम्ही.' 'तुम्ही संस्कृतचे मोठे प्राध्यापक आहांत. आम्हांला ठाऊक आहे' असं एकानं म्हटलं तेव्हां आमची स्वारी मनांत खूष झाली आणि बोलण्याच्या रंगांत आली. मी त्या मुलाला म्हटलं, 'मी संदेश कधीं देत नाहीं. संदेश देण्याच्या मी विरुद्ध आहें. आणि दुसरं असं कीं माझीं पुस्तकं आणि मोठे प्रबंध वाचून जर कोणाला कांहीं 'संदेश' मिळाला नसला तर एका वाक्यांत मी कसा संदेश देऊं? आणि एका व्याख्यानांत तरी कसा देणार?' तरी तीं मुलं म्हणूं लागलीं कीं, 'कांहीं तरी संदेश द्याच. काय आणि कसा तें आम्ही काय सांगणार?' मीं म्हटलं, 'संदेश दिला असता; पण संदेश म्हणजे काय,

कोणीं द्यायचा, याचा तुम्ही विचार केला आहेत का ?' तीं म्हणालीं, 'नाहीं, पण तुम्ही कांहीं तरी दिलाच पाहिजे.' 'बरं आहे तर मग' असं म्हणून एकाच्या हातांतलं चिटोरं घेतलं मीं आणि '**शाईनं लिहूं नका, रक्तानं लिहा**' असा संदेश लिहिला आणि दुसऱ्याचं एक चिटोरं घेऊन, **हिंसा-वृत्ति सोडा, सूत कांता, आणि प्रेमसूत्रानं जग हाराप्रमाणें ग्रथित करा**' असा संदेश लिहिला. त्या दोघांना आनंद झालेला दिसला. इतरहि संदेश मागूं लागले, तेव्हां त्या पहिल्या दोघांना विचारलं 'काय रे, या वाक्यांचा अर्थ काय ? शब्दार्थ कळला असेल, भावार्थहि समजला असेल, पण तो तुम्हांला पटला आहे का ? पहा वाचून. हे दोन्ही संदेश एकच मनुष्य लिहीत आहे. यांत कांहीं विसंगति तुम्हांला दिसत नाहीं ? आणि एकच संदेश दिला असता, तरी तो देण्याची माझी पात्रता काय, तो घेण्याचा आपला अधिकार काय, याचा विचार करायला नको का ?'

ते मुलगे माझी व्याख्यानबाजी ऐकून दबकले. त्यांना कांहीं उत्तर देतां येईना. ते घुटमळत राहिले, तेव्हां त्यांच्या साहाय्यार्थ आमच्या खोलींत राहण्याला आलेले एक साहित्यिक कृष्णाप्रमाणें धांवले आणि म्हणाले, 'अहो, त्यांना व्याख्यान कशाला देतां उगीच ? संदेश मागण्यांत काय चूक आहे ? आपण नाहीं का संमेलनाध्यक्षाकडून संदेशाची अपेक्षा करित ?'

'तोच तर माझा प्रश्न आहे' मी वादाच्या भरांत येऊन उत्तर देऊं लागलों. 'अध्यक्षांनीं इतकीं पुस्तकें लिहिलीं, इतके प्रबंध लिहिले, इतकीं व्याख्यानं दिलीं, त्यांत जो संदेश असेल त्याव्यतिरिक्त ते आतां एकदोन तासांत काय सांगणार ? आणि खरं म्हणजे त्यांच्या इतक्या वर्षांच्या लिखाणांत आणि जीवनांत कांहीं संदेश मिळाला नसला, तर आतांच्या तास दोन तासांच्या भाषणांत काय सांपडणार आहे ?'

'वादाकरितां वाद करीत आहांत तुम्ही' तो साहित्यिक म्हणाला आणि कपडे चढवूं लागला. मुलें विचारीं आमचा वाद मौजेनें ऐकत होतीं. मला साहित्यिकांच्या संगतीमुळें म्हणा किंवा जन्म-स्वभावामुळें म्हणा, भलत्याच वेळीं आणि भलत्याच ठिकाणीं वाद करण्याची 'स्फूर्ति' झाली आणि मीं तावातावानें म्हटलं, 'अहो, अध्यक्षाच्या लेखनांत तुम्हांला कांहीं मननीय, आदरणीय, आढळलं म्हणूनच ना त्याला तुम्हीं अध्यक्ष केलंत ? इतक्या

पुस्तकांत आणि इतक्या वर्षांच्या जीवनांत त्याला जर कांहीं सांगतां आलं नसेल तर तो एका व्याख्यानांत कसा सांगणार ? माझं तर मत असं आहे कीं, विशिष्ट संदेशाची अपेक्षा करणं वेडेपणाचं आहे. लेखकाचा खरा संदेश त्याच्या जिविनांत असतो, त्याच्या पुस्तकांत प्रतिबिंबित झालेल्या त्याच्या मनांत असतो. त्याचीं विशिष्ट मतं मला मान्य नसतील, पण मला त्याचं मन कदाचित् आदरणीय वाटेल. लेखकाचे विचार बरोबर असतील किंवा चूक असतील; त्या विचारांत त्याचा खरा संदेश नाहीं, तर त्याच्या विचार करण्याच्या पद्धतींत, त्या विचारांना आधारभूत असलेल्या आणि त्यांना प्रेरणा देणाऱ्या त्याच्या वृत्तींत त्याचा खरा संदेश गर्भित असतो. मॅक्स-मुल्लरच्या उपपत्ति तज्ज्ञांना आतां संशयास्पद वाटत असतील, पण त्यांची ४० वर्षांची अखंड ज्ञानपिपासेची तपश्चर्या हा त्याच्या जीवनाचा अलिखित संदेश कोण विसरेल ? टिळकांची उत्तरध्रुवावरील आर्यांच्या वसतिस्थानाबद्दलची उपपत्ति कदाचित् चूक ठरेल, पण फावल्या वेळांत विद्याव्यासंग चालू ठेवावा हा त्यांचा कधीं न दिलेला संदेश कायम टिकेल. त्यांचीं राजकीय धोरणें बरोबर होतीं का चूक होतीं हें भविष्यकाळ ठरवील; पण आपल्या ध्येयासाठीं तुरुंगासारख्या आपत्तींना धैर्यानें तोंड द्यावं हा त्यांच्या जीवनांतला गर्भित संदेश हाच त्यांचा खरा संदेश आणि तो मात्र नित्य सत्य ठरेल. असले संदेश कोणी देत नाहींत, पण ते घेतां येतात. कोणी सांगत नाहीं, पण समजतात. माझं व्याख्यान मीं पुढं चालू ठेवलं असतं, पण येथें 'टाळ्या द्या' 'टाळ्या द्या' असें ओरडून तेथल्या मंडळीनें टाळ्यांचा गजर केला. तो गिल्ला थांबल्यावर एक साहित्यिक म्हणाला, 'अहो, हाच संदेश झाला कीं, हाच द्या ना लिहून. खरंच, हा लिहून द्या' असं मुलं म्हणूं लागलीं. पण मीं त्यांना दाद दिली नाहीं. ते जरा दूर गेल्यावर एकमेकांकडे पाहून हंसूं लागलीं हें मला दिसलं आणि तें पाहून मला बरं वाटलं! मुलं गेल्यावर एक मार्मिक पण खवचट साहित्यिक मला चिडवण्याकरितां म्हणाला, 'अहो, नाहीं नाहीं म्हणतां म्हणतां तुम्हीं आतां संदेश सांगितलाच कीं.' मीं उत्तर दिलं, 'सांगितला असेल कदाचित्, पण Consistency is the virtue of asses.

## आत्मज्ञानाची भूक २.

आपल्या इकडे आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याचे मार्ग कोणते, त्याला अधिकारी कोण, इत्यादि गोष्टींविषयीं अनुभवसिद्ध शास्त्रवचनें आहेत. ब्रह्मज्ञान हें सहजगत्या हातीं येणारें फळ नव्हे असें आपलें शास्त्र सांगतें. ब्रह्मज्ञानाला पाहिजे तो अधिकारी नव्हे, ज्यानें आपलीं इन्द्रियें आपल्या ताब्यांत आणलीं आहेत, षड्रिपु ज्यानें जिंकले आहेत, हरतऱ्हेच्या उपभोगाविषयीं ज्याचें मन विरक्त झालें आहे तोच ब्रह्मज्ञानाला पात्र झाला. हें ज्ञान मिळविण्याकरितां संसाराची राखरांगोळी करावी असें आपलें शास्त्र सांगत नाहीं. पाहिजे त्याला संन्यास घेण्यास आपल्या शास्त्रानें अधिकार दिलेला नाहीं. सपत्नीक असल्यास पत्नीची अनुमति आहे किंवा नाहीं, वैराग्य खरें आहे का स्मशान–वैराग्य आहे, शम–दमादि साधनसंपत्ति आहे किंवा नाहीं, इत्यादि गोष्टी पाहूनच संन्यास घेणाऱ्यानें संन्यास घ्यावा, देणाऱ्यानें द्यावा, असें आपलें शास्त्र म्हणतें.

पण शास्त्राप्रमाणें संसार करून व पुढें वानप्रस्थ आश्रम घेऊन मग स्थितप्रज्ञ गुरूंच्या सत्संगतींत आत्मज्ञान करून घेण्याची आजकालच्या लोकांची इच्छा दिसत नाहीं; पण त्यांना आत्मज्ञानाची आवड तर आहे. अशा स्थितींत सध्यांच्या समाजांतील सामान्य सुसंस्कृत माणसांना आपल्या आत्म्याचें खरें स्वरूप काय, त्याला काय पाहिजे आहे, त्याचें समाधान कशानें होईल इत्यादि गोष्टींविषयीं जें वाटत असतें, त्याचें वर्णन करून आत्मज्ञानाची भूक शांत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अन्य मार्ग नाहीं.

अद्वैत ब्रह्मज्ञान निश्रेयस सुख देणारें आहे अशी ज्यांची श्रद्धा आहे, पण त्याच्या पाठीमागें जे ण्यार्ची ज्यांचा ' अधिकार ' नाहीं किंवा ज्यांना धैर्य नाहीं, त्यांच्याशिवाय दुसऱ्या एका वर्गाकरितां हें दुसऱ्या प्रकारचें आत्मज्ञानविवरण आवश्यक आहे. या वर्गांतील लोकांना आपल्या शास्त्रांतील

वेदान्तविवेचन खरें वाटतें. पण ते म्हणतात कीं, अद्वैताचा अनुभव हा कांहीं लोकांना किती जरी आनंददायक व शांतिप्रद असला, तरी तो सर्वांनाच तसा होईल असें नाहीं. कांहीं लोकांना अहंभावविशिष्ट ज्ञान, सत्संगति, प्रेम, इत्यादि गोष्टी इतक्या प्रिय असतात कीं त्यापुढें ब्रह्मज्ञानाची त्यांना किंमत वाटत नाहीं. तुकाराम जसा म्हणाला कीं मला सत्संगति द्या, मग मला धनसंपत्तीची किंवा मुक्तीचीही पर्वा नाहीं, त्याप्रमाणेंच हे लोक म्हणतात कीं आमचें मन शुद्ध असलें, आमचें प्रेम सात्त्विक असलें, आम्हांला जनसेवा करण्याची संधि मिळाली, आमच्या मानसिक व शारीरिक सर्व सात्त्विक शक्तींचा विकास होत असला, आमची सर्व प्रकारें उन्नति होत असली, म्हणजे आम्हांला तुमच्या ब्रह्मज्ञानाची जरूरी नाहीं! ही वृत्ति बरोबर आहे किंवा नाहीं या प्रश्नाचा ऊहापोह करण्याचें येथें प्रयोजन नाहीं. अशा वृत्तीचे पुष्कळ लोक आहेत व ते असणार ही गोष्ट ध्यानांत धरली म्हणजे आपलें ऐहिक व पारमार्थिक कल्याण कशांत आहे, याचा तर्कदृष्टीनें व हल्लींच्या सामान्य सुसंस्कृत माणसाला पटतील अशा प्रमाणांच्या आधारें ऊहापोह करणें जरूर आहे याबद्दल वाद राहणार नाहीं.

खरें बोलावें, खोटें बोलूं नये, चोरीचाहाडी करूं नये, परोपकार करावा इत्यादि जे नैतिक नियम अलीकडील सुसंस्कृत समाजांतील सामान्य माणसास देखील मान्य आहेत, त्यांचें सविस्तर वर्णन देण्याचें हें स्थल नव्हे. मनोदौर्बल्यामुळें या नियमांचें अतिक्रमण मनुष्याच्या हातून होतें ही गोष्ट खरी; पण नियमांचें मान्यत्व या गोष्टीनें कमी होत नाहीं. आपण जें कांहीं करतों तें सद्बुद्धीनें केलें पाहिजे तरच तें नीतीचें, हेंहि सर्वजण कबूल करतील. वाईट बुद्धि मनांत धरून एखाद्यानें जरी मोठा उपकार केला असला, तरी त्या ‘ उपकारा ’ची नैतिक किंमत बेताचीच. आतां, सामान्य नीतिनियमांमध्यें विरोध उत्पन्न झाला असतां काय करावें, असा प्रश्न केला असतां सुसंस्कृत मनुष्य म्हणेल कीं, ‘ ज्याच्या योगानें तुझ्या अंतरात्म्याचें समाधान होईल असें तुला वाटतें तें कर. ’ ‘ कशानें माझें समाधान होईल हाच माझा प्रश्न आहे ’ असें कोणी उलट म्हणाल्यास तो म्हणेल कीं, ‘ तूंच आपल्या मनाला विचारून पहा. तुला स्वतःच्याच पोळीवर तूप ओढून धष्टपुष्ट होण्यामध्यें व पशूंप्रमाणें यथेष्ट विषयोपभोग घेण्यामध्यें जीवितसाफल्य आहे

असें वाटतें काय.? नाहीं. लोकांना आनंदी पाहून तुला बरें वाटतें ना? होय. जगांत जीं अनेक दुःखें किंवा संकटस्थानें आहेत, जीं भांडणें आहेत, जो कोतेपणा आहे, जी कुरूपता आहे, जी अरसिकता आहे, जी असदाभिरुचि आहे, ती होईल तेवढी कमी व्हावी, अशी तुझी इच्छा आहे ना? आणि याकरितां स्वतःच्या जीवाला थोडाबहुत त्रास सोसावा लागला, तरी तो सोसणें चांगलें वाटतें ना? असें तुला वाटत नसल्यास पुढचें बोलणेंच खुंटलें. वाटत असून तसें आचरण होत नाहीं अशी तुझी तक्रार असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य करण्यासारखें नाहीं. कारण मानवजाति सध्यां ज्या अवस्थेंत आहेत त्या अवस्थेंत The Spirit is willing but the flesh is weak, किंवा '**जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः**' 'मला धर्म अधर्म समजतो, पण इंद्रियें माझ्या ताब्यांत नाहींत' असें म्हणण्याची पाळी पुष्कळांना येते. पण या आत्मदौर्बल्यविषयक असंतोषाच्या पोटांतच संतोषाचें एक बीज गर्भित आहे. कारण आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं परवां, दहावीस वर्षांनीं; या जन्मीं नाहीं तर पुढील जन्मीं, आपण आपल्या अंतरात्म्याची भूक शांत करूं, अशी सामान्य मनुष्याला आशा असते. या आशेची ज्योत सदैव सारखीच तेजस्वी असते असें नाहीं. कधीं ती अगदीं मंद होते व विझून केव्हां जाईल आणि केव्हां नाहीं अशी तिची अवस्था होते, आणि मनुष्याचें जीवित अंधकारमय होऊन पुढचा मार्ग तर दिसत नाहीं, हात धरून सुरक्षित जागेंत नेऊन पोंचवील असा कोणी श्रेष्ठ प्रेमळ पुरुष दिसत नाहीं, पावलांमध्यें जोर नाहीं, हातपाय हलविण्याविषयीं उत्साह नाहीं, अशी अवस्था प्राप्त होते. पण ही शोचनीय स्थिति नित्य नसते हा अनेकांचा अनुभव आहे, आणि म्हणूनच आपलें दौर्बल्य पाहून उत्पन्न झालेल्या असमाधानवृत्तींत समाधानवृत्ति गर्भित आहे असें वर म्हटलें. आपल्याकडून होईल तितका प्रयत्न करून जग हें अधिक सात्त्विक, सुंदर व आनंदरसमय करणें या ध्येयाची ज्योत हल्लींच्या संस्कृतींत वाढलेल्या मनुष्याच्या हृदयांत कधीं मंद तर कधीं अमंद पेटत असते, या विधानाचा असा अर्थ नव्हे कीं प्रत्येक मनुष्याला सारी पृथ्वी हलवून सोडण्याची नेपोलियनसारखी धमक किंवा शक्ति असते. नेपोलियन झाला तरी त्यालासुद्धां युरोपमधील देश व इजिप्त यांबाहेर विशेष कांहीं करतां आलें नाहीं, हें समंजस मनुष्य ओळखून असतो. नेपोलिअनचें कशाला? श्रीराम-

चंद्र, श्रीकृष्ण, इत्यादि देवांचें ( किंवा देवतुल्य राजांचें ) देखील राज्य अखेर विलयास गेलेंच कीं नाहीं ? सार्‍या त्रिभुवनांत आचंद्रार्क टिकेल असा कायमचा आकार मानवजातीच्या जीवितघटाला आजपर्यंत कोणीहि देऊं शकला नाहीं; फार काय, या घटावर आपली खूण कायमची राहील, एवढें देखील कोणी करूं शकला नाहीं, हें सुज्ञ मनुष्याच्या ध्यानांत आल्याशिवाय कसें राहील ? '**जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति**' अशा प्रकारची आपण ज्या वेळेस लोकोत्तर माणसांच्या कार्याविषयीं भाषा वापरतों त्या वेळेस देखील 'जग' म्हणजे यच्चयावत् मनुष्यें व प्राणिमात्र असा या विधानाचा शब्दशः अर्थ करावयाचा नसतो. मग यःकश्चित् सामान्य माणसाविषयीं बोलत असतांना तसा अर्थ कां करावा ? 'जगाचें' किंवा 'देशाचें' हित पहा इत्यादि वाक्यसमूहांच्या द्वारें एवढाच अर्थ विवक्षित असतो कीं जितक्या अधिक लोकांचें व जितकें अधिक तुम्हांला कल्याण करतां येईल, तितकें करा. एखाद्या गांवढळ गोम्या बिन सोम्याला सार्‍या जगाचें किंवा सर्व देशाचें कल्याण करतां येण्याचें दूरच राहिलें, त्यांच्या जिल्ह्याचें, तालुक्याचें किंवा गांवाचेंहि कल्याण करणें त्याच्या आवांक्याच्या बाहेरचें आहे. पण त्यानें दिवसभर मजुरी करून किंवा शेतावर खपून आपल्या म्हाताऱ्या आईबापांना, बायकोला व मुलांबाळांना आपल्या ऐपतीप्रमाणें प्रेमानें जेवूं खाऊं घातलें, दुसऱ्याच्या बायकोवर वाईट नजर ठेवली नाहीं, दुसऱ्याचे पैसे चोरण्याची इच्छा धरली नाहीं, शेजाऱ्याला सवडीप्रमाणें मदत केली, सवंगड्यांबरोबर हंसूनखेळून दिवस घालविले, कोणाला लागेल असें कधीं बोलला नाहीं, आपलें घरदार स्वच्छ राखलें, तर त्याच्या मगदुराप्रमाणें व अकलेप्रमाणें त्यानें देशहितच केलें म्हणावयाचें. आपल्या कक्षेंतली जी परिस्थिति आहे तिच्यावर ज्ञानकिरणांचा अधिक प्रकाश पाडून तिच्यांत अधिक रमणीयता व साधुत्व आणण्याचा प्रयत्न करणें हेंच नीतीचें मुख्य तत्त्व आहे. अशा प्रकारचें आचरण सुसंस्कृत मनुष्याच्या अंतरात्म्याला समाधान व शांति देतें. त्याच्या 'जीवात्म्याला' विषयोपभोग हे कांहीं काळ आनंद देऊं शकतील; पण विषयोपभोगांची एकसारखी रांग लागली तरी हा एका अर्थी सतत, अविरत किंवा 'नित्य' असलेला आनंद वर वर्णन केलेल्या शांतीच्या किंवा प्रसन्नतेच्या मानानें अगदीं क्षुद्र दर्जाचा आहे, हें तो ओळखून असतो. इन्द्रियसुखें त्याला योजिलेल्या सत्पथापासून एखादवेळेस च्युत करूं

शकतील, पण त्याला अशा वेळीं खरें समाधान प्राप्त होत नसतें. कारण नीतितत्त्व सोडून सुखाभिलाष धरणारा आत्मा हा आपला खरा आत्मा नव्हे, तो तोतया असून आपल्या हृदयांत दौर्बल्यामुळें उगीच पुंडाई माजवीत आहे असें सुसंस्कृत मनुष्य जाणून नसतो.

जगाचें कल्याण, देशहित, जनसेवा, परोपकार, ज्ञानवर्धन सदभिरुचीचें पोषण, इत्यादि इष्ट तत्त्वें ज्या कर्मांमध्यें गर्भित आहेत, अशा कर्मांमध्यें आपल्या खऱ्या आत्म्याचें–परमात्म्याचें-स्वरूप व्यक्त पावत असतें अंतरंगाकडे पाहिलें तर हा आत्मा मोठ जिज्ञासु, प्रेमप्रचुर, सुखलोलुप, सौंदर्यप्रिय व नैतिक सद्बुद्धीविषयीं आवड बाळगणारा असा दिसतो. गांवढळ मनुष्य घेतला तरी त्यालासुद्धां जिज्ञासा असतेच. आकुंचित दृष्टीचा मनुष्य घेतला तरी आपलीं मुलेंबाळें त्याला अत्यन्त प्रिय असतातच व तो त्याच्या प्रेमानें आपल्या सुखाचा व जीविताचाहि त्याग करण्यास प्रवृत्त होतो. ज्यांना सुशिक्षण, सुसंगति, इत्यादि सत्संस्कारांचा लाभ मिळाला आहे त्यांचें प्रेम याहून अधिक, व्यापक, खोल व स्थिर असतें व जो पूर्णावस्थेस पोंचला आहे, त्याला तर वसुधा हेंच कुटुंब वाटूं लागतें आणि तो ' सर्वभूतहिता '—विषयीं स्वहिताइतकाच तत्पर असतो. प्रेम हें आत्म्याचें एक अंग झालें; रसिकता किंवा सौंदर्यप्रियता हें दुसरें अंग आहे. आपल्या मुलांना खाण्यापिण्यास मिळालें म्हणजे एवढ्यानें आपलें समाधान होत नाहीं. तीं सुरेख दिसावीत अशीहि आपली इच्छा असते. याप्रमाणेंच आपलें घर, आपला पोषाख, सामानसुमान, शेतीवाडी, शहर, काव्यग्रंथ, नाटकें, चित्रें, पुतळे इत्यादिकांत जितकी रमणीयता अधिक असेल तितकी आपणांस पाहिजे असते; त्याशिवाय आत्म्याचें पूर्ण समाधान होत नाहीं. रानांत राहाणाऱ्या कातकऱ्याला देखिल आपलें घरदार स्वच्छ व सुरेख असावेंसें वाटतें. मग त्याच्याहून उच्चतर संस्कृति लाभलेल्या मनुष्याला सौंदर्यलालसा असते यांत नवल काय? अपत्य–प्रेम व सौंदर्यलालसा याशिवाय आत्म्याच्या पोटांत तिसरें एक तत्त्व आहे. हें तत्त्व म्हणजे नैतिक सद्बुद्धि. आपलें पोर आनंदांत राहावें, तें गोजिरवाणें असावें, असें जसें प्रत्येकाला वाटतें त्याप्रमाणेंच तें सदाचारसंपन्न असावें, अशी प्रत्येकाची इच्छा असते. 'सदाचारा'च्या कल्पना कालस्थलभेदानें भिन्न असतील; पण सदाचारप्रियता हा गुण सर्व लोकांमध्यें दिसून येतोच.

आपण जें कांहीं आचरण करतों तें सदबुद्धीनें केलेलें असलें तरच आपला अंतरात्मा गार होतो. दुसऱ्याला आनंदित करणारें किंवा त्याचें अन्य तऱ्हेनें कल्याण करणारें कर्म आपण जर दुष्ट बुद्धीनें केलें तर त्यानें मन प्रसन्न होत नाहीं. जगांत आनंदाचें क्षेत्र अधिक वाढवावयाचें हें ध्येय जरी चांगलें असलें व आपल्या कर्मांपासून आनंदक्षेत्र जरी विस्तृत झालें असलें तरी कुबुद्धि-पूर्वक केलेल्या असल्या कर्मांपासून आत्मप्रसादरूपी फलप्राप्ति कधीं व्हावयाची नाहीं.

आपल्याप्रमाणेंच दुसऱ्याचेंहि सुख पहावें असें आपला अंतरात्मा सांगतो. पण या सुखामध्यें 'कशा प्रकारचें सुख' हें स्पष्ट केलेलें नाहीं. सुखासुखांमध्यें भेद आहेत. कोणत्याहि विषयसुखापेक्षां आत्मप्रसाद अधिक योग्यतेचा आहे. आपण स्वतः क्षुद्र ऐन्द्रियसुखें त्याज्य समजून उच्चतर आत्मप्रसादाचें ध्येय आपल्यापुढें ठेवतों, त्याचप्रमाणें लोकांचें 'हित' करावयाच्या वेळीं त्यांच्या क्षुद्र विषयसुखापेक्षां त्यांच्या निःश्रेयसुखाचा लाभ त्यांना होईल याविषयीं आपण दक्ष असलें पाहिजे.

आपल्या हृदयांतील खरा आत्मा—परमात्मा—आपलें स्वतःचें श्रेय साधण्यास आपणांस सांगतो आणि या श्रेयाच्या अविरोधानें आपलें स्वरूप जितकें रम्य व प्रेममय होईल तितकें त्याला पाहिजे असतें. खरें प्रेम दुसऱ्याला सुख द्या असें सांगत नाहीं, तर त्यालाहि आपल्याप्रमाणेंच आत्मा आहे, तेव्हां त्या आत्म्याचें श्रेष्ठ स्वरूप सर्वांगानें व्यक्त होईल याबद्दल तुला जेवढें साहाय्य देतां येईल तेवढें दे, असें सांगतें. खरी सौंदर्यप्रियता अथवा रसिकता हीं देखील वाटेल ते रसोपभोग घेण्यास सांगत नाहीं, तर सात्त्विक रसास्वाद घे असें सांगते. आत्महिताची जी उच्च कल्पना आहे तिला अनुसरून अशीच 'परहिता'ची कल्पना असली पाहिजे. 'परहित' साधणें आपलें कर्तव्य आहे पण याचा अर्थ दुसरा मागेल तें त्याला द्यावें असें नाहीं, तर आपल्याप्रमाणेंच त्याच्या हृदयांतहि वास करणाऱ्या आत्म्याचें सर्वांगानें विकसन होईल व आत्मप्रसादाचा त्याला लाभ होईल अशा उद्देशानें त्याला जेवढें म्हणून आपल्या हातून साहाय्य देववेल तेवढें द्यावें, असा त्याचा अर्थ आहे. आतां आपल्या स्वतःच्या अनुभवावरून अपणांस असें विधान करतां येईल कीं, आत्म्याची प्रसन्नता ही इतर गोष्टींपेक्षां आपल्या नीति-

मत्तेवर अधिक अवलंबून आहे. ज्ञान (म्हणजे विद्वत्ता) वक्तृत्व, रसिकता, अपत्य-धन-दारादिसंपत्तिमत्व, इत्यादि गुणांचा समवाय दुधासारखा गोड आहे; पण या दुधांत नीतिमत्तेची साखर पडली तर ठीक. पापवृत्तिरूपी मिठाचा खडा त्यांत पडला तर तें मधुर दूध नासून जाईल. पापकर्माबद्दल आपलें मन आपणाला खाऊं लागलें म्हणजे मग खाणेंपिणें, नाटक, काव्य कांहीं एक गोड लागत नाहीं. उलटपक्षीं आपला कांहीं एक अपराध नसतां एखादी मोठी आपत्ति येऊन आपल्यावर कोसळली तर आपल्या चित्तांत चलबिचल होईल नाहीं असें नाहीं; पण या वरच्या लाटांच्या खालीं-आत्म्यामध्यें-एक प्रकारची शांति व प्रसन्नता अढळ राहते. नीतिमत्तेशिवाय आत्मप्रसाद नाहीं, म्हणून ज्याला परहित साधावयाचें असेल त्यानें नीतिमत्तेचा परिपोष होईल या गोष्टीकडे इतर गोष्टींपेक्षां अधिक लक्ष दिलें पाहिजे. पण नीतिमत्तेचा परिपोष म्हणजे विशिष्ट कर्मांचा परिपोष असें नव्हे; कारण भिन्न परिस्थितीमध्यें तेंच कर्म नीतीचें व तेंच अनीतीचें ठरेल. नीतिचा परिपोष म्हणजे नीतीनें वागण्याच्या बुद्धीचा परिपोष. नीतिमत्ता ही आत्मरूपी गृहांतील गृहिणी आहे; पण तिला इतरांचा हेवा वाटत नाहीं. इंद्रियसुखांचा, ज्ञानाचा; विविध ललित-कलाविषयक रसास्वादाचा ही गृहिणी दुस्वास करीत नाहीं, किंवा त्यांचा विटाळ मानीत नाहीं. आत्म्याच्या घरांत सर्वांना आनंदानें नांदतां येतें. पण एक मात्र अट आहे, ती ही कीं ज्यानें त्यानें मर्यादा संभाळून वागलें पाहिजे. नीतिमत्ता ही सुखेच्छेची सासू म्हटलें तर ही सासू आपल्या सुनेचा सदा सासुरवास करते असें नाहीं. सून जेव्हां आपली पायरी सोडून उन्मत्त-पणा करूं लागते तेव्हांच सासूला आपला अधिकार गाजवावा लागतो.

परहित साधतांना त्याच्या सुखाची वृद्धि होते किंवा नाहीं हें न पाहतां त्याच्या नीतिमत्तेचा परिपोष होतो किंवा नाहीं हें पाहावें, असें वर म्हटलें. पण नीतिमत्ता ही वस्तु फार खोल व गूढ आहे. ती हृदयांतल्या अगदीं आंतल्या गाभ्यांत राहते. तेथें वक्तृत्वाचीं किंवा तत्त्वज्ञानाचीं किरणें प्रवेश करूं शकत नाहींत. स्वतःच्या उदाहरणाचाच दुसऱ्याच्या नीतिमत्तेवर परि-णाम होतो. आपल्या स्वतःच्या नीतितेजानें तेथें जर आधींच प्रवेश केला नसला व द्वार उघडें केलें नसलें, तर वाक्पांडित्याचा प्रवाह त्यावरून कितीहि वाहिला तरी उलट्या घागरीवर पाणी अशांतलीच स्थिति व्हावयाची.

तेव्हां जगाच्या कल्याणाच्या, देशहिताच्या, किंवा दुसऱ्याची नीति सुधारण्याच्या उद्योगाला लागावयाचें म्हणजे आपलें हृदय निर्मळ करण्यापासून मनुष्यानें आरंभ केला पाहिजे.

याचा जर कोणी असा अर्थ करूं लागेल कीं आधीं तुम्ही नीतीचे पुतळे व्हा, आणि मग परहिताच्या गोष्टी बोला, तर तो अर्थ चुकीचा होईल, स्वतःस साधारण पोहतां येऊं लागलें म्हणजे दुसऱ्याला पोहणी शिकवितां येते. त्याला दहा पुरुष खोल बुडी मारण्याची किंवा समुद्र तरून जाण्याची ताकद लागत नाहीं. स्वतःस चार अक्षरें लिहितां वाचतां येऊं लागलीं म्हणजे दुसऱ्याला अक्षरओळख करून देण्याची पंचाईत पडत नाहीं. याप्रमाणेंच नीतीचीहि गोष्ट आहे.

शिवाय दुसरें असें नीतिमत्तेला अनुकूल परिस्थिति उत्पन्न करणें हें सुद्धां परंपरेनें नीतिपोषणच आहे. आपल्या स्वतःच्या तेजस्वी उदाहरणानें दुसऱ्याचें सौजन्य वृद्धिंगत करणें हा तर एक मार्ग आहेच. पण नीतिमत्तेला अनुकूल परिस्थिति उत्पन्न करण्याचा मार्ग अगदींच त्याज्य नव्हे. मनुष्य पापें कां करतो तर तो अज्ञानी असतो, त्याला वाईट संगति लागलेली असते, वाईट संवयी जडलेल्या असतात, सात्त्विक आनंद उपभोगण्याची आवड किंवा शक्ति नसते, म्हणून. ही प्रतिकूल परिस्थिति आपल्या हातून होईल तेवढी बदलली तर आपण त्याच्या उचित आत्मविकासास साहाय्य केल्यासारखेंच आहे. मुंबई-सारख्या शहरांतील गरीब लोकांना राहण्यास चांगल्या खोल्या दिल्या तर त्यांची नीतिमत्ता सुधारण्याचें थोडेंबहुत श्रेय मिळालेंच पाहिजे.

नीतिपोषणाच्या वगैरे लांबलांब गप्पा पुस्तकांत किंवा वर्तमानपत्रांत शोभतात, व्यवहारांत अशा प्रकारचे पुस्तकी उच्च हेतू मनांत धरून वागणारे फार थोडे असतात. पण ते अनीतिमान असतात किंवा त्यांच्या आचरणानें नीतिसंवर्धन होत नाहीं असें नव्हे. आई मुलांचे लाड करते, त्यांचें मन सहसा दुखवीत नाहीं, त्याचे हट्ट चालूं देते, हें काय 'जगांतील नीतिमत्ता सुधारण्या-'च्या उच्च हेतूनें? किंवा मुलांची तरी नीतिमत्ता सुधारण्याच्या हेतूनें! मुळींच नाहीं. ती मुलांचें तात्कालिक सुख पहात असते. यामुळें त्यांचें अनेक तऱ्हेनें नुकसान होतें. पण तिच्या प्रेमळपणाचा जितका नीतीला आधार आहे तितका दुसऱ्या कशाचा नसेल! सर्व नीतिशास्त्रवेत्त्यांचा, शिक्षणशास्त्रज्ञांचा,

वेदान्त्यांचा, पुराणिकांचा, व्याख्यान देणाऱ्या वक्त्यांचा, वर्तमानपत्रकर्त्यांचा, एकूणएक सर्वांचा वक्तृत्वपूर्ण व विद्वत्ताप्रचुर उपदेश तागडीमध्यें एकीकडे घातला व त्यांच्यांत आधुनिक समाजसेवावादी लोकांचीं हस्तपत्रकें, रात्रींचे वर्ग, मॅजिक लॅंटर्नचे खेळ, वगैरेंची आणखी भर घातली, आणि दुसऱ्या बाजूला अशिक्षित मातांची वेडी माया घातली, तर जगांतील कठोर व्यवहाराला कोमल व स्निग्ध स्वरूप देण्याच्या कामीं या आंधळ्या खुळ्या मायेचेंच महत्त्व अधिक आहे हें कबूल करावें लागेल !

याचें कारण उघड आहे. माता जें कांहीं करते तें प्रेमानें व सद्धेतूनें करते, त्यांत आपलपोटेपणा नसतो किंवा कपट नसतें. तिच्या फाजील लाडांचा बाह्य परिणाम कसाहि होवो, त्यामुळें मुलांची प्रकृति बिघडो किंवा त्यांचा अभ्यास मागें राहो; मुलाच्या जीवितरूपी पाटीवर हे किंवा असले डाग कितीहि पडोत; मातेच्या प्रेमाचा ओला हात त्या पाटीवरून एकसारखा फिरत असल्यामुळें हे डाग मुलाच्या नीतिमत्तेचें कायमचें नुकसान कधींहि करूं शकत नाहींत. माता ज्या बुद्धीनें मुलाचे लाड पुरविते ती बुद्धि त्याच्या अंतरात्म्याच्या अंतरात्म्याला जाऊन भिडते व तेथें प्रेमाचा झरा उत्पन्न करते. हा प्रेमाचा झरा विद्वत्तेच्या किंवा सदुपदेशाच्या कठोर कुदळीनें खणून किंवा मारहाणीचे सुरुंग लावून अंत:करणक्षेत्रांत काढतां येत नाहीं. डोळे फोडून डोळ्यांना पाणी येत नाहीं, रक्त मात्र येतें, पण करुण प्रसंग पाहून त्यांना पाणी जसें आपोआप येतें तसेंच अंत:करणांतील प्रेमनिर्झराचेंहि आहे. वातींतलें तेल जसें खालच्या तेलाचें आकर्षण करून घेतें तसेंच मातेच्या प्रेमाचें स्निग्ध आकर्षण मुलाच्या हृदयांत सुप्त असलेल्या झऱ्यास वर आणण्यास कारण होतें.

मातेच्या प्रेमाची जी गोष्ट तीच मित्राच्या, सोबत्याच्या, आपल्या बरोबर काम करणाऱ्यांच्या प्रेमाची आहे. ‘जगाचें कल्याण करावयाचें,’ ‘देशांतील नीतिमत्ता सुधारावयाची’ अशापैकीं उच्च हेतु प्रत्यक्ष जरी डोळ्यांसमोर नसला, तरी दुसऱ्याचें मन सहसा दुखवावयाचें नाहीं, मर्मभेदक भाषणें करावयाचीं नाहींत, आपल्यापेक्षां दुसऱ्याचें सुख व त्याची सोय पहावयाची, कपटरहित हास्यविनोद करावयाचा, अशा प्रकारची जी वृत्ति आहे ती सभोंवतालच्या आत्म्यामध्यें जी स्निग्धता, कोमलता व रम्यता उत्पन्न करील,

ती जितकें नीतिपोषण करील, तितकें दुसऱ्या कोणत्या वृत्तीनें होईल किंवा नाहीं याची वानवाच आहे.

स्वतःची व होईल तितकी इतरांची नीतिमत्ता सुधारावयाची हें आपलें ध्येय किंवा हा आपला मुख्य पुरुषार्थ असें आपण प्रथम ठरविलें; पण अखेर दुसऱ्याचें मन होतां होईल तों दुखवावयाचें नाहीं, व्यवहाराच्या कोरड्या भाकरीवर प्रेमदुग्ध शिंपडून होईल तेवढी ती स्निग्ध व नरम करावयाची, संसारयात्रेचा मार्ग आक्रमण करतां करतां हंसून खेळून असावयाचें, कोणाला लागून बोलावयाचें नाहीं, अशा प्रकारच्या घरगुती उपदेशावर आपण येऊन ठेपलों. यावरून कोणी असें अनुमान काढूं नये कीं, याहून उच्चतर व उदात्ततर वृत्ति शक्यच नाहीं. हीच मनुष्याची नैतिक पूर्णावस्था असें भासविण्याचा लेखकाचा इरादा नव्हता. सामान्य मनुष्याचें नैतिक ध्येय व्यवहारांत कोणतें स्वरूप धारण करतें एवढेंच येथें दर्शवावयाचें होतें. नैतिक पूर्णावस्था प्राप्त झाली असतां [ नीतिदृष्ट्या ' परिणतप्रज्ञ ' झाला असतां ] मनुष्याचें आचरण व त्याची बुद्धि कशी असेल याचें विस्तृत वर्णन येथें न करतां अर्जुनानें श्रीकृष्णाला स्थितप्रज्ञ करतो काय, तो बोलतो कसा, चालतो कसा, इत्यादि प्रश्न विचारल्यावर त्याला जें उत्तर मिळालें त्याच्यांत पूर्वविकसित नीतितत्त्वाचा आरसा आहे, एवढें तेथें सांगितलें म्हणजे पुरें आहे.

ज्ञानप्रियता, सुखाभिलाष, प्रेम, विविध रसोपभोगलालसा, स्वहितप्रवृत्ति, परहितप्रवृत्ति इत्यादि आपल्या आत्म्याचीं अंगें आहेत असें म्हटलें. पण इसापनीतींतील हात, पाय, पोट वगैरे अवयवांमध्यें जसें भांडण लागलें तसें या विविध अंगांमध्यें भांडण लागलें तर काय करावयाचें हा आपला मूळ प्रश्न होता व याचें उत्तर अद्यापि कांहींच आलेलें नाहीं. या दृष्टीनें वरील चर्चा विषयान्तरासारखी भासते. पण या चर्चेमुळें मूळ प्रश्नाचें उत्तर देणें सोपें झालें आहे असें वाटतें. आत्म्याचें स्वरूप काय व त्याला काय काय पाहिजे असतें, हें कळल्याशिवाय त्याचें समाधान कशानें होईल याचा निर्णय करणें अशक्य झालें असतें. आपणांला ज्ञान, सुख, परोपकार, सौंदर्य इत्यादि गोष्टी पाहिजे आहेत. या गोष्टींमध्यें कधीं विरोधच उत्पन्न झाला नसता, तर वरील प्रश्नाचें उत्तर अगदीं सोपें होतें. पण विरोध असल्यामुळेंच सर्व घोटाळा झालेला आहे. किंवा ' घोटाळा ' तरी कां म्हणावें ? यामुळेंच

संसारप्रवाहाला रम्य नवरसात्मकत्व आलेलें नाहीं काय ? किंवा उपमा बदलून बोलावयाचें म्हणजे, यामुळेंच संसाररूपी शुष्क पटावर रंगीबेरंगी सुंदर वेलबुट्टी काढली जात नाहीं काय ? दुसरें असें कीं भिन्न मनोवृत्तींमध्यें आपल्या हृदयांत कधींच कलह झाला नसता तर क्षुद्र मनोवृत्तींना जिंकण्याचा आपणांस आनंद होत आहे तो प्राप्त झाला असता काय ? मनांत आणावी ती इच्छा सफल झाली असती, ' एक ही किंवा ती, दोन्ही मिळणें शक्य नाहीं '–अशा प्रकारचें बिकट कोडें आपणांस कधींच सोडवावें लागलें नसतें, तर एकीच्या मोहकपणाला न भुलतां दुसरीच्या श्रेयस्करतेला वरण्याचा आपणास जो निरातिशय सात्त्विक आनंद होतो तो प्राप्त झाला असता काय? प्रबल इन्द्रियांशीं झगडा करून त्यांना अनेक वेळां चीत केल्याचा आपणांस अनुभव नसता, तर ' इन्द्रियें एकपट प्रबल तर आत्मा दसपट प्रबल ' अशा प्रकारचा दृढ आत्मप्रत्यय व सात्त्विक स्वाभिमान शक्य होता काय ?

हें कांहींहि असो; आत्म्याला शरीराची उपमा देणें विलक्षण आहे. तथापि आत्मरूपी शरीराचीं ज्ञानप्रेम, बंधुभागिनीप्रेम, मित्रप्रेम, काव्यप्रेम, सदाचारप्रेम इत्यादि अंगें एकमेकांत अनेक वेळां भांडतात व त्यांचें भांडण तोडणें कठीण पडतें, असें म्हटलें तर हें भांडण सर्वांना समजण्यासारखें व पटण्यासारखें आहे. वरील भांडण कसें तोडावें हा आपल्या पुढचा आतांचा प्रश्न आहे.

आपल्या अवयवामध्यें कोणताहि अवयव निरुपयोगी नाहीं; हात, पाय, कान, नाक–फार काय, नखें, केंस इत्यादिकांचा सुद्धां उपयोग आहे. पण त्यांतल्या त्यांत पोट किंवा डोकें यांचें अधिक महत्त्व आहे. एखाद्या काठेवाडी बारोटिआनें (डकाइतानें) गिरनारच्या रानांत, आपणांस पकडलें व म्हटलें कीं, 'तुमचा कोणता तरी अवयव कापणार आहे आणि मग माझ्या पुंडाईचें वर्तमान साऱ्या गांवाला कळावें व दशहत बसावी म्हणून मी तुम्हांला सोडून देणार आहें,' तर आपण त्यांला विनवूं कीं, 'बाबा अवयव कापावयाचाच तर हात, पाय, कान किंवा नाक काप; पण डोकें छाटूं नको.' आत्म्याचें कोणतें अंग असेंच सर्वांत अधिक महत्त्वाचें आहे? सुखलालसेला हें उच्चतम स्थान कधींहि देतां येणार नाहीं हें कोणीहि सांगेल. सुखलालसा म्हटली कीं ती वाईटच असें आपणांला वाटत नाहीं. सात्त्विक सुखें भोगण्यास

कोणतीहि हरकत नाहीं असें आपला आत्मा सांगतो. अट एवढीच कीं ही सुख-लालसा विद्यासाधन, परोपकार, इत्यादिकांच्या आड येतां कामा नये. आपल्या शास्त्रांनीं अर्थ व काम हे चार पुरुषार्थांमध्यें गणलेले आहेत, त्यांना निंद्य म्हटलेलें नाहीं, पण ते जेव्हां धर्म किंवा मोक्ष यांना प्रतिकूल होतात तेव्हां ते त्याज्य ठरतात. सुखलालसा कनिष्ठ ठरली, पण ज्ञानलालसा, रसिकता, परोपकारबुद्धि, इत्यादिकांमध्यें तर-तम भाव कसा ठरवावयाचा? सुखवादी तत्त्ववेत्त्यांनीं सुखाला म्हणजे कामाला व अर्थाला पुरुषार्थत्वाचें स्वरूप दिलें हें योग्यच होतें, पण सुखाशिवाय दुसरा पुरुषार्थच नाहीं असें जें ते म्हणत तेथें त्यांचें चुकत होतें. असो. सुखलालसा कनिष्ठ हें कबूल; पण जीवितसंरक्षणेच्छा, ज्ञानलालसा, रसिकता, सौजन्य इत्यादिकांमध्यें तर–तम–भाव कसा ठरवावयाचा, हा आपला प्रश्न आहे.

एखादी गोष्ट प्रिय आहे व दुसरी श्रेयस्कर आहे आणि त्यांमध्यें विरोध उत्पन्न झाला आहे, अशा प्रसंगीं 'प्रिय' सोडून 'श्रेय' वरण्याची जी प्रवृत्ति ती नीतिमत्ता. 'श्रेय' कोणतें व तें कसें ठरवलें जातें हा प्रश्न अलाहिदा आहे. आपल्या शरीरामध्यें बरें–वाईट, खरें–खोटें, हितकर–अहितकर, इत्यादि भेद दाखविणारें डोकें हें जसें 'उत्तमांग' गणलें गेलें आहे, त्याचप्रमाणें प्रेयापेक्षां श्रेय अधिक मान्य समजणारें सौजन्य हें आत्म्याचें उत्तमांग गणलें पाहिजे; कारण हें सौजन्य जेथें नसेल तेथें इतर अंगें निर्बल, पंगु किंवा आंधळीं होतात एवढेंच नव्हे, तर डोकें उडविल्याबरोबर शरीराचा जसा नाश होतो त्याचप्रमाणें सौजन्याची व आत्म्याची फारकत झाल्याबरोबर आत्मनाश होतो. नीतिमत्तेशिवाय विद्या किंवा दुसरी कोणतीहि सद्वस्तु प्राप्त करून घेणें दुष्कर आहे, अशक्य मात्र नव्हे. बुद्धि जर जात्याच फार तीव्र असली तर मनुष्य अनीतिमान् असून देखील ' विद्वानांत हिरा ' म्हणून चमकेल; पण तो जर नीतिमान् असेल, तर त्याचें तेज अधिक फाकेल. विद्वत्वाचा व सौजन्याचा संबंध कसाहि असो; सौजन्य–विरहित विद्वत्व आत्म्याला शांति देत नाहीं, पण विद्वत्वरहित सौजन्य आत्म्याला शांति देऊं शकतें असें म्हणण्यास कोणतीहि हरकत नाहीं. सर्पाजवळ अमूल्य मणि असला म्हणून तो जसा आदरणीय ठरत नाहीं त्याप्रमाणेंच विद्येनें भूषित असलेल्या दुर्जनाचें आहे, असें जें एका सुभाषितांत म्हटलें आहे तें कोणाल्याहि पसंत पडण्यासारखें

आहे. विद्येपुरताच जेव्हां प्रश्न निघेल तेव्हां त्या विद्वानाला अग्रस्थान देण्यास हरकत नाहीं. पण त्या विद्वानानें विद्वत्व संपादलें म्हणून त्याला आत्म-प्राप्ति झाली असें कोणी म्हणणार नाहीं; उलट 'आत्म-नाश' केला असेंच त्याला लोक म्हणतील. आतां एखाद्या साध्या-भोळ्या, सामान्य बुद्धीच्या, बेतानेंच विद्वत्व असलेल्या, पण इंद्रियावर पूर्ण ताबा असलेल्या, सात्त्विक व सौजन्य-मंडित गृहस्थाचें उदाहरण घ्या. विद्वत्वाच्या व व्यवहारज्ञानाच्या अभावीं त्याचा आत्मविकास सर्वांगपरिपूर्ण झाला आहे असें कधींहि म्हणतां येणार नाहीं. ज्ञानाला जर आत्मरूपी शरीराचे 'डोळे' म्हटलें, तर त्याच्या आत्म्याच्या पदरीं अंधत्वाचा नाहीं तर निदान काणेपणाचा तरी दोष येईलच. हा दोष स्वाभाविक असला, तरी व्यंग तें व्यंगच. पण या व्यंगामुळें त्याच्या आत्म्याचें समाधान ढळावयाचें नाहीं; लोकांनीं त्याला जरी मान दिला नाहीं तरी त्याचा स्वाभिमान त्याला प्रसन्न ठेवण्यास पुरेसा असतो.

विद्वत्वाविषयीं जें म्हटलें तेंच कवित्व, चित्रकलापटुत्व, संगीतपटुत्व, इत्यादिकांविषयीं म्हणतां येईल. कोणतेंहि शारीरिक किंवा मानसिक कौशल्य अथवा पटुत्व घ्या; सौजन्याचा त्याला आधार नसेल तर त्याची रमणीयता किंवा आश्चर्यकारकता इंद्रधनुष्याप्रमाणें पोकळ समजावी. या रमणीयतेमध्यें आत्मा प्रसन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं. आत्म्याच्या घरीं विद्वत्तेचें, बुद्धिमत्तेचें, कवित्वाचें, कलाकौशल्याचें, रसिकत्वाचें, वगैरे कितीहि ऐश्वर्य असलें, तरी रूपयौवनादि सकलैश्वर्यसंपन्न स्त्री कुंकुमतिलकावांचून जशी वस्तुतः अनुकंपनीय, त्याप्रमाणें तो विद्वत्वादिकांनीं मंडित झालेला आत्मा सौजन्यावांचून अनुकंपनीय आहे. 'अनुकंपनीयच' केवळ नव्हे तर तो तिरस्करणीय आहे, आणि दुसऱ्यांनाच तिरस्कारणीय तो वाटतो असें नव्हे तर स्वतः त्यालाच 'आपण तिरस्करणीय' असें वाटत असतें. पण विद्वत्वरहित नीतिमान मनुष्याचें मन प्रसन्न असूं शकतें आणि त्याचा लोकांनीं तिरस्कार केला तरी तो आपल्याला तिरस्करणीय समजत नाहीं. सौजन्याला आत्म्याचें उत्तमांग म्हटलें तर तें शोभण्यासारखें आहे असें यावरून दिसेल.

पण एखाद्या प्रसंगीं जगाच्या दृष्टीनें बुद्धिशुद्धतेपेक्षां बुद्धिसामर्थ्याला अधिक महत्त्व द्यावें लागेल हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. एखादा नामांकित, शूर, चतुर सेनापति अनीतिमान् आहे असें समजा; दुसरा नेमा-

पति लढाईच्या कामीं सामान्य प्रतीचा आहे, पण सौजन्याच्या दृष्टीनें त्याचें चरित्र प्रशंसनीय आहे असें समजा. युद्ध चाललें असतां या दोहोंपैकीं एकाला बळी दिल्याशिवाय गत्यन्तर नाहीं असा विकट प्रसंग राष्ट्रावर आल्यास, चतुर सेनापतीला बळी देऊन चालावयाचें नाहीं. कारण हा हिरा हरवला तर सर्व राष्ट्रावर दास्याचा प्रसंग येऊन सर्वांची नीतिमत्ता ढांसळण्याचा प्रसंग येईल. ही आपत्ति टाळण्याकरितां नीतिमान् सेनानीला वांचविणें राष्ट्रनीतिरक्षणाच्या दृष्टीनें प्राप्त आहे. असो.

सुखार्जनपर वृत्तीपेक्षां सौजन्यपर वृत्ति चांगली, अशा प्रकारें सामान्य तर–तम–भाव जरी ठरवितां आला, तरी अमुक वृत्तीपेक्षां अमुक श्रेष्ठ अशा प्रकारचें बिनचूक व सर्वांगपरिपूर्ण कोष्टक तयार करणें शक्य नाहीं. परिस्थिति, स्वभाव, आवड, सामर्थ्य, इत्यादि पाहून कर्तव्य–अकर्तव्य ठरवावें लागतें. एका व्यक्तीचा जो स्वधर्म तो दुसऱ्या व्यक्तीचा परधर्म होतो; किंवा दुसऱ्या परिस्थितींत त्याच व्यक्तीला देखील तो परधर्म वाटणें शक्य आहे. ‘हिंसात्मक व कांहीं म्हटलें तरी कठोर असलेल्या माझ्या क्षात्रधर्मापेक्षां अध्ययन–अध्यापनात्मक सात्त्विक ब्राह्मणधर्म श्रेष्ठ’ असें एकाद्या क्षत्रियानें जरी मनापासून कबूल केलें, तरी त्याला ब्राह्मण्य हें ‘परधर्म’–स्वरूप आहे. कारण अध्ययन-अध्यापनाची आवड नसल्यामुळें ब्राह्मण्याचें कर्तव्य त्याच्या हातून चांगलें पार पडावयाचें नाहीं आणि क्षत्रियवृत्ति स्वीकारून आपली व आपल्या राष्ट्राची शक्य तेवढी उन्नति करून घेण्याचें श्रेयहि त्याच्या पदरांत पडावयाचें नाहीं. पावशेर दूध पिण्यापेक्षां एक शेर पिऊन अधिक शक्ति येईल असा जसा सामान्य नियम करतां येत नाहीं, तर ज्याच्या त्याच्या प्रकृतिमानाप्रमाणें दुधाचें प्रमाण ठरवावें लागतें, तसेंच ‘अमुक बुद्धीपेक्षां अमुक बुद्धि श्रेष्ठ’ अशा प्रकारचें नैतिक कोष्टक तयार करतां येणें शक्य नाहीं. स्वधर्म व परधर्म हा काळ, वेळ, प्रसंग, वर्ण, आश्रम, आवड, इत्यादि पाहून ठरवावा लागतो. एखादा उत्तम चित्रकार आहे. त्यानें स्वतःच्या व लोकांच्या सात्त्विक आनंद-पोषणाकरितां आपल्या कलेंतच रममाण होण्याची इच्छा धरावी, का शत्रूपासून राष्ट्राचें रक्षण करण्याच्या हेतूनें लष्करांत शिरण्याची इच्छा धरावी?–याचें उत्तर भिन्न प्रसंगीं भिन्न दिलें जाईल. राष्ट्राकरितां प्राण देण्यास तयार असणें हें आपल्या आवडीच्या कामांतच दंग होऊन जाण्यापेक्षां श्रेष्ठ खरें;

पण शांततेच्या काळीं उत्तम चित्रकारानें आपल्याच चित्रांत रममाण व्हावें, राष्ट्रहित साधण्याच्या सद्‌बुद्धीनें युद्धकलेंत प्रावीण्य मिळविण्याच्या भानगडीस पडूं नये. युद्ध चाललें असतां सुद्धां उत्तम चित्रकारानें सैन्यांत आपलें नांव नोंदवून घ्यावें असें नाहीं. कारण सैन्याबाहेर राहूनच त्याला देशाची सेवा अधिक करतां येईल. पण एखादें महायुद्ध चाललेलें आहे व देशांतील यच्च-यावत् सर्व माणसांनीं लढल्याशिवाय घडगत नाहीं असा देशावर खडतर प्रसंग आला आहे, अशा वेळीं चित्रकारानें हातांतील ब्रश टाकून तलवार घ्यावी व शत्रूंच्या शरीरांत ती खुपसून भूमिरूपी प्रचण्ड फलकावर रुधिरांकित भीषण चित्रें काढावींत !

एकंदरींत काय, तर कार्याकार्य पाहण्याचें छापील पंचांग तयार करणें शक्य नाहीं. मुख्य मुख्य धोरणें मात्र सांगतां येतील. जें कांहीं करावयाचें तें केवळ सर्वांत अधिक सुखकर असून उपयोग नाहीं, तर त्या योगानें अंतरात्मा संतोष पावला पाहिजे, प्रसन्न झाला पाहिजे; सौजन्यानें आत्मा प्रसन्न होतो, दुसऱ्या कशानें नाहीं; आपला स्वभाव, वर्ण, आश्रम, परिस्थिति, सामर्थ्य, काळ, वेळ, प्रसंग पाहून आपलें वर्तन ठरवावें, आत्मोन्नति व परोन्नति हें ध्येय ज्या योगानें साधेल तें सत्कार्य, मग त्या मार्गानें सुख अधिक मिळो वा न मिळो,—इत्यादि तत्त्वें ध्यानांत ठेवून सद्‌बुद्धि कोणती व असद्‌बुद्धि कोणती, कार्य कोणतें व अकार्य कोणतें हें ठरवावें; प्रत्येकाला नैतिक अधिकार, स्वभावाचा कल, ज्ञान, अभिरुचि, इत्यादि भिन्न असल्यामुळें प्रत्येकाचे नीतिनिर्णय तंतोतंत जुळतील असें नाहीं. पण आपल्या मनाशीं संथपणें विचार करून, सज्जनांचा सल्ला घेऊन, शिष्ट लोकांचा आचार पाहून, परिस्थिति लक्षांत घेऊन, आत्मोन्नति व परोन्नति हें ध्येय डोळ्यापुढें ठेवून जो निर्णय आपण ठरविला असेल त्याच्यांत स्वार्थबुद्धि किंवा इंद्रियवासना नाहीं अशी मनाची खात्री करून घेऊन त्याप्रमाणें मग वागावें. अशा सद्‌बुद्धीनें केलेल्या कर्मांचा परिणाम अकल्पित रीत्या विपरीत झाला तरी त्याचें पाप कर्त्याकडे नाहीं; त्याविषयीं विशेष विषाद मानूं नये; कारण कर्मफल हें स्वायत्त नसतें, तर परायत्त असतें.

कार्याकार्यनिर्णय अखेर आपल्या मनावरच येथें सोंपविला आहे. पण मार्टिनो वगैरेंचा आधिदैवतपक्ष* अथवा सदसद्विवेकबुद्धिपक्ष किंवा कँटचा

वासनारहित शुद्धबुद्धि–पक्ष, यांहून हा पक्ष भिन्न आहे. अखेरचा निर्णय देण्याचें काम अंतरात्म्याचें आहे, हें तिन्ही पक्षांमध्यें सामान्य तत्त्व आहे. कँटचा निरुपाधिक अध्यात्मपक्ष "वासनांचें मुळींच ऐकूं नका आणि कोणतीहि वासना मनांत न धरतां शुद्ध बुद्धि सांगेल तें करा" असा उपदेश करतो. पण एकूणएक सर्व सात्त्विक व असात्त्विक वासनांना हद्दपार केल्यावर किंवा त्यांची मुस्कटदाबी केल्यावर कर्म करण्यास मनुष्य कसा प्रवृत्त होणार? अंतरात्म्याच्या स्वच्छ आरशासमोर कोणतीच वासना ठेविली नाहीं, तर शुद्ध बुद्धीला आपलेंच तोंड दिसेल; कारण कोणत्याहि कार्याचें चित्र त्या आरशापुढें परीक्षेकरितां ठेवलेलें नसतें. मार्टिनोचा आधिदैवतपक्ष म्हणतो कीं मनाला कौल लावा म्हणजे आपोंआप कार्य–अकार्य समजून येईल. पण कित्येक वेळां मन कांहींच कौल देत नाहीं, हा अनुभव आहे. शिवाय, केवळ मनावर हें काम सोंपविणें धोक्याचें आहे. स्थितप्रज्ञ जे असतील त्याचें मन त्यांना फसविणार नाहीं. पण बाकीच्यांनीं आपल्या मनाची उलट–तपासणी केल्याशिवाय निर्णय करणें श्रेयस्कर नव्हे. ही उलट–तपासणी कशी करावयाची, कोणते प्रश्न विचारावयाचे, मन फसवेगिरी कोठें करतें किंवा त्याची भ्रांति कोणत्या स्थानीं होण्याचा संभव असतो इत्यादि गोष्टी सांगितल्याशिवाय केवळ अंतःकरणप्रवृत्तीवर विसंबून राहणें सामान्य माणसांना उचित नाहीं. कापडाची लांबी किंवा लोण्याचें वजन अखेर डोळ्यांनींच ठरवावयाचें असतें, तरी लांबी मोजतांना गज, व वजन मोजतांना तागडी व वजनें, यांचें डोळ्यांना साहाय्य असलें, तर चूक, भ्रम, किंवा लुच्चेगिरी होण्याचा संभव जसा कमी आहे त्याप्रमाणेंच अखेर आपल्या मनानेंच सत् कोणतें व असत् कोणतें हें जरी ठरवावयाचें असलें, तरी या मनाला आपलें ध्येय कोणतें, याचीं अंगें कोणतीं, त्यांत कमीअधिक योग्यतेचें अंग कोणतें, इत्यादि गोष्टींचें सामान्य ज्ञान असलें तर हितकारक आहे. वासनाशून्य शुद्ध बुद्धीनें कार्याकार्य ठरविण्याचा कँटचा मार्ग आकाशासारखा उच्च आहे; पण तितकाच पोकळ आहे; 'अंतःकरणावर श्रद्धा ठेवा' हा मार्टिनोचा मार्ग सोपा आहे, पण धोक्याचा आहे. ध्येय ठरवून व परिस्थिति, स्वभाव, वगैरे पाहून कार्याकार्य ठरविण्याची युक्ति भानगडीची आहे; पण एखादी वस्तु हातांत घेऊन तिच्या वजनाचा अंदाज करून तो अंदाज खरा मानण्या-

१०५४

पेक्षां तिचें तराजूंत वजन करून पाहणें हें जसें अधिक श्रेयस्कर तशीच गोष्ट नैतिक गोष्टींचें तारतम्य ठरविण्यासंबंधानें आहे.

कार्याकार्य ठरविण्याची वर जी कसोटी दिली आहे, तिच्यामध्यें कँटच्या व मार्टिनोच्या कसोटींतील गुण घेतले आहेत व दोष टाकले आहेत, हें वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. आप्तवाक्यादि दुसऱ्या कसोटींचें देखील तिच्यांत असेंच गुणग्रहण करून दोषत्याग केलेला आहे, हेंहि समंजस वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. 'महाजनो येन गतः स पंथः' श्रेष्ठ लोक जसें आचरण करतात तसें करावें या कसोटीचा कोणीहि समंजस मनुष्य विचार करीलच आणि त्यानें करावाच. पण आपलें ध्येय निश्चित ठरलें असलें म्हणजे 'श्रेष्ठ' कोण, कोणाला गुरु म्हणावें ( म्हणजे कोणाचें वाक्य आप्तवाक्य समजावें), या गोष्टी ठरविण्याचा मार्ग सुलभ होतो. शिवाय 'सद्गुरु जवळ नसल्यास काय करावयाचें?' 'दोन आप्तवाक्यांमध्यें विरोध उत्पन्न झाला असतां कसें वागावयाचें?' इत्यादि प्रश्नांचा निकाल लावणें सुकर होतें. 'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ' यांत सांगितलेल्या कसोटीचा कोणीहि सुज्ञ मनुष्य उपयोग करीलच. पण सच्छास्त्र कोणतें व असच्छास्त्र कोणतें, तसेंच शास्त्रवचनामध्यें विसंगति दिसून आली, किंवा शास्त्र हें एखाद्या प्रश्नासंबंधानें मुग्ध किंवा मूक असलें, तर घाबरून जाऊं नये म्हणून ध्येयात्मक कसोटीचा आधार जवळ असणें श्रेयस्कर आहे.

ध्येयात्मक कसोट्यांमध्यें जे अनेक भिन्न पंथ आहेत त्यांतील प्रत्येकामध्यें जेवढा ग्राह्यांश आहे तोहि वर वर्णन केलेल्या कसोटींत घेतलेला आहे. सुखवादी लोकांनीं 'सुख हें मलमूत्राप्रमाणें त्याज्य समजावें' या खोट्या समजुतीचा निकाल लावला, हा त्याच्यांतला ग्राह्यांश; पण 'स्वसुखप्राप्ति हेंच प्रत्येकाचें ध्येय असतें व असावें' हें त्यांचें म्हणणें दुराग्रहाचें होतें. मनुष्य नेहमींच स्वतःच्या सुखावर डोळे ठेवून वागत असतो, असें नाहीं; त्याला सुखाव्यतिरिक्त कांहीं गोष्टींची चाड आहे; आणि सुखप्राप्ति हाच पुरुषार्थ धरला, तरी दुसऱ्याच्या सुखाकडे थोडीशी तरी नजर ठेवल्याशिवाय आत्म्याचें समाधान होणें शक्य नाहीं, हें कोणीहि सुसंस्कृत मनुष्य कबूल करील. 'सुख' शब्दाऐवजीं 'हित' शब्द घालणारे व अधिकांचें अधिक हित पाहण्यास सांगणारे बहु–जन–बहु–हितवादी लोकांनीं सुखवादाला उच्च स्वरूप दिलें. पण

कर्त्याच्या बुद्धीपेक्षां कर्मफलाकडे त्यांनीं अधिक लक्ष दिलें, ही त्यांची चूक झाली. मनुष्याला कांहीं प्रवृत्ती इतरांपेक्षां स्वाभाविकपणेंच आतां अधिक प्रिय व अधिक श्रेयस्कर वाटूं लागल्या आहेत, हें तत्त्व स्पेन्सरच्या विकासवाद-मिश्रित सुखवादानें कबूल केलें, व त्याच्या तत्त्वाचा मार्ग अखेर मनुष्याचा खरा आत्मा व खोटा आत्मा, सामाजिक अथवा जातिविशिष्ट आत्मा व व्यक्तिविशिष्ट आत्मा अथवा जीवात्मा अशा प्रकारचा भेद मानणाऱ्या अध्यात्माकडे येतो. कॅन्टचें निरुपाधिक आध्यात्म कर्त्याच्या शुद्ध बुद्धीला महत्त्व देतें; पण वासनांचें नियमन करा एवढेंच न सांगतां त्यांचें निर्मूलन करण्यास तें सांगतें, म्हणून तें सदोष ठरलें.

शास्त्र पाहून स्वधर्म ठरवावा या भगवद्गीतेंतील तत्त्वांतील गुणदोष वर आलेच आहेत. वर्ण व आश्रम पाहून स्वधर्म ठरवावा असा गीतेचा अभिप्राय आहे, असें कांहीं लोक म्हणतात. पण ही कसोटी सामान्य प्रसंगीं जरी उपयुक्त असली तरी बिकट प्रसंगीं ती पुरेशी पडत नाहीं. स्वाभाविक प्रवृत्ति ब्राह्मण्याकडे व आश्रम ब्रह्मचर्याचा, अशा स्थितींतहि एखाद्या षोडशवर्षीय ब्राह्मण मुलाला हातांत शस्त्र घेण्याचा प्रसंग येईल. उदाहरणार्थ, जर्मनीनें बेल्जमवर स्वारी केली त्या वेळीं ज्याला ज्याला बंदुक घट्ट धरतां येत होती त्या त्या बेल्जिअनला—मुलालाहि—देशाकरितां लढणें भाग होतें. म्हणजे वर्ण व आश्रम जरी ब्राह्मण्याकडे लोटीत असले, तरी त्यांचा आग्रह बाजूस सारून एखादे वेळेस वागावें लागतें. वर्ण व आश्रम यांच्या आग्रहाला विशेष मान केव्हां द्यावा, केव्हां देऊं नये, हें ठरविण्याकरितां आपलें ध्येय काय, पुरुषार्थाचीं अंगें कोणतीं, त्यांतील कमीअधिक महत्त्व कोणाला कां द्यावयाचें इत्यादि गोष्टी पहाव्या लागतात. कर्तव्य ठरवितांना वर्ण व आश्रम पहावा हें तत्त्व बरोबर आहे; पण 'परिस्थिति, प्रसंग, ध्येय, इत्यादि गोष्टी पहाव्यात' अशी एक त्याला पुस्ती जोडली पाहिजे. स्थितप्रज्ञाचें आरशाप्रमाणें स्वच्छ मन जें सांगेल तें खरें, ही भगवद्गीतेंतील कसोटी बिनचूक आहे. कारण स्थितप्रज्ञाला सर्व गोष्टींचें ज्ञान असतें. त्याचीं इंद्रियें त्याला कधींहि भलत्या मार्गाकडे ओढूं शकत नाहींत, ओढूं पहात देखील नाहींत; त्याची आत्मवंचना होणें शक्य नसतें, तो आपल्याप्रमाणेंच इतरांच्या सुखाकडे, हिताकडे व कल्याणाकडे पहात असतो. कारण तो स्वाभाविकपणेंच समबुद्धी असतो

आणि विश्व हेंच त्याला कुटुंब वाटतें. पूर्णत्वास पोंचलेल्या अशा माणसाचा आत्मा ज्यायोगें प्रसन्न होईल तो मार्ग चांगला, ही कसोटी अगदीं बिनचूक आहे. पण हल्लींच्या जगांत स्थितप्रज्ञ कोणाला आढळत नाहींत हें म्हणणें धाडसाचें असलें तरी 'ते थोडे आहेत' हें खचित. स्थितप्रज्ञ नसलेल्या लोकांना आपल्या अंतरात्म्याच्या निर्णयाच्या खरेपणाबद्दल खात्री वाटत नाहीं व वाटूंहि नये. अशा अर्धवट माणसांना अंतरात्म्याच्या डोळ्यांवरच अखेर विसंबावें लागेल; पण भिन्न कार्यांच्या कमीअधिक महत्त्वाचें माप करतांना एखादा तात्त्विक तराजू हातांत असला तर नजरचूक होण्याचा संभव कमी. आंधळ्याला कांहींच दिसत नाहीं; पण ज्याला ज्याला डोळे आहेत त्याला त्याला नेहमीं बरोबर दिसतेंच असें नाहीं; दृष्टीमध्यें चूक होऊं नये म्हणून फूटपट्टी, टेप, तराजू वगैरे केलेलीं आहेत. त्याप्रमाणेंच अंतरात्म्याची शांति किंवा प्रसन्नता हीच कसोटी अखेरीस खरी करावी लागली तरी या प्रसन्नतेची दृष्टि निर्दोष आहे, याबद्दल सामान्य मनुष्याला आत्मप्रत्यय वाटावा म्हणून 'शक्य तेवढें आपलें व इतरांचेंहि कल्याण साधावयाचें हें ध्येय, तसेंच शास्त्रवचनें, शिष्टांचें आचरण, सन्मित्रोपदेश इत्यादि गोष्टींचें सहाय्य घेणें आवश्यक आहे.

## ध्येयें-म्हणजे—? ४

पुणें
ता. १०-९-२५.

रा. विनायकराव भोळे यांस सौ. इन्दुमती हिचे साष्टांग नमस्कार वि. वि.

मी आपणांस सहसा पत्रें लिहीत नाहीं, महत्त्वाची गोष्ट असेल तेव्हांच लिहित्यें, हें आपणांस ठाऊकच आहे. आतांचा माझ्यापुढचा प्रश्न मला फार महत्त्वाचा वाटतो म्हणून लिहीत आहें.

मी बिन्दुमाधव म्हस्करांची शिकवणी बंद केल्यावर पुनः ती कां सुरू करण्यांत आली हें सर्व तुम्हांला ठाऊकच आहे. ज्या थोर अंतःकरणानें बिन्दुमाधवांच्या शिकवणीस पुन्हां आरंभ करून दिला त्या अंतःकरणांत संशयाचें विष पुनः कोणीतरी कालविलें आहे. आमची 'छोटी' होती तोंपर्यंत आमचे दिवस फार आनंदांत गेले. आमच्यांतील भेदभाव एवढ्याशा त्या छोटीनें पार घालवून टाकला होता. पण ती देवानें नेल्यापासून पुन्हां संशयपिशाचिकेनें मनांत जोर केला आहे. मला रागाचा शब्दहि बोलत नाहींत परंतु मन शुद्ध नाहीं. मला कोणत्याहि गोष्टीची ना नाहीं, परंतु माझ्याबरोबर बोलण्याचालण्यांत आतां राम वाटत नाहीं. माझ्या सगळ्या हौशी पुरवितात, परं‌तु स्वतःला कशाची हौस नाहीं. बाह्यतः सगळ्या गोष्टी चांगल्या आहेत, पण मनें विलग झालेलीं आहेत. मनांतला खरा भाव लपविण्याकरितां मुद्दामच मला कांहीं तरी आणून द्यावयाचें, मुद्दामच मला फिरावयास न्यावयाचें, कांहीं तरी निमित्त करून कृत्रिम विनोद करावयाचा, मला खूष करण्याबद्दल खोटाच उत्साह दाखवावयाचा; परंतु मन मनाला ओळखतें. इवलीशी छोटी होती तिला देखील रागाचा खोटा अविर्भाव

कोणता आणि खरा राग कोणता हें कळायचं; प्रेमाचा पान्हा कोणता आणि प्रेमाचा देखावा कोणता हें समजायचं; आमच्या चंपी कुत्रीला देखील हें समजतं; मग माझ्यासारखीला का तें कळायचं नाहीं ? मला मनापासून ते रागावले तर आवडेल, पण राग गिळून प्रेमाचं सोंग केलेलं आवडत नाहीं. मला वाईट वाटूं नये म्हणून कर्तव्यबुद्धीनेंच ते मनांतला संशय आणि राग गिळतात; पण हेंच मला डाचतं. त्यापेक्षां गरळ ओकून टाकलेलं बरं. माझ्या-वर खरं प्रेम नाहीं, आपलेपणा वाटत नाहीं, म्हणूनच रागवत नाहींत, हें न समजण्याइतकी मी खुळी नाहीं. अनेक महिने असं चालल्यामुळें माझ्या मनां-तहि एक प्रकारची अढी म्हणा किंवा तेढ म्हणा उत्पन्न झाली आहे. मीहि कधीं उलट बोलत नाहीं, रुसत-रागवत नाहीं, पण आंतून उत्साह नाहीं, आनंद नाहीं. उन्हाळ्यांतला दुपारचा उकाडा पंख्यांनीं कसा लोपणार ?

बिन्दुमाधवांशीं मात्र मी मनापासून बोलत्यें—चालत्यें, याबद्दल माझें मलाच वाईट वाटतें, पण त्यांनीं एकदां जरी किंचित् अतिप्रसंग केला असला तरी ते जात्या वाईट नाहींत अशी माझी खात्री आहे. कसलेल्या लेखकाच्या हातून एखादे वेळेस एखादें वाक्य चुकीचें गेलें म्हणून तो लेखक वाईट ठरेल काय ? त्यानें एखादी अश्लील कोटि लिहिली म्हणून तो अश्लील लिहिणारा म्हणा-वयाचा काय ? बिन्दुमाधवांच्या स्वभावाबद्दलहि माझें असेंच म्हणणें आहे. त्यांचें विनोदप्रचुर बोलणें आणि त्यांचें गाणें ज्याला आवडणार नाहीं तो मनुष्यच म्हणतां येणार नाहीं. कर्तव्य म्हणून त्यांची शिकवणी मागें बंद केली तशी आतांहि करण्यास तयार आहें. पण तसें विचारलें तर तेंहि पसंत नाहीं! अशा स्थितींत कसं वागावं ? पावसाळ्यामध्यें आभाळांत ढग आले म्हणजे फिरावयास जावं का न जावं अशी स्थिति होते, तशी माझी झाली आहे.

बाकी अलीकडे मला असा प्रश्न पडूं लागला आहे कीं, शिकवणी तरी कां बंद करावी आणि त्यांच्याशीं बोलणें—चालणें तरी कां सोडावें ? फिरावयास जावयाचें ठरल्यावर पाऊस पडेल ही भीति कां बाळगावी ? रेनकोट असल्या-वर पावसाची भीति कशाला ? वरील प्रश्न पुनःपुन्हां नागाप्रमाणें फणा वर करून माझ्याकडे पहात आहेत, म्हणून माझी मलाच भीति वाटत आहे. आणि म्हणून हें पत्र मी लिहीत आहें.

तुमच्याशीं मागें अनेकदां बोलणें झालें. त्यांत तुम्ही मला किंवा बिन्दुमाधवांना एखाद वेळेस मोह होऊन भलताच प्रकार व्हावयाचा हा मुद्दा वारंवार माझ्यापुढें मांडलात; पण माझ्याविषयीं मला पूर्ण खातरी आहे. बिन्दुमाधवांविषयींहि माझी खात्री असल्यामुळें तुमचा मुद्दा येथें गैरलागू आहे. माझ्याकरितां का होईना, घटकाभर गृहीत धरा कीं बिन्दुमाधव फार चांगले आहेत, आणि मीहि फार चांगली आहे; आणि हें गृहीत धरून नेहमीं-प्रमाणें उडवाउडवी न करतां पुढच्या प्रश्नाच सरळ उत्तर द्यावें. प्रश्न असा-

**आत्म्याची कलाविषयक जी भूक आहे ती लोकापवादाच्या भीतीनें किंवा पतीला उगाच संशय येतो म्हणून दाबून टाकावी काय ?**

× × ×

माझी रडकथा संपली. आतां दुसऱ्या गोष्टी लिहित्यें. सरलावन्संची प्रकृति बरी नाहीं हें खरें काय ? छोटूलाहि बरें नाहीं असें ऐकल्यें. छोटूला बहीण झाली आहे तिचें नांव ( माझ्या इच्छेला मान द्यावयाचा असल्यास ) छोटी ठेवावें. माझी छोटी गेली ती सरलावन्संच्या पोटीं आली असंच मी मानत्यें ! आमच्याकडचे पैसे स्वतःकरितां खर्च न करण्यांत मनाचा मोठेपणा नाहीं; आम्ही परके आहोंत असा याचा अर्थ होतो. तरी असें करूं नये आणि कुटुंबाचे हाल करून घेऊं नयेत.

नारायणराव पाठक यांनीं काशी ढवळेबद्दल चौकशी करूं नये म्हणून निक्षून सांगितलें तरी तुम्ही साखरप्यास पत्र पाठवून चौकशी केलीतच आणि ती झुरत आहे असें कळविलेंतच ! त्यांचें मन चुळबुळ करीत आहे. बाहेरून मनाची खंबिरी दाखवितात, पण आंत काय होत असेल याचा अंदाज मला करतां येतो. काशी ढवळे पोर चांगली आहे. आणि नारायणराव पाठकाहि चांगले आहेत. पण......ध्येयें म्हणजे दुःखें हेंच खरें. कळावें.

*इंदुमती काळे*

## नागे-फुरशे फणा काढतात

*पांचबावडी*

ता. १५-९-२५.

सौ. इंदुमती काळे, यांस विनायकराव भोळे, यांचा सा. न. वि. वि.

आपलें ता. ९-९-२५ चें पत्र पावलें. मी कुटुंबाचे मुद्दाम हाल करीन असें वाटतें काय ? आपण पैसे पाठवितां त्यांपैकीं खाजगी खर्चाकरितां कांहीं एक घेत नाहीं हें म्हणणें खोटें आहे. मी घेतों, पण सभोंवतालचें दारिद्र्य पाहून मन इतकें द्रवतें कीं, हातीं पैसा आल्यावर हातांत फारसा राहातच नाहीं. आजच बारसें झालें. आपल्या इच्छेला अनुसरून आम्हीं आमच्या मुलीला 'छोटी'च म्हणतों. पाळण्यांतलें नांव उषा आहे.

आतां आपला प्रश्न. तत्त्वदृष्ट्या पाहिलें तर कलेपुढें सांकेतिक चालीरीतीनें मान वांकविलीच पाहिजे; म्हणजे, लोकांतली खुळचट चालरीत कलाविषयक ध्येयाच्या आड येत असेल तर आपलें ध्येय सोडण्याचें कारण नाहीं. पण चालरीत खरोखरच खुळचट आहे का, हाच व्यवहारांत प्रश्न पडतो. परपुरुषांशीं फार बोलणें, चालणें असूं नये, स्त्री-पुरुषांनीं एकान्त करूं नये, हे जनरीतीचे निर्बंध खुळचट आहेत ? आतां एखादा पुरुष, अत्रि, वसिष्ठ, वामदेव किंवा शुक यांच्याप्रमाणें असला आणि एखादी स्त्री अनसूया, अरुंधती, सीता, सावित्री यांच्याप्रमाणें असली तर त्यांनीं देखील हे निर्बंध पाळावेत काय, या प्रश्नाचें उत्तर असें कीं, त्यांनीं न पाळले तर चालेल; पण पाळणें उत्तम. विवाहित स्त्रियांवर ( व पुरुषांवर ) तर अधिक जबाबदारी आहे; कारण आपली कलेची भूक शांत करतांना पतीची ( किंवा पत्नीची ) हेळसांड होत नाहीं ना, पतीकडे ( किंवा पत्नीकडे ) दुर्लक्ष होत नाहीं ना, प्रेमामध्यें विघ्न उत्पन्न होण्याचा संभव नाहीं ना, इत्यादि गोष्टीहि पाहिल्या पाहिजेत. तुमच्या मनाची द्विधा झालेली स्थिति वर्णन करतांना तुम्ही दिलेला दाखला चांगला नाहीं; पण त्याचाच आधार घेऊन मी तुम्हांला सांगतों कीं आभाळांत ढग आले तरी वनश्री पाहाण्यास वाटलें तर जावें, पण घरीं मूल किंवा पति आजारी असल्यास जाणें योग्य नव्हे.

बिंदुमाधव वाईट नसतील, नाहींत असेंच मी समजतों; पण स्त्रियांच्या बाबतींत पुरुषांचें मन केव्हां मोहवश होईल हें सांगतां येत नाहीं, हें लक्षांत ठेवावें. स्त्रियांच्या मनाबद्दलहि मी असेंच म्हणेन; पण आमची सौभाग्यवती आणि आपण यांच्या मूर्ती डोळ्यापुढें उभ्या राहून लेखणी अडते.

* * *

आतां इकडल्या कांहीं किरकोळ गोष्टी लिहून पत्र पुरें करतों. गोष्टी किरकोळ आहेत; पण कुंटुबांतल्या माणसांना त्या सांगाव्याशा वाटतात म्हणून लिहितों.

मीं शाळेंत अस्पृश्यांना शिवतों आणि घरीं आल्यावर आंघोळ करीत नाहीं म्हणून घारूअण्णा नागे, कृष्णंभट फुरशे वगैरे सनातनी ब्राह्मण गुंडांचा माझ्यावर रोष होता तो आतां वळावत चालला आहे. मला वाळींत टाकण्याच्या ते विचारांत आहेत. ब्राह्मणांच्या आळींत मला भाड्यानें सोईचें घर मिळालें आहे तें त्यांना पाहावत नाहीं, आणि म्हणून ते घरमालकाला सांगून मला तेथून हुसकावून लावूं पाहात आहेत. या मालकाच्या मुलीला पटकी झाली होती. तेव्हां रात्रीच्या रात्री जागून व अंथरुणाजवळ बसून मीं तिला औषधपाणी दिलें आणि बरी केली आणि तो गरीब असल्यामुळें पैसे नांवापुरतेच घेतले, म्हणून त्या मालकाला मला घरांतून निघून जा असें एकदम सांगवत नाहीं. तथापि तो गरीब भिक्षुक असल्यामुळें घर सोडावें लागेल आणि गांवांत कोठेंहि घर मिळावयाचें नाहीं अशी थोडीशी भीति आहे.

घर न मिळण्याचें दुसरें कारण असें कीं, राजकारणांत मी थोडासा गांधींचा अनुयायी झाल्यामुळें येथील कांहीं टिळकभक्त माझे शत्रू झाले आहेत. ( बऱ्याच लोकांचा आदर आहे, पण कांहीं थोडे कट्टर टिळकभक्त दुष्टावा करतात,आणि ते गुंड असून त्यांना लोक भितात). सरकारी अधिकाऱ्यांचा तर रोष आहेच, कारण भातशेतावरच वार्षिक धारा देणें दिवसेंदिवस लोकांना परवडत नसल्यामुळें सत्याग्रह करण्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें मी भाषणांत बोलूं लागलों आहें. एकंदरींत परिस्थिति कठीण आहे. पाहूं या काय होतें तें ! कांहींहि झालें तरी मी आपलें ध्येय सोडणार नाहीं, हें निश्चित.

शाळेंतली एक अस्पृश्य मुलगी चिंगी नांवाची आहे. ती नऊ दहा वर्षांची असेल. पण इतकी चुणचुणीत आहे कीं, ब्राह्मणांच्या मुलींनाहि तिच्या

पुढें लाजावें लागेल. जराशी गबाळी आणि गलिच्छ आहे, पण स्वभावानें फारच चांगली आहे. सौभाग्यवतीची ती मोठी लाडकी झाली आहे. ती आमच्या घरीं पुष्कळदां येते आणि सौभाग्यवतीला लाघवीपणानें हरतऱ्हेच्या कामांत मदत करते. एक चाळीस वर्षांच्या वरील पाटील शाळेंत येऊं लागला आहे. कारण वाचतां येत नसल्यामुळें एका मारवाड्यानें त्याला कसें नागवलें हें त्याच्या आतां चांगलेंच ध्यानांत आलें आहे. शाळेंत एक मराठा मुलगी आहे आणि चिंगीशिवाय दुसरी एक अस्पृश्य मुलगी आहे. ब्राह्मणांच्या कांहीं मुलींहून त्या गोऱ्या आणि सुंदर आहेत. बुद्धीनें सामान्यच आहेत. त्यांचेकडे पाहिलें म्हणजे मला घारुअण्णा नागे आणि कृष्णंभट फुरशे यांची आठवण होते, इतकें त्यांच्या चेहऱ्यांत साम्य आहे. कांहींतरी येथें पाणी मुरत असलें पाहिजे म्हणून चौकशी केली, तेव्हां त्यांच्या आयांची चालरीत कशी आहे तें कळलें आणि सर्व उलगडा झाला! आणि हे नागे–फुरशे लोकांना ‘ सनातनी धर्म ’ शिकविणार! ! मुली मात्र स्वभावानें फार चांगल्या आहेत. एक तर इतकी भाबडी आहे कीं तिच्या मनांत स्त्री–पुरुष हा भेदच नसावा. ती माझ्याशीं इतक्या लडिवाळपणानें वागते आणि इतकी जवळ येऊन बोलते–चालते कीं मला लाजल्यासारखें होतें आणि असला देखावा पाहून लोकांना काय वाटेल अशी भीति वाटते. बरें, इतका लाडिकपणा आणि इतकी सलगी करूं नये हें तिला सांगणें देखील माझ्या जिवावर येतें. किंबहुना तिला हें सांगणें पाप वाटतें. कारण जिच्या मनांत कपट नाहीं, कामवासना काय पदार्थ आहे हें समजतहि नाहीं, तिच्या मनांत अकालीं खोटी लाज आणि कपट उत्पन्न करणें मला पाप वाटतें. असल्या प्रसंगांतून कशी तरी वाट काढून मी वेळ मारून नेतों. पण कामात्मक मोहाचा प्रसंग या कामरहित लडिवाळपणाच्या प्रसंगापेक्षां कमी कठीण आहे असें अनुभवावरून मी सांगतों.

मराठे आणि अस्पृश्य मुलग्यांपैकीं काहीं फार चांगले आहेत, कांहीं अत्यंत गलिच्छ आणि वाईट आहेत. त्यांची शिवीगाळ ऐकून आणि त्यांचे हातवारे वगैरे पाहून त्यांना शाळेंतून घालवून द्यावेंसें वाटतें. पण असें करून कसें चालेल? सौभाग्यवती त्यांना घालवून देण्याबद्दल आग्रह धरते, पण मी ऐकत नाहीं. कारण वाईट लोकांना सुधारणें हाच माझा शाळा काढण्यांतला हेतु आहे. सौभाग्यवतीहि मी मुलींशीं फार बोलतों म्हणून मधून

मधून मला बोलते आणि संशयखोरपणा दाखविते. (सगळ्याच बायका संशयखोर असतात का ? ) तिच्या भलत्या संशयांना अर्थात् मी फारशी भीक घालीत नाहीं, कारण तिचे संशय क्षणभरच टिकतात. ( आणि पुष्कळ वेळ टिकले तरी भलत्या संशयांना भलतें महत्त्व देऊन ध्येय कसें सोडतां येईल ?

सौ. ची प्रकृति किंचित् नादुरुस्त आहे. काम फार पडतें आणि खाण्यापिण्याची आबाळ होते हें एक कारण असलें पाहिजे. मुलांचीहि प्रकृति जेमतेमच आहे. मी आपल्या ध्येयाकरितां कुटुंबाचा होम तर करीत नाहीं ? प्रश्न बिकट आहे. असो.

*विनायकराव भोळे*

## भांडखोरपणाचा प्रश्न ?

पुणें

ता. १५-९-२५

रा. रा. विनायकराव भोळे यांस इंदुमती काळे हिचा नमस्कार वि. वि.

आपलें पत्र पावलें. आपला उपदेश वाचला व शेवटल्या किरकोळ गोष्टीहि वाचल्या. किरकोळ गोष्टींच्या शेवटीं आपण लिहिलें आहे कीं, सौभाग्यवतीनें भलते संशय घेतले तरी मी आपलें ध्येय सोडणार नाहीं. निश्चय उत्तम आहे, पण पतीनें जर का भलते संशय घेतले तर पत्नीनें मात्र आपलें ध्येय सोडावें असें आपलें मत दिसतें. असा फरक कां ? प्रश्न जरा भांडखोरपणाचा आहे, पण खरा आणि जिव्हाळ्याचा आहे म्हणून विचारला आहे.

सौ. च्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करूं नये. सरलावन्संच्यासारखी पत्नी पुन्हां मिळणार नाहीं. मुलांची आई गेली तर त्यांनीं काय करावें ? पैसे अधिक लागतील ते मी पाठवीन. ( आजच पाठवितें. ) माझें प्रेमाचें धन कमी होत असलें तरी सोन्यारुप्याच्या नाण्यांची तूट नाहीं. पैशांची रास माझ्यापुढें आणून एकदां टाकली म्हणजे काम झालं अशी घरांतली स्थिति आहे. एखाद वेळेस मला मोटारींत घालून बाजारांत नेतात आणि कापडचोपड वगैरे श्रीमंत थाटानें घेऊन देतात, पण पोटांत प्रेमाचा ओलावा नाहीं. दिखाऊ प्रेमाच्या या नाटकांत मीहि आपला पार्ट उत्तम करतें ! पण क्लबांतून रात्रीं उशीरा येणं आणि

पैसा व कपडालत्ता देण्याशिवाय माझ्याशीं संबंध न ठेवणं, जेवतांना उगीच कांहींतरी प्रश्न विचारून खऱ्या प्रेमाचा अभाव लपवूं पाहणें, वगैरे गोष्टींचा अर्थ मला समजतो. पतिप्रेम माझ्या नशिबींच नसावं. एरवीं त्यांच्यासारख्या थोर मनाच्या माणसाची वृत्ति अशी झाली नसती. अपत्य–सुखहि नशिबीं नसावं. एरवीं छोटीसारखी मुलगी देऊन लगेच ती देवानें परत नेली नसती! बाकी विशेष कांहीं नाहीं. कळावें.

*इंदुमती काळे*

## स्त्रिया लतांसारख्या; पुरुष वाघांसारखे

*पांचबावडी,*

ता. २५–९–२५

सौ. इंदुमती काळे यांना विनायकराव भोळे यांचे नमस्कार वि. वि.

आपल्या मागील पत्रांतील प्रश्न बोचक आणि मार्मिक (व मर्मभेदकहि !) होता. पतीकरितां तुम्हांला ध्येय सोडण्यास सांगतों आणि मी स्वतः पत्नीकरितां आपलें ध्येय सोडण्यास तयार नाहीं, यांत विसंगति दिसते खरी. माझ्याहि ती ध्यानांत आली होती, पण म्हटलं कीं तुमच्या ध्यानांत येणार नाहीं, उगीच कशाला खोलींत शिरा ?

हल्लींच्या समाजांत ( आणि पुढेंहि कित्येक शतकें ) स्त्रियांचें ध्येय संसार करणें हें असणार; म्हणून त्यांनीं पतीला नापसंत असलेली, अतएव या ध्येयाच्या आड येणारी गोष्ट टाळावी. पुरुषांचें ध्येय याहून भिन्न आहे, म्हणून त्यांनीं पत्नीच्या इच्छेला जरा बाजूला ठेवलें तरी हरकत नाहीं, असें माझें थोडक्यांत उत्तर आहे. स्त्रिया या लतांप्रमाणेंच आकुंचित क्षेत्रांतच राहाण्यांत आनंद मानणाऱ्या असतात. पुरुष हे वाघांप्रमाणें गुहेबाहेर जाऊन पराक्रम करण्यांत आनंद मानतात. लतांना अडचणींना तोंड द्यावेंसें वाटत नाहीं, तर त्या अडचणींना वळसा घालून कोठून तरी जीवनरस घेऊन टवटवीत राहातात, फुलाफळांनीं आपलें अंग सुशोभित करतात आणि इतरांना या फुलांफळांनीं आनंद देतात. वाघांना सिंह-हत्ती पाहिले म्हणजे चेव येतो आणि मग ते मादीची किंवा पिलांची पर्वा न करतां शत्रूच्या अंगावर तुटून पडतात आणि मरतात किंवा

मरतात. सामान्यतः स्त्रियांना सुंदर कौटुंबिक संसार पाहिजे असतो; पुरुषांना कौटुंबिक संसारांतल्यापेक्षां उच्चतर पराक्रम हवा असतो. या नियमाला अपवाद आहेत, पण सामान्यतः हा नियम बरोबर आहे.

तुम्हीं 'कला-प्रेम' 'कला-प्रेम' म्हणून कितीहि म्हटलंत तरी भाऊरावांचें प्रेम तुम्हांला खरोखर पाहिजे आहे; असें नसतें तर भाऊरावांच्या वागणुकी-बद्दल तुम्हीं तक्रारच केली नसती! तसेंच तुम्हांला छोटी गेली म्हणून फार वाईट वाटत आहे. तुम्हांला मुलांची खरी भूक आहे. माझ्याविषयीं म्हणाल तर मला माझी सौभाग्यवती आणि माझीं मुलें कितीहि प्रिय असलीं तरी समाजकारणांतील आणि राजकारणांतील संकटांना धैर्यानें तोंड देण्यांत मला खरें पौरुष आहे असें वाटतें. तुमचे व माझे प्रकृति—धर्म वेगवेगळे असल्यामुळें, तुमचें ध्येय निराळ्या प्रकारचें असणार आणि माझें निराळें असणार. अर्थात् कर्तव्येंहि भिन्न होणार. तुमच्या खोंचदार प्रश्नाचें हें असें उत्तर आहे. [ बाकी हे प्रश्न खरोखर सामान्य तत्त्वाच्या दृष्टीनें सोडविण्याचा प्रयत्न करण्यांत विशेष अर्थ नाहीं. व्यक्ति, स्थिति व प्रसंग पाहून व्यवहारदृष्ट्याच ते सोडविले पाहिजेत. एखाद्यानें लग्न करावें का नाहीं या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण आहे. पण अमुक मुलीशीं लग्न करावें कां नाहीं हा प्रश्न कठीण असला तरी वरच्या प्रश्नापेक्षां तो सोपा. ज्ञानोत्तर कर्म का अकर्म हा तात्त्विक प्रश्न जितका कठीण आहे तितका "अमक्या परिस्थितींत असलेल्या अमक्या अमक्यानें कर्ममार्गानें जावें का नाहीं." हा व्यावहारिक प्रश्न तेवढा कठीण नाहीं. ]

पत्नीनें घेतलेल्या संशयाला किती महत्त्व द्यावें हा प्रश्न सोडून माझ्या पुढच्या प्रत्यक्ष व्यावहारिक प्रश्नांसंबंधीं मी तुम्हांला असें सांगतों कीं, माझ्या बद्दलचा तिचा संशय मधून मधूनच डोकावतो आणि माझ्या वरच्या प्रेमाचे भारानें तो दडपून जातो, आणि म्हणूनच मी तिकडे दुर्लक्ष करतों. खरोखरीच तो प्रबळ झाला तर मला काय करावें हा विचार पडेल. आपल्या पतीचा आपल्याबद्दलचा संशय दृढ व प्रबळ होत चालला आहे, म्हणून आपण हटवादीपणा करूं नये, असें माझें म्हणणें. शिवाय बिन्दुमाधवांना सोडणें म्हणजे ध्येय सोडणें कसें? पुण्यास गायनशिक्षक दुसरे थोडे आहेत?

देशसुधारणेचीं हजारों अंगें आहेत; मनुष्याची शक्ति मात्र मर्यादित आहे. तेव्हां देशहित करूं पाहणाराला कोणतें ना कोणतें तरी एक अंग किंवा फार तर दोन–तीन अंगें घेऊन त्या बाबतींत देशाची प्रगति कशी होईल, या दिशेनें स्वशक्त्यनुसार खटपट करावी लागते. 'कोणत्या दिशेनें आपण खटपट करावी' याचा ज्याचा त्यानें आपल्याशीं विचार करावा आणि आपली आवड, आपला कल, आपला स्वभाव, आपली परिस्थिति व आपली शक्ति इत्यादि गोष्टी पाहून त्याप्रमाणें काय तें ठरवावें. मला राजकीय सुधारणा अधिक महत्त्वाची वाटली म्हणून ती दुसऱ्यास तशी वाटेलच असें नाहीं. बरें, दुसऱ्यासहि जरी ती अधिक महत्त्वाची वाटली तरी तेवढ्यामुळें, इतर गोष्टी अनुकूल नसल्यास, त्यानें राजकारणांत पडावें असें होत नाहीं. सारांश, ज्याची ज्याला आवड असेल, ज्याची ज्यांत गति असेल, आणि जें ज्याला परवडेल तें त्यानें उत्साहानें व स्वार्थत्यागपूर्वक करावें, म्हणजे कोणत्याहि देवाला केलेला नमस्कार जसा केशवाला जाऊन पोंचतो तसा त्याचा प्रयत्न राष्ट्रकार्याच्या गंगेला जाऊन पोहोंचेलच पोहोंचेल.

सामाजिक सुधारकानें राजकीय सुधारकास पाण्यांत कां पाहावें हें समजत नाहीं. एखाद्याला विधवाविवाह आवडत नसला म्हणून तो स्वार्थी निष्ठुर समजावयाचा काय? एखाद्याला महाराच्या पंक्तीला बसणें कसेंसेंच वाटत असलें म्हणून त्याची राजकीय कामगिरी कुचकामाची ठरते कीं काय? विधवांचे विवाह लावणें, महार-मांगांच्या पंक्तीला बसणें, सहकारी संस्था स्थापणें, ठराव पास करणाऱ्या राजकीय परिषदा व सभा भरविणें या अशाच गोष्टी कांहीं मतलबी अधिकाऱ्यांच्या पसंतीस उतरतात, म्हणून तेवढ्याच गोष्टी करणारा तो खरा व 'जबाबदार' देशाभिमानी आणि बाकीचे सर्व बेजबाबदार

देशबुडवे म्हणावयाचें ? देशसेवेचा मार्ग एकच आहे काय ? हल्लीं रेल्वे झाल्यामुळें कांहीं मुलांना जसें वाटतें कीं, पुण्याहून मुंबईला जाण्याचा एकच मार्ग—खडकी, तळेगांव, वडगांव, लोणावळें, कर्जत वगैरे स्टेशनें वाटेंत आहेत तो—तसेंच कांहीं सामाजिक सुधारकांना वाटतें कीं, देशसुधारणेचा मार्ग एकच आणि या मार्गांतील वाटेंतलीं स्टेशनें म्हटलीं म्हणजे विधवा—विवाह, मिश्र—जाति—भोजन, सहकारी संस्था, स्त्री—शिक्षण, वर्षांतून तीन दिवस तोंड उघडणारी राष्ट्रीय सभा, वगैरे वगैरे. पण पुण्याहून मुंबईला जाण्याचा रेल्वेचा तेवढाच काय तो एक मार्ग असें नाहीं. ज्याला घाटावरची वनश्री व सृष्टिशोभा पाहवयाची असेल, पायीं चालण्याची मेहनत केल्यानें आपली शक्ति वाढेल असें ज्याला वाटतें, वाटेंतलीं खेडीं दुरून बाहेरून पाहण्यापेक्षां त्यांत प्रत्यक्ष राहून तेथील रहिवाश्यांशीं निकट संबंध यावा अशी ज्याची इच्छा असेल, घाटावरचे कडे, तेथील निसरड्या वाटा, तेथील कांटे-कुटे इत्यादिकांना न डगमगतां खडतर मार्गानें चालण्यास जो तयार असेल, त्यानें देखिल पायरस्त्यानें न जातां रेल्वेनेंच जावें आणि रेल्वे अधिकारी ज्या डब्यांत बसवतील त्या डब्यांत मुकाट्यानें बसावें, हा आग्रह कां ?

राष्ट्राची प्रगति एका तऱ्हेच्या प्रयत्नानेंच होते असें नव्हे. राष्ट्र ही नाव आहे असें कल्पिल्यास कोणाला हातांत वल्हें घ्यावें लागेल, कोणाला सुकाणूं धरावें लागेल, तर कोणाला भेगेंतून येणारें पाणी टंबरेलानें बाहेर टाकून द्यावें लागेल; कोणाला बांबू पाण्यांत घालून त्याच्या नेटानें प्रसंगविशेषीं नावेची दिशा फिरवावी लागेल, तर कोणाला वल्हें उलटें मारावें लागेल ! राष्ट्रनौका पैलतीरावर न्यावयाची असल्यास या सर्व गोष्टी केल्या पाहिजेत; आणि या जर केल्या पाहिजेत, तर ज्या कामाला जो योग्य असेल आणि ज्याची ज्याला विशेष हौस असेल त्यालाच तें देण्यांत आलें तर त्यांत सर्वांचाच फायदा नाहीं काय ?

आतां कोणी म्हणतील कीं, नावेला जर मोठें भोंक पडलें तर सुकाणूवाल्यानें, वल्हें मारणारानें, डोलकाठीवरच्या माणसानें—सर्वांनीं—एकच काम करण्यास आरंभ केला पाहिजे, अर्थात् पाणी काढून टाकून भोंक बुजविण्याच्या कामास लागलें पाहिजे. तद्वतच राष्ट्रावर असा एखादा प्रसंग येतो कीं, त्या वेळीं, सर्वांनीं आपले धंदे व आपापलीं आवडीचीं कामें सोडून देऊन त्या प्रसंगास

तोंड देण्यासंबंधानें जें बरेंवाईट काम पडेल तें केलें पाहिजे. शहराला शत्रूचा वेढा पडला असतां भास्कराचार्यांनीं आपली गणिताची पाटी बाजूस सारावी, पाणिनीनें 'ख फ छ ट' मधून आपलें डोकें काढावें, तुकारामानें टाळ सोडावी, तानसेनानें ताना बंद कराव्या आणि सर्वांनींच शहराच्या रक्षणास धांवून जावें, हें तत्त्वतः खरें मानलें तरी वेढा कोणीं व कशा प्रकारें घातला आहे आणि तो कसा उठवावा याविषयीं मतभेद होण्याचा संभव आहे. प्रस्तुतच्या उदाहरणांत एक म्हणणार, दारिद्र्य हाच हिंदुस्थानचा शत्रु; दुसरा म्हणणार, धर्मग्लानि हाच खरा शत्रु; तिसरा म्हणणार, शरीरसंपत्तीचा ऱ्हास; चवथा म्हणणार, विधवाविवाहप्रतिबंध; पांचवा अस्पृश्यजाति; सहावा शिक्षणाचा अभाव; सातवा राजकीय परतंत्रता; आठवा स्वाभिमानाचा व कर्तव्यदक्षतेचा अभाव; इत्यादि इत्यादि, इत्यादि. अशी ही यादी किती तरी लांबवितां येईल !

राष्ट्राला कधीं कधीं शरीराची उपमा देतात. आपणांला साधा ताप आला तरी देखील निरनिराळे डॉक्टर किंवा वैद्य लोक त्याची निरनिराळी चिकित्सा करतात व निरनिराळी औषधयोजना करतात. आणि यदाकदाचित् रोगाची चिकित्सा एकच होऊन एकच औषधयोजना झाली, तरी औषधाच्या प्रमाणांत, अनुपानांत, पथ्यांत हरएक बाबतींत निरनिराळ्या डॉक्टरांची व वैद्यांची निरनिराळी प्रवृत्ति ! ही झाली एका तापासंबंधानें गोष्ट. आणि एखाद्याला जर एकाच वेळीं दोनतीन रोग असले आणि त्यांपैकीं कांहीं जुनाट असले, मग तर विचारावयासच नको. आपलें हें आर्यावर्तरूपी राष्ट्रशरीर केवढें अवाढव्य आणि त्याला कितीक तरी रोग आहेत ! अशा स्थितींत समाजशरीरचिकित्सकांत मतभेद नाहीं झाला तरच नवल ! आपल्या देशाला कोणता रोग नाहीं ? त्याचा एक तरी अवयव निकोप आहे का ? आर्यावर्ताला त्रिदोष नव्हे तर शतदोष झाला आहे्च असें कधीं कधीं वाटतें. व्यापार नाहीं, पैसे नाहींत, खाण्यापिण्यास पुरेसें नाहीं; देशांतरीं जाण्याची उमेद नाहीं व त्याला अवसर नाहीं; देशांतल्या देशांत मान नाहीं; मानहानि पुष्कळ वर्षें होत गेल्यामुळें तेजहि कमी झालेलें; नीतिधैर्य वेताचेंच; धर्माचा उत्साह तात्पुरताच; विद्येची आवड परंपरागत, पण तीहि अवसर नसल्यामुळें मंदावलेली; शास्त्रीय शोध नाहींत; ललितकलांमध्यें प्रगति नाहीं; जुन्या कलाहि बऱ्याच विसरलेल्या; सर्व गोष्टींत परावलंबित्व–उष्टें खाण्याशिवाय गत्यंतर नाहीं; शाळेंतलीं बीजगणिताचीं वगैरे

क्रमिक पुस्तकें सुद्धां दुसरीकडून आणावयाचीं; स्त्रिया अशिक्षित आणि कोत्या दृष्टीच्या म्हणजे अर्धांग विगलित झालेलें; शूद्रादि वर्गांना पायाचा दाखला दिला तर हे पाय कमजोर झालेले व पोटाशीं आणि डोक्याशीं भांडण्यास तयार झालेले; बाहू लुले; डोकें गांगरून गेलेलें ! बरें, परिस्थिति अशी कीं, स्वतःला जें औषध घ्यावेंसें वाटतें तें घेण्याची सोय नाहीं. कारण हें अवाढव्य राष्ट्रशरीरच पराधीन ! अशा अर्धांग-विगलित, अनेक-रोगग्रस्त, आंधळ्या, लुल्या, पांगळ्या, थोट्या, दरिद्री, परावलंबी शरिराला कोणतें औषध किती प्रमाणांत द्यावयाचें हें मलाच तेवढें समजतें, दुसऱ्या कोणाला समजत नाहीं, हें म्हणणें किती धाडसाचें आहे ? आणि तसें म्हणवतें तरी कसें ? यास्तव एखाद्याला विटकुरानें पाय शेकावेसे वाटले तर त्याला तें खुशाल करूं द्यावें; एखाद्याला डोकें चेपावेंसें वाटलें तर त्यानें तें करावें; ज्याला जो उपाय सुचेल त्यानें तो करावा. पाहिजे तर आपणाला मदत करण्यास इतरांना बोलवावें; रोग्याची शुश्रूषा करण्याबद्दल चुकार किंवा आळशी लोकांची 'दादा बाबा' करून विनवणी करावी, आडमुठेपणानें सेवा करणारास प्रसंगीं दाबावें; पण सद्बुद्धीनें सेवा करणाऱ्याची कधींहि अवहेलना करूं नयें, द्वेष करूं नये. रोग इतके आहेत आणि रोग्याची स्थिति इतकी भयंकर आहे कीं, चिकित्सक कितीहि हुशार किंवा दूरदर्शी असला तरी अमुक उपचार आणि अमुक औषधच लागू पडेल, असें म्हणणें समंजस होणार नाहीं; व एखादी म्हातारी आई, भोळसर भाऊ आणि प्रेमळ मित्र हीं जर हातपाय चेपीत असलीं किंवा शेकीत असलीं तर 'अहो, तुम्ही वेडे आहांत, हातपाय चेपून काय होणार आहे, रोग पोटांत ( नाहीं तर डोळ्यांत, नाहीं तर डोक्यांत ) आहे, माझेंच औषध घ्या, आणि मी सांगेन तीच सेवा करा' असे शब्द त्याच्या तोंडून निघूं नयेत ! आणि रोग्याच्या हिताकरितां असली भोळसर सेवा करूं देणें योग्य नसलें, तर कठोरपणा त्यानें स्वीकारावा, पण आईचा किंवा बापाचा दांडग्या मुलासंबंधानें जो क्षणिक व अंशतः कृतक कठोरपणा असतो तो स्वीकारावा, कसायाचा निष्ठुरपणा नसावा व सूड घेण्याची इच्छा तर मुळींच नसावी.

एका फ्रेंच प्रहसनांत असें दाखविलें आहे कीं, नुकत्याच श्रीमंत झालेल्या एका गृहस्थाचे मनांत 'शिष्ट' ( gentleman ) बनण्याचें आलें व त्यानें 'शिष्टता' शिकविणाऱ्या गुरूबद्दल वर्तमानपत्रांत जाहिरात दिली. त्याबरोबर

दुसरे दिवशीं अनेक लोक त्याचेकडे गुरु म्हणून आले. नृत्य शिकविण्याचा नेहमीं धंदा करणारा त्याचेकडे गेला व म्हणाला कीं, " वागणुकींत केव्हांहि पाऊल न चुकणें—वांकडें पाऊल न पडणें—याच्यांत शहाणपण व शिष्टता आहे. पाऊल कसें टाकावें हें नृत्यकला शिकल्यानें समजतें; तेव्हां तुमचा गुरु होण्यास मींच योग्य." पण गवई त्याला पुढें बोलूं देईना. तो म्हणाला, "गायनाशिवाय शिष्टता यावयाचीच नाहीं. गायनकलेंत सर्व जीवितरहस्य आहे; कारण तालबद्धता, मेळ, मिलाफ ( Harmony )यांत गायनाची गुरुकिल्ली आहे व तीच व्यवहाराची, राजकारणाची, किंबहुना सर्व आयुष्याची, गुरुकिल्ली आहे. वर्तनांत ' ताळतंत्र ' संभाळावें लागतें, परिस्थितीशीं मेळ घालावा लागतो; तेव्हां तुम्ही मजजवळ गायन शिका म्हणजे तुमचें काम होईल. " गवयाचें म्हणणें पुरें होतें न होतें तोंच एका विद्वान् पण दरिद्री ग्रंथकारानें त्याला अडविलें व त्या श्रीमंत गृहस्थाकडे वळून म्हटलें, " या सगळ्यांना सोडून मलाच तुम्ही गुरुस्थानीं नेमा; कारण जगांत आपलें म्हणणें काय आहे तें उत्तम रीतीनें सांगतां येणें आणि लोकांवर आपल्या भाषणानें छाप बसवितां येणें, हें फार उपयुक्त आहे आणि हें ज्ञान शास्त्रग्रंथांचें परिशीलन केल्यानें येतें. मी तुम्हांला काव्य, अलंकार वगैरे सर्व शिकवितों, तेव्हां मला तुम्ही गुरु नेमा. इतर सर्व लोक कुचकामाचे आहेत. " इतर धंदेवालेहि तेथें आलेच होते. जो तो आपलें घोडें पुढें ढकलूं लागला. तेव्हां त्यांचें एकमेकांमध्यें मोठें भांडण जुंपलें. इतक्यांत एक लष्करी अंमलदार तेथें आला. त्यानेंहि आपल्या कलेची थोरवी गाइली व ' शिष्टतेचे गुरु होण्यास आपण लायक ' असें प्रतिपादिलें. लगेच इतर सर्वजणांनीं त्यांच्याविरुद्ध ओरड केली; पण त्यानें गवयाला, ग्रंथकाराला, नर्तकाला व इतरांना घालवून दिलें व शिष्टतेचें गुरुत्व बळजबरीनें आपलेकडे घेतलें !

स्मरणावरून वर्णन केलेल्या या प्रहसनप्रसंगाचें तात्पर्य विस्तारानें सांगण्याची विशेष जरूर नाहीं. हिंदुस्थानची सुधारणा करूं पाहणारी अशीच नानाविध मंडळी पुढें येते. विधवाविवाहनिषेधाच्या विरुद्ध बंड करणारी मंडळी म्हणते कीं, राष्ट्राचा उद्धार या चालीचा मोड झाल्याशिवाय होणार नाहीं. आपल्या पक्षाला जो येऊन मिळणार नाहीं तो समाजाचा शत्रु असें यांपैकीं कांहींजण समजतात. 'राजकीय चळवळ' वाला, 'शारीरिक सुधारणा' वाला, उद्योग-

धंदेवाला, अस्पृश्योद्धारवाला, इतिहाससंशोधनवाला, पैसाफंडवाला, गोरक्षणवाला इत्यादि मंडळी लोकांच्या परिचयाचीच आहेत.

आपल्या आवडीच्या विषयाचा अभिमान बाळगणें, किंवा त्याविषयीं विशेष उत्साहानें व कळकळीनें काम करणें कांहीं वावगें नाहीं; पण त्याच्याशिवाय दुसरा महत्त्वाचा विषयच नाहीं हा समज चुकीचा आहे. पण हा समज एक वेळ पत्करेल; परतु आमच्या पक्षाच्या बाहेर खरा देशाभिमान नाहीं, खरी दूरदृष्टि नाहीं, खरा स्वार्थत्याग नाहीं, अशा प्रकारचा समज फारच घातुक आहे. हा दोषहि कदाचित् चालूं शकेल; पण ' माझ्या मताचे जे नाहींत ते माझे शत्रु ' अशा प्रकारची भावना मात्र सर्वांत वाईट. स्वतःचें मत खरें समजणें साहजिक आहे. प्रत्येक मनुष्याला आपण स्वतः फार शहाणे असें वाटतच असतें, पण दुसऱ्याचे मतांत दोष आहे असें समजणें आणि त्या मनुष्याचा द्वेष करणें याच्यांत फार अंतर आहे. दुसरा पक्ष सदोष आहे, असें समजणें स्वाभाविकच नव्हे तर इष्टहि असेल,—' आहे ' असेंहि एक वेळ म्हणण्यास हा लेखक तयार होईल; परंतु ' सदोष ' पक्ष ' द्वेषार्ह ' असलाच पाहिजे असा कांहीं कोठें न्याय नाहीं. जो तो मनुष्य स्वतःला शहाणाच समजतो; पण शहाणपणाचा सर्व मक्ता आपल्याकडेच आहे, स्वार्थत्याग आपल्याच घरीं पिकतो, देशाभिमान आपल्या हृदयांतच स्फुरतो, राष्ट्राच्या प्रगतीची मख्खी आपल्यालाच ठाऊक आहे, इतर सर्वांनीं माझ्या मार्गानेंच चालावें, नाहीं तर ते स्वतः खड्यांत पडतील व देशाला रसातळाला नेतील, अशा प्रकारची भावना अस्वाभाविक व अनिष्ट आहे. आपलीं मुलें आणि आपलीं मतें जशीं आपणाला प्रिय असतात तशीं लोकांनाहि आपापलीं मुलें आणि मतें प्रिय असतात. आपणाला जसा स्वाभिमान व देशाभिमान आहे तसा लोकांनाहि असतो. इत्यादि इत्यादि साध्या गोष्टी देखील महाराष्ट्र विसरला आहे असें कांहींजणांना वाटतें. याच्यांत पाहणाऱ्यांच्या दृष्टीचा दोष आहे का दुसरीच कांहीं तरी याची उपपत्ति आहे ?

कांहीं लोक येथें एक असा आक्षेप घेतील कीं, दुसऱ्याचें मत चुकीचेंच नव्हे तर घातुक आहे, असें प्रामाणिकपणें ज्याला वाटतें त्यानें त्या मताचा निषेध करणें आणि त्या मताचा पुरस्कार होऊं न देणें, शक्य तेवढा त्याला विरोध करणें, हें इष्ट आणि आवश्यक नाहीं काय ? तर दिलेल्या रोग्याचा

दाखला घेऊन असें म्हणतां येणार नाहीं का कीं रोग्यास भ्रमानें औषध देणाऱ्यांचा निषेध करणें आणि त्यास प्रतिबंध करणें डॉक्टरचें कामच आहे ?

आक्षेप बरोबर आहे. पण उत्तर असें कीं, डॉक्टरानें निषेध, विरोध, किंवा प्रतिबंध करूं नये असें मी म्हणत नाहीं; तर डॉक्टरानें दुसऱ्याला कटु शब्दांनीं दुखवूं नये, दुसऱ्यावर भलभलते आरोप करूं नयेत, एवढेंच मला सुचवावयाचें आहे. भलतें औषध देण्यास किंवा देणाऱ्यास विरोध करावा, पण देणाऱ्याची कुचेष्टा करूं नये. त्याला निंद्य ठरविण्याचा प्रयत्न करूं नये. पापाबद्दल एकानें म्हटलें आहे कीं, Hate the sin but not the sinner. भलतें औषध देऊं पाहणाऱ्याबद्दल मला हेंच सुचवावयाचें आहे. विरोध करावा, प्रतिबंध करावा, वेळप्रसंगीं झगडा, झुंज, युद्ध करण्यासहि हरकत नाहीं. पण हें युद्ध 'धर्म्य' असावें, 'सद्धर्म' न सोडतां तें करावें. ही गोष्ट चुकीची किंवा अशक्य कोटींतली आहे काय ?

केतकरांच्या कादंबऱ्यांनीं मराठी कादंबरीवाङ्मयांत एकंदर कोणती भर घातली याचा विचार करूं लागल्यावर दोनतीन गोष्टी ध्यानांत येतात त्या अशाः—( १ ) त्यांच्यापूर्वीच्या कादंबऱ्या बव्हंशीं 'सदाशिवपेठी' होत्या आणि त्यांनीं त्यांचें क्षेत्र विस्तृत केलें. ( २ ) त्यांच्या कादंबऱ्यांमध्यें मनुष्य-स्वभावावर व वर्तनावर सभोंवतालच्या परिस्थितीचा व सामाजिक रचनेचा सूक्ष्म पण अत्यन्त प्रबल असा परिणाम होतो, हें तत्त्व पटविलेलें आहे; व स्त्रीपुरुषांच्या हृदय-दरींतलि ज्या कांहीं भाव-भावनांकडे पूर्वकालीन कादंबरी-कारांनीं दुर्लक्ष केलें होतें त्यांकडे त्यांनीं लक्ष वेधलें आहे. ( ३ ) त्यांच्या कादं-बऱ्या केवळ मनोविनोदनार्थ नाहींत, तर त्या विचारप्रवर्तक आहेत. ( आणि सद्भावना-पोषकहि आहेत असें मी म्हणेन, पण हें कांहीं वाचकांना मान्य होणार नाहीं. )

[ १ ] केतकरपूर्व कादंबऱ्या 'सदाशिवपेठी' होत्या याचा सामान्यतः समजण्यांत येणारा अर्थ असा की, त्यांत सदाशिवादि ब्राह्मणी पेठांत राह-णाऱ्या व तत्सम अशा मध्यमवर्गीय पांढरपेशा वर्गाचेंच वर्णन होतें. केत-करांनीं हें निंदागर्भ विशेषण लाविलें तेव्हां त्यांच्या मनांतील अर्थ अधिक व्यापक होता. 'सदाशिवपेठी' मध्यमवर्गाची व त्यांतील बुद्धिमान् व पुढारी गण-लेल्या लोकांची ही जी विशिष्ट दृष्टि, विशिष्ट मनोरचना, विशिष्ट विचारपद्धति ( ही त्यांच्या मतें अत्यंत संकुचित व अशास्त्रीय होती ) ती या विशेषणाच्या द्वारें व्यक्त करण्याची त्यांची इच्छा होती. हरिभाऊ आपटयांच्या कादंबऱ्यांत विविधजातीय पात्रें आलीं नाहींत असें नाहीं; परंतु तीं थोडीं आहेत व विशेष महत्त्वाचीं नाहींत. केतकरांच्या कादंबऱ्या आपणापुढें महाराष्ट्रीय मध्यमवर्गीय

पांढरपेशा, अशिक्षित व सुशिक्षित स्त्रीपुरुषांचें वर्णन करूनच थांबत नाहींत, तर त्या नागपुरी, बंगाली, पंजाबी इत्यादि लोकांशीं आपला परिचय करून देतात; त्या यहुदी, शीख, ख्रिश्चन लोकांत आपणांला नेतात; नायकिणी, रखेल्या व त्यांच्या मुली यांच्याकडे नेण्यास कचरत नाहींत; इंग्लंडांत गेलेल्या विद्यार्थ्यांचे विनोदी संवाद आपणांस ऐकवितात; तिकडे गेलेल्या अर्धवट स्थायिक झालेल्या बंगाली वगैरे प्रौढ स्त्रियांचें अंतरंग आपणांस दाखवितात; तेथील तरुणींच्या हृदयांतील अंतःप्रेरणा व अंतःकरण याबद्दल सहानुभूति उत्पन्न करितात अमेरिकेंत गेलेल्या नव्याजुन्या हिंदी स्त्रीपुरुषांचीं ध्येयें व त्यांच्या विचारसरणी यांतील भेद स्पष्ट करून दाखवितात; तेथील हिंदी राजकारणांतील सौम्य कॉंग्रेस पक्षीय व ज्वलज्जहाल ‘ गदर ’ पक्षीय लोकांची मनोवृत्ति समजावून देतात; इंग्लंडांतील व अमेरिकेंतील परिस्थिति पाहून प्रत्यक्ष आलेल्या विचारवन्त ‘बुवा’शीं ओळख करून देतात—ही यादी लांबविण्यांत अर्थ नाहीं. तात्पर्यार्थ वाचकांना कळलाच आहे. केतकरांच्या कादंबऱ्यांनीं पात्रांची क्षेत्रव्याप्ति व विविधता यांत वृद्धि केली, यावर विशेष भर द्यावासें मला वाटत नाहीं. केतकरांनीं जी मराठी कादंबऱ्यांत भर घातली आहे, ती सदाशिवपेठी वृत्ति व दृष्टि सोडून त्यांत जें नावीन्य आणिलें त्यांत आहे. सदाशिवपेठी समाजाचे प्रश्न, त्यांच्या अडचणी, त्यांच्या आकांक्षा, त्यांचीं ध्येयें यांतच गुरफटलेल्या मराठी कादंबरी-वाङ्मयाला महाराष्ट्रांतील मध्यमवर्ग म्हणजे महाराष्ट्र नव्हे, महाराष्ट्र म्हणजे हिंदुस्थान नव्हे. बालविवाह, पुनर्विवाह, तरुण–तरुणी विवाह, जातिभेद, इंग्रजांचा जुलूम इत्यादि प्रश्न हेच सध्यांच्या पिढीनें सोडविण्याचे प्रश्न नव्हेत; रूढ नीति किंवा सुशिक्षित समाजानें इंग्रजी वाङ्मयावरून घेतलेली नीति म्हणजेच त्रिकालाबाधित व सर्व समाजाला सारखी लागू पडणारी नीति नव्हे; समाजाचा विचार करावयाचा म्हणजे सर्व प्रवृत्तींचा विचार करावा लागतो, केवळ शिष्टसंमत प्रवृत्तींचाच विचार करून चालत नाहीं; इत्यादि अनेक गोष्टी त्यांच्या कादंबऱ्यांवरून जशा प्रतीत होतात तशा तत्पूर्व कादंबऱ्यांवरून होत नाहींत हें कोणीहि कबूल करील.

[ २ ] हरिभाऊंनीं मराठी कादंबरीला अद्भुततेच्या बालोचित कल्पनाविहारापासून परावृत्त करून वास्तवतेच्या भूमिकेवर आणून तेथील रमणीय, चिन्तनीय व लक्षणीय दृश्यांचा तिला नाद लाविला, आणि तिच्या क्रीडेला व्यव-

स्थित, कलायुक्त व विचारगर्भ स्वरूप दिलें. नंतर 'रागिणी'नें तिला कांहींसें अंतर्मुख करून किंचित् गंभीर स्वरूपाच्या अंतःकलहाकडे मधून मधून लक्ष देण्याचा थोडासा नाद लाविला. प्रो. फडक्यांनीं तिची सुशिक्षित श्रीमंतांशीं ओळख करून देऊन सुसंस्कृत प्रेमलीला तिला शिकविल्या आणि त्यांनीं तिची कलादृष्टि विशेष जागरूक व आग्रही केल्यानें कलानैपुण्यामुळें उत्पन्न होणारी 'जादुगिरी' तिच्या डोळ्यांमध्यें चमकूं लागली. खांडेकरांनीं उपमा-उत्प्रेक्षादि अलंकारांनीं तिला सजविली, पण अलंकारोन्मत्त न करतां तिला जीवनाकडे केवळ क्रीडादृष्टीनेंच नव्हे, तर हळुवार चित्तानें पाहण्याची संवय लावली. ना. ह. आपटे यानीं तिला संसारविषयक सदुपदेशाचे पाठ दिले. 'विभावरी शिरूरकर'नें तिला लालित्ययुक्त औद्धत्याभास मधून मधून आकर्षक होतो हें एक विलोभन-तत्त्व शिकविलें. अशा रीतीनें अनेकांनीं—प्रौढ तरुणांनीं—स्त्री-पुरुषांनीं-कादंबरीच्या वाढत्या वयाला अनुसरून तिचें जीवन सुविनीत व कलापूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. केतकरांनीं १९२६ मध्यें या क्षेत्रांत प्रवेश करून तिला हरतऱ्हेचे वेष-देश दाखविले, आणि बऱ्यावाईट रूढ कल्पनांचें, विचारांचें व भावनांचें अंतरंग सर्वांत अधिक सूक्ष्मतेनें व व्यापक दृष्टीनें ओळखण्यास शिकविलें. समाजांत निरनिराळ्या जाति व धर्म, चालीरीति व रूढ कल्पना, प्रवृत्ति व आकांक्षा असल्यामुळें संमिश्र स्वरूपाचे प्रश्न कसे उत्पन्न होतात व ते सोडविण्याचे भांडारकर, आगरकर प्रभृतींचे प्रयत्न कितीहि सद्हेतुयुक्त असले तरी ते कसे अपुरे आणि (त्यांच्या मतानें अशास्त्रीय) आहेत, हेंहि त्यांनीं सोदाहरण दाखवून दिलें. केतकरांच्या पूर्वीं समाजाच्या विविध आणि संमिश्र स्वरूपाच्या अंतरंगाचें इतक्या व्यापक दृष्टीनें कोणी फारसें निरीक्षण केलें नव्हतें. आणि निरीक्षण करून जीं अनुमानें निघतील तीं इतक्या धैर्यानें आणि निर्भीडपणानें सांगणारे तर फारच थोडे. धर्माचा आणि विवाहाचा कांहीं संबंध नाहीं, रखेली ठेवणें हेंहि कित्येक वेळां समर्थनीय ठरतें, कलानिपुण स्त्रियांना प्रचलित विवाहबंधनें लागू नसावींत, तरुण-तरुणींनीं प्रेमसंशोधनाच्या किंवा प्रेमदर्शनांच्या बाबतींत संकोच किंवा भिडस्तपणा बाळगूं नये, अशा प्रकारचीं मतें समर्थनीय असोत किंवा नसोत, तीं निर्भयपणें समाजापुढें मांडणें हें काम कोणी तरी केव्हां तरी करावयासच पाहिजे होतें; त्याशिवाय त्यांची आमूलाग्र व संपूर्ण छाननी होणें शक्य नव्हतें. त्याचप्रमाणें एखाद्या विशिष्ट जातीचा किंवा वर्गाचा किंवा

धर्माचा विचार करून हिंदुस्थानचा प्रश्न सुटणार नाहीं हा सिद्धान्त बाजूला ठेविला आणि कादंबरीकारानें स्वभाववर्णन व प्रसंगवर्णन एवढेंच आकुंचित ध्येय डोळ्यांपुढें ठेविलें, तरी देखील स्वभावांचें व प्रसंगांचें रहस्य कळण्यास सामाजिक परिस्थितीची किती छाननी करावी लागते, मनःसागरांत किती खोल बुडी मारावी लागते, आणि या मानसशास्त्रीय पाणबुड्यानें आपलें मन किती उदार, ज्ञानसंपन्न, निर्विकार व निर्भय ठेवावें लागतें, हें केतकरांच्या कादंबऱ्यांतून जसें स्पष्ट होतें तसें इतर कादंबऱ्यांतून होउ नाहीं, हें कोणालाहि मान्य करावें लागेल.

[ ३ ] कादंबऱ्या ज्या लिहावयाच्या त्या जीवनविस्मृतीकरितां 'for escape from life' कीं जीवनोन्नतीकरितां, या वादांत येथें शिरण्याचें कारण नाहीं. कांहीं कादंबऱ्या वर्तमान जीवनाची विस्मृति पडावी आणि काल्पनिक जीवनांत मन रममाण व्हावें एवढ्याकरितां प्राधान्येंकरून लिहिलेल्या असतात आणि तशाच हेतूनें त्या वाचल्याहि जातात हें खरें आहे; आणि त्यांत वावगें असें कांहीं नाहीं. पण कांहीं कादंबऱ्या वर्तमानाची विस्मृति उत्पन्न करून जीवनाचा खरा व खोल अर्थ सुचवितात, आत्मोन्नतीच्या व समाजोन्नतीच्या मार्गाचें दिग्दर्शन करून त्या मार्गानें जाण्याबद्दल आवड व उत्साह उत्पन्न करितात, हेंहि खरें आहे. आनंददानाचें कलेचें कार्य साधून हें दुसरें कार्य साधलें तर त्यांतहि वावगें असें कांहीं नाहीं. केतकरांच्या कादंबऱ्यांमध्यें कांहीं कलातत्त्वांकडे दुर्लक्ष झालें आहे यांत शंका नाहीं. त्यांनीं या बाबतींत थोडें अधिक लक्ष दिलें असतें तर विचारप्रवर्तक व उदार भावनांचें पोषण या दृष्टीनें त्यांच्या कादंबऱ्यांची जी योग्यता आहे ती अनेक पटींनीं वाढली असती. आहे त्या स्थितींत देखील त्यांचें कार्य डोळ्यांत भरण्यासारखें आहे. त्यांची भाषाच घेतली तर ती रुक्ष व खडबडीत आहे असें आपण म्हणतों, पण तीतहि त्यांचें धाडस आणि विचारप्रवर्तकत्व दिसून येतें. 'सदाशिवपेठी', 'परीक्षा—मोजू' (वृत्ति) 'बाहेर-जाव' (walk-out) इत्यादि शब्द असंस्कृत वाटतील, पण ते परिणामकारक आहेत. 'करती झाली', 'विचारते झाले' इत्यादि सकर्मक क्रियापदांचे भूतकाळाचे कर्तरि प्रयोग त्यांनीं अनेक ठिकाणीं वापरले आहेत, ते प्रथमदर्शनीं हरदासी थाटाचे वाटतात. पण ही प्रथा सुरू झाली तर मराठीच्या सोइस्करतेंत आणि सामर्थ्यांत भर पडेल असें वाटतें. ती प्रथा लोकप्रिय करण्याचा धाडसी प्रयत्न यशस्वी होण्यास काला-

वधि लागेल, पण जेव्हां तो होईल तेव्हां यशस्वितेचें थोडेंसें तरी श्रेय केतकरां-कडे जाईल. कथानकाचीं पात्रें निवडण्यांतहि त्यांनीं धाडस व कल्पकता दाखविलेली आहे. वेश्यांच्या मुलींना कथानकांत गोंवण्याचें काम अलीकडील पुष्कळच लेखकांनीं केलेलें आहे; पण हें काम करणाऱ्याला जी माहिती, जी विचारप्रवणता व जी व्यापक दृष्टि लागते तिचा अभाव बहुतेक ठिकाणीं दिसून येतो. केतकरांच्या कादंबऱ्यांमध्यें गरीब मजुरांच्या परिस्थितीचा व त्यांच्या प्रश्नांचा फारसा विचार केलेला नाहीं, ही कांहींना उणीव भासेल. अलीकडच्या कांहीं 'भाई' लोकांना समाजशास्त्राचें खोल ज्ञान नाहीं असें केतकरांचें मत होतें असें त्यांच्या कादंबऱ्यांतील कांहीं उल्लेखांवरून दिसून येतें. मजुरांचा प्रश्न सोडविण्याचे 'भाई'चे मार्ग चुकीचे आहेत असें सांगून न थांबतां खरे मार्ग केतकरांनीं सोदाहरण दाखविले असते तर बरें झालें असतें. पण त्यांना तेवढें आयुष्य लाभलें नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, प्रत्येक कादंबरीकारानें हे प्रश्न हातीं घेतलेच पाहिजेत हा केवळ दुराग्रह होय. त्यानें जे प्रश्न हातीं घेतले ते त्यानें कसे सोडविले आहेत एवढें आपण पाहावें आणि गुणदोषचर्चा करावी यांतच औचित्य आहे. 'कलात्मकते'च्या नांवावर विचारशून्यता लपविण्यापेक्षां कलात्मकतेकडे थोडेंसें दुर्लक्ष करून संसारांतील विविध दृश्यें जीं सामान्य लोकांच्या नजरेला आलीं नसतीं तीं दाखविणें, त्यांतील खोल मर्म सुचविणें त्यांच्या दर्शनानें सुविचारांत, सद्भावनेंत आणि सात्त्विक आनंदांत भर घालणें हें अधिक श्रेयस्कर आहे. हें कार्य करतांना मापेची ठाकठिकी साधली नाहीं, कथानकाची बांधणी शिथिल आणि मांडणी अव्यवस्थित झाली, कांहीं ठिकाणीं अकालपांडित्यप्रदर्शन झालें व कांहीं ठिकाणीं कंटाळवाणा पाल्हाळ झाला, तर हे दोष दोषस्वरूपच आहेत; परंतु ते पत्करतील. 'कले'चें नांव एकसारखें घेऊन विचारशून्य उखाणे घेत बसणाऱ्यांपेक्षां वरील दोष करून विचारप्रवर्तन व सद्भावनापोषण करणाऱ्या केतकरांमध्यें उच्चतरदृष्ट्या कलात्मकता अधिक आहे असें मला वाटतें. ऋतुमात्रजीवी सुंदर फुलांचे ताटवे मांडणीमुळें रमणीय वाटतात आणि असतातहि; परंतु बेडौल दिसणाऱ्या कलमी आंब्यांच्या झाडांवर, फणशीवर व उंच गेलेल्या माडांवर शेंकडों फळें लटकत आहेत, समुद्रावरून वादळी वारे वाहत आहेत, सुंदर पाण्याचे वाकडेतिकडे पाट चालले आहेत, अशा देखाव्यांत देखील आनंददायकत्व आहे असें मला वाटतें !

## देशभक्त मेला, शाळेला सुटी 

पुणं
१६-१-३४

प्रिय मित्र भाऊराव काळे, मुक्काम सुरत, यास नारायणराव पाठक हल्लीं मुक्काम पुणें, याचा नमस्कार वि. वि.

जरूरीच्या कामाकरितां आपण सुरतेस गेल्याचें येथें आल्यावर कळलें म्हणून आपला तेथला पत्ता विचारून घेऊन त्या पत्त्यावर पत्र धाडीत आहें. आतां पांचबावडी येथील शेवटल्या दिवसाचीच हकीकत राहिली आहे!

सरलेनें तिसऱ्या दिवशींच कागदपत्रें आणि भांडींकुंडीं यांची आवराआवर धीरोदात्तपणें केली आणि उद्यां पहाटे ५ वाजतां निघणाऱ्या मोटार-लॉरीनें पुण्यास जाण्याचा आपला निश्चय झाल्याचें सांगितलें. रदबदलीदाखल बोलण्याला त्यांनीं अवकाशच कांहीं ठेवला नाहीं, इतका त्यांचा आवाज निर्धाराचा होता. 'एका स्पेशल मोटारीनें आपण सर्वजण जाऊं' अशी उपसूचना मात्र आम्ही करूं शकलों आणि सरलाबाईंनीं ती मान्य केली.

डॉक्टर-वैद्य, औषध-पाणी, दूधवाला, वाणी वगैरेंचें बिल आपण देऊन ठेविलेल्या पैशांतून देऊन टाकलें होतें. तेव्हां मागें कांहीं ओढ नव्हती आणि आम्हीं पहांटेस ४-४।। वाजतां स्पेशल मोटार आली तींत ५ वाजतां बसलों. जातांना कोणाच्या तोंडून कांहींहि शब्द निघत नव्हता; निघाला असता तरी मोटारीच्या आवाजामुळें तो स्पष्टपणें ऐकूं आला नसता. पेट्रोलची का कसलीशी घाण येतच होती आणि प्रत्येकाचीं मनें तर दुःखमग्न. शिवाय प्रत्येकाला कांहींतरी बोलावें अशी इच्छा जरी होती तरी अशा वेळीं भलताच शब्द तोंडून जाऊं नये म्हणून प्रत्येक जण ओंठावर आलेले शब्द गिळीत होता.

" आज फार थंडी नाहीं. " " मोटार फार जोरांत चालली आहे. " यापलीकडे कोणी कांहीं बोललेंच नाहीं. सृष्टीला आमच्या दुःखाची किंवा संकोचाची जाणीव होती असें दिसलें नाहीं; कारण कोंबड्याचें आरवणें, कावळ्यांची कावकाव, कुत्र्यांचें भुंकणें, पूर्वीसारखेंच चाललें होतें. आभाळांत आज ढग कांहीं अधिक आले नाहींत, सूर्य वेळच्या वेळीं उगवला, उजेड नेहमींसारखाच क्षणक्षणाला अधिक अधिक स्पष्ट होऊं लागला, उष्णता रोजच्याप्रमाणेंच हळुहळू वाढूं लागली आणि विनायकराव भोळ्यांसारखा महात्मा मृत्युवश झाला याची जणूं कांहीं दखलगिरीच नाहीं अशा भावनेनें गाढवें, गुरेंढोरें बैलगाडीवाले, मोटारवाले, भाजीविक्ये, दूधविक्ये वगैरे लोकांचे व्यवहार चालू झाले. आठ वाजण्याच्या सुमारास आम्ही पिंपळगांवला आलों आणि मोटारवाल्यानें एका चहाकॉफीच्या ब्राह्मणी दुकानासमोर गाडी थांबविली आणि तो दुकानांत शिरला. चहा पिण्याची सगळ्यांना इच्छा उत्पन्न झाली, पण संकोचामुळें कोणी कांहीं बोलेना. मीं धीर करून जणूं कांहीं हवेंतच म्हटलें, " कोणाला चहा घ्यायचा आहे का ? " पण कोणीच कांहीं बोलेना. अखेर मी निलाजऱ्या माणसाचें सोंग आणून म्हटलें कीं, " मला थकल्यासारखं झालं आहे. मी चहा पितों बाबा. " तरी देखील कोणी कांहीं मोटारींतून उठेना तेव्हां सरलेनेंच चाणाक्षपणें सगळी परिस्थिति ओळखून निश्चयाच्या स्वरानें म्हटलें, " नारायणराव, मला पण पाहिजे चहा. तुम्ही आणि मी पिऊं या. " असें म्हणून ती खरोखरीच उठली आणि मोटारींतून उतरून दुकानांत जाऊं लागली. तिच्या पाठोपाठ दुसरी मंडळीहि गेली. दुकानांत चहा घेणार इतक्यांत तिच्या मनांत कल्पना आली असावी कीं, आपण या आसपासच्या खेड्यांत कांहीं जणांना तरी अस्पृश्यासारखे वाटतों, तेव्हां दुकानांत शिरलों असतां अपमान व्हायचा आणि इतरांना चहा मिळावयाचा नाहीं. हा विचार आल्याबरोबर ती लगेच मोटारींत चढली आणि तेथेंच तोंड धुण्याकरितां पाणी मागून घेतलें आणि चहाचा घोटच घेतला; कारण बशींतला चहा निवाला होता या निमित्तानें त्यांनीं बशींतला चहा फेकून दिला आणि कपांतल्या चहाचा घोट घेतला असेल नसेल तोंच हुंदका येऊन सगळा चहा मोटारींत सांडला ! हें मींच तेवढें पाहिलें, इतरांना दुकानांत गेल्यामुळें हा प्रकार दिसला नाहीं. हा प्रकार पाहिल्यावर माझ्या डोळ्यांतहि अश्रू आले, पण दुकानांत गेलेली

मंडळी बोलावूं लागली तेव्हां मन घट्ट करून मीहि दुकानांत गेलों आणि आधींच बेचव आणि कडवट असलेला चहा कडू तोंड करून घेतला.

मोटारींत येऊन बसल्यावर त्या गांवीं एका देशभक्तानें चालविलेल्या एका राष्ट्रीय शाळेंतल्या प्राथमिक वर्गांतलीं गांधीटोपी घातलेलीं लहान मुलें दिसलीं. तीं शाळेंतून परत येत असावींत; कारण " ए गोप्या, शाळेकडे कशाला चाललास? आज शाळेला सुट्टी आहे " असें त्यांपैकीं एकजण म्हणाला. "कसली रे सुट्टी?" असें गोप्यानें विचारल्यावर " कुणी काळे का भोळे देशभक्त मेला अशी बातमी आली आहे. अरे आज सुट्टी आहे, चल विटी-दांडू खेळूं या. " असें तो म्हणाला आणि गोप्याला घराकडे ओढूं लागला.

मोटारींत बसलेले जे आम्ही त्यांना हा संवाद ऐकून काय वाटलें असेल? आणि सरलेला काय वाटलें असेल? कोण कसें सांगणार? तिनें पदरानें तोंड झांकून घेतलें आणि आंतल्या आंत ती हुंदके देऊं लागली एवढें मात्र मला ठाऊक आहे.

पुढील प्रवासांत विशेष कांहीं घडलें नाहीं.

आम्ही पुण्यास घरीं वेळेवर पोंचलों. तेथें आप्पांची गांठ पडल्यावर त्यांना आणि सरलेला, इंदुताईना, मला आणि इतरांना काय झालें असेल हें विस्तारानें मी सांगत नाहीं. पहिल्यानें जो आक्रांत झाला तो ओसरल्यावर शोक गिळून टाकण्याचा सगळयांचा धीराचा प्रयत्न चालला असतां देखील जे दुःखावेग, जें मुळुंमुळूं रडणें, जें डोळे पुसणें, जो दुसऱ्यांच्या समाधानाचा अश्रुयुक्त प्रयत्न, जो ओढूनताणून केलेला वेदान्तोपदेश झाला, त्याचें वर्णन करणें माझ्या शक्तीच्या पलीकडचें आहे आणि स्वभावाच्या विरुद्धहि आहे.

आप्पांची कंबरच खचलेली आहे. म्हातारपणीं हा फारच मोठा आघात झाला. त्यांतून निभावून जाणें कठीण दिसतें.

सरलेनें बाह्यतः तरी शोक गिळलेला दिसतो. ती घरांतलें काम करूं लागली आहे आणि लोकांनाच उपदेशाच्या गोष्टी सांगूं पाहते. पण आंतलें दुःख कसें लपणार? आणि हे प्रयत्न कितीसे सफल होणार!

"माझ्याबद्दल शोक करूं नका, मी शिक्षकीण होऊन जनसेवेचें त्यांचें व्रत पुढें चालवीन" असें मधून मधून सरला डोळे पुशीत आणि हुंदके देत म्हणत होती.

आपला

*नारायण पाठक*

## मुलांची दुसरी सृष्टि ८

माझ्यापासून फार अपेक्षा करूं नका. मी रागिणी लिहिली वगैरे माझी ओळख करून देण्यांत येते. परंतु माझें व्याख्यान ऐकल्यावर म्हणतील, " आजचें व्याख्यान कांहीं नीट जमलें नाहीं." असें होतें. मुलावरून जनकाची परीक्षा करूं नये. विक्रमोर्वशीयं हें कालिदासाचें नाटक आहे. त्यांत उर्वशी ही नारायण ऋषीपासून जन्मली असें विधान केलें आहे, यावर कसा विश्वास ठेवावा असा श्लोक आहे. उर्वशीच्या सौंदर्यावरून तिला प्रत्यक्ष वसंत ऋतूनें, मदनानें जन्म दिला असेल असें वाटतें. उर्वशीवरून तिचा बाप कोणी वेदाभ्यासजड नारायण ऋषि असेल, असें कोणी सांगितलें तरी खरें वाटत नाहीं. त्याप्रमाणें हेच का रागिणीकर्ते, असें व्याख्यान ऐकून कदाचित् खरें नाहीं वाटणार. म्हणून फार अपेक्षा नका करूं. मीं येथें आलों. येथें येण्यांत माझाहि एक स्वार्थ आहे. मुलांत आल्यानें उत्साह व आनंद मिळतो. बाहेरच्या जगांत वावरतांना, सर्व परिस्थिति पाहून एक प्रकारची निराशा वाटते. परंतु तुमच्यांत आलें म्हणजे नैराश्याला रजा मिळते. मुलांत खेळण्याची संधि मिळाली म्हणजे मोठा आनंद असतो. मी तुमची कवाईत पाहिली. तुमचा गणवेष पाहिला, खूप आनंद झाला. मुलें एकत्र खेळत आहेत, सुंदर पोषाख करीत आहेत, हंसत आहेत, नाचत आहेत. मग निराशेचें काय कारण ?

माझ्या वेळची शाळा आठवली म्हणजे तुम्हीं किती भाग्यवंत आहांत असें मनांत येतें. आज विशाल क्रीडांगणें, शिक्षणाचीं अनेक साधनें, निरनिराळ्या शिक्षणपद्धती. आज तुम्हांस मार नसेल मिळत. आमच्या वेळेस पाळी चुकली कीं, छडीचा खुराक असे. मी मानेवर खडा ठेवून लिहायला शिकलों

आहे, मानेवरचा खडा पडला कीं, छडी बसायची. घोडीवर चढवून मिरच्यांची धुरीहि म्हणे देत. मला वर्गांतलि पेटींत कोंडून ठेवलें होतें !

ते शिक्षेचे प्रकार आज गेले. आणि शाळागृहेंहि किती सुंदर, हवाशीर. तळेगांवच्या समर्थविद्यालयांत मी शिकवीत असें. तेथें त्या पत्र्यांच्या झोंपड्या पावसांत गळायच्या. तुम्हीं किती सुखी. आणि ही ड्रिल, बॉयस्काउट वगैरे प्रकार. मीं ड्रिल शिकलों असतों तर पोषाखांत अधिक व्यवस्थित राहिलों असतों. वाटतें पुन्हां लहान व्हावें, बॉयस्काउट व्हावें. तुमच्याकडे पाहून खरोखरच आनंद होतो.

परंतु, तुमची स्थिति अशी असली तरी तुमचा भविष्यकाळ आमच्यापेक्षां कठीण आहे. माझ्या वेळेस बी. ए. वगैरे झाला कीं, हटकून नोकरी मिळायचीच. विष्णुशास्त्री बी. ए. च्या वर्गांत असतांनाच त्यांना फर्स्ट असिस्टंट म्हणून मागणी आली. मास्तर किंवा रेव्हिन्यु खात्यांत नोकरी मिळणें कठीण नसे; परंतु आज ती स्थिति नाहीं. आज किती तरी बेकार बी. ए. पडलेले आहेत; म्हणून तुमचें भविष्य कठीण वाटतें. तें उज्ज्वल दिसत नाहीं. परंतु तें उज्ज्वल आहे व दिसण्यांत उज्ज्वल नसलें तरी तें उज्ज्वल आहे हें विसरूं नका.

कॉलेजमध्यें मुलें गेलीं म्हणजे ही बेकारी समोर दिसून त्यांच्यानें अभ्यास करवत नाहीं, अभ्यासांत लक्ष लागत नाहीं, कोण देणार नोकरी, कां शिकावें. असें मनांत येतें. तुम्ही निरनिराळे विचार करूं लागतां, सामाजिक, राजकीय विचारहि तुमच्या मनांत येतात.

अशा या परिस्थितीसंबंधीं मीं दोन शब्द आतां सांगणार आहें. मला उपदेश करायचा नाहीं. उपदेशावर माझा विश्वास नाहीं. जे मूर्ख असतात, त्यांना उपदेशाचा काय उपयोग ? आणि जे शाहाणे आहेत. त्यांना जरूरच नसते. पुष्कळ वक्ते मुलांना उपदेश देऊं लागतात. "मुलांनो, शील बनवा, चारित्र्यवान् व्हा, वेळेचा सदुपयोग करा," वगैरे सांगतात. परंतु, वक्त्यांनीं वेळेचा सदुपयोग कितपत केलेला असतो ? जगांत सारे उपदेश करीत असतात. इंग्रजींत एक उखाणा आहे. "जी वस्तू सारे जण देऊं इच्छितात, परंतु घेऊं कोणी इच्छित नाहीं, तर ती कोणती ?" उत्तर "उपदेश." मुलें सुद्धां एकमेकांस उपदेश करितात ! परोपदेशे पांडित्यं. उपदेशाप्रमाणें

वागतो कोण ? मोठमोठे ऋषि, तत्त्वज्ञानी, व्यवहारविद् लोक हे जगाला किती तरी सांगत आहेत. लायब्ररऱ्या भरलेल्या आहेत. परंतु पुस्तकें वाचून कोणी कांहीं कृति करतो का? उपदेशाचें आपण ग्रहण केलें असतें तर समाज फार निराळा दिसला असता. म्हणून उपदेश करण्याची मला इच्छा नाहीं; अधिकारहि नाहीं. परंतु बरेवाईट अनुभव थोडे सांगतों.

ज्ञानासाठीं वाचावें लागतें. मी पुष्कळ वाचलें व कांहीं लिहिलें. कांहीं लिहिणें मान्यहि झालें आहे. परंतु मीं कसें वाचीत असें ? विद्यार्थिदशेंत पांगारकर, शंकरराव लवाटे, करंदीकर वगैरे थोर शिक्षक मला लाभले होते. लो. टिळकांच्या व्याख्यानांस वगैरे आम्ही जावयाचे. शिक्षक जीं पुस्तकें वाचायला सांगत तीं मीं हातांत घेत असें. परंतु आवडलें नाहीं तर दूर ठेवीत असें. शिक्षक आपल्या आवडीप्रमाणें सांगतात; मुलांची आवड तीच असते असें नाहीं. कोणतीं पुस्तकें वाचावीं वगैरे आपण विचारावें; आवडतील तीं वाचावीं. जें आवडतें तें समजतें. एखादें पुस्तक वाचण्यांत आपण तन्मय झालों असलों, तर आईनें ५।६ हांका मारल्या तरी आपण जात नाहीं. तो विद्यार्थी चांगला, जो एकदम हांक मारतांच चहा प्यायला जात नाहीं. हातांत पुस्तक आहे किंवा गणित सोडवीत आहे. त्यापुढें चहा त्याला फिका वाटतो. याचा अर्थ आईनें हांक मारतांच जायचें नाहीं, असा नाहीं हो. नाहींतर आईला सांगाल, वामनरावांनीं पांच हांकांशिवाय जायचें नाहीं सांगितलें. सांगण्याचा हेतु असा कीं, जें आवडलें त्यांत आनंद असतो; त्यांत लक्ष लागतें. तें पुस्तक संपल्याशिवाय, तो प्रश्न सोडविल्याशिवाय चैन पडतां कामा नये. अशी बेचैन वृत्ति होणाऱ्याला ज्ञान मिळतें, त्याची प्रगति होते.

ज्ञानासाठीं दुसरें साधन म्हणजे प्रश्न विचारले पाहिजेत. मीं विद्यार्थी असतांना फार प्रश्न विचारीत असें. मीं उत्तरेंहि देत असें. उत्तरें चुकतात, मुलें हंसतात, परंतु आपलें अज्ञानहि कळून येतें. उत्तरें चुकायचींच. कधीं कधीं मी असे प्रश्न विचारीत असें कीं, मास्तर हंसत. माझ्या शंकांचीं उत्तरें देणें त्यांना बरें वाटत नसे; मग " गुरोस्तु मौनं व्याख्यानम्" असें व्हायचें. पुष्कळ मुलें प्रश्न विचारायला लाजतात. मुलींचें तर विचारूंच नका. लाजून कसें होणार ? विचारावें. कारण आजचेंच समजलें नाहीं, तर उद्यांचें कसें समजणार ? मग १५ दिवसांनीं आपण म्हणतों, " हें नाहीं समजत." मास्तर म्हणतात,

पूर्वींच कां नाहीं विचारलेंस? १५ दिवस झाले. आतां का पहिल्यापासून समजावून देऊं? बस खालीं. आपण मग शिक्षकावर रागावतों. त्यांच्यावर रागावण्यांत काय अर्थ? मीं कॉलेजमध्यें होतों. प्रो. बेन यांना गंभीरपणें प्रश्न विचारला. ते हंसले व निघून गेले. मागून माझा प्रश्न वेडेपणाचा होता असें मला कळलें. प्रो. सेल्वी फारच कर्तव्यपरायण. प्रश्न विचारून त्यांना मी भंडवायचा. ते घरीं गेल्यावर माझे सर्व प्रश्न लिहून काढीत व त्यांचीं उत्तरें लिहून मला देत. मला लाज वाटे, आपण यांना किती त्रास देतों! परंतु त्यांचा आनंद होता तो. खऱ्या शिक्षकास प्रश्नांचा कंटाळा नाहीं येत. प्रश्न विचारावे, उत्तरें द्यावीं. त्यांतून आपलें अज्ञान प्रकट होईल म्हणून भिऊं नये. अज्ञान घालवण्यासाठीं तर शाळेंत जायचें. अज्ञान लपवल्यानें तें लपत नाहीं. खरूज असेल तर ती लपवून काय फायदा? ती धू, डॉक्टरला दाखव, आणि शिक्षकाला काय तुझें अज्ञान माहित नसतें? त्याच्यापासून काय लपवणार? वर्षभर तुला तो बघतो आहे. कोण पास वा कोण नापास होईल सारें त्याला माहित असतें. प्रश्न विचारा. मुलांनीं प्रश्न विचारले तर मला शिकविण्यास उत्साह येतो. शिकाविणें म्हणजे व्याख्यानबाजी नव्हे. वाटतें कीं, आपलीहि आतां परीक्षा आहे. मुलांच्या प्रश्नांना उत्तरें देतां आलीं म्हणजे आनंद वाटतो. मुलांचे प्रश्न ऐकून मुलांच्या मनांतील कल्पना कळतात. त्यांतील चुकीच्या दूर करायच्या, तो एक आनंद आहे. भुकेलेल्यास अन्न द्यावें. जागृत जिज्ञासेला ज्ञान द्यावें. मुलांनीं प्रश्न विचारूनच ज्ञान मिळवायचें असतें. आईला हें विचार, तें विचार, असें करून ती ज्ञान मिळवितात. आई शेवटीं रागावते. म्हणते पुरे रे. परन्तु आईला उत्तर देतां येत नसलें म्हणजे ती रागावते. मुलें विचारतात, "चांदोबा कां पडत नाहीं?" याचें उत्तर मींसुद्धां नीट देऊं शकणार नाहीं. त्याला गुरुत्वाकर्षण कसें समजावून देऊं? मला आधीं विचार करावा लागेल. सारांश, प्रश्न विचारीत जा. मास्तर जर म्हणाले, "तुला कांहीं कळत नाहीं." तर सांगा, "कळत नाहीं म्हणून तर शाळेंत आलों. कळतें तर येथें येण्याची जरूर काय?" भगवान् श्रीकृष्णांनीं सुद्धां ज्ञान मिळविण्यासाठीं "परिप्रश्नेन सेवया" असे मार्ग सांगितले. अर्जुनानें प्रश्न विचारून पिच्छा पुरवला त्याचा, परन्तु कृष्ण रागावला नाहीं. "प्रज्ञावादांश्च भाषसे" अशी आरंभीं जरा गंमत केलीन्; परंतु पुढें सर्व शंका उत्कृष्टपणें त्यानें दूर केल्या.

आतां तुमच्या समोरच्या विकट भविष्यासंबंधीं सांगतों. जुनी व नवी पिढी यांच्यांत विसंगति आहे. जुन्या व नवीन कल्पना यांच्यांत विरोध येतो. सामाजिक, राजकीय अशा अनेक प्रश्नांत तुमचें व वडील मंडळीचें मतभेद होतात. तुमचीं मतें सोडा असें नाहीं मी म्हणत. तुम्हीं तुमच्याच डोळ्यांनीं पहा. तुमच्याच कानांनीं ऐका. आपल्या बुद्धीनें प्रत्येकानें चालावें; परंतु मोठीं माणसें, वडील माणसें काय म्हणतात तें ऐकावें. आज वडील मंडळींचें कोणीच ऐकत नाहीं. म्हणतात, यांची बुद्धि बुरणुसली, साठी बुद्धि नाठी ! असें करूं नये. ऐकायला काय जातें ? शेवटीं कृति करायची वेळ येईल, तेव्हां स्वतःच्या बुद्धीप्रमाणें वागावें. आज तुम्हीं सर्वांचें ऐकून घ्यावयाचें. नाना मतें ऐकावीं. विरुद्ध पक्षाचें तर आधीं ऐकावें. आज एकदम कृति करूं लागूं नको. ज्या वेळेस जीवनाची सर्व जबाबदारी स्वतःवर घेशील त्यावेळेस स्वतःच्या विचाराप्रमाणें वाग.

मीं जेव्हां थोडें राजकारण करीत होतों, तेव्हां टाइम्स आधीं वाचीत असें. एक आयरिश पुढारी म्हणत असे, " आमचें धोरण ठरलेलें आहे. सरकारच्या विरुद्ध आमचें धोरण." तसें आमचें मत इंग्रज सरकारच्या विरुद्ध, टाइम्सच्या विरुद्ध, असें आम्ही म्हणत असूं. परन्तु टाइम्स् काय म्हणतो, आपल्या काय चुका दाखवितो, त्यांना उत्तरें देतां येतील कीं नाहीं, हें मीं पहात असें.

एका इंग्रज लेखकानें म्हटलें आहे, " He does not know England who only England knows "—जो फक्त इंग्लंड जाणतो, त्याला इंग्लंड समजलें नाहीं. इंग्लंड समजायला हवें असलें तर आधीं जग समजून घे. इतर देश कसे आहेत, तेथें व्यापार, राज्यशासन, शिक्षण कसें आहे, चालीरीती, संस्कृति कशी आहे तें बघ. त्यांची स्वतःच्या देशाशीं तुलना कर. इतर देशांत तुझ्या देशाबद्दल काय म्हटलें जातें तेंहि ऐक. अशा रीतीनें तुझें ज्ञान अधिक यथार्थ होईल. सारांश, विरुद्ध बाजूंचीं मतें ऐकावीं. त्यांच्या सभांस मुद्दाम जावें. नाना ग्रंथ वाचावे आणि आपलीं मतें हळुहळू निश्चित करावीं. आज तुम्ही वागतां त्याचीं फळें तुमच्या वडिलांस भोगावीं लागतात. त्यांना तुमच्या कृतींवर पांघरूण घालावें लागतें, तुमचा सांभाळ करावा लागतो. पालकांना आज दुःख होतें. तुम्हीं बी. ए., एम्. ए. व्हा. स्वतःवर जबाबदारी घ्या. जें कराल, त्याचे बरेवाईट परिणाम स्वतः भोगण्यास सिद्ध व्हा. आणि मग वागा स्वतःला योग्य वाटेल तसें !

आजकाल दुसऱ्याचें ऐकूनच घेत नाहींत. मीं विद्यार्थ्यांच्या सभेस अध्यक्ष होतों. एका विद्यार्थ्यास बोलायचें होतें; परंतु त्याला बोलूंच देत ना. तो जर अश्लील बोलूं लागला, कंटाळवाणें चऱ्हाट वळूं लागला, तर हुटहुट करून बसवा खालीं; परंतु त्याला बोलूंच द्यावयाचें नाहीं हें काय ?

तुम्हीं का सर्वज्ञ झालांत ? कितीसे तुमचे अनुभव ? कितीसें ज्ञान ? तुमच्यापैकीं पुष्कळ खानदेशच्या बाहेरसुद्धां गेले नसतील. मी तिकडे महिलाविद्यालयांत आहें. एक मुलगी बी. ए. झाली; परंतु ती मागील वर्षापर्यंत आगगाडींत बसलीसुद्धां नव्हती. कुरुंदवाडची होती ती. मोटारनें पुण्यास येई, जाई. तिनें मुंबई पाहिली नव्हती. मुंबई पाहिली नाहीं; दिल्ली, कलकत्ता तर दूरच राहिलीं. कसलें ज्ञान नि कसला अनुभव ! अधीर नका होऊं. जगांत किती घडामोडी, गुंतागुंती नि नाना व्यवहार. उगीच पोकळ विधानें ठोकून का काम होतें ? १९०८ मधील गोष्ट आहे. एक दहा–बारा वर्षांचा मुलगा मजकडे आला व म्हणाला, " बॉंब तयार केल्याशिवाय कांहीं नाहीं. कधीं होणार तुमची तयारी ? शस्त्रास्त्राशिवाय कोणाला मिळालें का स्वराज्य ? केव्हां तरी आरंभ केलाच पाहिजे, मग आजच कां करूं नये ?" मी म्हटलें, " तूं लहान आहेस, थांब. अनेक मोठे कार्यकर्ते काय म्हणतात तें ऐक. घाई नको करूं."

घाईनें पश्चात्ताप करण्याची पाळी येते. आज कांहीं कराल, तर तुमच्या घरांतलि इतरांस त्रास होतो. आज तुम्ही शिकत असतां. आईबापांस दुःख व्हावें हें मला मान्य नाहीं. मोठे व्हा, जबाबदारी अंगावर घ्या, मग वागा स्वतंत्रपणें ! मग कम्युनिस्ट व्हा, कॉंग्रेससभासद व्हा किंवा नोकरी करा. नोकरी केलीत, उद्योग करून पैसे मिळवलेत, सुखोपभोग घेतलात तरी वाईट नाहीं. आपण श्रम करून मिळवावें, आपण श्रम करून भोगावें. मात्र श्रम न करतां केवळ बापाच्या पैशावर चैन मारणें मला पसंत नाहीं.

सारांश, आज एकदम मनांत येईल तसें वागूं नका. पुढें विरोध येणारच आहेत. आईबापाशीं भांडावें लागेल; पण त्यावेळेस आपलीं मतें निश्चित असतलि. जीवनांत ज्यांच्याबद्दल आपणांस प्रेम व आदर वाटतो त्यांच्याशीं झगड्याची वेळ येते. मोठा उद्वेगजनक प्रकार असतो हा. अर्जुनाला भीष्मावर, गुरुद्रोणावर बाण सोडावे लागतात ! काय हा प्रसंग ! खरी ट्रॅजिडी–शोकान्तप्रकार आहे हा. ज्या पुढाऱ्यांबद्दल, नेत्यांबद्दल आपल्यास अलोट आदर व

प्रेम, त्यांच्याविरुद्ध जावें लागतें. बाप हिंदुमहासभावाला, तर मुलगा कॉंग्रेसवाला. बाप कॉंग्रेसवाला, तर मुलगा कम्युनिस्ट. असे हे प्रकार होतात. परंतु या प्रकारांनीं भिऊन जायचें नाहीं. मग कसें वागायचें; परंतु आजच नका गर्दी करूं. मीहि माझ्या वडिलांच्या विरुद्ध वागलों. सरकारी नोकरी धरली नाहीं. परंतु जबाबदारी अंगावर घेऊन मग वागलों. तसें पुढें वागणें अपरिहार्य होतें.

आज मला मुली प्रेमानें म्हणतात, " ते तुमचे दिवस गेले. तुम्हीं शिकविलेंत तें सारें फुकट. अशानें जगाचे प्रश्न सुटणार नाहींत. नवीन उपाय पाहिजेत. " मला त्या म्हणण्याचा राग नाहीं येत, उलट आनंद व अभिमान वाटतो. " तुम्हीं निर्भयपणें मला हें सांगतां, शिकवलेंत तें फुकट असें म्हणतां; यानेंच माझें शिकवणें कृतार्थ झालें. "

तुम्हांला मी तीनचार गोष्टी सांगितल्या. आवडेल तें वाचा. सर्वांचें ऐका. विरुद्ध पक्षाचें आधीं ऐका. विद्यार्थी आहांत तोंपर्यंत प्रत्यक्ष कार्यांत पडूं नका. पालकांस त्यामुळें त्रास होतो. पुढे मोठे झालांत, जबाबदारी अंगावर आली, म्हणजे मग वडिलांस दुःख झालें तरी तुमच्या मताप्रमाणें वागा. त्यांना म्हणा, मला पराक्रम करायचा आहे. मला माझें कर्तृत्व दाखवायचें आहे. माझा कोंडमारा मीं कसा करूं ?" परन्तु आज नको.

विद्यार्थ्यांस मी अनुभवाच्या या गोष्टी सांगितल्या, शिक्षकांस काय सांगूं ? आज समाजांत मान नाहीं, आदर नाहीं, एक दगड मारला तर १० आंबे पडतात, त्याप्रमाणें १ प्रोफेसर काढला तर १०० त्यासाठीं येतात. परन्तु शिक्षकांस मला सांगायचें आहे कीं, समाजांत मान असो नसो; आपण तरी स्वतःला मान द्यावा. ' मला पगार कमी असला म्हणून मी तुच्छ नाहीं. मीं उत्तम कार्य करीत आहें. ' असें आपण म्हटलें पाहिजे. मान वर करून, छाती पुढें करून आपण चाललें पाहिजे. श्रीमंताकडे जायचें असलें तर ऐटींत सरळ जावें. आपणच जर स्वतःला कमी लेखलें, तर जग कां कमी लेखणार नाहीं ? असली नम्रता व विनय नको. आजच्या काळीं तीं उपयोगी नाहींत. आज आपली मान आपण वर ठेवली पाहिजे. पगार अधिक मिळावा म्हणून मागणी करावी. असेल तर मिळेल; परन्तु कमी पगार म्हणून आपणांस कमी समजूं नये. हें पवित्र कार्य आहे, उदात्त आहे, मग पगार अधिक कशाला—असें

मी म्हणणार नाहीं. पवित्र काम आहे म्हणूनच अधिक पगार द्या, उगीच थापा नका मारूं! संस्थेजवळ पैसे नसतील तर देऊं नका; परन्तु खोटा उपदेश नका करूं.

असो. मला एकंदरींत खूप आनंद झाला. लायक शिक्षक, उत्साही मुलें, सुंदर क्रीडांगण, सारें पाहून उत्साह वाटला. तुम्हीं माझें व्याख्यान शांतपणें ऐकलेंत, चुक्‌चुक् शुक्‌शुक् केलें नाहीं. यावरून तुम्ही सद्गुणीहि आहांत असें मी अनुमान काढतों. मी आगगाडींतून येत असतां हिरवी सृष्टि पाहून मन कसें प्रफुल्लित झालें होतें. तशी मुलांची नवीन उत्साही हंसणारी खेळणारी ही सृष्टि पाहून खूप आनंद झाला. मुलें पाहून आनंद होतो. शाळेचा ३१ वा हा वाढदिवस. १०१ वा आपण पाहणार नाहीं. परंतु १०१ वाच काय, १००१ वा वाढदिवस येवो अशी मीं आशा करतों. इंग्लंडमध्यें ऑक्सफर्ड, केंब्रिज, कधीं शतकानुशतकें परंपरा चालते. हा हॅरोचा विद्यार्थी, हा ईटनचा असें सांगतात. एकेका संस्थेची परंपरा असते, वैशिष्ट्य असतें. वेलिंग्टननें वॉटर्लूची लढाई ईटनशाळेच्या क्रीडांगणावर जिंकली असें नेहमीं म्हणतात. तसें आपल्याकडे झालें पाहिजे. मुलांना पाहून त्यांच्या वर्तनावरून हा अमक्या संस्थेंतील असें म्हटलें गेलें पाहिजे. ही हिंगणेछाप विद्यार्थिनी, हा अमळनेरच्या हाय स्कूलचा विद्यार्थी असें उमटून आलें पाहिजे. अशी परंपरा निर्माण झाली पाहिजे. तुमच्या शाळेंतून असे पुढारी निघोत. सच्छील, सरळ असे कार्यकर्ते अमळनेरच्या हाय स्कुलांतून निघतात असें झालें पाहिजे. तुमची शाळा त्या ईटन, हॅरो वगैरे इंग्लंडमधील शाळांप्रमाणें उत्कृष्ट नागरिक देणारी होवो, अशी मी इच्छा करतों."

## शत्रु ? छे, मित्र !



'ज्ञानान्मोक्षः' असें आपण म्हणतों खरें, पण जसजशी समाजाची ज्ञानामध्यें प्रगति होत गेली आहे, तसतशी धर्मावरील श्रद्धा कमी होत गेली आहे असें सकृद्दर्शनीं तरी वाटतें, हें कबूल केलें पाहिजे. अलीकडे अलीकडे तर आधिभौतिक व इतर शास्त्रांमध्यें प्रगति बरचि झाल्यामुळें लोक धर्मशून्य नाहींत तरी अश्रद्ध व अज्ञेयवादी होत चालले आहेत असें आपाततः दिसतें, हेंहि खरें आहे. युरोपियन व अमेरिकन लोकांच्या अलीकडील चालीरीतींकडे व विचार-पद्धतीकडे पाहिलें असतां जुन्या धर्मकल्पनांचा व नीतिकल्पनांचा तिकडे ऱ्हास होत चाललेला दिसतो, आणि आपल्याकडेहि इंग्रजी शिक्षणामुळें अशाच प्रकारचा देखावा दिसतो, हें सगळें मी कबूल करतों; पण माझें म्हणणें एवढेंच आहे कीं, बाह्य देखाव्याकडेच न पाहतां, सूक्ष्म दृष्टीनें विचार केला असतां, खऱ्या धर्माची व नीतीची हानि अलीकडे झाली आहे किंवा होत चालली आहे, असें मानण्यास मुळींच आधार नाहीं.

चारपांच हजार वर्षांपूर्वींचा वैदिक धर्म किंवा १९२५ वर्षांपूर्वींचा ख्रिस्ती धर्म हे आजकाल मूळ स्थितींत दृग्गोचर होत नाहींत, हें आंधळ्याला देखील दिसतें आहे, पण याचा अर्थ जग धर्महीन बनत चाललें आहे असाच कां करावा ? धर्मासंबंधीं आपल्या कल्पना बदलत आणि सुधारत चालल्या आहेत, असा त्याचा अर्थ कां करूं नये, असा मी तुम्हांला नम्रपणें प्रश्न विचारतों. इतर बाबतींत जसा विकास ( Evolution ) झाला आहे, त्याप्रमाणेंच धर्माचाहि विकास होऊन रूपांतर झालें आहे, असें मला तरी वाटतें. वैदिक कालाचाच विचार केला, तर त्या कालांत देखील धर्माचें एकच स्वरूप होतें, असें दिसत नाहीं. ऋग्वेदांतील ऋचांवरून पाहतां, त्या कालीं देखील अनेक

देवतांची पूजा मागें पडत जाऊन एक देव मानण्याकडे पुढें पुढें प्रवृत्ति होऊं लागली होती, असें दिसतें. "एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति" या वचनाची तुम्हांला येथें आठवण होईल. 'नासदीय' सूक्तावरून तर हल्लींच्या अज्ञेयवाद्यांची पूर्वपीठिका वेदकालापर्यंत जाते असें म्हणावें लागतें. मनुष्याची विचारशक्ति जसजशी वाढत जाईल, त्याला अनुभव जसजसे निराळे निराळे येऊं लागतील, त्याची परिस्थिति जसजशी बदलेल, त्याप्रमाणें धर्मासंबंधीं व नीतिसंबंधीं त्याच्या कल्पना बदलावयाच्याच; त्या बदलल्या तर त्यांत आश्चर्य नाहीं, न बदलल्या तर मात्र आश्चर्य खरें! 'गीता' हें आपण एक धर्म–पुस्तक मानतों. पण गीतेंतच 'वेद-वाद-रतां'ची निंदा करून श्रुतींच्या पलीकडे जो श्रेष्ठ मार्ग श्रीकृष्णाला दिसला तिकडे अर्जुनाचें मन वळविण्याचा प्रयत्न केलेला आहे ना? आद्य शंकराचार्य यांना तर कोणी अधार्मिक म्हणणार नाहीं ना? ते तर धर्माचा उद्धार करणारे म्हणून आपण मानतों. त्यांनीं तरी कोठें यज्ञयागात्मक जुना वैदिक धर्म कायम ठेविला? आम्ही अलीकडचे लोक कदाचित् अश्रद्ध व धर्मशून्य असूं, पण ज्ञानदेव–तुकाराम–एकनाथादि साधुसंत तरी अधार्मिक नव्हते ना? त्यांनीं जुन्या धार्मिक समजुतींत व चालीरीतींत फरक करण्याचा प्रयत्न केला कीं नाहीं? युरोपमध्येंहि ल्यूथर, कॅल्व्हिन, वेस्ले इत्यादिकांनीं आपापल्या कल्पनांप्रमाणें धार्मिक चालीरीतींत व विचारपद्धतींत परिवर्तन करण्याचा आपापल्या परीनें प्रयत्न केलेला आहे. मग आधुनिक कालांतल्या विचारवंत लोकांना हल्लींच्या ज्ञानाला, अनुभवाला व परिस्थितीला अनुसरून धार्मिक चालीरीतींत वगैरे बदल करावासा वाटला, तर त्यांनाच कां दोष देण्यांत यावा? आणि त्यांना धर्मशून्य कां म्हणण्यांत यावें? धर्म हा वाढत्या वृक्षाप्रमाणें आहे; त्याचें मूळचें बीजस्थितींतलें स्वरूप अंकुरावस्थेंत राहाणार नाहीं आणि अंकुरावस्थेंतलें स्वरूप वृक्षावस्थेंत राहाणार नाहीं. मोठा वृक्ष झाल्यावरहि जुनीं पिकलेलीं पानें गळून पडणार, कांहीं फुलें व फळेंहि त्या ऋतूंत आपापलीं कार्यें करून गळून पडणार. आहे त्या स्थितींतच सदा राहणें यांत त्याचें चिरंजीवित्व किंवा सनातनत्व नाहीं, तर परिस्थितीप्रमाणें पानांत वगैरे बदल करण्यांतच त्याचें सनातनत्व आहे.

तुम्ही कदाचित् म्हणाल कीं, धर्माच्या मूळ तत्त्वांतच बदल करण्यांत आला, तर मग धर्म-हीनत्व हा आरोप बरोबर होईल किंवा नाहीं ? तुमचें म्हणणें कबूल; पण ' धर्माचें तत्त्व ' म्हणजे तरी काय ? खिस्ती धर्म खरा, का हिन्दुधर्म, का मुसलमानी, का बौद्ध ? आणि त्यांतलीं ' खरीं तत्त्वें ' किंवा ' खरें तत्त्व ' कोणतें ?

" **श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्ना**
**नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणम् ।** "

हा श्लोक तुम्हांला ठाऊकच आहे. ' **धर्मस्य तत्त्वं निहित गुहायाम्** ' असें सांगून आपल्या प्रश्नाची टाळाटाळी मला करावयाची नाहीं, तर आपल्या प्रश्नाचें उत्तर देणें किती कठीण आहे, हें सूचित करावयाचें आहे. धर्माच्या व नीतीच्या तत्त्वासंबंधानें मी ' नीतिशास्त्रप्रवेशा ' त आणि ' विविधज्ञान-विस्तारा ' च्या ज्युबिलीप्रीत्यर्थ निघालेल्या ' निबंधसंग्रहा ' त विस्तारानें ऊहापोह केलेला आहे. त्याचा पुनरुच्चार करण्याचें हें स्थळ नव्हे व वेळहि सध्यां आपणाला नाहीं. सर्व लोकांना मान्य होईल अशा प्रकारचें धर्माचें तत्त्व म्हटलें म्हणजे

" **न हि सत्यात्परो धर्मः** "

किंवा ' परोपकार हाच धर्म; ' किंवा

" **ज्यासी आपंगिता नाहीं । त्यासी धरी जो हृदयीं ।**
**तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥** "

अशा प्रकारचें तत्त्व होय. ' भूतमात्रांच्या ठिकाणीं प्रेमबुद्धि ठेवणें ' असें त्याचें रूपांतर करतां येईल, किंवा अधिक विस्तार करून व तपशील देऊन धर्माचें तत्त्व असें सांगतां येईलः—

" **धृतिः क्षमा शमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ।**
**धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ॥** "

यांपैकीं कोणतेंहि सर्वमान्य लक्षण घेतलें, तर धर्माचा अलीकडे अधःपात होत आहे आणि तो ज्ञानाच्या प्रगतीमुळें होत आहे, या दोन्ही विधानांना कांहीं एक आधार नाहीं असें दिसून येईल, अशी माझी खात्री आहे. ' **न हि सत्यात्परो धर्मः** ' हें लक्षण उदाहरणार्थ घ्या. अलीकडच्या ज्ञानबुद्धीमुळें

इतऱ्हेचें 'सत्य' अधिक कळूं लागलें आहे, आणि सत्यजिज्ञासा आणि सत्याबद्दलची आसक्ति देखील वाढत आहे. राजकीय दृष्ट्या 'सत्याग्रह' यशस्वी असो किंवा नसो, बौद्धिक दृष्ट्या अलीकडच्या काळांत सत्याग्रहाबद्दलचा आग्रह अधिकाधिक होत आहे,—इतका कीं, या सत्यामुळें परंपरागत समाजरचनेची व नीतिकल्पनांची वगैरे वाताहात झाली तरी हरकत नाहीं, अशी या काळांतील बौद्धिक सत्याग्रही लोकांची वृत्ति आहे! कॉलऱ्याचे जंतु शोधून काढणाऱ्या मेचनिकॉफ (Methnikoff) या शास्त्रज्ञाला किती प्रयास पडले व शेवटीं तर त्यानें शोधून काढलेल्या जंतूंच्या विषाचा अर्क त्यानें स्वतः व त्याच्या कांहीं शिष्यांनीं प्राशन करून, जीव धोक्यांत घालून, आपलें मत सिद्ध केलें! रेडिअम शोधून काढणाऱ्या क्यूरी पति–पत्नींची, आपल्या इकडील बोस, रॉय वगैरेंची व अशा अनेक शास्त्रज्ञांची सत्यशोधनार्थ चाललेली धडपड, त्यांची चिकाटी, त्यांचा स्वार्थत्याग, इत्यादि गोष्टींचा विचार केला असतां, 'सत्य'रूपी नारायणाची पूजा अलीकडे श्रद्धेनें, निष्काम बुद्धीनें व निश्चयानें होत आहे, हें कोणालाहि प्रांजलपणें कबूल करावें लागेल.

'भूतदया हाच धर्म' असें लक्षण केलें, तरी देखील हा भूतदयात्मक खरा धर्म दिवसेंदिवस प्रवृद्ध व उन्नत होत आहे, असें दिसून येईल. परोपकार, दान, धृति, क्षमा, अक्रोध–कोणताहि धर्ममूलक सद्‌गुण घ्या, अलीकडे त्याची अभिवृद्धि दिसेल. दान पूर्वींच्या स्वरूपांत होत नसेल, पण त्याचें कारण 'सात्त्विक दान कोणतें' याबद्दल आपण अधिक विचार करूं लागलों आहोंत व आपलें दान 'सात्त्विक' असावें याबद्दल आपण अधिक दक्ष आहोंत. जो मागेल त्याला जें मागेल तें देणें याला आपण आतां सात्त्विक दान समजत नाहीं, तर ज़्याला जरूर असेल त्याला जरूर तेवढेंच द्यावयाचें व तें देखील अशा रीतीनें द्यावयाचें कीं, त्याचें सामर्थ्य वाढून याचना करण्याची त्याला जरूरच राहूं नये, अशा प्रकारची आपली दानकल्पना आहे. आणि तिला अनुसरूनच आपण वागण्याचा प्रयत्न करतों. पूर्वींचे पेशवाईतले 'रमणे' जरी गेले असले, बडोद्यांतली रोजची खिचडी जरी आतां बंद झाली असली, हव्यकव्य कमी होऊन भिक्षुकांना जरी कमी दक्षिणा व आमंत्रणें मिळत असलीं, किंवा पुराणिकांच्या चौरंगावर तांदुळाची जरी आतां पूर्वींएवढी रास होत नसली, तरी एकंदरींत खरा दानधर्म कमी झाला आहे असें मानण्याचें कारण नाहीं.

हल्लींच्या विश्वविद्यालयांत वगैरे मिळणाऱ्या हरतऱ्हेच्या शिष्य--वृत्त्या, जिकडे तिकडे चालू असलेल्या आणि लोकाश्रयावर जगलेल्या नानाप्रकारच्या संस्था, त्यांचे नानाविध निधि व त्यांच्या वर्गण्या, या सर्वांचा विचार करतां, समाजांत परोपकार किंवा दान कमी होत आहे असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. 'क्षमा' पाहिली असतां, अलीकडे तींत ज्ञानामुळें फारच प्रगति झालेली दिसेल. युरोपमध्यें पूर्वीं धार्मिक मताबद्दल कित्येकांचा छळ झाला आहे. बायबलमधील 'जेनेसिस' च्या विरुद्ध पृथ्वीची व मानवजातीची उत्पत्ति प्रतिपादण्याबद्दल आधिभौतिक शास्त्रज्ञांना त्रास सोसावा लागला आहे. चोरीसारख्या लहान अपराधाबद्दल अठराव्या शतकांत फांशीं देण्यांत येत असे. या प्रवृत्तीचा अव-शेष एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतहि मधूनमधून दृष्टीस पडे. उदाहरणार्थ, १८१८ मध्यें बारा लोकांना लहानशा चोरीबद्दल फांशीं देण्यांत आलें होतें.* १८२० मध्यें एका लहान मुलानें गवताच्या गंजीला कोलीत लावलें म्हणून त्याला फांशीं देण्यांत आलें ! हल्लींच्या काळांत असले न्यायाधीशकृत मनुष्यवध शक्य आहेत काय ? स्त्रियांसंबंधीं, मुलांसंबंधीं, गुन्हेगारांसंबंधीं, मजुरांसंबंधीं आपली वर्तणूक पूर्वीपेक्षां अधिक माणुसकीची, अधिक न्यायाची आणि दयेनें व क्षमा-बुद्धीनें अधिक प्रेरित झालेली नाहीं काय ? दया व न्याय या दृष्टीनें पाहातां पांढरपेशा वर्गांतील स्त्रियांची—विशेषतः विधवांची—स्थिति मला तरी पूर्वीपेक्षां सुधारलेली वाटते व दिवसेंदिवस ज्ञानाचा व विचारांचा फैलाव जसजसा जास्त होईल, तसतशी त्यांची स्थिति सुधारत जाईल, यांत शंका नाहीं. 'धृति' आणि इतर सद्गुण घेऊन ज्ञानवृद्धीबरोबर या सद्गुणांची वृद्धि कशी झालेली आहे, हें मला दाखवितां येईल; पण दिशा दाखवून दिलेली आहे, अधिक विस्तार करण्यांत अर्थ नाहीं.

पण तुम्ही कदाचित् येथें मला असा प्रश्न विचाराल कीं, 'ईश्वराविषयीं आस्तिक्यबुद्धि कमी झालेली नाहीं काय ?' कमी झालेली आहे हें कबूल, पण

* "On March 7, 1887 at the Lincolnshire Lent Assizes the Right Honourable Sir Vicary Gibbs, the Honourable Sir William Farrow, and John Charles Lucas Calcraft Esquire, all pillars of the Church and State, murdered in cold blood by hanging twelve unfortunate men, guilty of petty theft or small offences."

*'Times of India' 7 th Oct- 1925*

ईश्वराविषयीं आस्तिक्यबुद्धि धार्मिकतेला आवश्यक असल्यास, ती कोणत्या अर्थानें, तें आपणांस पाहिलें पाहिजे. कपिलमुनींनें प्रचलित केलेल्या सांख्य-वादाच्या अनुयायांपैकीं कांहीं निरीश्वरवादी होते, पण त्यांना आपण अधार्मिक मानीत नाहीं. अद्वैतवेदान्ती हे वास्तविक निरीश्वरवादीच. बौद्धहि तसेच. पण त्यांना सर्वांना अधर्मनिष्ठ म्हणणें धाडसाचें होईल. बरें, 'ईश्वर' शब्दानें अमुक गुणधर्मसमुच्चय सूचित होतो असा विचार करूं लागलों, तर 'व्यक्ती तेवढे ईश्वर' मानण्याची पाळी येईल आणि हिंदुस्थान देशांतील तेहतीस कोटि लोकांना तेहतीस कोटि देव आहेत, ते या अर्थानें यथोचित होतील ! त्यांतील खरी गोष्ट अशी आहे कीं, देवाची कल्पना मनुष्यानें आपल्या समाधानाकरितां उत्पन्न केलेली आहे. अर्थात् ज्याच्या त्याच्या मानसिक विकासाला व प्रवृत्तींना अनुरूप असाच त्याचा देव असणार. ज्यू लोकांचा देव कोपिष्ट, सूड घेणारा, बलि घेण्यास उत्सुक, पक्षपाती होता, त्याला तशींच कारणें होतीं. रानटी लोकांचे देव रानटीच असावयाचे ! मनुष्य सुसंस्कृत झाला म्हणजे त्याचा देव सुसंस्कृत होतो. मग त्या देवाला पक्षपात आवडत नाहीं, त्याला कोणाचा तरी बळी घ्यावासा वाटत नाहीं, त्याला अमुक मनुष्याकरितां सृष्टीचे नियम बाजूला सारून जादुगाराप्रमाणेंच चमत्कार करून दाखवावेसे वाटत नाहींत, तर तो न्यायी, दयाळू, प्रेमळ असा होतो. मन अधिक संस्कृत झालें म्हणजे सगुण ईश्वरापेक्षां निर्गुण ईश्वराची–ब्रह्माची-कल्पना आवडूं लागते ! या ब्रह्माचा अर्थ कसा करावयाचा, हें देखील ज्याच्या त्याच्या ज्ञानावर, स्वभावावर, प्रवृत्तीवर, परिस्थितीवर अवलंबून असतें. कोणी पूर्वींचा अर्थ घेऊन त्यांत समाधान मानून राहतील, कोणी हेगेल ( Hegel) याच्या 'निरपेक्षपूर्ण' प्रमाणें ('Absolute' प्रमाणें) त्याचें लक्षण करतील, कोणी त्या त्या मनुष्याला अत्यंत आदरणीय, पूज्य, रम्य वाटणारें ध्येय, असा त्याचा अर्थ करतील ! "देवपूजा म्हणजे ध्येयपूजा" असें या शेवटीं निर्देश केलेल्या लोकांचें म्हणणें पडेल. माझें स्वतःचें असेंच म्हणणें आहे, पण "माझा धर्म तोच खरा धर्म" ( My doxy is orthodoxy ) असें मानणाऱ्यांपैकीं मी नाहीं ! गीतेंत सांगितल्याप्रमाणें, पण किंचित् निराळ्या अर्थानें, प्रत्येकाचा 'स्वधर्म'–म्हणजे त्याला पटलेला धर्म–त्याला श्रेष्ठ होय, असें मानणारा मी आहें. प्रत्येकाची ईश्वराची कल्पना निराळी असते व असण्यास हरकत नाहीं,

आणि प्रत्येकानें आपआपल्या ईश्वराची आपआपल्या पद्धतीनें पूजा करावी असें कबूल केल्यास, ईश्वराविषयीं आस्तिक्यबुद्धि हें धर्माचें एक प्रमुख अंग आहे, असें मी आनंदानें मान्य करीन. कोंट ( Comte ), मिल, ब्रॅडलॅा, आगरकर इत्यादिकांना 'सत्य', 'आदर्शभूत मानवजाति', 'समाजसेवा' किंवा अशाच प्रकारचें ध्येय ईश्वराच्या ठिकाणीं होतें व या ईश्वराची ते दृढ श्रद्धेनें, निष्कामबुद्धीनें, स्वार्थत्यागपूर्वक निरंतर पूजा करीत होते; अर्थात् ते नास्तिक नव्हते, —हें जर तुम्ही कबूल करीत असाल, तर ईश्वराविषयीं आस्तिक्यबुद्धि ही धार्मिकतेला आवश्यक नाहीं, असें म्हणण्याचें कोणालाच कारण नाहीं. पण असा जर अर्थ मान्य नसेल, आणि आपल्या आवडत्या लोकांकरितां त्यांच्या शत्रूचें निर्दालन करणारा, किंवा सोमपान करणारा, किंवा सूड उगवणारा, किंवा सृष्टीचे नियम झुगारणारा, किंवा नवसाला पावणारा, किंवा भक्तांचीं दळणें दळणारा देव मानला पाहिजे असाच तुमचा आग्रह असेल, तर मात्र "आमची अधार्मिकांत गणना झालेली पुरवली; आम्हांला असला चमत्कारिक, लहरी, पक्षपाती, आकुंचित दृष्टीचा देव नको", असें म्हणण्याची कित्येकांना पाळी येईल ! अलीकडच्या सुसंस्कृत माणसाला सरळपणा, न्याय, समता, दया, क्षमा, शान्ति इत्यादि गुण प्रिय व पूज्य आहेत; हे गुण समाजांत जितके प्रिय व पूज्य होतील तितकें त्याला बरें वाटेल; या गुणांच्या इष्टतेबद्दल आणि पूज्यतेबद्दल त्याची श्रद्धा असते व त्यांच्या अभिवृद्ध्यर्थ तो शक्य तेवढा निष्ठापूर्वक प्रयत्न करीत असतो. सनातनीयांची परंपरागत आस्तिक्यबुद्धि खरी असेल, त्यांची भक्ति चांगली असेल, त्यांचा धर्म खरा असेल; पण आतां सांगितलेल्या वृत्तींत खरी भक्ति व खरा धर्म अजिबात नाहीं, ही वृत्ति धर्मशून्यतेची आहे, असें म्हणणें धाडसाचें आहे. आधिभौतिक शास्त्रांच्या किंवा इतर शास्त्रांच्या प्रगतीमुळें परंपरागत आस्तिक्यबुद्धीला धक्का बसला आहे यांत शंका नाहीं, पण खऱ्या धार्मिकतेचा किंवा नीतिनिष्ठेचा नाश व्हावा, असें या शास्त्रांत कांहींच नाहीं. पदार्थविज्ञानशास्त्रानें व रसायनशास्त्रानें पदार्थांचें, अणूंचें व परमाणूंचें कितीहि पृथक्करण केलें आणि त्यांना कार्यकारणभावाच्या नियमरज्जूंनीं बांधलें, तथापि मन हें देखील एक परमाणूंचेंच कार्य आहे, असें अद्यापि तरी तीं दाखवूं शकत नाहींत; तें तीं पुढेंमागें दाखवूं शकलीं तर शकतील, पण तशी आशा करण्यास फारसा आधार नाहीं. किंबहुना आधुनिक आधिभौतिक शास्त्रीय

शोधांचा विचार करतां Purpose ची म्हणजे सहेतुककेचीच भाषा जीवशास्त्र, व मानसिक शास्त्रांतहि कांहीं बाबतींत अधिक यथार्थ वाटूं लागली आहे. 'सहेतुकते' वरून कोणी तरी 'ईश्वरा'नें जग निर्माण केलें असें समजावयाचें नाहीं, तर एवढेंच समजावयाचें कीं, रासायनिक भाषेपेक्षां हेतुसूचक भाषा अधिक उचित आहे—हा हेतु कोणत्या मनाचा किंवा व्यक्तीचा आहे, हा केव्हां व कसा उत्पन्न झाला, वगैरे गोष्टी मुग्धच ठेवावयाच्या. बरें, घटकाभर आपण असें धरलें कीं, मन हें एक खडू किंवा पाणी याप्रमाणेंच जड परमाणूंचें कार्य आहे, तरी देखील मानसिक व्यापार म्हणून कांहींतरी अस्तित्वें आहेत, गुणधर्म आहेत, त्यांत विशिष्ट भाव-भावना आहेत, त्यांमध्यें विशिष्ट आशा-आकांक्षा, आवडी-निवडी गर्भित आहेत; याहि गोष्टी तितक्याच खऱ्या व अनुभवसिद्ध आहेत. अर्थात् सुसंस्कृत मनाला विशिष्ट गोष्टी खऱ्या किंवा सुंदर किंवा उचित किंवा नीतिदृष्ट्या चांगल्या वाटल्या, तर त्यांचें खरेंपण, सौंदर्य, औचित्य किंवा सत्त्व ही त्याच्यापुरती तरी खरीं मानलीं पाहिजेत, आणि तो तीं तशीं खरीं धरून चालला, तर त्यांत अस्वाभाविक किंवा गैर कांहीं नाहीं. वनस्पतींचीं फुलें व फळें मातीपासून उत्पन्न झालेलीं असलीं, तीं जरी जड परमाणूंचीं पूर्णपणें कार्यें असलीं, तरी त्यांचा सुवास किंवा गोडी किंवा त्यांचें सौंदर्य खोटें किंवा टाकाऊ किंवा अप्रिय किंवा अनादरणीय कां व्हावें ? मनाचीहि गोष्ट तशीच आहे. तें कसेंहि उत्पन्न झालेलें असो, आज तें असें असें आहे, त्याच्या अशा अशा प्रवृत्ती व आवडीनिवडी आहेत, अर्थात् आज त्या सर्व खऱ्या धरून त्यांना अनुसरूनच वागलें पाहिजे. सुसंस्कृत माणसाचें मन मातीपासून उत्पन्न झालें आहे असें ठरलें, तरी त्या मनाला घाणींत लोळावेंसें वाटणार नाहीं, आणि त्या मनानें घाण टाळली किंवा लोकांना टाळण्यास सांगितली, तर त्यांत तर्कदृष्ट्या वावगें काय आहे ? माझी सौंदर्याभिरुचि किंवा सदभिरुचि कशीहि उत्पन्न झालेली असो, आज मला अमुक अमुक गोष्टी कुरूप, हिडीस, अनुचित किंवा अनीतीच्या वाटत आहेत, अर्थात् त्या तशा मीं मानल्या, तर त्यांत चूक कोठें आहे ? मला जोंपर्यंत माझें मन जास्त विश्वसनीय वाटत आहे, (आणि तें प्रत्येकाला वाटतेंच) तोंपर्यंत त्या मनाला प्रिय-अप्रिय, पूज्य-अपूज्य, सुंदर-असुंदर, वाटणाऱ्या गोष्टी मी ग्राह्य किंवा त्याज्य समजाव्यात व लोकां-

नाहि त्या तशा आहेत, असें सांगावें, आणि शक्य असल्यास तसें वागण्यास सांगावें किंबहुना भागहि पाडावें, हें माझ्या दृष्टीनें न्यायप्राप्त व यथोचितच आहे. सुसंस्कृत समाजामध्यें सौंदर्याच्या, नीतीच्या वगैरे ज्या कल्पना शिष्ट-संमत असतात त्या,–अर्थात् त्या शिष्ट जनांच्या दृष्टीनें–मनाच्या उत्पत्तीची कोणतीहि मीमांसा स्वीकारली, तरी आदरणीयच राहाणार आणि त्या त्यांनीं आदरणीय कां मानूं नयेत, याला सबळ कारण कांहीं नाहीं.

इच्छाशक्ति [ Will ] स्वतंत्र नाहीं, ती मूलभूत द्रव्यांच्या गुणधर्मांनीं किंवा पूर्वजन्म-कर्मांनीं निबद्ध आहे असें जरी सिद्ध झालें ( सिद्ध झालेलें नाहीं; तरी पण घटकाभर सिद्ध झालें आहे असें गृहीत धरलें ), तरी नैतिक भाषा, कर्तव्य-अकर्तव्य याबद्दलचा उपदेश, व्यर्थ व अनुचित आहे असें नाहीं. सिजविक साहेबांनीं या बाबतींत आपल्या " Methods of Ethics " मध्यें जें विवेचन केलेलें आहे, तें मननीय आहे. मन हें नियमांना वश आहे म्हणून तर विशिष्ट प्रकारचें शिक्षण द्यावयाचें, संवयी लावावयाच्या, शिक्षेची दहशत घालावयाची; नियमांना तें वश नसतें तर त्यावर मात्र परिणाम होईल अशा रीतीचें शिक्षण देण्याचा, संवयी लावण्याचा, उपदेश करण्याचा किंवा दहशत घालण्याचा प्रयत्न वेडेपणाचा झाला असता, हा त्यांचा कोटिक्रम विचारणीय आहे.

" इतिहास-शास्त्र, समाज-शास्त्र, मानस-शास्त्र, इत्यादिकांच्या अध्ययनानें जात्यभिमान, देशाभिमान, वगैरे गुण आकुंचित दृष्टीचे वाटूं लागतात, " असें पूर्वपक्षी जें म्हणतो, तें एका अर्थी खरें आहे. इतिहासाला आपलाच देश सर्वांत उत्तम, आपलीच संस्कृति सगळ्यांत श्रेष्ठ, आपलाच धर्म सनातन, आपलीच ज्ञाति शुद्ध बीजाची व रक्ताची, आपल्याच देशाकडे, जातीकडे किंवा धर्माकडे सर्व जगाला सुसंस्कृत करण्याचें काम ईश्वरानें दिलेलें आहे, या व अशा कल्पना खुळचट वाटूं लागतील, यांत शंका नाहीं; पण यांत बिघडलें कुठें ? दुरभिमान गेला तर त्यांत वाईट काय आहे ? आपल्या देशांत, धर्मांत जातींत जर कांहीं खरोखरीच अभिमानास्पद गोष्टी असतील, तर त्यांबद्दल योग्य प्रमाणांत अभिमान बाळगण्याच्या आड इतिहासादि शास्त्रें येतील असें वाटत नाहीं. अभिमानास्पद गोष्टी नसल्या, तर इतिहासादि शास्त्रें उत्तेजन देऊन सांगतील कीं, " गत गोष्टींचा विचार न करतां स्वपराक्रमानें

अभिमानास्पद गोष्टी करून दाखवा, कोणतेंहि राष्ट्र पृथ्वीच्या पोटांतून एकदमच पराक्रमी किंवा सुसंस्कृत असें बाहेर पडलेलें नाहीं, तर त्या त्या देशांतील लोकांनीं प्रयत्न करून त्याला 'राष्ट्र' बनविलें व त्याचें नांव अभिमान बाळगण्यासारखें केलें."

आपली जाति किंवा आपले लोक तेवढे शुद्ध बीजाचे किंवा वीर्यशाली किंवा सर्वांत पुरातन संस्कृति असलेले, हें जर इतिहासानें सिद्ध झालें तर ठीकच; वरें, नाहीं सिद्ध झालें, तर विषाद मानून मान खालीं घालून हताश होण्याचें कारण काय? एखाद्याच्या दहा वीस हजार वर्षां पूर्वींच्या पूर्वजानें, उत्तरध्रुवाजवळ, किंवा इतर कोठें वस्ती असेल तेथें, एखाद्या रानटी स्त्रीशीं विवाह केला असला, किंवा चार पांच हजार वर्षांपूर्वीं सिंधुप्रदेशाच्या आंत-बाहेर असतांना एखाद्या शूद्रीशीं विवाह केला असला, किंवा तदनंतर विंध्य पर्वत ओलांडून आल्यावर दंडकारण्यांत वसाहत करतांना एखाद्या अनार्य स्त्रीशीं विवाह केला असला, म्हणून त्या गृहस्थानें कां उगीच विशेष विषाद मानावा? तसेंच पाहूं गेलें असतां, आपले पूर्वज वानरसदृश कोणी-तरी अज्ञात नर होते, असें डार्विन वगैरेंचा विकासवाद सांगतो; मग आपण या हीनतम योनिबद्दल शोक करावा किंवा विषाद मानीत बसावें काय? नाहीं. कारण आपले पूर्वज वानर-सदृश होते का कसे होते, हा मुख्य प्रश्न नाहीं, तर आपण आपल्या इष्टमित्रांशीं वानरोचित चेष्टा करतों कीं काय, ही मात्र महत्त्वाची गोष्ट आहे; आणि या बाबतींत जर मान खालीं घालण्याजोगी आपली स्थिति नसेल, तर आपल्या वानरसदृश योनिची क्षिति बाळगण्याचें कारण नाहीं. वानर-सदृश जातीच्या अगदीं पूर्वींच्या आपल्या पूर्वजांकडे पाहिलें, तर ते सूक्ष्मदर्शक यंत्रांतून दिसतील न दिसतील एवढे सूक्ष्म जंतु किंवा जीव-पेशी या स्वरूपांत दिसतील असें जीवशास्त्र सांगतें; पण या आपल्या मूळ योनिबद्दल आपण कोठें विषाद मानतों? याच न्यायानें आपले पूर्वज क्षत्रिय होते का ब्राह्मण होते, त्यांनीं वैश्याशीं किंवा शूद्राशीं विवाह केला होता किंवा नाहीं, हे प्रश्न विशेष महत्त्वाचे नाहींत. आपण आज वैश्य-शूद्रांप्रमाणें वागतों किंवा काय, म्हणजे त्यामध्यें विशिष्ट प्रतिकूल परिस्थितीमुळें सामान्यतः आजकाल जे दोष दिसतात तशा प्रकारचे दोष आपल्यामध्यें आहेत किंवा काय, हा मुख्य प्रश्न आहे. मी शुद्ध ब्राह्मण-बीजाचा असेन, पण मी आपल्या

विद्येची व सामर्थ्याची क्षुद्र वैश्यवृत्तीनें विक्री करीत असेन, किंवा शूद्राप्रमाणें मी गलिच्छ रीतीनें वागत असेन, तर माझ्या शुद्ध ब्राह्मणबीजाचा मीं पोकळ अभिमान बाळगण्यांत विशेष अर्थ नाहीं. बरें, माझे पूर्वज कोणत्याहि वर्णांचे असले, तरी त्यांत मला लज्जास्पद असें काय आहे? तात्पर्य, इतिहास व समाजशास्त्र हीं जातिविषयक आणि वर्णविषयक अभिमानाला काट मारतील, पण खऱ्या पौरुषाच्या, पराक्रमाच्या किंवा सद्गुणाच्या अभिवृद्धीला तीं मारक होऊं शकत नाहींत.

खऱ्या देशाभिमानाला हीं शास्त्रें पोषक नाहींत, असें पूर्वपक्षानें दाखविण्याचा जो प्रयत्न केला आहे, तो देखील चुकीचा आहे. आपलाच देश सर्वश्रेष्ठ, अशा प्रकारची भावना या शास्त्रांच्या अध्ययनानें बाधित होईल, हें मला कबूल आहे. आपण आपल्याच लोकांचें हित पाहावें, इतरांना पादाक्रांत करावें, त्यांनीं आपणांस जिंकलें असल्यास त्यांचा द्वेष करावा, अशा प्रकारच्या वृत्तीला इतिहासादि शास्त्रें उत्तेजन देणार नाहींत, हेंहि मला मान्य आहे; पण खऱ्या देशाभिमानाला अशा भावना किंवा वृत्ती आवश्यक नाहींत. तत्त्वदृष्ट्या पाहिलें असतां कोणत्याहि देशांतला सज्जन मनुष्य मला प्रिय असला पाहिजे आणि दुर्जन माझ्या देशांतला असला तरी मला तो अप्रिय झाला पाहिजे. गीतेंतला स्थितप्रज्ञ 'सर्वभूतहिते रत' असतो; केवळ 'हिंदुजनहिते रत' किंवा 'ब्राह्मणजनहिते रत' नसतो. सर्व मनुष्यजातीचें हित, हें आपलें ध्येय असलें पाहिजे. हें ध्येय देशाभिमानाशीं किंवा जात्यभिमानाशीं अत्यंत विरोधी किंवा विसंगत आहे, असें समजण्याचें कारण नाहीं. उलट शांतपणें खोल विचार केला असतां हें ध्येय मर्यादित आणि यथोचित देशाभिमानानें व जात्यभिमानानें अधिक सुसाध्य होईल, असें दिसून येईल. नीग्रो, पोर्च्युगीझ, बेल्जिअन, स्पॅनिश किंवा अमेरिकन लोक यांचें हित हिंदुस्थानांतील सामान्य मनुष्य साधणार कसा? त्याला त्यांची भाषा येत नाहीं; त्यांची विशेष माहिती नाहीं; त्यांच्या जरूरी—अडचणी काय आहेत हें ठाऊक नाहीं; बरें त्यांनाहि याची विशेष माहिती नाहीं. अशा स्थितींत या हिंदी गृहस्थानें अपरिचित परकी लोकांचें हित साधावयाचें कसें? सामान्य मनुष्याला आपल्या कुटुंबाचें रक्षण व पोषण करणेंच कठीण पडतें. त्याचें ज्ञान व त्याचें सामर्थ्य आपल्या कुटुंबाचें हित साधण्यास जेमतेम समर्थ असतें. थोडेंबहुत अधिक सामर्थ्य असल्यास, गांवां-

तील एखाद्या संस्थेचें थोडेंबहुत हित साधूं शकेल, त्याहून अधिक असल्यास गांवाचें, त्याहून अधिक असल्यास प्रान्ताचें. सबंध देशाचें हित साक्षात् साधण्याचें सामर्थ्य फारच थोड्यांमध्यें असतें. अप्रत्यक्षपणें आपल्या संस्थेचें किंवा गांवाचें हित आपल्या मतीप्रमाणें व संधि मिळेल त्याप्रमाणें साधणें हें देखील पुष्कळांना कठीण पडतें. कारण कशामध्यें हिताहित आहे हें आधीं समजत नाहीं, समजून घेण्याला फुरसत नाहीं, समजलें तरी संस्था किंवा गांव यांत आपलें तेवढें वजन नसतें, वजन असलें तरी आपलें सामर्थ्य मर्यादितच असल्यामुळें आपलें साहाय्य देखील मर्यादित स्वरूपाचेंच असतें. अशा स्थितींत सबंध प्रान्ताचें किंवा देशाचें जें सामान्य मनुष्य हित साधणार तें अप्रत्यक्षपणेंच–आपल्या गांवाचें, संस्थेचें, व कुटुंबाचें हित साधण्याचा प्रयत्न करूनच साधणार. अशा मनुष्यानें, ज्या देशाची आपणांस विशेष माहिती नाहीं, त्या देशाचें हित साधण्यास कंबर कशी बांधावी ? बरें, ज्याचें सामर्थ्य टिळक, गोखले, गांधी यांच्याप्रमाणें असेल त्यांना तरी परकी देशाचें हित साधणें शक्य असेल असें नाहीं. टिळक, गोखले, गांधी झाले तरी त्यांचें ज्ञान, त्यांची माहिती, त्यांचें वजन, त्यांचें सामर्थ्य या देशापुरतेंच बव्हंशीं असतें. ते पोर्च्युगालचें किंवा बेल्जमचें हित कसें साधणार? त्यांना त्या देशाची खरी स्थिति, त्या देशाच्या खऱ्या अडचणी, वगैरे गोष्टी ठाऊक नसतात, आणि ठाऊक आहेत असें क्षणभर गृहीत धरलें, तरी टिळक, गांधींना पोर्च्युगाल किंवा बेल्जममध्यें कोण विचारतो ? अर्थात् या थोर महात्म्यांना देखील आपलें सामर्थ्य आपल्या देशाचा आपापल्या दिशेनें व आपआपल्या कल्पनेप्रमाणें उद्धार करण्यांत खर्च करावें लागणार. परकीय लोक कमी योग्यतेचे, त्यांचा उद्धार करण्यांत पाप आहे, असें नव्हे, तर त्यांचा उद्धार करणें या थोर व्यक्तींना देखील सुसाध्य नसतें, म्हणून त्यांनीं आपलें शक्तिसर्वस्व व मतिसर्वस्व आपल्या देशाची उन्नति करण्याचे कामीं खर्च केलें तर त्यांत वावगें कांहीं नाहीं. प्रत्येक देशांतील थोर थोर माणसांनीं काय, किंवा लहानसहान माणसांनीं काय, आपआपल्या देशाची आपल्या हातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जेवढी सुधारणा होईल तेवढी करण्याचा प्रयत्न करणें, यांतच मानवजातीचें कल्याण आहे. आतां ही गोष्ट खरी कीं, वेडरबर्न, ह्यूम, सी. एफ. अँड्र्यूज, इत्यादिकांसारख्यांना परदेशाचें हित साधतां येतें व तें त्यांनीं आपल्या परीनें

साधावेंहि. पण अशी मंडळी थोडी. हे लोक टिळक, गोखले, गांधी यांहून अधिक योग्यतेचे आहेत, असें मला भासवावयाचें नाहीं. कारण खरी गोष्ट अशी आहे कीं, वेडरबर्न, ह्यूम इत्यादिकांना हिंदुस्थानचें प्रत्यक्षपणें कल्याण करण्याची सुसंधि मिळाली, तशी टिळक-गोखले इत्यादिकांची स्थिति नव्हती आणि त्याहून अधिक खोल विचार करावयाचा म्हणजे हिंदुस्थानचें हित साधण्यांतच इंग्लंडचेंहि खरें कल्याण आहे असें वेडरबर्न, ह्यूम, इत्यादिकांना व टिळक, गोखले, यांना वाटत होतें व गांधी यांना वाटत आहे. 'इंग्लंडचें खरें कल्याण' असे शब्द मी वापरले आहेत, 'इंग्लंडचा फायदा' असे शब्द मी वापरले नाहींत हें येथें ध्यानांत धरावें. खऱ्या कल्याणाच्या म्हणजे निःश्रेयसाच्या दृष्टीनें पाहतां हिंदुस्थानचें कल्याण म्हणजे इंग्लंडचेंहि कल्याण होय, व इंग्लंडचें कल्याण म्हणजे हिंदुस्थानचेंहि कल्याण. आर्थिक किंवा व्यावहारिक फायद्याच्या बाबतींत दोन व्यक्तींचा किंवा देशांचा विरोध होऊं शकतो; निःश्रेयसाचे बाबतींत केव्हांहि अविरोधच असतो. महात्म्यांना सर्व लोक व सर्व देश सारखेच असतात.

“ अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम् ॥ ’

महात्मे हे 'सर्वभूतहिते रत' असतात, असें मघांशीं सांगितलेंच. या दृष्टीनें पाहतां आकुंचित 'देशाभिमाना'ला अवकाश नसला, तथापि परकी लोकांचें किंवा देशांचें कल्याण साधण्याची प्रत्यक्ष संधि थोर थोर महात्म्यांना देखील मिळत नाहीं, परदेशांची त्यांना विशेष माहिती नसते, तेथें त्यांचें वजन नसतें, इत्यादि गोष्टींचा विचार करतां ज्यानें त्यानें आपल्या देशाची उन्नति करण्याचा प्रयत्न करून, त्या द्वारेंच इतर देशांची अप्रत्यक्ष उन्नति होईल तेवढ्यावरच समाधान मानून राहणें प्राप्त आहे. सामान्य माणसाला तर परकी लोकांबद्दल कांहींच माहिती नसते आणि त्याचें मन त्यांविषयीं स्नेहार्द्र तर मुळींच नसतें. अर्थात् त्यांनीं भलती उडी मारण्याचा प्रयत्न न करतां, आपल्या सामर्थ्यानुरूप आपल्या कुटुंबाची, जातीची, संस्थेची, गांवाची वगैरे उन्नति करण्याचा प्रयत्न करावा; यांतच त्यांचें, त्यांच्या जातीचें, देशाचें आणि जगाचेंहि कल्याण आहे.

इतिहास, समाजशास्त्र इत्यादि शास्त्रें वाचलीं असतां, मनुष्याचें सामर्थ्य मर्यादित आहे, राज्यें उदयास येतात व अस्तास जातात–खाल्डिअन, असिरि-

अन संस्कृतीप्रमाणें संस्कृतीच्या संस्कृती नामशेष होतात, इत्यादि गोष्टी कळून मनुष्य निरुत्साह होईल असें पूर्वपक्षाचें म्हणणें होतें तें थोडेंसें खरें आहे. कारण असा परिणाम कित्येकांच्या मनावर होतो यांत शंका नाहीं. पण असा परिणाम झालाच पाहिजे, विचारी माणसांच्याहि मनावर न्यायतः असाच परिणाम होणार, हें मात्र खोटें. समाजाची उन्नति एका दिवसांत होऊं शकत नाहीं, एका मनुष्याची देखील सुधारणा एका दिवसांत एकदम होऊं शकत नाहीं. बरें, मनुष्याची किंवा समाजाची सुधारणा झाली, तरी मनुष्याप्रमाणें समाजालाहि मरण येण्याचा संभव असतो, इत्यादि गोष्टी समाजशास्त्रावरून कळल्या, तरी शक्य तेवढी सुधारणा करण्याचा प्रयत्न करूं नये, असें ठरत नाहीं; समाजाची सुधारणा हळूहळू होते, अनेक लोकांनीं अनेक रीतींनीं अनेक वर्षें सतत प्रयत्न करावा लागतो, या तत्त्वाचा निष्कर्ष, न्यायतः पाहिलें तर असाच निघतो कीं, प्रत्येकानें आपल्या परीनें आपल्या प्रयत्नांची शिकस्त करावी. एक वर्षात स्वराज्य मिळविण्याची आशा समाजशास्त्र नष्ट करील, पण स्वराज्य मिळविण्याची खटपट करूं नये असें कोणतें समाजशास्त्र शिकवील? भलत्या आशा व आकांक्षा यांना इतिहासादि शास्त्रांकडून पायबंद पडेल, पण यांत वाईट कांहींच नाहीं. उलट आशा-आकांक्षा प्रथमपासूनच शक्य कोटींतल्या ठेवण्यास या शास्त्रांनीं शिकविल्यामुळें निराशेचें दुःख व त्यामुळें येणारा निरुत्साह या आपत्ती टळतील. देश, समाज, संस्कृति यांमध्यें हळूहळू फरक होत जातो व कालांतरानें मूळ स्थिति अगदीं बदलून जाते आणि कित्येक वेळां देश, संस्कृति वगैरेंना मरण येतें, ही गोष्ट जरी इतिहासानें शिकविली तरी देखील आपण आपल्या देशाच्या वगैरे उन्नतीचा प्रयत्न करूं नये, असें अनुमान यावरून कसें निघतें? शंभर वर्षांच्या आंत आपण मरणार ही गोष्ट आपणास ठाऊक आहे तरी आपण हरतऱ्हेचे स्वसुधारणेचे प्रयत्न करतोंच ना? अमक्या अमक्या कारणानें अमुक अवस्थेंत मरण येतें, ही गोष्ट कळली तर नैराश्य तर येऊं नयेच, उलट हीं कारणें शक्य तेवढीं टाळण्याविषयीं दक्षता बाळगावी, असाच त्यावरून बोध घ्यावयाचा असतो. दुसरी गोष्ट अशी कीं, उद्यां किंवा एका घटकेनंतर किंवा एक मिनिटानंतर मला फांशी देणार, हें जरी मला किंवा तुम्हांला निश्चित कळलें, तरी आपण मुद्दाम घाणींत बसूं का? मुद्दाम अभद्र भाषण करूं का? मुद्दाम सदभिरुचि सोडूं का? नाहीं.

एका क्षणानंतर मी मरणार असलों किंवा तुम्ही मरणार असलां, तरी आपण कोणी घाणींत बसावें किंवा अद्वातद्वा बोलावें किंवा भरमसाट वागावें हें न्यायतः प्राप्त नाहीं व आपण कोणी असें वागणारहि नाहीं. त्याचप्रमाणें देश, समाज, संस्कृति यांचा पुढें केव्हांतरी अधःपात होणार असला तरी आजचें आपलें कर्तव्य आपण करूं नये असें होत नाहीं. उलट आपण ती आपत्ति शक्य असल्यास टाळण्याचा आटोकाट यत्न केला पाहिजे, हेंच खरें अनुमान त्यावरून निघतें. बरें पूर्वी अनेक देशांचा, समाजांचा व संस्कृतींचा नाश झाला म्हणून पुढेंहि असाच होणार, हा सिद्धांतहि निश्चित नाहीं. उलट समाजाच्या वगैरे अधःपाताचीं कारणें अधिकाधिक कळूं लागल्यामुळें ही आपत्ति टाळणें पुढेंमागें शक्य होईल, अशी आशा बाळगण्यास जागा आहे. कसेंहि पाहिलें तरी, इतिहासादि शास्त्रें नैराश्य किंवा निरुत्साह उत्पन्न करतील, असें मानण्यास तर्कदृष्ट्या मुळींच आधार नाहीं.

वैवाहिक व इतर चालीरीतींसंबंधीं भिन्न समाजांतील भिन्न प्रकार समजल्यामुळें या चालीरीतींचें बंधनकारकत्व शिथिल होईल, त्याबद्दल आदर कमी होईल व एकंदरींत समाजशास्त्रादि शास्त्रांच्या अध्ययनानें नैतिक सदभिरुचीचे निर्णय अनिश्चित व धरसोडीचे होतील, आणि नीतिनियम पाळलेच पाहिजेत असा दंडक राहणार नाहीं, सगळीकडे शैथिल्य आणि स्वेच्छाचारित्व यांचा पगडा बसेल, ही भीतिदेखील चुकीची आहे. भिन्न देशांतल्या भिन्न चालीरीती कळल्या म्हणजे आपल्या चालीरीतींत जर कांहीं दोष असतील तर ते दिसून येतील, व या अर्थानें त्यांचें बंधकत्व व मान्यत्व हीं कमी होतील हें मला कबूल आहे. पण भिन्न चालीरीतींचा वगैरे समाजशास्त्र, नीतिशास्त्र इत्यादिकांच्या आधारें सांगोपांग व साधक-बाधक ऊहापोह करून, ज्या चालीरीती उत्तम ठरतील त्यांचें उत्तमत्व, केव्हांहि अबाधित राहणार. खुंटा हालवून जसा बळकट होतो त्याप्रमाणें आपल्या चालीरीतींची इतरांच्या चालीरीतींशीं तुलना करून आणि हरतऱ्हेचा तद्विषयक ऊहापोह करून, ज्या चालीरीती आपण उत्तम ठरवूं त्याबद्दलची आपली निष्ठा दृढ होईल. अज्ञानजन्य श्रद्धा लहानसा धक्का लागल्याबरोबर डळमळते किंवा ढांसळते, पण ज्ञानाचा आणि विचाराचा आधार असलेली निष्ठा स्थिर व अचल असते. अर्थात् शास्त्रें हीं खऱ्या नीतिमत्तेला

८५५५

स्थैर्य देतात, आकुंचित दृष्टीच्या नैतिक कल्पनांना मात्र त्यांपासून कंप सुटतो व त्यांचें भय वाटतें !

लहान मुलांवर वगैरे अलीकडे मानसशास्त्रज्ञांकडून जे प्रयोग होत आहेत त्यांतून निष्पन्न झालेल्या तत्त्वांवरून मुलांचें हंसणें, रुसणें, बोलणें, चालणें वगैरे सर्व विशिष्ट कारणांचीं विशिष्ट कार्यें होत असें कळूं लागून, माता-पित्यांना आज आपल्या अपत्यांबद्दल जें कौतुक वाटतें व जो प्रेमाचा पान्हा फुटतो तो फुटणार नाहीं, अशा प्रकारचें पूर्वपक्षानें जें प्रतिपादन केलें होतें तें कसें सदोष आहे हें थोडक्यांत दाखवून मी पुढील मुद्द्याकडे वळणार आहें. ज्ञान जसजसें वाढत जाईल, तसतशा बाल्याविषयींच्या ज्या कांहीं भ्रामक कल्पना आहेत त्या जाऊं लागतील, हें उघडच आहे. 'लहानपण मोठें रम्य आहे' 'रम्य तें बालपण देईं देवा,' इत्यादि कल्पना ज्ञानाच्या प्रकाशापुढें टिकावयाच्या नाहींत. लहानपण आपणांला रम्य वाटतें,—लहान मुलांना तसें वाटत नाहीं, आणि आपणांला तरी काय, ' रम्य तें बालपण देइं देवा ' हें बोलण्यापुरतें व गाण्यापुरतेंच ठीक आहे; खरोखरीच मोठेपण सोडून लहानपण स्वीकारण्याचा प्रसंग आला, तर 'दुसरें बालपण' म्हणजे म्हातारपण जितकें आपणांस नकोसें वाटतें, तितकेंच पहिलेंहि वाटेल यांत शंका नाहीं! वर्ड्स्वर्थला आत्म्याच्या अमरत्वाला कांहीं खुणा लहानपणींच्या आठवणींत दिसल्या व लहान मुलें हीं ईश्वराच्या घरून नुकतींच आल्यामुळें ईश्वराच्या घरच्या-दिव्य लोकांच्या-त्यांच्या आठवणी ताज्या असतात, असें वाटलें; पण कविकल्पना म्हणून हीं मतें चांगलीं आहेत; तत्त्व-दृष्ट्या त्यांची किंमत बेताचीच ! आईला आपलें चार महिन्यांचें मूल हंसलेलें पाहून असें वाटतें कीं, 'गुलामाला माझं बोलणं सगळं समजतं,' आणि ती त्याचे मटामट मुके घेते. पण त्याच्या हंसण्याचा बहुधा आईच्या बोलण्याशीं कांहींएक संबंध नसतो, दुसऱ्या कांहींतरी कारणानें तें स्मित उत्पन्न झालेलें असतें ! आणि त्या हंसण्यामध्येंहि विसंगतिदर्शन वगैरे कांहीं नसतें, तर तें अर्धवट यांत्रिक असतें ! लहान मुलें आपणांला जितकीं चांगलीं वाटतात तितकीं तीं नसतात. त्यांना आपण निःस्वार्थी, निष्पाप, गरीब, सालस समजतों, पण हें बरेंचसें भ्रममूलक आहे. त्यांचें मलमूत्रांत लोळणें हें जसें वेदान्तज्ञानाचें लक्षण नव्हे, तसेंच त्यांचें रुपयांकडे वगैरे दुर्लक्ष असणें हें निःस्वार्थीपणाचें लक्षण नव्हे. लहान मुलांमध्येंहि आपल्याप्रमाणेंच बऱ्यावाईट प्रवृत्ती असतात, तीं स्वार्थी

असतात, इत्यादि गोष्टी कळूं लागल्यावर, लहान मुलांभोंवतीं जो एक आपल्या कल्पनेनें अनेकरंगी सुरम्य परिवेष निर्माण केला असतो, तो सूर्यकिरणांमुळें धुकें जसें नष्ट होतें त्याप्रमाणें नष्ट होऊं लागतो. इतर अनेक गोष्टींबद्दल मुलांचें आपण कौतुक करतों, पण यांपैकीं कांहीं गोष्टी प्रेममोहमूलक होत, असें मानसशास्त्रावरून कळून येईल. या सगळ्या गोष्टी मी कबूल करतों, पण मानसशास्त्रामुळें प्रेमाचेंच निर्मूलन होईल, मुलांविषयींच्या आपल्या सर्व कोमल भावना ज्ञानाग्नींत होरपळून जातील आणि मुलांविषयींची आपली कर्तव्यबुद्धि शिथिल होईल, असें मानण्यास कारण नाहीं. खरा प्रकार असा आहे कीं, मानसशास्त्राच्या अध्ययनानें बालमनाच्या विकासाची दिशा, तद्विषयक नियम, विकृतीचीं कारणें, संवयींचें महत्त्व, चांगल्या उदाहरणांची आवश्यकता, शिस्त केव्हां, कशी व कोणीं लावावी याविषयींच्या यथार्थ कल्पना, या सर्व गोष्टी कळून मुलांबद्दल आपण अधिक दक्षतेनें वागूं ! आईचें 'आंधळें खुळें मन' जसें बालकाकडे पाहतें, तसेंच केवळ आपण बाल-मानसशास्त्र शिकल्यावर त्याकडे पाहणार नाहीं. पण आईच्या प्रेमाचा झरा त्यामुळें आटेल असेंहि मानण्याचें कारण नाहीं; उलट आईला आपली जबाबदारी अधिक वाटूं लागेल, आपलें कर्तव्य काय हें अधिक यथार्थत्वानें कळूं लागेल आणि एकंदरींत मुलांच्या शिक्षणाविषयीं ती अधिक दक्ष होईल. 'या दक्षतेबरोबर रुक्षताहि येण्याचा संभव नाहीं काय ?' असें मला कोणी येथें विचारील; पण मला तर वाटतें कीं, रुक्षतेऐवजीं बालसंगोपनाच्या व शिक्षणाच्या बाबतींत शास्त्राध्ययनानें अधिक जिज्ञासा-विषय, अधिक आस्था-विषय, अधिक कौतुक-विषय, (interests) उत्पन्न होतील, अधिक गोष्टी मनोरंजन-विषय बनतील, अधिक गोष्टींकडे लक्ष लागेल, आणि मूल हें एक आपल्याजवळ ठेवलेली मोठी मौल्यवान् ठेव आहे, हा एक Trust आहे, याकडे यत्किंचित् दुर्लक्ष करणें पाप आहे, अशी अधिक तीव्र जाणीव उत्पन्न होईल. 'मूल हें स्वर्गातून ईश्वराच्या घरून आलें आहे,' ही वर्डस्वर्थची कल्पना नष्ट झाली, तरी तिच्याऐवजीं मुलाचा भविष्यकाळ उज्वल करणें, त्यामध्यें ईश्वरी गुण उत्पन्न करणें हें आपल्या हातांत आहे ही भावना तेथें अधिक जागृत होईल.

## निरपेक्ष सात्त्विक प्रेम



श्रीगणेशाय नमः । धौम्यमुनींनीं दीर्घ श्वास टाकून पुनः म्हटलें 'हिरण्यगर्भराजा, या गोष्टीला सात आठ वर्षें होऊन गेलीं. मध्यन्तरींची हकीकत पाल्हाळपणें मी सांगत नाहीं. कारण त्यांत सांगण्यासारखें विशेष कांहीं नाहीं. अरण्यांतील गुहेंत माझी तपश्चर्या चालू होती. इकडे आश्रमांत काय गोष्टी झाल्या आहेत, याची मला कल्पनाहि नव्हती. 'दिङ्नागराजा मरण पावल्याशिवाय मी जिवंत असल्याची वार्ता कोणास कळूं देणार नाहीं' असें मातंगांना दिलेलें वचन मी अक्षरशः पाळलें. त्या दुष्ट राजाच्या मरणघटकेची मी वाट पाहत होतों. अखेर करतां करतां आठ वर्षांनंतर तो राजा मृत्यु पावल्याची वार्ता मला समजली. लगेच मी ती गुहा व ती तपश्चर्या सोडली, व १५ दिवसांच्या आंत आश्रमाजवळ आलों. आश्रमाच्या आसपासचे डोंगर, तेथील वृक्ष, तेथील विहीर, फार काय, तेथील डबकीं सुद्धां पाहून मला अवर्णनीय आनंद झाला. पण मी प्रिय पत्नीच्या व प्रिय मित्राच्या दर्शनास अत्युत्सुक झालों असल्यामुळें वरील गोष्टींकडे मीं विशेष लक्ष दिलें नाहीं. अखेर संध्याकाळच्या सुमारास माझें उटज व मीं लावलेले अगस्त्याचे, बकुळीचे वगैरे वृक्ष दिसूं लागले. हे जड वृक्ष पाहून देखील मला किती आनंद झाला याचें नारदा, मी वर्णन करीत नाहीं. कारण नारदा, हा आनंद फार वेळ टिकला नाहीं. मी आपल्या उटजाजवळ जातों तों एक तीन चार वर्षांची मुलगी उटजाबाहेरील अल्पशा पुष्पोद्यानांत खेळत आहे, असें मी पाहिलें. मला येतांना पाहून चकित हरिणीप्रमाणें ती माझ्याकडे पहात उभी राहिली. पुष्पोद्यानाचें द्वार उघडण्यास तिला मी सांगितलें, पण ती घाबरून गेलेली दिसली. ती आपल्या जागेवरच स्वस्थ उभी राहिली. तिच्या मुखाकडे पाहून

मला सुलोचनेच्या बालपणाची आठवण झाली व 'तिची तर ही मुलगी नसेल ना ?' अशी शंका आली. ही कल्पना आल्याबरोबर माझें धैर्य खचलें, व पाय गळले; सर्व अंगाला घाम सुटला. घाबरत घाबरत मी त्या मुलीला म्हटलें, 'मुली, घाबरूं नकोस, तुझें नांव काय ? तूं कोणाची मुलगी ?'

'आईची.' म्हणून तिनें उत्तर दिलें. 'आईची' या उत्तरानें मला त्या स्थितींतहि जरा हंसूं आलें. पुनः मी तिला म्हटलें, 'मुली, तूं आईची खरी; पण तुझ्या आईचें नांव ?'

'आईचें नांव, आई.' ती म्हणाली. या उत्तरानें मला अधिकच हंसूं आलें; पण तें क्षणिकच होतें. तिच्या मुखाकडे निरखून पाहतां तिची आई कोण असावी, याची मला चांगली कल्पना आली. कदाचित् दुसऱ्या कोणाची ती मुलगी असेल, अशी आशाजनक कल्पनाहि आली. इतक्यांत त्या उटजाजवळून एक लहानसा मुलगा जात आहे असें पाहून मी त्याला विचारलें 'बाळा, हें उटज कोणाचें व येथें कोण रहातो ?'

'आमचे गुरु गभस्तिगति व त्यांची पत्नी सुलोचनामाता येथें राहतात.' असें तो म्हणाला. हे शब्द मी ऐकले असतील नसतील तोंच माझी पत्नी—माझी नव्हे, गभस्तिगतीची पत्नी—दीड दोन वर्षांच्या एका लहान मुलाला कडेवर घेऊन देहलीवरील दीप लावण्याकरितां आली. तिला तसें पाहिलें मात्र; मला वेड लागल्यासारखें होऊन मीं तेथून जो धांवूं लागलों तो कुलपतींच्या आश्रमापाशीं गेलों.

त्यांचें दर्शन झाल्याबरोबर मी त्यांचे चरण धरले. त्यांनीं मला पाहिल्यावर अत्यन्त आश्चर्य व्यक्त केलें. मातंगांनीं मला कोणतें वचन घेऊन जिवंत ठेवलें वगैरे सर्व गोष्टींचा उलगडा केल्यावर ते मला म्हणाले, "धौम्य, तुम्हीं आपल्या उटजापाशीं जो प्रकार पाहिलात त्याचें तुम्हांला आश्चर्य वाटलें असेल व तुम्हांला रागहि आला असेल."

मी कांहींच बोललों नाहीं. त्यांचे 'तुम्हांला' हे बहुमानदर्शक शब्द मला कांहीं बरे वाटले नाहींत, आणि मी तसें बोलूनहि दाखविलें.

'बाल धौम्य,' ते म्हणाले, 'तूं विवाह केलास तो आपल्या सुखासाठीं का तिच्या सुखासाठीं ?'

'बाल धौम्य' हें एकेरी संबोधन मला किती तरी सुखदायक झालें! पण, त्यांना उत्तरादाखल मीं कांहीं बोललों नाहीं. माझें मन त्या वेळीं इतकें गोंधळलें होतें कीं, त्या स्थितींत कांहीं बोलणेंच शक्य नव्हतें. त्या स्थितींत मी काय बोलणार ?

'धौम्य, शांत हो.' ते सौम्यतेनें म्हणाले, 'तूं अरण्यांत राहून आठ वर्षें तपश्चर्या केलीस, तरी विषयसुखाची इच्छा तुला आहेच ना ? विषयसुखांत सुख आहे, असें तुला अद्यापि वाटतें काय ?'

'नाहीं. पण माझी पत्नी—'

'तिनें पुनः विवाह केला, याच्यांत तिचा दोष नाहीं. मींच तिला ही गोष्ट करण्यास सांगितलें.'

'आपण या गोष्टीला कशी अनुमति दिलीत ?'

'धौम्य, तुला मी सर्व सांगतों. शांतपणें विचार कर. सुलोचना ही सच्छील आहे, परंतु तिचें गभस्तिगतीवर लहानपणापासून प्रेम होतें, व राजस प्रेमानें अंध होऊन व पितामहाची इच्छा ही 'आज्ञा' मानून तुझ्याशीं विवाह केल्यानंतर हें प्रेम सुप्त झालें. तुझ्या निधनाची वार्ता ऐकल्यानंतरहि तिनें विवेक करून हें प्रेम कांहीं काळ सुप्त ठेवलें. पण, धौम्य, कांहीं वर्षांनंतर यौवनानें व या प्रेमानें फार उचल केली. मनोनियमन करण्यासाठीं तिनें हर प्रयत्न करून पाहिले. परंतु गभस्तिगतीची मूर्ति तिला जळीं, काष्ठीं, पाषाणीं जेव्हां दिसूं लागली, व तिचा निद्राभंग होऊन नित्य धर्माचरणाकडेहि तिचें जेव्हां लक्ष लागेनासें झालें, तेव्हां मनोनिग्रह करणें अशक्य वाटून तिनें प्राणत्याग करण्याचें योजिलें. मला ही गोष्ट कळल्यावर मीं तिचें निवारण केलें व प्राणत्याग करण्यापेक्षां त्याच्याशीं विवाहच केलेला बरा, असा तिला उपदेश केला. धौम्य, वासना जिवंत असतां, केवळ देहनाश केल्यानें आत्मशुद्धि होत नाहीं, हें तूं जाणत आहेस. तिची आत्मशुद्धि तुला जर प्रिय असेल, तर तिला तूं दोष देऊं नये. तुझ्याशीं एकदां तिनें विवाह केला, म्हणून तिनें आपला देहनाशच नव्हे तर आत्मनाशहि करून घ्यावा काय ?'

'पण अन्य पति केल्यानें आत्मनाश होत नाहीं का ?' मीं जरा रागानें म्हटलें.

'नाहीं.' ते आवेशानें म्हणाले. 'या सर्व गोष्टी सारासार विचारानें पाहिल्या पाहिजेत. धौम्य, तुझें मातापित्यांवर प्रेम होतें कीं नाहीं? जर होतें तर मग ते निधन पावल्यावरहि तूं आपल्या पत्नीसमवेत सुखोपभोग कां घेत होतास? मातापिता मरण पावले म्हणून सर्व—सुखसंन्यास तूं कां केला नाहींस? मी तुला दोष देत नाहीं; पण माझें तुला एवढेंच सांगणें आहे कीं, मानवमात्राची सुखप्रवृत्ति कांहीं काळ दुर्निवार आहे. प्रेमाचें एक माणूस निधन पावलें, म्हणून सर्वदा दुःखी रहाण्यास एखाद्याला सांगणें असमंजसपणाचें आहे. आपल्या मागें राहिलेल्या माणसांनीं आपल्याकरितां जन्मभर दुःखी रहावें, अशी त्या मृत माणसाची सुद्धां इच्छा नसते. मरतांना मातेला असें का वाटत असतें कीं, आपल्या मुलांनीं आपल्याकरितां आजन्म शोक करीत रहावें? मरतांना पत्नीला असें का वाटत असतें कीं, आपल्या पतीनें सर्व जन्म आपल्याविषयीं शोक करण्यांत घालवावा? मग पतीनें तरी अशी इच्छा कां धरावी? पत्नीला सुख व्हावें, तिची आत्मोन्नति व्हावी, अशी जर पतीची इच्छा असेल, तर आपण मरण पावल्यावरहि आपल्या अल्पवयस्क पत्नीनें त्या वयांतच सर्वसंगपरित्याग करावा असें दयार्द्र अंतःकरणाच्या विवेकी पतीस तरी वाटूं नये.'

'पुनः विवाह केल्यानें तिला सुखप्राप्ति होईल; पण तिची आत्मोन्नति होईल असें मला वाटत नाहीं.' मी म्हटलें.

'आत्मोन्नतीहि होईल.' ते आवेशानें म्हणाले, "अन्य पति केल्यानें पातिव्रत्यभंगाचा दोष प्रथमदर्शनीं येतो हें मला ठाऊक आहे; पण कित्येक अबलांचें मन त्यांच्या स्वाधीन नसतें. त्यांनीं किती केलें तरी प्रबल व गीतेंत म्हटल्याप्रमाणें 'प्रमाथि' असलेलीं इन्द्रियें त्यांचें मन विकारवश करतात. विवेकानें त्या आपल्या कृतींचें नियमन करूं शकतात; पण मनाचें नियमन करणें अत्यंत दुर्घट. त्या कर्मानें शुद्ध राहूं शकतात; पण मनांत त्यांना विवाहेच्छा होतेच. जन्मभर त्यांचें शरीर शुद्ध, पण मन पापी असतें, मनाची पापवासनेकडे ओढ अनावर वाहूं लागली म्हणजे खुशाल पापें करावींत, असें मी म्हणत नाहीं; आणि कोण म्हणेल? पण 'पाप' कोणतें व कोणतें नाहीं, हें पाहिलें पाहिजे. पुनर्विवाह हा नित्य पापात्मक आहे असें तुला वाटतें काय? प्रथमविवाह ज्या कारणांकरितां शुद्ध, पवित्र व आत्मोन्नतिकारक वाटतो तीं सर्व कारणें उपस्थित असतां व 'पूर्वी एकदां विवाह केला होता व आपण

आतां विधवा आहोंत या जाणिवेशिवाय परिस्थितींत महत्त्वाचा फरक नसतां पुनर्विवाह अशुद्ध, अपवित्र व अधःपातकारक कां मानण्यांत यावा हें मला समजत नाहीं.'

'तर्कदृष्ट्या तुमचें म्हणणें बरोबर आहे.' मी उत्तर दिलें, 'पण भावना म्हणून कांहीं पदार्थ आहे किंवा नाहीं?'

'भावनांना मी महत्त्व देतों.' कुलपति म्हणाले, 'पण भावना कशा उत्पन्न होतात, त्यांना केव्हां किती महत्त्व द्यावें, याचाहि विचार केला पाहिजे. व असा विचार करतां सुलोचनेच्या सारख्या परिस्थितींत पुनर्विवाह हा व्यक्तीच्या व समाजाच्या उन्नतीला प्रतिकूल नसून अनुकूल आहे असें माझें मत आहे.'

'अन्य-पति केल्यानें आत्मोन्नति होते, असें का आपलें म्हणणें?' मी जरा उपरोधिक स्वरानें म्हटलें.

'होय.' ते म्हणाले, 'क्षुद्र सुखाविषयीं खरें वैराग्य प्राप्त होऊन सर्व जगताकडे समतेनें व प्रेमदृष्टीनें पाहणें व तदुन्नतीकरितां उत्साहपूर्वक अहर्निश प्रयत्न करणें याचेंच नांव आत्मोन्नति. मनांत अहर्निश सुखोपभोगाचे विचार चालले असून देहदृष्ट्या स्वीकारलेलें वैराग्य खरें वैराग्य नव्हे. सर्व विश्व ज्याला कुटुंबाप्रमाणें वाटूं लागलें, व सर्व भूतांच्या ठायीं समदृष्टीनें व प्रेमदृष्टीनें जो पाहूं शकेल, त्याचेंच खरें वैराग्य. ही स्थिति प्राप्त होण्याचे अनेक मार्ग आहेत. विवाह वगैरे न करतां संन्यस्त वृत्तीनें राहणें, हा एक मार्ग आहे. पण हा मार्ग फार कठीण आहे. हा कंटकमय व मोहगर्ता-मय आहे. या मार्गानें जाऊन यशःप्राप्ति करून घेणारे साधु किंवा साध्वी धन्य होत, यांत शंका नाहीं. पण याशिवाय सुसाध्य एक मार्ग आहे. ज्याच्या सद्गुणांवर आपलें सात्त्विक प्रेम जडलें आहे, ज्याच्या समागमांत आपणांस पवित्र विचार सुचतात, ज्याचें उदार अंतःकरण आपणांसहि उदार होण्यास प्रेमानें शिकवितें, ज्याची निःस्वार्थपरहितबुद्धि आपल्या स्वार्थबुद्धीस लाजविते, ज्याचें ज्ञान आपलें अज्ञानपटल दूर करतें, ज्याची धर्मप्रवृत्ति आपल्या उच्छृंखल मनास आवरून धरण्यास सांगते, ज्याचे परहितार्थ अहर्निश चाललेले उत्साहपूर्ण प्रयत्न आपणांसहि तसें करण्यास प्रवृत्त करतात, ज्याची परसुखानें आनंदित होणारी सात्त्विक वृत्ति आपणांस या उच्चतम आनंदाची गोडी लावते, अशा

प्रेमपूर्ण सात्त्विक पुरुषाशीं विवाह करण्याचें एखाद्या कोमल स्वभावाच्या अज्ञान अबलेनें मनांत आणलें, तर तिला पापिणी म्हणण्यास मी तयार नाहीं.'

'तात्त्विकदृष्ट्या मला वाद करावयाचा नाहीं.' मीं शांत होऊन म्हटलें, 'आपण म्हणतां हें सर्व खरें असेल; पण माझें अद्यापि पूर्ण समाधान होत नाहीं.'

'होईल, कालान्तरानें तुझेंहि समाधान होईल.' कुलपति म्हणाले, 'धौम्य, ईश्वरी नेमानेम फार विलक्षण आहेत. मनुष्य मात्र 'माझें' धन, 'माझी भार्या, इत्यादि गोष्टींचा वृथाभिमान बाळगून स्वतःस उगीच दुःखी करून घेत असतो. मनुष्य आज आहे नि उद्यां नाहीं. 'माझें गृह,' 'माझी पत्नी,' असें म्हणण्यांत अर्थ काय ? सुलोचना ही तुझ्या सुखाकरितां का ईश्वरानें निर्माण केली आहे ? तिच्या आत्म्याला स्वतंत्र अस्तित्व नाहीं का ? धौम्य, पूर्वीं गभस्तिगतीनें तुझ्याकरितां सुलोचनेचा नाद सोडून दिला. त्यानें हा प्रेमत्याग त्या तरुण वयांत केला. तूं आतां तपश्चर्या केली आहेस. या वयांत तूं सुलोचनेवरचा अधिकार सोडण्यास तयार झाला नाहींस, तर तुझें मत अनुदार व क्षुद्र आहे, असें मी म्हणेन. सुलोचनेला तूं जर आतां दुःख दिलेंस तर सुलोचनेवरील तुझी प्रीति सात्त्विक नव्हती, ती स्वसुखार्थ होती, असेंच मी म्हणेन. '**न वाऽऽरे जायायाः कामाय जाया प्रिया भवति । आत्मनस्तु कामाय जाया प्रिया भवति ।**' हें उपनिषदांतील वाक्यच अखेर खरें म्हणावयाचें ना ? धौम्य, तूं सुद्धां या वाक्याला अपवादभूत होत नाहींस ना ? जगांत उच्च व निरपेक्ष प्रेम मुळींच नाहीं, असेंच ना म्हणावयाचें ?'

'गुरुजी, मी सुलोचनेला दर्शन देऊन तिला दुःख देणार नाहीं व गभस्तिगतीच्याहि सुखांत मी माती कालवूं इच्छीत नाहीं. त्या दोघांनीं सुखांत नांदावें हीच माझी इच्छा आहे. क्षुद्र अहंकार मीं आजपासून सोडला. जगांत अहेतुक उच्च सात्त्विक प्रेम आहे, हें मी आज सिद्ध करून दाखविणार. आपल्या उदात्त उपदेशास व उदार उदाहरणास अनुरूप असेंच मी चरित्र ठेवीन.'

प्रो. फडके यांनीं साहित्याचे दोन प्रकार मानिले आहेत. एक शिकविणारें साहित्य आणि दुसरें रिझविणारें साहित्य. शिकविणारें साहित्य रिझविणारें होऊं शकेल. उदाहरणार्थ मेकॉलेचे निबंध, विष्णुशास्त्री चिपळुणकरांची निबंध-माला, शिवरामपंत परांजपे यांचे कांहीं निबंध, इत्यादि. त्याचप्रमाणें रिझ-विणाऱ्या साहित्याला शिकविण्याचें वावडें नाहीं, त्यानें शिकविलें तर तें पाप आहे असें प्रो. फडके कधींहि म्हणाले नव्हते आणि म्हणत नाहींत. 'कले-करितां कला' असें ज्या वेळीं ते म्हणतात त्या वेळीं त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ एवढाच असतो कीं कलावन्तानें कलाकृति करतांना आपल्या कलेचे नियम आपण पाळतों किंवा नाहीं आणि आपली कृति सुंदर होते किंवा नाहीं याकडे मुख्यतः लक्ष द्यावें. आणि यांत गैर काय आहे ? साधीं घरगुती उदाहरणें घेऊन बोलावयाचें म्हणजे टेनिस खेळणाऱ्यानें टेनिसचे नियम सांभाळून डाव कसा जिंकतां येईल इकडे लक्ष द्यावें. प्रतिपक्षाचा पराभव झाला तर त्याला वाईट वाटेल कीं काय, त्याला हूल दाखवून चेंडू दुसरीकडे मारणें हें पाप आहे कीं काय, असल्या गोष्टींचा विचार करूं नये हें म्हणणें सरळ आहे. जेवतांना अन्न स्वच्छ, रुचकर, पचण्यासारखें आणि बलवर्धक आहे कीं नाहीं तें पाहावें, इतर गोष्टींचा फारसा विचार करूं नये, यांत गैर असें फारसें कांहीं नाहीं. तसेंच कलावन्तानेंहि आपल्या कलेच्या दृष्टीनें विचार करावा; इतर असंबद्ध विचारांच्या भोवऱ्यांत सांपडूं नये, हें प्रा. फडक्यांचें म्हणणें हिशेबी आहे. गुलाबाचें चित्र पाहिल्यावर त्यापासून कांहीं बोध मिळत नाहीं अशी कोणी तक्रार करतो काय ? बरें, एखाद्या सापाचें, वाघाचें किंवा गाढवाचें हुबे-हूब चित्र काढलें तर त्यावरहि कोणी आक्षेप घेत नाहीं. एखाद्या नग्न स्त्रीचें चित्र काढलें तर मात्र वादाचें वादळ उठतें. साहित्यामध्यें देखील असेंच

आहे. एकाद्या गद्यलेखकानें किंवा कवीनें वनश्रीचें किंवा राजवाड्याचें किंवा एखाद्या गरीबाच्या झोंपडीचें चांगलें चटकदार वर्णन केलें तर त्यावेळीं कोणी असा प्रश्न काढीत नाहीं कीं या वर्णनापासून काय बोध घ्यायचा ? पण रूढ कल्पनांना, नीतिनियमांना, चालीरीतींना धक्का देणारें वर्णन कितीहि चांगलें असलें कीं,—किंबहुना चांगलें असतें म्हणूनच-वाद निघतो कीं असलें लिखाण योग्य कीं अयोग्य ?

या विषयासंबंधीं माझें मत दहापंधरा मिनिटांत सांगायचें आहे म्हणून मी असें म्हणेन कीं 'कलेकरितां कला' हें प्रमेय मला सामान्यतः मान्य आहे. 'सामान्यतः' या शब्दावर मीं जोर देत आहें. कारण मी या प्रमेयाला कांहीं अपवादात्मक परिस्थितींत थोडीशी मर्यादा आणि मुरड घालूं इच्छितों. मघांशीं आपण खेळण्याचें एक उदाहरण घेतलें. खेळतांना प्रतिपक्षाला हूल देऊन फसविण्यांत कांहीं पाप नाहीं हें खरें आहे, त्याचप्रमाणें त्याचा पराभव झाला असतां त्याला जें दुःख होईल तिकडे पाहावयाचें नसतें हेंहि खरें आहे, पण त्याचा जीव जाईल किंवा त्याला मोठी दुखापत होईल अशा रीतीनें खेळ खेळणें-हि उचित नाहीं असें आपण मानतोंच ना ? क्रिकेट खेळतांना अंगाला दुखापत होईल अशा प्रकारचें आततायीपणाचें 'अंग-झोडपें' म्हणजे [Bodyline] बोलिंग बरेच लोक अशिष्टपणाचें समजतात तें उगाच नाहीं. कलेचा खेळ खेळतांना "तुमचा खेळ होतो पण आमचा जीव जातो" असें गोष्टींतल्या बेडकांप्रमाणें म्हणण्याची पाळी जनतेवर येऊं नये इतकी काळजी कलाक्रीडा करणाऱ्यांनीं घ्यावी असें मला वाटतें.

साहित्यकलेला स्वातंत्र्य असावें, तिला पायबंद कोणी घालूं नये, आनंद देणें हेंच तिचें अवतारकृत्य आणि तेंच तिचें सौभाग्य, आपल्या मंदिरांत तरी तिला राणीचा मान पाहिजे, जराजर्जर रूढीचा, निर्दय नीतीचा किंवा कल्पना-शून्य सत्यप्रीतीचा तिला सासुरवास नसावा, या आणि अशा सर्व गोष्टी मला मान्य आहेत. पण कलेचा आणि साहित्यकलेचा मी भक्त असलों, तरी मी अनन्य भक्त नाहीं. मला केव्हांहि हें विसरतां येत नाहीं कीं मनुष्याचा जन्म केवळ कलेचा आनंद लुटण्याकरितां नाहीं. कला नसेल तर मनुष्याच्या जीव-नांत तें मोटेंच वैगुण्य होईल, पण जीवन हें केवळ कलामय नाहीं. जीवनांत ज्या अत्यंत रम्य आणि वंद्य गोष्टी आहेत त्यांत कलेबरोबर नीतीचा आणि

सत्याचाहि समावेश होतो आणि यांचें जर एकमेकांत पटलें नाहीं तर जीवनांतली ती मोठीच आपत्ति म्हटली पाहिजे. जीवनांत कला नसेल तर तें बेचव, नीरस, कळाहीन होईल हें खरें, पण सत्य नसेल तर तें लुळें, आंधळें, पांगळें होईल, आणि नीति नसेल तर तें रोगट, कुजकें, नासकें होईल. अर्थात् या तिहींपैकीं कोणाचेंहि अनिर्बंध असें स्तोम माजविण्यांत आणि कोणालाहि शेफारूं देण्यांत अर्थ नाहीं. कलेला काय, नीतीला काय किंवा सत्याला काय, आपापल्या क्षेत्रांत सामान्यतः स्वातंत्र्य असावें. हें एक ध्यानांत धरावें कीं कलेचा कलह पुष्कळ वेळां होतो तो खऱ्या नीतीशीं किंवा उच्चतम सत्याशीं नसतोच मुळीं. पुष्कळ वेळां मी असें पाहिलें आहे कीं नीतीचा आणि सत्याचा मक्ता जणूं कांहीं आपल्याकडेच आहे असें समजणाऱ्या आकुंचित बुद्धीच्या भक्तगणांनीं नसता कलह उत्पन्न करून उगाच बावटळ उत्पन्न केलेली असते. कांहीं प्रामाणिक नीतिभक्तांना विनोदबुद्धीच नसते आणि आपल्या उणीवेची त्यांना जाणीव नसल्यामुळें ते नाकानें कांदे सोलून डोळ्यांतून उगाच आसवें गाळतात आणि पावित्र्यविडंबनाची वगैरे कोल्हेकुई उठवून देतात. असल्या विनोदबुद्धिहीन नीतिभक्तांना ताळ्यावर आणण्याकरितां कांहीं एकान्तिक कलात्मक व कलैकपुरस्कारक लोक असणें समाजाच्या दृष्टीनें फार उपयुक्त आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं, कलेच्या दृष्टीनें पाहतां येणें ही गोष्ट सोपी नाहीं.

हें प्रांजलपणें कबूल केल्यानंतर 'कलेकरितां कला' या प्रमेयाला मुरड कशी घातली पाहिजे हें थोडक्यांत सांगण्यास हरकत नाहीं. 'कलेकरितां कला' हें जितकें खरें आहे त्याहून कला हें एक जीवनाचें अंग आहे, तें जीवनसर्वस्व नव्हे, हें अधिक खरें आहे. 'आनंद' हें कलेचें अवतारकृत्य खरें पण नीतीच्या नरड्याला नख लावून किंवा सत्य पायाखालीं तुडवून कला नाच करूं लागली तर सात्त्विक आनंद मिळूं शकेल काय? अर्थात् नाहीं.

आतां मला कोणी असें विचारील कीं, "वामनराव, सत्याला किंवा नीतीला दुखविणारें किंवा चिरडणारें कलेचें बेबंद तांडवनृत्य तुम्हांला नको हें वादाकरितां क्षणभर आम्हीं कबूल करितों. आतां यापुढें तरी तुम्हांला 'कलेकरितां कला' या प्रमेयाला दुसरी कांहीं मर्यादा किंवा मुरड घालायची नाहीं ना?" असा मला जर कोणी प्रश्न केला तर मी म्हणेन कीं 'नाहीं'; आणखी कांहीं मुरड बिरड घालायची नाहीं. पण एक मुद्दा मात्र मला स्पष्ट करायचा आहे.

तो असा कीं ज्या कलावन्ताला कांहीं एक सांगावयाचें नाहीं, ज्याच्याजवळ सांगण्यासारखें कांहीं नाहीं, त्याची कला लहान मुलांच्या रबरी फुग्यासारखी दिसण्यांत सुंदर, पण अगदीं पोकळ असेल. अशा कलेला विशेष कांहीं किंमत नाहीं. प्रा. फडक्यांच्याच कलात्मक कादंबऱ्या घेतल्या तरी त्यांमध्यें प्रा. फडक्यांना संसारांत जीं चमत्कृतिजनक दृश्यें दिसलीं आणि जीं त्यांना इतरांना सांगावींशीं वाटलीं तींच त्यांनीं कलात्मक रीतीनें वर्णिलेलीं आहेत ना? संसारांतील हीं चमत्कृतिजनक दृश्यें हुडकून काढण्यांत त्यांचा मार्मिकपणा दिसून येतो. हा मार्मिकपणा त्यांच्यामध्यें नसता तर त्यांचीं वर्णनें विशेष आनंददायक झालीं असतीं काय? वाङ्मयीन कलावन्त जें सांगेल त्यांत जितका खोलपणा, जितका मार्मिकपणा, जितकें अर्थवैभव असेल त्या मानानें त्याची योग्यता कमीअधिक. कर्णमधुर शब्दावडंबर, शुष्क कोट्या, क्षणभर चकित करणारे शब्दश्लेश, इत्यादिकांमध्यें जी थोडीबहुत चमत्कृति आहे तिच्यामुळें मनाची क्षणभर करमणूक होते एवढेंच तिचें महत्त्व. डोंबाऱ्याचे खेळ किंवा माकडाच्या उलट्या सुलट्या उड्या पाहून क्षणभर आपण हंसतों, त्यांतलाच तो प्रकार. अशा लोकांची किंमत बेताचीच. शेक्सपियर, टॉमस हार्डी, आपले फडके इत्यादिकांनीं आपल्या कलाकृतींमध्यें मानवी स्वभावविशेष, मानवी संसारांतील पेंचप्रसंग, मानवी मनांमध्यें आंतल्याआंत चाललेले कलह किंवा उलटसुलट प्रवाह, मानवी मनांतील बऱ्यावाईट विचारांची, भावनांची आणि प्रवृत्तींची विलक्षण गुंतागुंत, इत्यादिकांचीं जीं शब्दचित्रें काढिलीं आहेत त्यांवरून ‘ अशा रीतीनें वागा किंवा वागूं नका ’ असें सांगितलें नसेल, पण तीं शब्दचित्रें पाहिल्याबरोबर जें पूर्वीं आपणांस दिसलें नव्हतें, किंवा निदान स्पष्टपणें दिसलें नव्हतें, तें आपण आज पाहिलें असें आपणांस वाटतें आणि आपल्या अनुभवांत चांगली भर पडली असा प्रत्यय येऊन आनंद होतो, ही गोष्ट निर्विवाद आहे. कित्येक वेळां अनुभवांमध्यें भर पडत नाहीं, तर स्वानुभवाचा पुनःप्रत्यय येतो. भर घालून म्हणा किंवा पुनःप्रत्यय आणून देऊन म्हणा, साहित्यिक कलावंत आपणांस ऋणी करतात. हे कलावन्त केवळ शाब्दिक वेलबुट्टीनें आणि रंगीबेरंगी चकाकीनें मन रमवूं म्हणतील, तर क्षणभर मन रमेल कदाचित्; पण लगेच आपण म्हणूं कीं, “ या कलावंताची बुद्धि कांहीं विशेष खोल किंवा मार्मिक नाहीं. ” थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कला ही उपदेशगर्भ असलीच

पाहिजे असें नाहीं, हें त्रिवार सत्य आहे. कलाकृतीमध्यें कलेचे नियम संभाळले पाहिजेतच आणि हे नियम संभाळून कलात्मक आनंद देणें हेंच त्याचें खरें कार्य. पण कलाकृतींत कलावन्ताच्या मनाची खोली, प्रगल्भता, विवेकशीलता, मार्मिकता, ज्या मानानें दिसेल त्या मानानें त्या कलाकृतीची किंमत कमीअधिक ठरेल. या गुणांच्या अभावीं ती कलाकृति सुंदरहि दिसूं शकेल; पण तें सौंदर्य दिखाऊ, पोकळ असण्याचा संभव आहे. क्वचित्प्रसंगीं हें सौंदर्य सापाच्या किंवा वाघाच्या किंवा कलावंतिणीच्या सौंदर्याप्रमाणें घातुकहि होऊं शकेल. असें होऊं न देण्याचा प्रयत्न करणें अवश्य आहे. कलाकृति मोहक असावी, पण भलता मोह तिनें घालूं नये हें सर्वांगीण जीवनाच्या दृष्टीनें उचित आहे.

## ही समाजव्यवस्था नव्हे, सामाजिक अनवस्था १२

"तुमची ही विश्वकुटुंबी संस्था ठीक आहे; पण अजून कांहीं खात्री पटत नाहीं." विनायकराव एकदां वाचकांच्या परिचयाच्या सोनगांवकर मित्र-त्रयाला म्हणाले, "आपल्या इकडे 'वसुधैव कुटुंबकम्' सगळ्या जगाला-च आपलें कुटुंब मानावें हें तत्त्व जुनें आहे, व तें सर्वमान्य आहे; पण तुमचा अलीकडचा विश्वकुटुंबवाद दिसण्यांत सारखा पण अगदीं भिन्न आहे. तुम्ही खाजगी मालमत्ता मुळीं मानीतच नाहीं, आमची सर्व समाज-रचना खाजगी मालमत्तेवर उभारलेली आहे. आम्ही एवढेंच म्हणतों कीं, आपल्या मालकीचें जें असेल त्याचा आपण सद्व्ययच करावा म्हणजे अड-चणींत असलेल्या आपल्या बंधुभगिनींना मदत करण्याचे कामीं त्याचा उप-योग करावा. आमच्या समाजाचा पाया कुटुंब, तुम्ही कुटुंबव्यवस्थेवरच घाला घालतां."

"कबूल," त्यांची मुलगी सुशीला म्हणाली, "तुम्ही म्हणतां तें सगळं कबूल; पण आमच्या मतांत वाईट काय आहे! तुम्ही भेद दाखविलात तो खरा आहे; पण जुन्या विश्वकुटुंबवादापेक्षां नवा विश्वकुटुंबवाद अधिक चांगला आहे असें आमचें म्हणणं आहे, यांत चुकीचें काय आहे तें सांगा."

"सांगतों आतां काय काय चुका आहेत त्या." विनायकराव बोलूं लागले, "तुमची इथली संस्था अत्याचारी नसेल, अत्याचाराचा पुरस्कारहि करीत नसेल; पण तुमचे युरोपमधले थोरले भाऊ आणि तिथल्या थोरल्या भगिनी अत्याचारानें देखील समाजव्यवस्थेंत क्रांति घडवून आणावी असें म्हणतात, ही झाली पहिली चूक; ही क्रांति एकदम घडवून आणावी असं ते म्हणतात ही दुसरी चूक; ही क्रांति आपल्या मताप्रमाणें असावी, सर्व लोकांना विचार-

ण्याची जरूर नाहीं आणि त्यांना पसंत पडेतोंपर्यंत वाट पाहण्याची मुळींच जरूर नाहीं असं ते मानतात, ही त्यांची तिसरी चूक; आणि तुमचे सिद्धांत इतिहासाच्या शिकवणुकीलाच सोडून आहेत असं नाहीं तर एकदर मनुष्य–स्वभावाला–मानसशास्त्राला–सोडून आहेत, ही सर्वांत मोठी चूक."

"फिर्यादीतर्फेच्या वकिलाप्रमाणें चार मुद्दे काढलेत, त्यांना मी आरोपी-तर्फेचा वकील म्हणून उत्तर देतों कीं, सोनगांवची आमची संस्था म्हणजे युरोपमधली संस्था नव्हे. अर्थात् युरोपमधल्या एखाद्या संस्थेला लागू असलेले आरोप आम्हांला लागू नाहींत."

"कबूल करतों हें मी." विनायकराव म्हणाले, "पण तिकडच्या संस्थेमध्यें आणि तुमच्या संस्थेमध्यें फरक काय आहे तो तुम्ही सांगितला पाहिजे."

"फरक सांगतों." बळवंतराव म्हणाले, "फरक असा कीं, आमचा अत्याचारावर विश्वास नाहीं. आम्ही गांधींचे भक्त नसलों तरी त्यांचा अनत्याचाराचा पुरस्कार आम्हांला बराच पसंत आहे."

"तात्या, 'बराच' शब्द ध्यानांत धरा बरं का." सुशीला म्हणाली. "'बराच' शब्दामध्यें बराच अर्थ आहे."

"आला, ध्यानांत आला अर्थ." तिच्या वडिलांनीं मंद स्मित करून उत्तर दिलें.

"तुम्ही हंसा." सुनंदराव म्हणाले, "पण आमचं खरं मत असंच आहे कीं, होतां होईतों जबरदस्ती करूंच नये. प्रबळ मनुष्य अल्पबलाला एखादी गोष्ट जबरदस्तीनें करायला लावतो; पण तो अल्पबल मनुष्य आपण प्रबल केव्हां होऊं याची वाट पहात असतो, व प्रबल झाल्याबरोबर पूर्वीच्या जबरदस्तीचा सूड उगवतो! एका मनुष्याची जी गोष्ट तीच मनुष्य-संघाची किंवा राष्ट्राची. जबरदस्तीनें दुसऱ्याकडून एखादी गोष्ट करून घेतां येते; परंतु हें यश टिकाऊ नसतें. खरें टिकाऊ यश मनुष्याला एखादी गोष्ट मनापासून तो जेव्हां ती करतो तेव्हां येतें."

"आणि म्हणूनच आम्ही सुधारणा घाईनें करूं इच्छीत नाहीं." सुनंदराव मध्येंच म्हणाला, "आम्हांला 'झटपट रंगारी' सुधारणा नको आहेत. आम्ही आपल्या संस्थेच्या द्वारें लोकमत तयार करणार आणि मग शंभर—दोनशें—

पांचशें वर्षांनीं जेव्हां सुधारणा व्हायच्या असतील तेव्हां त्या आपोआप घडून येतील. ”

“ बरं, तिसऱ्या आक्षेपाबद्दल काय ? ” विनायकरावांनीं विचारलें.

“ तिसऱ्या आक्षेपाचं उत्तर असं, ” सुशीलेनें उत्तर दिलें, “—कीं आमची सोनगांवची विश्वकुटुंबी चळवळ केवळ कामगारांचेंच वर्चस्व स्थापण्याकरितां नाहीं, त्याप्रमाणेंच केवळ शेतकऱ्यांचें, मध्यमवर्गाचें, केवळ सरदाराचें किंवा केवळ सरकारी नोकरांचें वर्चस्व स्थापण्याकरितां नाहीं. आम्हांला सर्व जनता-जनार्दनाचें वर्चस्व पाहिजे आहे. पांचामुखीं परमेश्वर असें आमचें मत आहे.”

“ काय बोलतेस तूं हें—” विनायकराव म्हणाले, “ परमेश्वराचं नांव तुझ्या तोंडून आतां निघालं हें मोठंच पाप केलंस तूं ! ”

“ पाप झालं खरं. ” सुशीलेनें स्मितपूर्वक गुन्हा कबूल केला, “ माझ्या ध्येयात्मक समाजव्यवस्थेंत परमेश्वराला आणि इतर देवांना आणि देवींना पुराण-कालीन वस्तुसंग्रहांतील ‘ मृत देवतां’ च्या कपाटांत स्थान मिळेल, इतरत्र मिळणार नाहीं. ”

“ ध्येयनिष्ठ लोकांच्या हृदयांत देवाला स्थान मिळेल असें तूं पर्वां म्हणालीस तें विसरलीस वाटतं ? ” बळवंतराव म्हणाले.

“ विसरल्यें खरी. ” सुशीलेनें उत्तर दिलें, “ पण एका अर्थी विसरल्यें नाहीं असेंहि म्हणण्याला हरकत नाहीं. कारण सात्त्विक लोकांच्या वगैरे हृदयांत जो देव वास करतो त्याचं नांव ‘ध्येय’ असेल,—‘देव’ हें नांव तो पुढें सोडून देणार आहे.!”

“ कां, ‘ देव ’ या शब्दाचा विटाळ कां वाटतो ? ” विनायकरावांनीं विचारलें, “ एखाद्याची खरोखरच जर उच्चतमगुणविशिष्ट विभूतीवर श्रद्धा असली तर त्यानें ही श्रद्धा त्याज्य कां मानावी ? ”

“ खरोखरीच श्रद्धा असली तर उच्चतमगुणविशिष्ट विभूतीवर श्रद्धा ठेवण्यास हरकत नाहीं.” सुशीलेनें उत्तर दिलें.

“ पण आपण मूळ मुद्दा सोडून देत आहोंत. आमची विश्वकुटुंबी संस्था ईश्वरवादी नाहीं, आणि निरीश्वरवादी नाहीं; आम्ही सत्यवादी आहोंत. सर्व लोकांना आमच्या राज्यव्यवस्थेंत विचार-स्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य असेल. पण विशिष्ट वर्गाचा इतर वर्गावर जुलूम असावा हें मतच मुळीं आमच्या राज्यां-

तील आम्हांला पसंत नाहीं. म्हणून लोकांनीं ईश्वर मानावाच किंवा मानूं नयेच असा आम्ही निर्बंध घालूं इच्छीत नाहीं."

" तुम्हांला राज्य जणूं कांहीं मिळालंच आहे अशी तुझी भाषा दिसते. तुमच्या राज्यांतली पहिली राणी तूं आहेस असं दिसतं ! "

" आमच्या राज्यांत राजा नाहीं, आणि राणी नाहीं, सगळेच आम्ही कामकरी ! " सुशीलेनें उत्तर दिलें.

" असं कसं होईल ? " विनायकराव थट्टेच्या स्वरांत म्हणाले, " मुंग्या सगळ्या कामकरी असतात; पण त्यांच्यामध्यें देखील एक 'राणी मुंगी' असतेच; ती तूं होणार अशीं मला लक्षणं दिसूं लागलीं आहेत ! पण ही थट्टा सोडून देऊन माझ्या चवथ्या आक्षेपाकडे वळूं या. तुमच्या समाजव्यवस्थेचा हा सगळा डोलारा मनुष्यस्वभावाच्या, आणि सहजप्रवृत्तींच्या विरुद्ध आहे आणि इतिहासाचीहि साक्ष अशीच आहे, यावर तुमचं उत्तर काय आहे ? तुमच्या विश्वकुटुंबी संस्थेवर खरा आक्षेप म्हटला म्हणजे हाच आहे. यावर तुमचं काय म्हणणं आहे ? "

" यावर आमचं म्हणणं असं आहे, " बळवंतराव म्हणाले, " कीं मनुष्यस्वभाव कसा आहे हें निश्चित ठरविण्याला आज पुरेसें साधन नाहीं. आजपर्यंतच्या इतिहासावरून भविष्यकाळाबद्दलचीं अनुमानें करणें चुकीचें आहे. पूर्वींचा काळ आजच्या काळाहून फार भिन्न होता आणि भविष्यकाळ आजच्याहून फार भिन्न होणार आहे. "

" या तुमच्या कल्पनेच्या उड्या आहेत." विनायकराव मध्येंच म्हणाले.

" असतील, कल्पनेच्या उड्या असतील; पण त्याला इतिहासाचा आधार तुमच्या सिद्धान्तापेक्षां अधिक आहे. मनुष्यसमाज दहा हजार वर्षांपूर्वी होता तसा चारपांच हजार वर्षांपूर्वी म्हणजे वेदकालीं नव्हता. वेदकालीं जसा होता तसा पुराणकालीं नव्हता. पुराणकालीं जसा होता तसा आज नाहीं. मनुष्याच्या वासना व महत्त्वाकांक्षा पूर्वींसारख्या राहिल्या नाहींत. पूर्वीं मनुष्य मनुष्याला खात होता, जें दिसेल तें आपलें म्हणत होता, जी स्त्री दिसेल ती आपली असं मानीत होता व तिला हें मानण्याला लावण्याचा गोडीगुलाबीचा किंवा जबरदस्तीचा प्रयत्न करीत होता. पूर्वीं ' कुटुंब ' असलेंच तर अशा रीतीनें खुषीनें—जबरदस्तीनें आलेल्या स्त्री-पुरुषांचें व त्यांच्या अपत्यांचें होतें. राज्य

किंवा राष्ट्र असें कांहीं नव्हतेंच; घरेंदारें नव्हतीं, कायदे नव्हते, हक्क नव्हते. अर्थात् कोणाचे कोणते हक्क हीं ठरविणारीं कोर्टेंहि नव्हतीं. या स्थितीशीं आजच्या स्थितीची तुलना करा आणि 'काल' ही अजब चीज किती फरक घडवून आणीत असते, याचें मनाशीं आश्चर्य करीत रहा."

"तूं तर वक्तृत्वच करूं लागलास, बाळू!" विनायकराव उद्गारले आणि डोळे मिस्किलपणें मिचकावून म्हणाले कीं, "असला बाह्य फरक पुष्कळ झाला आहे हें कबूल. 'पुष्कळ' म्हणजे फारच पुष्कळ–तुला वाटेल तेवढा! पण मनुष्याच्या मूलभूत प्रवृत्तींमध्यें फरक झाला आहे का? मनुष्याची स्वार्थबुद्धि नष्ट झाली आहे का? कामवासना गेली आहे का? क्रोध थंडावला आहे का? असूया मरून गेली आहे का? खरी गोष्ट अशी आहे कीं, मनोविकार सगळे तत्त्वतः पूर्वींसारखेच आहेत–ते व्यक्त करण्याची पद्धति मात्र बदलली आहे. मनोविकार तेच, फक्त पोषाख बदलला आहे. पोषाखांतला फरक सोडला तर पांच हजार वर्षांपूर्वींचा मनुष्य आणि आजचा मनुष्य यांत काय फरक आहे? अवयव तेच; प्रवृत्ती त्याच. ज्ञान–म्हणजे माहिती–अधिक आहे, पण 'स्वभाव' बदलला आहे असं म्हणतां येणार नाहीं."

"स्वभाव हा सहजप्रवृत्ति, शिक्षण, संवयी, संगत, सभोंवतालची परिस्थिति यांवर अवलंबून असतो असं म्हणतात. आणि हें जर खरं असेल," बळवंतराव म्हणाले, "तर पांच हजार वर्षांपूर्वींच्या मनुष्याच्या आणि आतांच्या मनुष्याच्या स्वभावांत फार फरक आहे असेंच अनुमान निघेल. कारण अवयव आणि त्यांच्या सहज-प्रवृत्ती यांशिवाय इतर बाबतींत या उभयतांमध्यें साम्य कांहींच नाहीं. अवयवांमध्येंहि थोडा फरक झालेला आहे. कारण हजारों वर्षांपूर्वींच्या माणसांचे व हल्लींच्या माणसांचे सांपळे जर तुलनेच्या दृष्टीनें पाहिले तर उंची, पायांचीं ठेवण, हातांची लांबी, वगैरेमध्यें फरक दिसतो. पूर्वींचे लोक कमी उंच होते. ते पायांनीं चालत; पण किंचित् अस्वलासारखी त्यांची चाल होती. हात सापेक्षतः हल्लींपेक्षां लांब होते. ते लोक आजानुबाहू असावेत असें दिसतें. त्यांचें घ्राणेंद्रिय अधिक तीक्ष्ण होतें असें अनुमान आहे. पण शरीराच्या अवयवांमध्यें किंवा त्यांच्या शक्तीमध्यें कांहीं एक फरक झाला नाहीं असें गृहीत धरलें तरी शिक्षण, संवयी, संगत, सभोंवतालची स्थिति या बाबतींत इतकी भिन्नता आहे कीं, पूर्वींच्या रानटी माणसाचा आणि विसाव्या शतकांतल्या माणसाचा

स्वभाव एक आहे म्हणणं हें अत्यंत अतिशयोक्तीचं आहे आणि ही अतिशयोक्ति घातुक आहे."

"स्वभावांत भेद असेल; पण मूलतः भेद आहे का ? असा माझा प्रश्न आहे."

"त्यावर माझें उत्तर असें आहे," बळवंतराव म्हणाले, "—कीं, फूल आणि फळ किंवा लहान मुलगी आणि तरुणी हीं 'मूलतः' जरी एक असलीं तरी त्यांमध्यें जसा जमीनअस्मानाचा फरक असतो तसाच प्रकार इथें आहे."

"आणि शिवाय," सुनंदराव म्हणाला, "—दुसरं असं कीं, मनुष्यस्वभाव पूर्वीसारखाच आहे असं गृहीत धरलं तरी हा स्वभाव व्यक्त होण्याच्या बाबतींत तुम्ही फरक मानतांच. तेव्हां जरी पूर्वीसारखेच मनोविकार असले तरी त्यांची अभिव्यक्ति भिन्न असूं शकेल आणि एवढं कबूल केलंत म्हणजे आमचं काम झालं."

"मनुष्यस्वभाव ही एक स्थिर नित्य वस्तु आहे, असं मानण्यांत जशी एक चूक होते आहे—" सुशीला म्हणाली, "—तशी दुसरी चूक अशी होते आहे कीं, मनुष्यस्वभाव हा केवळ स्वार्थी, आपमतलबी, कामैकप्रेरित, अधिकारलोलुप असं सामान्यतः मानण्यांत येतं. मोठमोठे लोक देखील पुष्कळदां असेंच म्हणतात. पण मनुष्यांत उच्च प्रवृत्ति आणि मनोवृत्तीहि आहेत. त्याला स्वार्थ प्रिय असेल; पण 'स्व' मध्यें तो कुटुंबाचा-देशाचा--मनुष्यजातीचाहि समावेश करतांना आढळतो. स्वार्थाबरोबर त्याला परार्थहि प्रिय आहे. स्वार्थ बहुधा प्रबळतर होतो; पण परार्थहि कित्येक वेळां प्रबळतर होऊं शकतो. शिवाय, ज्ञानानें व अनुभवानें खरा स्वार्थ आणि परार्थ यांचा अविरोध जसजसा दिसून येऊं लागतो, तसतसा स्वार्थप्रवृत्ति व परार्थप्रवृत्ति यांमध्येंहि साहाजिकच अविरोध उत्पन्न होऊं लागतो. उदाहरणार्थ, शेजारच्या घरीं प्लेग झाला म्हणजे आपल्या घरींहि प्लेग होण्याचा संभव आहे ही जाणीव एकदां तीव्रतेनें उत्पन्न झाली म्हणजे शेजारीदेखील प्लेग होऊं नये, अशाबद्दल लोक दक्ष होऊं लागतात, असा आज काल आपण अनुभव पाहतोंच आहोंत."

"कबूल आहे, कबूल आहे तुमचं सगळं म्हणणं." विनायकराव म्हणाले, "पण अद्यापि तें चांगलंसं गळीं उतरत नाहीं. कारण सांगतां येत नाहीं;

पण पटत नाहीं एवढी गोष्ट खरी. माझ्या बोलण्याचा हा प्रकार बायकी आहे हें मला कबूल आहे; पण वस्तुस्थिति ही अशी आहे."

"बोलण्याचा बायकी प्रकार म्हणतां, पण या भाषेवर सुशीला आक्षेप घेईल हो." सुनंदराव म्हणाला.

"आक्षेप घेणारच." सुशीला म्हणाली, "पण सध्यां घेत नाहीं. आमच्या तात्यांचं चुकतं आहे कोठें, तर जगांत विचारांमध्यें आणि आचारांमध्यें केवढ्या मोठ्या मोठ्या आणि किती झपाट्यानं क्रांत्या होत आहेत यांकडे ते लक्ष देत नाहींत! खाजगी मालमत्तेच्या पद्धतीपासून लोकांचें किती नुकसान होत आहे, हें लोकांच्या एकदां नजरेस आलें म्हणजे हळुहळू कालांतरानें हल्लींच्या समाजव्यवस्थेंत फरक होत जाऊन विश्वकुटुंबी व्यवस्थेकडे समाजाच्या प्रवृत्तीची दिशा झुकणार यांत शंका नाहीं. आतांच पहा ना; गाड्यांचे रस्ते, रेल्वे, पोस्ट-ऑफिसें, पोलिस, सैन्य, हीं सर्व खाजगी मालकीचीं राहिलीं नाहींत, तर तीं बहुतेक सार्वजनिक स्वरूपाचीं झालीं आहेत आणि त्यांची व्यवस्था बरीच चांगली आहे. विशेषेंकरून पोस्टाची व्यवस्था सार्वजनिक स्वरूपाची आहे तरी ती किती उत्तम चालली आहे! जी.आय्. पी. सारख्या कांहीं रेल्वे आतां जशा राष्ट्राच्या झाल्या आहेत, तशाच सगळ्या झाल्या तर त्या काय चालणार नाहींत असें वाटतें ? आणि पोस्टाप्रमाणें आणि रेल्वेप्रमाणें खाणी आणि जमिनी सार्वजनिक ? मालकीच्या झाल्या तर अव्यवस्था माजेलच असें निश्चयानें म्हणण्याला पुरावा काय ? आज उद्यां किंवा एकदोन पिढ्यांत ही क्रान्ति होणार नाहीं व होणें इष्टहि नाहीं; पण पुढेंमागें केव्हांहि होणार नाहीं आणि झाली तर वाईट परिणाम घडून येतील असं खात्रीनें म्हणण्याला पुरावा काय आहे ? असले प्रयत्न पूर्वीं फसले हा इतिहासाचा पुरावा एवढेंच सिद्ध करतो कीं, या बाबतींत यश येण्याला अडचणी पुष्कळ होत्या. पण कालमानाप्रमाणें हरतऱ्हेच्या यांत्रिक व इतर सुधारणा होत आहेत; लोकांमध्यें ज्ञानवृद्धि होत आहे; लोक इतके दिवस निजले होते ते आतां जागे झाले आहेत; व्यक्ति-व्यक्तींचे व राष्ट्र-राष्ट्रांचे हितसंबंध एकमेकांस निगडित झाले आहेत याची जाणीव उत्पन्न होऊन दुसऱ्याचें हित किंवा अनहित तें वस्तुतः आपलेंहि हित किंवा अनहित हें अनुभवान्तीं व्यक्तींना व राष्ट्रांनाहि चांगलें कळूं लागलें आहे; संशयी, स्वार्थी, कलहात्मकवृत्ति शेवटीं

आपल्यालाच घातुक होते हें तत्त्व पटूं लागलें आहे; विश्वासानें विश्वास वाढतो व मनुष्य विश्वासार्ह होतो, तसेंच प्रेमानें प्रेम वाढतें आणि मनुष्य प्रेमार्ह होतो या तत्त्वाचाहि अनुभव अनेकांना अनेक क्षेत्रांत येत आहे,–अशा स्थितींत भविष्यकाळीं विश्वकुटुंबवाद लोकांना पटेल व तो त्यांना चांगलें यशहि देईल असें कां मानूं नये ? ”

“ कां मानूं नये याचं उत्तर असं कीं, यश येईलच खास, अशी खात्री करून देणारा निश्चयात्मक प्रबळ पुरावा नाहीं.” विनायकरावांनीं उत्तर दिलें.

“ नसेल, पुरावा नसेल, ” सुनंदराव म्हणाले, “ पण पूर्वीच्या ‘ समाज-व्यवस्थे’ नें आतांपर्यंत अव्यवस्थाच माजविली ही तर गोष्ट खोटी नाहीं ? आतांच्या समाजव्यवस्थेला काय मोठंसं सुयश मिळालं आहे तर आम्हीं अप-यशाला भ्यावं ? आतांपर्यंत इतिहास म्हणजे कलह, मारामाऱ्या, खून यांचाच बराचसा इतिहास. लढायांत आणि युद्धांत शत्रूचा जीव घेणें म्हणजे वास्तविक खून करणं होय; पण हे खून प्रतिष्ठितपणाचे, कायदेशीर आणि मोठ्या प्रमाणा-वर आणि पुष्कळ वेळां अप्रत्यक्ष असतात म्हणून त्यांना खून म्हणायचं नाहीं इतकंच. दुसरं असं कीं, हल्लींच्या समाजव्यवस्थेंत कोण सुखी आहे तर आमच्या विश्वकुटुंबी समाजामुळें दुःख ओढवेल म्हणून आम्हीं चिन्तातुर व्हावं आणि सदाशा आणि सदुद्योग सोडून देऊन आहे त्या स्थितींत समाधान मानावं ? हल्लींच्या समाजांत-हिंदुस्थानांतल्याच नव्हे तर कोठल्याहि समाजांत–मजूर संतुष्ट नाहींत, मालक नाहींत, कारकून नाहींत, शिक्षक नाहींत, मध्यमवर्ग नाहीं, सरदार नाहींत, व्यापारी नाहींत, कारखानदार नाहींत,–कोणीच नाहीं. हल्लींच्या समाजव्यवस्थेंत तरुण मुलगे असंतुष्ट, मुली असंतुष्ट, स्त्रिया असंतुष्ट, पुरुष असंतुष्ट, जो तो मनांत झुरतो आहे, समाधान कोणालाच नाहीं. प्रत्येकजण इतरांना दोष देतो आहे आणि आपल्या अपयशांचं किंवा दुःखाचं खापर फोडण्याला शेजाऱ्यापाजाऱ्यांचीं किंवा आप्त संबंधी लोकांचीं डोकीं मिळालीं नाहींत तर समाजाच्या डोक्यावर हें खापर तो फोडतोच — नाहीं तर निदान ‘दैव’ किंवा ‘देव’ यांचीं डोकीं केव्हांहि आणि कोणालाहि आणि कोठेंहि खापर फोडण्याच्या या कामाला उपलब्ध आहेतच ! ”

“ पण सुशीलेच्या विश्वकुटुंबी समाजव्यवस्थेंत देवांची हकालपट्टी झाल्यामुळें

खापर फोडण्याचं तें एक स्थान कमी होईल ! ही एक आपत्तिच ओढवणार आहे म्हणायची !" विनायकराव थट्टेच्या स्वरानें म्हणाले.

" आमच्या राज्यांत देवाला स्थान नाहीं खरं–" सुशीला थट्टेला थट्टेनेंच उत्तर देण्याच्या स्वरांत म्हणाली, " पण कांहीं लोक हृदयांत त्याला स्थान देणारे असतीलच ! त्यांना तो अगदीं जवळच सांपडेल, आणि इतरांनीं या हृदयस्थ आणि अंतर्यामीं वास करणाऱ्या देवाच्या नांवाचा उच्चार करून खापर फोडावें ! उंच आकाशांत किंवा कैलासावर किंवा स्वर्गात किंवा लांबच्या क्षीरसागरांत असलेल्या देवाला जर इथली हांक ऐकूं जाते आणि इथल्या दगडी मूर्तींच्या माथ्यावर वाहिलेलीं फुलें जर त्याला पोंचतात, तर इथून दिलेले शिव्याशापहि त्याला खात्रीनें पोंचतील."

" तुझ्या या फटकळपणानें तुझ्या बाजूच्या सत्याची किंमत तूं कमी करतेस." विनायकराव म्हणाले, " बाकी तुला दोष देऊन काय उपयोग ? मींच या चेष्टेला आरंभ केला तेव्हां तुला कोणत्या तोंडानं दोष देऊं ? "

"देवाचं नांव आलं कीं सुशीलेचं डोकं उठतं आणि ती कांहीं तरी बडबडूं लागते तेव्हां तो प्रश्नच सोडून मूळ मुद्याचा विचार करूं या." सुनंदराव म्हणाला, " सुशीलेचा मुद्दा असा होता कीं, हल्लींची समाजव्यवस्था म्हणजे अव्यवस्था आहे—तिला व्यवस्था हें नांव सौजन्यानें द्यायचं एवढंच. I. C. S. मधला साहेब जसा Indian नसतो, Civil नसतो आणि Servant हि नसतो, तथापि त्याला आपण Indian Civil Servant म्हणतोंच, तसेंच समाजांतील हल्लींच्या अव्यवस्थेला ' व्यवस्था ' म्हणायचें झालें. खरा प्रकार असा आहे कीं, समाजाचा पाया डळमळीत आहे अशी लोकांना शंका येऊं लागली आहे; समाजाचा डोलारा ताबुताप्रमाणें हलत आहे; हा डोलारा एकदां गडगडून पडला तर नवीन इमारत मजबूत पायावर बांधतां येईल अशी कांहीं लोकांना कल्पना सुचूं लागली आहे–इतकेंच नव्हे तर ते त्या दिशेनें प्रयत्न करीत आहेत. कोठल्याहि देशांतल्या जुन्या परंपरागत रूढींचा आणि ढोंगासोंगांचा आधार असलेली इमारत आज ना उद्यां,–नाहीं तर ५००० वर्षांनीं,—कोसळणार यांत शंका नाहीं. मग या असल्या अपेशी समाज–'व्यवस्थे' चें अवडंबर माजविण्यांत काय अर्थ आहे ? हल्लींच्या पद्धतींत जर लोकांना सुख असतें, समाधान असतें, तर गोष्ट वेगळी; पण वस्तुस्थिति अशी आहे कीं,

सर्वत्र असंतोषाचा बाजार आहे. पुरुष बायकांच्या नांवानें खडे फोडतात, बायका पुरुषांच्या नांवानें बोटें मोडतात ! ब्राह्मणेतर ब्राह्मणांना शिव्या देतात, ब्राह्मण ब्राह्मणेतरांना पोकळ शाप देतात ! भांडवलवाले लोक ' मजूर, अडाणी, बेवकूफ, निष्काळजी, बेइमानी' असें म्हणतात; तर मजूरवर्ग भांडवलवाल्यांना ' स्वार्थी, मगरूर, निर्दय, लबाड, संभावितपणें दरोडा घालणारे, मजुरांना पिळून काढणारे, नफाबाजी करून मोटारी उडवणारे आणि व्यसनांत लोळणारे' अशा प्रकारचीं शेलकीं विशेषणें लावतो ! हल्लींच्या समाजव्यवस्थेंत पैशाकरितां मुलगे बापाचा खून करतांना आढळतात. बायको नवऱ्याचा खून करते असा देखावा दिसतो ! लहान मुलांच्या अंगावरचे दागिने मिळावेत म्हणून त्यांचा अमानुषपणें जीव घेणारे काय थोडेथोडके गुन्हेगार आहेत ? या द्रव्यलोभाची विलक्षण गोष्ट फ्रान्समधल्या एका गुन्हेगाराची आहे. तो एकेकट्या स्त्री-पुरुषांना कांहीं तरी निमित्त करून आपल्या खोलींत बोलवीत असे आणि त्यांचा तेथें बेमालूम रीतीनें खून करीत असे ! हेतु काय तर त्यांचीं प्रेतें एका संशोधक डॉक्टरला विकून तो डॉक्टर त्याबदली जें काय देईल तें घ्यावयाचें ! अशा रीतीनें त्यानें शंभरावर खून केले म्हणतात ! असे प्रकार ज्या समाज'व्यवस्थे'नें होतात, ती काय व्यवस्था म्हणायची का व्यवस्थेची ही चेष्टा आहे ? आजच्या समाजांत गरीबांना अन्न नाहीं, आणि श्रीमंत अजीर्णानें आजारी पडत आहेत ! वयाच्या साठसत्तर वर्षांपर्यंत घाम येईतों रोज काम करून समाजाची सेवा केली तरी म्हातारपणीं अन्नाशिवाय व औषधपाण्याशिवाय कांहींना मरण्याची पाळी येते, तर कांहीं जण ' गर्भश्रीमन्त ' असून कांहीं एक काम नाहीं म्हणून जगभर उगीच 'भटक्या' मारीत असतात ! असे एक का दोन, लाखो प्रकार. या समाजरचनेला व्यवस्था कोण म्हणणारा असेल तो असो; मला तर हा सांवळा गोंधळ वाटतो. देवानें केलेली ही रचना नव्हे तर हा एक पोरखेळ आहे. मन सुसंस्कृत करण्याचें हें मंदिर नाहीं, तर ढोंगसोंग आणि हलकटपणा शिकविण्याची ही शाळा आहे. हल्लींच्या समाजाच्या कोशांत गरिबी म्हणजे 'पाप', श्रीमन्त म्हणजे ' सर्व-गुण-संपन्न ', वळी तो कान पिळी हा 'न्याय', सरकारच्या चुका सडेतोडपणें दाखविणें हा 'राजद्रोह', निरपराधी लाखों लोकांचा राजरोस खून पाडणें म्हणजे 'युद्ध चालवणें' लोकांना फसविणें म्हणजे ' मुत्सद्देगिरी ', ढोंगें करून बाह्य शिष्टाचार पाळणें म्हणजे

'सभ्यता', आणि देव, स्वर्ग, श्रुतिस्मृति इत्यादि शब्द उच्चारणें, टिळेमाळा करणें आणि ज्याच्यावर श्रद्धा नाहीं त्याच्यावर श्रद्धा आहे असें सांगणें किंवा भासविणें म्हणजे 'धार्मिकता'! या कोशांतले हे अर्थ आमच्या सारख्यांना अमान्य आहेत. आम्हांला वाटतें कीं, खाजगी मालमत्तेचीं, दिखाऊ धर्मश्रद्धेचीं आणि ढोंगी शिष्टाचारांचीं खुळें एकदां मोडलीं म्हणजे समाजाला सत्याची भाषा समजूं लागेल आणि ती भाषा तो वापरूं लागेल, आणि खऱ्या विचारविनिमयाचा, अन्योन्य साहाय्याचा आणि सात्त्विक आनंदोपभोगाचा मार्ग मोकळा होईल. "

" वास्तविक पाहतां सर्व निराशावादी पुराणाभिमानी व नेमस्त आणि सर्व आशावादी सुधारक व जहाल असावयास पाहिजेत. निराशावाद्यांची दृष्टि नेहमीं भूतकाळावर खिळलेली असून आशावाद्यांची भविष्यकालावर लागलेली असते. यामुळें पहिला वर्ग उभयविध सुधारणांविषयीं सारखाच उदासीन व दुसरा वर्ग त्याविषयीं सारखाच जहाल असला पाहिजे; मग त्या सुधारणा राजकीय असोत किंवा सामाजिक असोत. " (पान ४७-४८)

सर्व आशावादी उभयविध जहाल असावेत व सर्व निराशावादी उभयविध नेमस्त असले पाहिजेत, याच्या जोडीला हरिहरराव व (बहुधा कोल्हटकर) यांचा आणखी असा एक सिद्धान्त आहे कीं, " कल्पना व भावना हीं अंगें बाल्यावस्थेंत प्रौढावस्थेंतल्या इतक्याच, किंबहुना अधिक परिणतावस्थेंत असल्यामुळें प्रत्येक इसम अपवादात्मक परिस्थितीच्या अभावीं आरंभीं पुराणाभिमानी असतो व मागाहून आपल्या उपजत मनोधर्माप्रमाणें सुधारक किंवा जहाल होत जातो. " या दोन्ही सिद्धान्तांसंबंधानें थोडक्यांत माझें म्हणणें सांगावयाचें म्हणजे मी असें म्हणेन कीं, आशावादी लोक मूलतः उभयविध जहाल असतात व निराशावादी लोक नेमस्त असतात, हें म्हणणें कांहीं अंशीं बरोबर असलें तरी सर्व जहाल आशावादी व सर्व नेमस्त निराशावादी असें कोणी समजूं नये. इंग्लंडमध्यें स्थितिप्रिय (Conservative) जो पक्ष आहे त्यांतल्या सर्व लोकांची प्रकृति व त्यांची प्रवृत्ति निराशावादाकडे झुकते काय ? ग्लॅडस्टन प्रथम स्थितिप्रिय (Conservative) पक्षाचा होता, नंतर प्रगतिप्रिय पक्षाला मिळाला. तेव्हां यावरून प्रथम तो निराशावादी व नंतर आशावादी बनला असें म्हणावयाचें काय ? चर्चिल, चेंबर्लेन वगैरेंनीं पक्षान्तर केलें

तेव्हां त्यांच्या आशा-निराशावादांत क्रांति झाली होती काय ? तसेंच प्रत्येक मनुष्य 'आरंभीं पुराणाभिमानी असतो' (पा. ५१) यांतील 'आरंभीं' शब्दाचा अर्थ अनिश्चित आहे. मनुष्य जात्या पुराणप्रिय असतो असें म्हणावयाचें असलें तर तें खोटें आहे. कारण स्थितिप्रियता व प्रगतिप्रियता अथवा बंडखोरी या दोन्ही प्रवृत्ती मनुष्यामध्यें जात्या असतात, असें मानसशास्त्रज्ञ सांगतात. बाल्यामध्येंहि या दोन्ही प्रवृत्ती दिसून येतात; त्या तत्कालिन परिस्थितिभेदानें किंवा वृत्तिभेदानें किंवा प्रकृतिभेदानें कमीअधिक प्रमाणांत दृग्गोचर होतात एवढेंच. बाल्यावस्थेंत कल्पना व भावना प्रबलतर असतात हें जरी घटकाभर खरें धरलें, तरी या कल्पनाभावनाप्राधान्यामुळें बाल्यामध्यें वास्तविक जहालपणा किंवा सुधारकपणा दिसून आला पाहिजे. पुराणाभिमानित्व या कारणामुळें कसें उत्पन्न होईल ? यौवनामध्यें मनुष्य जहाल किंवा सुधारक असतो व नंतर अनुभवाचा इंगा फिरला म्हणजे नेमस्त बनतो असें म्हणावें तर तेंहि बरोबर दिसत नाहीं. कारण कित्येक लोक यौवनामध्येंही स्थितिप्रिय व नेमस्त असतात. अस्तु. या मुद्द्याची रजा घेण्यापूर्वीं मोर्लेचें एक विधान सांगावेंसें वाटतें. तो एके ठिकाणीं पुढील आशयाचें वाक्य लिहितोः—

"A man who is not a radical in his youth and a conservative in his old age is not worth much."

## हे वादविवाद कादंबरीला आवश्यक आहेत काय ?

वर उद्धृत केलेले व त्यांच्यासारखे इतर वाङ्मयात्मक वगैरे वादविवाद कोल्हटकरांची विद्वत्ता व त्यांचा मार्मिकपणा दर्शवित असले तरी ते कादंबरीला आवश्यक आहेत कीं काय, हा प्रश्न उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाहीं. ते मार्मिक व विद्वत्ताप्रचुरच नव्हे, तर मनोरंजक आहेत व कादंबरीला अलंकारभूत आहेत असें मला तरी वाटतें. पण कांहीं आक्षेपक लगेच मला म्हणतील कीं, "हे अलंकार आहेत हें कबूल; ते मूल्यवान् आहेत, सुंदर आहेत हेंहि कबूल; पण नाकापेक्षां मोतीं जड अशा प्रकारचे हे अलंकार आहेत एवढेंच." या आक्षेपकांना मी पहिल्या प्रथम असें विचारतों कीं, हे अलंकार जड किंवा बोजड तुम्ही कसे ठरवितां ? सरी नाकांत अडकविली तर

जड वाटेल, पण गळ्याला वाटणार नाहीं. पाटल्या किंवा बांगड्या कानांत बेढब दिसतील, पण हातांत तशा दिसत नाहींत. शिवाय हेंहि ध्यानांत धरलें पाहिजे कीं, एकीच्या शरिराच्या किंवा स्वरूपाच्या किंवा अंगकांतीच्या दृष्टीनें जो दागिना शोभादायक होणार नाहीं तो दुसरीला कदाचित् शोभादायक होईल. आणखी असें कीं, एकीच्या दारिद्र्यामुळें जो अलंकार 'उसना आणिलेला' अशी लोकांची समजूत करील, तोच अलंकार एखाद्या गर्भश्रीमन्तिणीला शोभून जाईल. काळ, वेळ, प्रसंग, कार्य इत्यादिकांचाहि अशा बाबतींत विचार करावा लागतो. सणावारीं किंवा विवाहादि मंगलप्रसंगीं जे अलंकार शोभतील ते इतर प्रसंगीं शोभणार नाहींत. या सर्व गोष्टींचा प्रस्तुत प्रसंगीं निष्कर्ष असा आहे कीं, या कादंबरीचें स्वरूप, तिची ठेवण, तिचें कार्य इत्यादि गोष्टींचा विचार करतां तिच्यांतील बहुविध विदग्धचर्चात्मक भाग तिची शोभा पुष्ट करतात असें सूचित व्हावें. या कादंबरीचा नायक विद्वान् आहे; नायिका जिज्ञासू आहे, ती त्याच्याकडे लेखनकला, वादकुशलता वगैरे शिकण्याकरितां आलेली आहे; त्यांचे अनेक प्रसंगीं अनेक विषयांवर जे वादविवाद होत त्यांत सहजगत्या एखाद्याच्या मुखांतून जो शब्द निघे किंवा जो विचार प्रकट होई त्यामुळें त्यांच्या वाढत्या प्रेमाच्या प्रवाहांत हरतऱ्हेचे तरंग उद्भवत व त्यांची गति कित्येक वेळां मंद किंवा तीव्र होई. नायकाचें वर्तन दुटप्पीपणाचें आहे असें अशा चर्चेच्या एका प्रसंगीं त्याच्या बोलण्यावरूनच तिला वाटूं लागलें; नायकाचें मन 'कौन्तेया' बद्दल असूयेनें दूषित आहे असा अशा प्रसंगींच्या सहजोद्गारांवरूनच तिला संशय येऊं लागला; नायकानें तिचें संशयनिरसन न करण्याचें कारणहि त्याची विशिष्ट प्रकारची ( बरोबर किंवा चुकीची ) विचारसरणी होती. फार काय, नायकाचें जीवित म्हणजे विचार करणें व विचार करावयास लावणें, चर्चा करणें व चर्चा करावयास लावणें हें आहे. त्याच्या जीविताचें धोरणहि विशिष्ट विचारपद्धतीनें ठरविलेलें, नायिकेलाहि विचारविनिमयाची आवड, तिला नायक आवडतो तो त्याच्या धनामुळें, अधिकारामुळें किंवा सौंदर्यामुळें नव्हे, तर त्याच्या विचारसंपत्तीमुळें, वादकौशल्यामुळें व आचारविचारसंगतीमुळें; तो तिला अप्रिय होतो तो आचारविचारसंगतीला बाधा आणणारें असें कांहीं चर्चेच्या प्रसंगीं तिला कळतें म्हणून;—या व अशा इतर गोष्टींचा विचार करतां या कादंबरींत हरएक ठिकाणीं हरएक प्रकारची चर्चा आली तर ती अप्रस्तुत

आहे असें मला वाटत नाहीं; इतकेंच नव्हे तर ती साहजिक, किंबहुना आवश्यक वाटते.

गोळ्यांचें 'हिंदुधर्म आणि सुधारणा', प्रस्तुत परीक्षण-लेखकाची रागिणी, जॉन्सनचें रासेलस, सर आर्थर हेल्प्स् यांचें 'Friends in Council' इत्यादि पुस्तकांत हरतऱ्हेच्या विषयावर संभाषणद्वारा चर्चा केलेली आहे व या चर्चेच्या द्वारें स्वभावविशेष दाखविण्याचा व थोडाबहुत कथानकाचा परिपोष करण्याचाहि प्रयत्न केलेला आहे. परंतु 'दुटप्पी कीं दुहेरी?' या कादंबरींत कथानक, स्वभावविशेष व वादविवाद जसा व जितका एकजीव झाला आहे तितका इतरत्र दिसत नाहीं हें कबूल केलें पाहिजे. वरलि पुस्तकांपैकीं रागिणींत कांहीं ठिकाणीं व इतरांत त्याहून अधिक ठिकाणीं तात्त्विक वादविवाद बुद्ध्याच घुसडून दिले आहेत, निदान ते घालण्याचा मोह त्या लेखकांना आवरला नाहीं. व कथानकाला अनवश्यक असे भाग त्या पुस्तकांत आले आहेत. प्रस्तुत पुस्तकांतहि कांहीं स्थळें अशीं दाखवितां येतील. म्हणजे त्या ठिकाणीं कोल्हटकरांनीं केलेल्या विवेचनाचा थोडासा संकोच केला असता तरी विशेष हानि झाली नसती. पण जहाल-नेमस्त वादविवाद, टोपण नांवाबद्दलची चर्चा, चंद्रिकेच्या लघुकथेवरील टीका, हीं विवेचनें कितीहि विस्तृत असलीं किंवा तात्त्विक स्वरूपाचीं वाटलीं तरी तीं कथानकाला आवश्यकच नव्हेत तर कथानकाची अभिवृद्धि व पुष्टि करणारीं आणि त्याला शोभा व बल देणारीं आहेत असें मला तरी वाटतें.

कथानकाला incident व movement हीं पाहिजेत, म्हणजे त्या त्या पात्रांकडून स्वभावविशेषामुळें विशिष्ट कार्यें घडवून आणण्याचे किंवा बिघडविण्याचे बरेचसे बुद्धिपुरःसर प्रयत्न केले गेले पाहिजेत, तत्कार्यपोषक किंवा कार्यविघातक प्रसंग किंवा घडामोडी त्यांत पाहिजेत, कथानकांत ओघ असावा, व तें एकाच स्थितींत किंवा परिस्थितींत रेंगाळूं किंवा घुटमळूं नये या तत्त्वांचा येथें थोडक्यांत विचार करणें सोईचें आहे. कारण, तात्त्विक चर्चेच्या अलंकाराचें ओझें किंवा लोढणें गळ्यांत बाळगल्यामुळें आधींच कृति व गति incident व movement या बाबतींत वैगुण्य असलेल्या कथानकांत कथानक या दृष्टीनें अधिक वैगुण्य आलें आहे, म्हणजे इतर दृष्टींनीं हे अलंकार कितीहि चांगले असले तरी कथानक या दृष्टींनीं त्यामुळें मंदत्व, जडत्व,

व नीरसत्व आलेलें आहे असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. यासंबंधीं मला कृति व गति यांचीं लक्षणें काय हें पाहिल्या प्रथम आक्षेपकांना विचारावेंसें वाटतें. गीतेंत श्वासोच्छ्वास करणें याला देखील 'कर्म' म्हटलें आहे, आणि तें खरेंहि आहे; पण वाङ्मयात्मक कलेच्या दृष्टीनें कर्माचा इतका व्यापक अर्थ घेतां येणार नाहीं, हें मला कबूल आहे. 'कर्म' म्हटलें म्हणजे वाङ्मयकलेच्या क्षेत्रांत तरी तें होतां होईतोंपर्यंत आकस्मिक असूं नये, तर एखाद्या व्यक्तीनें विशिष्ट हेतु साध्य करण्याकरितां बुद्धिपुरःसर केलेलें असावें, त्यामुळें कथानकांतील पात्रांच्या परिस्थितींत व संबंधांत थोडाबहुत फरक झाला पाहिजे, तें कर्म त्या त्या पात्रांच्या पूर्वपरिचित स्वभावाला व वृत्तीला होतां होईतोंपर्यंत अनुरूप असलें पाहिजे, इतकेंच नव्हे, तर त्यावरून तें अनुमित करतां येण्यासारखें असलें पाहिजे, व शिवाय तें चमत्कृतिजनक परिस्थितींत झालें असावें किंवा चमत्कृतिजनक परिस्थिति अथवा परिणाम तिच्यापासून निर्माण झाले पाहिजेत किंवा होण्यासारखे असलेले पाहिजेत. 'गती' चें देखील याच धोरणानें लक्षण करतां येईल, पण या सर्व लक्षणांत 'चमत्कृतिजनक' अशा आशयाचा जो शब्द येईल त्याच्या भोंवतीं रणें पडतील. हाणाहाणी, मारामाऱ्या, 'सूड सूड सूड' असा जोराचा उच्चार, रक्तपात, खून, इत्यादिकांचेशिवाय कथानकांतील कृतिगतींचा संभवच नाहीं असें अगदींच अडाणी व असंस्कृत माणसें म्हणतील किंवा मानतील. पण बऱ्याच लोकांना असलेच प्रकार पण सौम्य स्वरूपांत पाहिजे असतील; म्हणजे त्यांना कथानकांमध्यें भांडण, बोलाचाली, गैरसमज, राग, वैर, अपशब्द, प्रेमांत बिघाड, विघ्नें, 'विलक्षण स्वार्थत्याग' 'दिव्य आत्मयज्ञ' 'अलौकिक पराक्रम' इत्यादि गोष्टी कमी अधिक प्रमाणांत व कमी अधिक सौम्य किंवा तीव्र स्वरूपांत असल्याशिवाय कथानकाला रंग चढलेला आहे, असें वाटत नाहीं, आणि त्यांत कांहीं वावगें नाहीं. पण याच गोष्टी आणखी अधिक सौम्य स्वरूपांत एखादे कादंबरींत दिसल्या तर तेथेंहि कांहीं जणांना चमत्कृति दिसणार नाहीं काय? झगझगीत व भडक रंगाचे कपडे असले तरच श्रीमंती किंवा सौंदर्य भासमान होतें असें नाहीं; उलट, अलीकडील प्रवृत्ति पाहिली तर, जितके स्त्री-पुरुष सुसंस्कृत तितका त्यांच्या पोषाखाच्या रंगाचा भडकपणा कमी. हृदय विद्ध होण्याला सुसंस्कृत मनुष्याला एक शब्द किंवा दृष्टिपात,—फार काय,

इष्टदेवतेच्या दृष्टिपाताचा अभावदेखील कित्येक वेळां पुरेसा होतो ! दुःख होण्याला श्रियाळचरित्रांतल्यासारखे हृदयविदारी प्रसंग आवश्यकच आहेत असें नाहीं. राग येण्याला दुर्वासासारखें शीघ्रकोपित्व पाहिजे किंवा इंद्र-अहिल्या-प्रसंगासारखे प्रसंग डोळ्यांनीं पाहिलेच पाहिजेत, असें सुसंस्कृतांना वाटत नाहीं. मुंगी मेली काय किंवा राजा मेला काय देवाच्या दृष्टीनें सारखेंच; पण कलाविलासाच्या दृष्टीनें सारखें नाहीं, हें मला कबूल आहे. पण कलाविलासाच्या दृष्टीनें नायकनायिकांच्या मृत्यूशिवाय किंवा अपघाताशिवाय पारणें फिटणार नाहीं असेंहि मला वाटत नाहीं.

प्रस्तुत पुस्तकांत नायिकेचें व नायकाचें एकमेकांकडे मन जें ओढलें जातें किंवा एकमेकांपासून किंचित् परावृत्त होतें किंवा संशयग्रस्त होतें तें एखाद्या प्रसंगोपात्त वाक्यामुळें होतें. हें प्रसंगोपात्त वाक्य त्या त्या व्यक्तींना अत्यंत महत्त्वाचें वाटत होतें व त्यामुळें त्याच्या जीवितप्रवाहाला निरनिराळीं वळणें-हि मिळत गेलीं व अशीं हीं वळणें ज्या प्रसंगोपात्त वाक्यामुळें किंवा शब्दा-मुळें मिळत गेलीं त्यांचा संदर्भ व त्यांचा अर्थपरिवेष उत्तम कळवण्या-करितां ते ते संवाद देणें आवश्यक होतें. हे संवाद दिले नसते तर त्या त्या व्यक्तीचे हेतु व स्वभाव पूर्णपणें कळणें अशक्य झालें असतें. ग्रंथकर्त्यानें पात्राच्या स्वभावाचें व हेतूचें पृथक्करण करण्यापेक्षां पात्रांच्या वर्तनावरून व भाषणावरून या गोष्टी सूचित करणें हें कला या दृष्टीनें अधिक श्रेयस्कर मान-ण्यांत येतें आणि तें पुष्कळ अंशीं बरोबरहि आहे. व या पुस्तकांतहि ग्रंथ-कर्त्यानें नायकनायिकांच्या शीलादिकांचें स्वतः विवेचन किंवा कथन केलेलें नाहीं, तर त्यांच्या संभाषणावरून व त्यांच्या कृतीवरून त्या गोष्टी सूचित होतील, अशी रचना केली आहे. आतां त्यांच्या या कृतींत किंवा संवादांत वाचकांच्या भावना तीव्रतेनें उद्दीपित किंवा कंपित होतील किंवा त्यांना धक्का बसेल असे भाग विशेष नसतील; पण कुतूहल जागृत करणारे किंवा भावनांना कोमलतेनें स्पर्श करणारे किंवा गुदगुल्या करणारे प्रसंग नाहींत असें नाहीं.

त्यांतली खरी गोष्ट अशी आहे कीं, ही कादंबरी novel of incident नसून novel of character आहे. वर जें विवेचन केलें त्याचा अर्थ एवढाच कीं ( Incident and Character ) ‘ कृति ’ व ‘मति’ यांत किंवा कृति व संभाषण यांत निरपेक्ष अत्यंत भिन्नता किंवा विसंगति मानण्यांत येऊं नये; तर

हे भेद सापेक्षतेनें व तारतम्यानें आणि प्राधान्याच्या दृष्टीनेंच खरे आहेत, हें वाचकांच्या ध्यानांत यावें. या कादंबरींत कृति किंवा प्रसंग यांपेक्षां संभाषण व शील यांचें प्राधान्य आहे व कथानकापेक्षां मानसपृथक्करण अधिक आहे, हें मला मान्य आहे. पण कृति किंवा प्रसंग याचा अर्थ आकुंचित करण्यांत येऊं नये. संभाषण ही देखील एक कृतिच आहे. ‘ प्रसंग ’ हे शब्दमूलक देखील असूं शकतात; कृतीवरून शील जसें दिसतें तसें मतांवरून किंवा विचार-प्रवृत्तींवरूनहि दिसूं शकतें, इत्यादि गोष्टीहि आपण ध्यानांत धरल्या पाहिजेत. ‘कृतिप्रधान’ व ‘मतिप्रधान’ कादंबऱ्या novels of incident and novels of character हा भेद **प्राधान्येन व्यपदेशाः भवन्ति** या न्यायानें मला मान्य आहे. पण हा भेद स्थूल दृष्टीनेंच खरा आहे. कृति व मति यांमध्यें अन्योन्यसंबंध कांहींच नाहीं, असें नाहीं. ‘ मति ’ ही कृतिजन्य आहे. ती कृतींत परिणत होते. व कृतीवरून अनुमित होते आणि कृति ही देखील मतिनिरपेक्षतेनें विचारांत घेतां येत नाहीं, इत्यादि गोष्टी देखील विसरून चालावयाचें नाहीं. ज्या कादंबऱ्यांमध्यें हेतुविवेचनाला व मानसपृथक्करणाला विशेष महत्त्व दिलें असतें, अशा कादंबऱ्यांना novel of psychologial interest म्हणतात, अशा मानसपृथक्करणप्रधान कादंबऱ्यांत कृति किंवा संभाषण किंवा शील या दृष्टीनें लेखन मुळींच केलेलें नसतें असें नाहीं, तर त्यांत मानसपृथक्करणाचें प्राधान्य असतें एवढेंच. या अर्थानें कोणी टीकाकारानें प्रस्तुत कादंबरींत incident (कथानक) नाहीं, असें म्हटलें तर तें विधान मी मान्य करीन. पण या विधानाच्या स्वीकारामुळें भलताच ग्रह होऊं नये म्हणून मी लगेच असेंहि सांगेन कीं, कथानक व कृति या शब्दांच्या अर्थांचा आनुषंगिक परिवेष जरा बाजूला सारून आन्तर तत्त्वाकडे नजर फेंकली व सूक्ष्म दृष्टीनें विचार केला तर नायकनायिकांच्या वृत्त्यंतरांमध्यें व वर्तनामध्यें कथानक आहे व या वृत्त्यंतरांचीं कारणें सुचविणाऱ्या संभाषणांतहि कांहीं ठिकाणीं कृति व प्रसंग दृग्गोचर होतात. आतां ही गोष्ट कोणीहि मान्य करील कीं, एकाच घरांत राहणाऱ्या व सरळ, शांत, सात्त्विक वृत्तीच्या दोनच व्यक्तींच्या व्यवहारांस कृति-मति-वैचित्र्य असूं शकलें, तरी अनेकविध परिस्थितींत अनेकविध व अनेक व्यक्तींच्या संमर्दांत जें वैचित्र्य शक्य असतें तें तेथें असणें शक्य नाहीं.

## माझ्या अनुभवाचें सार १४

ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति माम्
धर्माभासप्रसक्तैर्यत्सद्धर्मो नाशितः खलु १
अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम्
यज्जातिधर्ममोहेन हन्तुं स्वजनमुद्यताः २
सत्य-सौंदर्य-सौजन्यासक्तिधर्मो हि तात्त्विकः
वेष-भाषा-जाति-वर्णा गौणाश्चैवानुषंगिकाः ३
न श्रोष्यति जनः कश्चिज्जानन्नपि विरौम्यहम्
जनतानामके देवे भक्तिर्योजयते हि माम् ४

—उच्चाहु वामन

सिंध हैद्राबाद येथील तुरुंगांत असतांना मला पुढील अनुभव आला. रोज ४० पौंड जोंधळे पिसण्याचें [दळण्याचें] सक्त काम माझ्याकडे आलें असतां माझ्यावर देखरेख करण्याकरितां जो मुकादम-कैदी (Convict Overseer) नेमलेला होता तो पठाण होता व त्याला हिंदुस्थानांतील कोणतीहि भाषा मुळींच येत नव्हती. हिन्दीचें त्याचें आणि माझें ज्ञान 'इधर आव, उधर जाव' अशा प्रकारच्या पांच दहा वाक्यांपलीकडे विशेष कांहीं नव्हतें. तो त्या वेळीं रमजानच्या उपासांमुळें व दीड दोन वर्षें कैद अनुभवल्यामुळें अत्यन्त कृश झाला होता. त्याचा वेष निराळा, भाषा निराळी, आवडीनिवडी निराळ्या, जाति निराळी, धर्म निराळा, तथापि तो त्या अशक्त स्थितींत मला आपली पोळी देत असे व चक्की पिसण्यास मदत करीत असे. नको नको म्हटलें तरी ऐकत नसे. त्याचें हें करणें जेलच्या नियमांच्या विरुद्ध असे. जर का तो हें करतांना पकडला गेला असता तर त्याची पगडी गेली असती, म्हणजे

त्याची मुकादमी गेली असती आणि सामान्य कैद्याप्रमाणें त्याला पुनः सक्त काम करावें लागलें असतें. हा इतका धोका असतांना तो मला इतक्या आग्रहानें कां मदत करीत असे? पुष्कळ दिवसांचा उपवास, दिवसा पोटांत अन्न नाहीं, अशा स्थितींत तो चक्की पिसूं लागला म्हणजे घामाघूम व्हावयाचा, दीर्घ श्वास घेऊं लागावयाचा आणि जोंधळ्याची ती भली मोठी रास आपल्या मदतीनेंहि संपणें शक्य नाहीं असें पाहून व मला पुढील क्रमप्राप्त शिक्षा होणार हें मनांत आणून तो हळहळत असे आणि पुन: जोर करून रास कमी करण्याचा प्रयत्न करीत असे. शेवटीं दळलेलें पीठ नेण्याकरितां जेव्हां दुसरा मुकादम येई तेव्हां तो मला पुरतें काम न झाल्याबद्दल माफी व्हावी याबद्दल कांहीं तरी सबबी सांगून रदबदली करीत असे. असें तो कां करीत असे याचा विचार करूं लागल्यावर मला पुस्तकांच्याद्वारा नव्हे तर स्वानुभवानें असें दिसून आलें कीं सौजन्य हें वेष, भाषा, जाति, किंवा धर्म यांवर अवलंबून नसून तें 'माणुसकी'वर अवलंबून आहे, आणि ही माणुसकीच मनुष्याला मनुष्यत्व देते, निदान मनुष्यत्वामध्यें ही माणुसकी हेंच प्रधान अंग आहे. तो पठाण अगदीं अशिक्षित होता व त्याची सौंदर्याभिरुचि विशेष विकसित नव्हती म्हणून मनुष्याचें पूर्णत्व त्याचे अंगी नसेल, पण ज्याचा बौद्धिक विकास पुष्कळ झाला आहे आणि कलाजन्य आनंद ज्याला पुष्कळ उपभोगितां येतो पण वरील माणुसकी ज्यामध्यें नाहीं, अशा माणसापेक्षां तो पुष्कळ बरा असें मी तरी म्हणेन!

ह्या कैदी मुकादमानें आणि मी तुरुंगाचे नियम मोडले हें गैर केलें किंवा काय हा प्रश्न प्रस्तुत प्रसंगीं गौण आहे. मुद्दा असा कीं, माणुसकी ही शिक्षण, वेष, भाषा, धर्म इत्यादिकांवर विशेष अवलंबून नाहीं. आणि या प्रश्नासंबंधीं महत्त्वाचा असा दुसरा एक माझा अनुभव—जेलमधलाच अनुभव—असा कीं, एका अधिकारारूढ 'सुशिक्षित' डॉक्टरानें मी त्याचा समानधर्मी असतांना व आमांशानें आजारी असतां स्वच्छतेच्या दृष्टीनें अत्यन्त आवश्यक असलेली लंगोटीदेखील देण्याचें नाकारलें आणि आरोग्याला अपायकारक व अत्यन्त गलिच्छ झालेल्या अशा लंगोट्यांवर लज्जारक्षणाचें काम मला भागवावयास लावलें! वास्तविक डॉक्टरांचें स्वच्छतेकडे अधिक लक्ष असावयाचें आणि अधिकारारूढ डॉक्टरानें आरोग्याच्या दृष्टीनें अमुक एक गोष्ट आवश्यक

म्हटली असतां कोणालाहि ती नाहीं म्हणतां यावयाची नाहीं. पण या डॉक्टर बहाद्दरानें भर पावसाळ्यांत गळत असलेल्या खोलींत ओल्या जागेवर निजावयास लावून व दांत दुखत असल्यामुळें चर्वण करणें अशक्य असतां भाकऱ्या खावयास देऊन हा आमांश अप्रत्यक्षपणें आपणच उत्पन्न केला असतां आणि सर्व गोष्टी समजत असतां व पूर्ण अधिकार असतां, दीडदोन हात लांब अशी साधी लंगोटी देण्याचें नाकारलें ! तेव्हां येथें भाषैक्य, धर्मैक्य वगैरे सर्व होतें, पण 'माणुसकी' तेवढी नव्हती असें म्हणावयाचें नाहीं तर काय ?

माझ्या पन्नास एक वर्षांच्या आयुष्यांत असे अनेक प्रसंग आले आहेत. त्या सर्वांचा निष्कर्ष असा कीं, 'माणुसकी' ही ब्राह्मणब्राह्मणेतर, हिंदु–मुसलमान-ख्रिश्चन, स्त्री–पुरुष, शिक्षित–अशिक्षित—अशा प्रकारच्या भेदांवर अवलंबून नाहीं तर ती एक निराळी व स्वतंत्रच चीज आहे. मला ब्राह्मणेतरांनीं, ख्रिश्चनांनीं, मुसलमानांनीं, भंग्यांनीं (होय भंग्यांनींहि) मदत केली आहे व सजातीयांनीं, सधर्मीयांनीं, सुशिक्षितांनीं फसविलें आहे आणि एकदां नव्हे अनेकदां.

स्वतःच्या विशिष्ट अनुभवाची भाषा सोडून सामान्य दृष्टीनें आतां विचार करूं या. मनुष्यत्व कशांत आहे? वेषविशेष, आहारविशेष, भाषाविशेष यांवर तें अवलंबून नाहीं हें कोणीहि कबूल करील. पण शिक्षणविशेष, मतविशेष, धर्मविशेष इत्यादिकांना मीं 'वेषां'च्याच योग्यतेचें ठरविलें तर तें मात्र प्रथमदर्शनीं तरी पुष्कळांना गैर वाटेल. पण विचारांतीं माझें मत असें होत चाललेलें आहे ही गोष्ट खरी. इतिहास, काव्य, गद्य वाङ्मय, तत्त्वज्ञान, धर्म, मानसशास्त्र इत्यादि विषयांसंबंधीं मीं जें अल्पस्वल्प वाचलें आहे त्यावरून माझी अशी खात्री झाली आहे कीं, पूर्ण सत्य कोणत्याहि एका कवीच्या, इतिहासकाराच्या, दर्शनकाराच्या किंवा धर्मस्थापकाच्या हातीं लागलेलें नाहीं. आपले जुने ऋषी त्रिकालज्ञ व पूर्ण ज्ञानी होते आणि त्यांनीं सांगितलेलें खरें मानावयाचें तर कपिल ऋषीचेंच खरें कां मानावयाचें आणि कणादाचें कां नाहीं? (**कपिलो यदि सर्वज्ञः कणादो नेति का प्रमा ।।**) अशा प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात. धर्मस्थापकांना ईश्वरी साक्षात्कार होतो व त्यांचें ज्ञान पूर्ण होतें म्हणावें तर मग धर्मस्थापकांत एवढा मतभेद कां? आणि नवीन नवीन धर्म स्थापण्याची त्यांना जरूर कां वाटली ? बुद्धिवान् व विद्वान् तत्त्वज्ञांचें खरें मानावयाचें असें ठरविलें तर शंकराचार्यांचें मत खरें मानावें का रामानुजाचार्यांचें, प्लेटोचें का

आरिस्टॉटलचें, 'नवोन्मेषी विकासवाद' ( Creative Evolution ) लिहिणाऱ्या बर्गसनचें का 'वर्तनवादाचा' ( Behaviourism चा ) पुरस्कार करणाऱ्या वॉटसनचें—हे प्रश्न मनांत विकल्प उत्पन्न करतात.

तत्त्वद्रष्टे किंवा साक्षात्कारी ( Mystic ) असें ज्यांना म्हणतां येईल अशा ज्ञानेश्वर तुकारामादि लोकांची कास धरावी तर त्यांचें म्हणणें काय आहे तें स्पष्ट कळत नाहीं, आणि थोडें बहुत कळतें त्यांत मतभेद दिसतो व कित्येक स्थळीं तर तें अनुभवाच्या व विचाराच्या अगदीं उलट दिसतें. यांचे मतभेद गौण मानले आणि मतैक्यावर भर दिला तरी स्वतःला द्रष्टे किंवा साक्षात्कारी समजणाऱ्याशिवाय इतरांना तें समजतच नाहीं असें मानणें बरोबर दिसत नाहीं. प्रो. रामभाऊ रानडे, "महाराष्ट्रांतील साक्षात्कार पंथ" ("Mysticism in Maharashtra") या नांवाच्या आपल्या इंग्रजींत लिहिलेल्या उत्तम पुस्तकांत म्हणतात कीं, हे साक्षात्कार सर्व देशांत व सर्व कालखंडांमध्यें अत्यंत सात्त्विक व बुद्धिमान् लोकांना झाले आहेत, तेव्हां ते सत्यस्वरूप मानले पाहिजेत. पण जडवाद किंवा दुसरे वाद यांसंबंधीं देखील असाच युक्तिवाद करतां येणार नाहीं का ? सार्वत्रिकता, सर्वकालीनत्व किंवा सुजनाभिमतत्व यावरून एवढें फार तर म्हणतां येईल कीं, त्या त्या वादामध्यें सत्याचा अंश आहे. बाकी हें देखील म्हणणें युक्तीला पूर्णपणें धरून नाहीं. कारण वरील गुण असलेलें 'दर्शन' सर्वस्वी चूक असण्याचा संभव नाहींच, व हें तत्त्वज्ञानाचा किंवा कोणत्याहि शास्त्राचा इतिहास जाणणाऱ्याला छातीठोकपणें सांगणें कठीण पडेल. तत्त्वज्ञानाचा इतिहास सोडूनच द्या. ज्योतिःशास्त्र किंवा पदार्थविज्ञानशास्त्र यांसारख्या शास्त्रांतील देखील सार्वत्रिक व विद्वदभिमत मतें चूक ठरलेलीं नाहींत काय ? गणितशास्त्रांतल्या सिद्धांताबद्दल वास्तविक मतभेद नसावा, कारण त्यांत भावनांचा संबंध येत नाहीं व तर्क्य विषयांत जास्तींत जास्त स्पष्टता व निश्चितता असते आणि कमींत कमी संमिश्रता असते. पण आईनस्टाईनपूर्वीच्या सार्वत्रिक, सार्वकालीन व सर्वतज्ज्ञाभिमत कल्पना आज एका विशिष्ट अर्थानें तरी चूक ठरल्याच ना ?

गणित, रसायनशास्त्र, ज्योतिःशास्त्र इत्यादिकांतील भेद किंवा सामाजिक व राजकीय प्रश्नाबाबतचे मतभेद विशेष महत्त्वाचे नाहींत असें कबूल करण्यास कांहीं लोक तयार होतील. पण आध्यात्मिक किंवा धार्मिक प्रश्न हे अत्यन्त

जिव्हाळयाचे आहेत, कारण त्यांत मनुष्याचे अंतरात्म्याचाच संबंध येतो असें कांहीं लोक म्हणतील आणि या बाबतींतील प्रामाणिक मतभेदांना वेष-भेदाइतकें गौणत्व देण्यास ते तयार होणार नाहींत. पण खोल विचार केल्यास या विषयांतलिहि प्रामाणिक मतभेदांचें विशेष स्तोम माजविण्याचें कारण काय ? हें समजत नाहीं. हे विषयच मुळीं असे आहेत कीं, त्यांविषयीं मत-भेद असणें साहजिकच नव्हे तर अपरिहार्य आहे. कारण अज्ञात व अज्ञेय अशा विषयांबद्दल कोणता समंजस मनुष्य अमुकच सत्य असें निश्चयानें सांगेल? फार झालें तर तो एकंदर उपलब्ध पुरावा पाहतां मला आपलें असें वाटतें, असें सांगेल. पण तो प्रांजल असेल तर लगेच असेंहि म्हणेल कीं, या बाबतींत दुसरेंहि मत असणें व तें बरोबर असणें संभवनीय आहे, कारण निश्चयानें बोलतां येईल इतका भरभक्कम पुरावा उपलब्ध नाहीं, व निकटवर्ती भविष्यकालांत उपलब्ध होण्यासारखाहि नाहीं. आत्म्याचें अमरत्व, त्याचें प्रवृत्तिस्वातंत्र्य, ईश्वराचें अस्तित्व इत्यादि धार्मिक किंवा आध्यात्मिक प्रश्नांना अनेक तत्त्वज्ञांनीं व धर्मज्ञांनीं जीं उत्तरें दिललीं आहेत त्यांना आधा-रभूत असलेले युक्तिवाद व पुरावे पाहतां शेवटीं असेंच म्हणावें लागतें. या बाबतींत निश्चित व दुसऱ्याला पटलाच पाहिजे असा युक्तिवाद किंवा पुरावा उपलब्ध नाहीं.

ईश्वरास्तित्वच उदाहरणाकरितां घेऊं या. कांहीं सांख्य व बौद्ध निरीश्वर-वादी आहेत व अद्वैत वेदान्ती शंकराचार्यहि प्रच्छन्न बौद्ध व प्रच्छन्न निरी-श्वरवादी आहेत. या गोष्टी जुन्यापुराण्या म्हणून सोडून दिल्या व जुन्यांच्या खांद्यावर बसणाऱ्या आणि अधिक पुरावा असलेल्या आधुनिक तत्त्वज्ञांकडे पाहिलें तर त्यांत निरीश्वरवादी नाहींत का? युरोपीय आधुनिक प्रमुख मानस-शास्त्रज्ञांपैकीं शेंकडा ७५ हून अधिक लोक निरीश्वरवादी आहेत, असें कोठेंसें वाचलें तें जरी संशयित म्हणून सोडलें तरी ही गोष्ट धादान्त स्पष्ट नाहीं का कीं आधुनिक तत्त्वज्ञांमध्यें अज्ञेयवादाचा अधिकाधिक प्रसार होत आहे? मी असें म्हणत नाहीं कीं, निरीश्वरवादांत किंवा अज्ञेयवादांत अन्तिम सत्य आहे. जीवशास्त्रांतील व पदार्थविज्ञानशास्त्रांतलिहि नवे नवे प्रयोग व नवीं नवीं मतें ( Vitalism ) वगैरे पाहतां जगांत कांहीं तरी योजना दिसत असें मला स्वतःला म्हणावेंसें वाटतें. पण जडवादाचेंहि बल वर्धिष्णु आहे व वृत्ति

जयिष्णु आहे. तो जीवान्तर्गत एक एक कार्य दिवसेंदिवस आपल्या क्षेत्रांत आणीत आहे आणि त्याची प्रगति अशीच कायम राहिली तर मनुष्याचे शारीरिक व्यापारच नव्हेत तर मनाचे म्हणून ज्यांना आपण म्हणतों ते व्यापार-हि कार्यकारणभावाच्या कक्षेंत पूर्णपणें कधींच येणार नाहींत असें म्हणणें धाडसाचें वाटतें. तात्पर्य असें कीं, परमाणू व प्रेरणा (Force) यांबद्दलचीं कांहीं पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांचीं मतें 'अजडवादा' कडे झुकत आहेत, आणि जीवशास्त्रज्ञांचीं मतें तर त्याहूनहि अधिकच योजनावादाकडे झुकत आहेत. असें जरी मला दिसत असलें तरी जडवादाला मूठमाती देण्याची वेळ आली आहे असें मात्र मला म्हणतां येत नाहीं. अशा स्थितींत अमुकच सिद्धान्त खरा असा आग्रह धरण्यांत फायदा काय? शिवाय, आपलीं मतें हीं खरोखर पुष्कळ वेळां आपल्या पूर्वशिक्षणावर, आपल्या सहजप्रवृत्तींवर, आपल्या गूढ व सुप्त वासनांवर अवलंबून असतात [ –आपण निर्विकार चित्तानें विचार करावयाचें ठरविलें तरी आपल्या भावना, आपले हितसंबंध, आपल्या अंतः-कोशांतील गूढ, सुप्त व बोधरहित (Unconscious) वासना यांचा परिणाम नकळत होत असतोच असतो– ] हें सर्व ध्यानांत घेतलें म्हणजे विशिष्ट मताबद्दलचा आग्रह किती दुराग्रहस्वरूप आहे हें ध्यानांत येतें आणि अशी वृत्ति होऊं लागते कीं, ईश्वरास्तित्वादि गूढ गहन प्रश्नांबद्दल ज्यानें त्यानें आपलीं प्रामाणिक मतें स्वतःपुरतीं अवश्य स्वीकरणीय मानावींत, लोकांनाहि स्वीकारण्यास सांगावींत, पण त्यांबद्दल आग्रह धरूं नये. आणि दुसऱ्यांचा मतभेद दिसल्यास माणुसकीच्या दृष्टीनें ते त्याज्य किंवा निंद्य आहेत असें तर मुळींच मानूं नये.

लौकिकदृष्ट्या ज्यांना आपण हिंदु, ख्रिश्चन, बौद्ध, महंमदी वगैरे धर्म म्हणतों त्यांचा लौकिक तारतम्याच्या दृष्टीनें विचार केला तरी देखील हाच निष्कर्ष निघतो. ख्रिश्चन लोक मुसलमानी किंवा हिंदु धर्माला कमी लेखतात, आपण मुसलमानांना कमी लेखतों, मुसलमान हिंदूंना तुच्छ मानतात. वास्त-विक पाहतां प्रत्येक धर्मांत अंधश्रद्धेचा भाग आहे. प्रत्येक धर्माच्या कांहीं आचारांत खुळचट प्रकार आहेत, आणि प्रत्येक धर्माच्या लोकांचें मूर्खपणा-चेंच नव्हे तर नीचतेचेंहि पुष्कळ वेळां अनुकरण झालेलें आहे. उलटपक्षीं प्रत्येक धर्मांत स्वीकरणीय भाग असतो, धर्माच्या कांहीं कांहीं विधींत व आचा-

रांत पावित्र्यादि सद्भावना जागृत करण्याची शक्ति असते आणि प्रत्येक धर्मा-च्या अनुयायांनीं सौजन्य उत्कटत्वानें दाखविल्याचीं उदाहरणें आहेत. प्रत्येक धर्माचे संस्थापक सद्धेतुप्रेरित होते, प्रत्येक धर्मांच्या अधिकारी उपाध्यायवर्गांत साधुपुरुष होऊन गेले—आणि खलपुरुषहि होऊन गेले. ख्रिश्चन लोक क्राइ-स्टच्या मातेला—मेरीला—'अदूषित कुमारी' मानतात, बाप्तिस्मा देतांना अर्भ-काला थंड पाण्याच्या कुंडांत बुडवून काढतात, ख्रिश्चनेतर व अबाप्तिस्मित लोक कायमचे नरकांत जाणार असें मानतात, पण हेच लोक हिंदूंच्या वगैरे धर्मांतील खुळचट आचार-विचारांची कुचेष्टा कित्येक वेळां करतांना आढळ-तात. हिंदु, मुसलमान, पारशी, शीख वगैरे सर्व लोक स्वेतर धर्मांविषयीं बोल-तांना असेंच धोरण कित्येक वेळां स्वीकारतात. एखाद्या चांगल्या कुटुंबांतील सदाचारी हिंदु मुलीनें एखाद्या चांगल्या युरोपिअनाशीं, पारशाशीं किंवा मुसलमानाशीं लग्न केलें आणि हा विवाह केवळ धर्मभेदाशिवाय इतर सर्व दृष्टींनीं अभिनंदनीय मानण्यासारखा असला तरी देखील कांहीं हिंदु लोक अशी ओरड करूं लागतात कीं ती मुलगी अगदीं पतित झाली, तिनें आपल्या कुटुं-बाला काळिमा आणिला आणि तिच्या धर्माची अवनति होऊन तो लयास जाण्याचा मार्गाला लागला! एखाद्या पारशी स्त्रीनें असेंच केलें तरी त्या समाजांत देखील अशीच ओरड चालते. असें कां? ती स्त्री इतर दृष्ट्या सर्वतोपरी सद्वर्तनी असतां केवळ तिच्या धर्मान्तरामुळें तिचा व तिच्या समाजाचा अधःपात होऊन जिकडे तिकडे हाहाःकार व्हावा असें त्यांत काय आहे? मिश्र विवाहाची गोष्ट सोडून देऊन स्वेतर धर्मांतील समाजांत अनीति फार असते असें मानण्याची जी कांहीं लोकांत प्रवृत्ति आहे तिचा विचार क्षणभर करूं या. मिस मेयोसा-रख्या स्त्रियांना हिन्दु समाजांत अनीतीचा आणि खुळचटपणाचा बाजार भरलेला दिसतो, आणि कांहीं हिन्दु लोकांना अमेरिकेंत घटस्फोटादि प्रकार सर्रास चालून तेथील स्त्री-पुरुष पशुतुल्य स्वैर आचार करीत असतात असें वाटतें हा मोठा दोष तर खराच, पण यापेक्षां अधिक मोठा दोष असा कीं परकी समाजांत अनीतिमत्ता आहे हें पाहून पुष्कळांना आनंद होतो! वास्तविक हिन्दु समाजांत जर खरोखरीच मिस मेयोनें सांगितल्याप्रमाणें अनीतिमत्ता असेल तर त्याबद्दल सर्व विचारी ख्रिश्चन लोकांना हळहळ वाटली पाहिजे, पण तसें न होतां मिस मेयोचें पुस्तक कांहीं ख्रिश्चन लोक मिटक्या मारीत वाचतात! आमचेंहि असेंच.

( Uncle Sham ) हें अमेरिकेंतील सामाजिक गटारें उपसणारें पुस्तक आपणहि मोठ्या हौसेनें वाचतों व त्यांतील गोष्टी इतरांना तिखटमीठ लावून सांगतों ! खरें म्हटलें म्हणजे कोठेंहि वाईट प्रकार असेल तर त्याबद्दल नीतिप्रिय मनुष्याला खेद व्हावा, पण स्वेतर समाजांविषयीं व धर्मांविषयीं मनुष्याचें मन इतकें पूर्वग्रहदूषित असतें आणि सापेक्षतः आपला समाज व धर्म हे श्रेष्ठ आहेत असें सांगण्यांत व ऐकण्यांत असा कांहीं आनंद असतो कीं परधर्मीयांची निंदा ही मेवामिठाईप्रमाणें आपणांस वाटते आणि ती ऐकण्यास किंवा वाचण्यास मिळाली असतां त्यांतील अंश आपण इतरांना प्रसाद म्हणून वाटतों ! ब्राह्मण-ब्राह्मणेतरांतील भांडणें व हिंदुमुसलमानांतलि मारामाऱ्या अशाच प्रकारच्या दुरभिमानामुळें व दुःप्रवृत्तीमुळें उत्पन्न होतात. समाजकारणांत व राजकारणांत जातिभेदांमुळें व धर्मभेदांमुळें जे बिकट प्रश्न उत्पन्न झालेले आहेत त्यांच्या बुडाशीं असलाच दुरभिमान व असलीच दुःप्रवृत्ति बव्हंशीं आहे, व हे प्रश्न कधीं सुटावयाचे असतील तर धर्मभेदांना व सामाजिक भेदांना जें फाजील महत्त्व आलें आहे तें नाहींसें होईल तेव्हांच ते सुटतील. खरा सदाचार व खरें सौजन्य हें विशिष्ट जातींत जन्म घेतल्यानें प्राप्त होत नाहीं किंवा विशिष्ट धर्माचे आपण आहोंत असें म्हणवून घेतल्यानेंहि तें अंगीं येत नाहीं. सामाजिक जाति व लौकिक धर्म इत्यादिकांतलि भेद खरोखर व वेष–भाषादिकांप्रमाणें बाह्य आहेत. अंतरात्म्यांतील चांगुलपणा त्यांवर विशेष अवलंबून नाहीं. त्यांना आजकाल जें भलतें महत्त्व प्राप्त झालेलें आहे तें नाहींसें होईल तो सुदिन !

लौकिक धर्मभेदच नव्हे, तर नीतिविषयक कल्पनांतील व आचारांतील भेदांनाहि मी विशेष महत्त्व देत नाहीं. स्त्री–पुरुष आपआपल्या प्रामाणिक समजुतीप्रमाणें नीतीनें वागत आहे किंवा नाहीं या प्रश्नालाच मी महत्त्व देतों. उदाहरणें घेऊन बोलावयाचें म्हणजे मांस खाणें निषिद्ध व अविहित असें वाटत असून जो मांस खाईल तो पापी, मांसभक्षणामध्यें पापपुण्याचा कांहीं संबंध नाहीं असें ज्याला प्रामाणिकपणें वाटत असेल त्यानें मांस खाल्लें असतां त्याला मुळींच पाप लागत नाहीं असें मी मानतों. अशनपानादि क्षुल्लक गोष्टीबद्दलच नव्हे तर संततिनियमन, घटस्फोट, पुनर्विवाह इत्यादिकांसंबंधीं माझ्या विचारांचें असेंच धोरण आहे. एतद्विषयक कल्पना व आचार यांमध्यें देशभेद, कालभेद, परिस्थितिभेद, ज्ञानभेद इत्यादिकांमुळें फरक होत असतो हें धादांत स्पष्ट

आहे. यांतलि नीतिमत्व व अनीतिमत्व कालस्थलपरिस्थिति–सापेक्ष आहे; व अमुक एक कल्पना किंवा आचार नित्यत्वानें व कालस्थलादि–निरपेक्षतेनें सत् किंवा असत् ठरविणें चुकीचें आहे हें नीतिशास्त्रज्ञांना व समाजशास्त्रज्ञांना माहीत आहे. इतिहास असें सांगतो कीं बाल-हत्या करणें, अनेक स्त्रिया करणें, अनेक पति करणें इत्यादि गोष्टी नीतीच्या म्हणून कांहीं ठिकाणीं गणल्या जात होत्या! लोकांच्या बायका पळवून नेऊन 'राक्षसी विवाह' वीरांनीं किंवा विभूतींनीं लावलेले आहेत व त्यांपैकीं कांहीं देवकोटीप्रतहि गेलेले आहेत! तात्पर्य काय तर नीतिविषयक आचारविचार हे परिस्थितिसापेक्ष आहेत, त्यांतील नित्य व निरपेक्ष भाग एवढाच कीं स्वतःला जें खरोखर अशिष्ट व अनीतीचें वाटतें तें करणें पाप होय व स्वतःच्या मनाला जें खरोखर योग्य व नीतीचें वाटतें तें करण्यांत पाप नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं पाहिजे त्यानें पाहिजे तसें वागावें. स्वतःच्या मनाला 'पूत' वाटेल तें करावें म्हणजे "मनःपूतं समाचरेत्," याचा जा लौकिक अर्थ आहे त्याप्रमाणें वागावें असा अर्थ नाहीं. आपल्या समाजांतील शिष्ट लोकांची चालरीत, सत्पुरुषांची शिकवणूक, स्वतःच्या मनाशीं शांतपणें केलेला सर्वांगिण विचार, इत्यादि गमकांवरून ज्यानें त्यानें आपलें कर्तव्य-अकर्तव्य ठरवावें व त्याप्रमाणें वागावें एवढाच याचा अर्थ. कर्तव्याकर्तव्य ठरवितांना आपल्या मनोविकारांना आपण बळी तर पडत नाहीं ना, आत्मवंचना तर आपण करून घेत नाहीं, प्रचलित शिष्टाचार, धर्मवचनें वगैरेंचा त्याग करणें आपणांस प्रशस्त वाटत असल्यास असा त्याग करण्यापूर्वीं आपण पूर्ण व सर्वांगिण विचार निर्विकार चित्तानें केलेला आहे ना, अशा प्रकारचे प्रश्न मनाला अर्थात् विचारलेच पाहिजेत, पण हे विचारून झाल्यावर आणि मन व मत निश्चित झाल्यावर आपला 'सदसद्विवेक' म्हणा किंवा 'आत्मतुष्टि' म्हणा किंवा '**स्वस्य च प्रियमात्मनः**' म्हणा, हीच शेवटीं नीती-अनीतीची कसोटी आहे हें ओळखावें आणि त्याप्रमाणें वागावें. नीति-अनीति-आचारविचारांच्या बुडाशीं गेल्यावर मनुष्य आपल्या प्रामाणिक बुद्धीला अनुसरून स्वतःचें व दुसऱ्याचें हित साधण्याचा प्रयत्न करीत आहे किंवा नाहीं एवढेंच महत्त्वाचें तत्त्व हातीं लागतें. हें स्वहित व परहित [स्वसुख किंवा परसुख नव्हे हें ध्यानांत धरावें] साधण्याची जी इच्छा आहे ती किती दृढ, प्रबल, विचारयुक्त व निर्विकार आहे एवढ्यावर मनुष्याची नीतिमत्ता अवलं-

बून असते—तो कोणतीं वस्त्रें परिधान करितो, तो काय खातो-पितो, तो मक्केकडे तोंड करून अल्लाची प्रार्थना करतो का पूर्वेकडे तोंड करून सूर्याला अर्घ्य देतो, तो जातीनें ब्राम्हण आहे का अब्राम्हण आहे, तो स्वजातीय स्त्रीशीं विवाह करतो का परजातीय स्त्रीशीं, इत्यादि गोष्टींवर त्याची नीतिमत्ता अवलंबून नाहीं. या गोष्टी बाह्य, गौण व आनुषंगिक आहेत. खरें सौजन्य, खरी नीतिमत्ता, खरें धार्मिकत्व यांहून महत्त्वाच्या, जिव्हाळयाच्या व आंतर लक्षणावर अवलंबून आहे.

लौकिक धर्मांचे आचार-विचार, नीतिविषयक बाह्य आचार-विचार यांनाच असें हें गौण स्थान दिल्यावर पदार्थविज्ञानादि भौतिक शास्त्रें, कला, वाङ्मय, सामाजिक सुधारणा, राजकीय चळवळ, इत्यादिकांतील मतभेदांना व वर्तनप्रकारांना सौजन्याचा विचार करतांना विशेष प्राधान्य देण्याचें माझ्या मतें कारण नाहीं हें ओघालाच येतें. पण माझा अनुभव तर असा आहे कीं या मतभेदांना व वर्तनभेदांना आजकाल अवास्तव महत्त्व देण्यांत येतें आणि त्यामुळें पक्षभेद व पंथभेदच नव्हे तर पक्षद्वेष आणि पंथद्वेष उत्पन्न होऊन असलीं हीं हरतऱ्हेचीं भांडणें करण्यांत गुंतलेल्या व या भांडणांत आनंद मानणाऱ्या समाजांत राहणें नको असें कित्येक वेळां वाटूं लागतें. मतभिन्नता, जातिभिन्नता किंवा धर्मभिन्नता असतांना सलोख्यानें, गुण्यागोविंदानें व दुसऱ्याच्या प्रामाणिक आचार-विचारांबद्दल मनांत आदर बाळगून महाराष्ट्रीयांना काय, हिंदवासियांना काय, वागणें शक्यच नाहीं काय? ४०—५० वर्षांपूर्वी रानडे, आगरकर, गोखले यांनीं आपआपल्या प्रामाणिक समजुतीप्रमाणें समाजसुधारणा करण्याचे प्रयत्न केले. त्याबद्दल त्यांचा जो छळवाद झाला तो काय महाराष्ट्राला शोभला? हल्लीं देखील एकाद्याचें प्रथम माहात्म्य कबूल करून त्यानें अस्पृश्योद्धाराची चळवळ हातीं घेतल्याबरोबर त्याचें ‘माहात्म्य’ नाकबूल करून त्याची वाटेल तशी निर्भर्त्सना करावी आणि वारंवार भाल्यानें भोसकल्यासारखें करून त्याला छळावें हें काय महाराष्ट्राला उचित आहे? बरें एकाद्यानें कौन्सिल—प्रवेशाची तरफदारी केली आणि असहकारिता अशक्य म्हणून सांगितलें, म्हणून त्याला शाळेंतल्या पोरांकडून खादीच्या टोपीचा जाहीर अहेर करण्यांत यावा, हें तरी काय योग्य झालें? असे प्रकार पाहिले म्हणजे असें वाटूं लागतें कीं महाराष्ट्राला अद्यापि सौजन्याचा अंतरात्माच कळलेला नाहीं आणि

म्हणून त्याला लहान मुलांप्रमाणें पोपाखावरूनच मनुष्याची ओळख पटते, रानटी लोकांप्रमाणें काचेच्या मण्यांनाच तो अलंकार समजतो व एखाद्या अडाणी स्त्रीप्रमाणें पोपाखाच्या व अलंकाराच्या फाजील आवडीमुळें अंतरात्म्याच्या शुद्धाशुद्धतेकडे तो दुर्लक्ष करतो !

मला कोणी येथें असें विचारील कीं प्रामाणिक मतें जर तुम्हांला मान्य आहेत तर प्रामाणिक मतविरोध तुम्हांला अमान्य कां असावा ? खरी गोष्ट अशी आहे कीं मला मतविरोध नको आहे असें मुळींच नाहीं. प्रत्येकानें आपल्या मताचा पुरस्कार केलाच पाहिजे. अर्थात् विरोध हा अपरिहार्यच आहे. पण हलकटपणाचा विरोध आणि सौजन्ययुक्त विरोध यांत फरक आहे. पौराणिक दाखला द्यावयाचा म्हणजे अर्जुनानें भीष्माशीं व द्रोणाशीं युद्ध केलें तसें युद्ध देखील मला चालेल, मग केवळ विरोधाची गोष्टच बोलावयास नको. या जगांत पूर्ण सत्य कोणाच्याच हातीं न लागल्यामुळें ( तसेंच गैर-समज, भिन्न भावना, भिन्न हितसंबंध, कर्तव्यें इत्यादि गोष्टींमुळें ) प्रामाणिक विरोधाची शक्यताच नव्हे तर अपरिहार्यता कोणाच्याहि ध्यानांत येईल. पण विरोधामध्यें बालिशता, कुत्सितपणा, कुचेष्टा करून प्रतिष्ठा मिळविण्याची बुद्धि, एखाद्याला एकदां शत्रु म्हटल्यानतर त्याच्या पाठीस लागून व जें हातीं येईल तें फेंकून किंवा मारून त्याची जणूं काय शिकार करावयाची अशा प्रकारची रानटी प्रवृत्ति इत्यादि गोष्टींचा अभाव असला पाहिजे.

भीष्म-द्रोण व अर्जुन यांच्या विरोधाचा वर उल्लेख केला तो पौराणिक म्हणून सोडून दिला तरी आधुनिक कालांतहि उपरिनिर्दिष्ट भारती योद्धांच्या सारखीं आदरयुक्त युद्धें आयर्लंडच्या इतिहासांत अलीकडे दिसून आलीं आहेत. इंग्लंडचा आयर्लंडशीं तह झाल्यानंतर डी व्हॅलेरा याचे कांहीं अनुयायी यांना तो तह मान्य नव्हता आणि निर्भेळ स्वातंत्र्याकरितां पूर्वी जे इंग्लिशांशीं लढले त्यांना आतां तह मान्य करणाऱ्या स्वकीयांशीं लढणें प्राप्त झालें. म्हणजे तह होण्यापूर्वी इंग्लंडशीं लढतांना ज्यांनीं खांद्याला खांदा लावून साहसाचीं अनेक कामें केलीं आणि एकमेकांच्या प्राणरक्षणार्थ आपले प्राणहि धोक्यांत घातले त्यांनाच तह झाल्यावर एकमेकांना तुरुंगांत टाकण्याचें, गोळ्या घालून ठार मारण्याचें काम करण्याची पाळी आली. अशा प्रसंगीं कित्येक बापांना मुलांशीं, भावांना भावांशीं, मित्रांना मित्रांशीं लढावें लागलें पण या कालखंडाच्या इति-

हासांत भारतीय युद्धांतल्याप्रमाणें कांहीं उज्जल देखावे दिसून आले. त्यांतलें एक उदाहरण आठवतें. तें असें कीं डी व्हॅलेराच्या एका अनुयायाला त्याच्या मित्रानेंच पकडून तुरुंगांत टाकल्यावर त्याची रीतसर चौकशी होऊन गोळी घालून त्याला दुसरे दिवशीं बारा वाजतां ठार करण्याचें ठरलें. आपणाला अत्यन्त प्रिय असलेल्या मित्राला तुरुंगांत ठार करविण्याचें कटु कर्तव्य त्याच्या नशीबीं आलें, व त्यानें तें बजावलेंहि. तुरुंगांतून त्याला सोडविण्याचे हरतऱ्हेचे बरेंवाईट प्रयत्न होत होते, ते विफल करण्याकरितां त्याचा मित्र रात्रीं डोळ्यांत तेल घालून पहारेकऱ्यांवर वगैरे देखरेख करीत होता. दुसऱ्या दिवशीं बारा वाजेपर्यंत त्यानें सख्त पहारा केला. बरोबर बाराच्या ठोक्याला आपल्या मित्रावर गोळी झाडली जाऊन तो मृत झाला हें ऐकेतोंपर्यंतच कर्तव्यनिष्ठुरता त्याला स्वीकारतां आली, कारण तो लगेच स्वतः रडूं लागला व थोडक्याच अवधींत निश्चेष्ट पडला. कालान्तरानें लोकांनीं त्याला सावध केल्यावर त्याच्या मृत मित्रानें लिहिलेल्या मृत्युपत्राचा कागद त्याच्या हातांत देण्यांत आला. या मृत्युपत्रात असें लिहिलें होतें कीं, कर्तव्यनिष्ठेमुळें माझ्यासारख्या मित्राला देखील मारण्यास तूं कमी केलें नाहींस हें पाहून तुझ्याबद्दल माझा आदर पूर्वींपेक्षांहि अधिक झाला आहे आणि म्हणून माझी सर्व इस्टेट मी तुझ्या स्वाधीन करतों. तिचा विनियोग तूं पाहिजे तसा कर.

युद्धें व्हावयाचींच असलीं तर अशा प्रकारचीं 'धर्म्य युद्धें' मला पाहिजे आहेत, 'धार्मिक युद्ध' नको आहेत. धार्मिक युद्धेंहि चालतील—जर तेवढी खरीखुरी धर्मश्रद्धा असेल तर. पण मी मुंबईस होणारे जे दंगे पाहिले व त्यांचीं वर्णनें जीं ऐकिलीं त्यांवरून या दंग्यांच्या बुडाशीं खुळचट व अचरट समजुती, गैरसमज, दुरभिमान, स्वार्थसाधुत्व, इत्यादि गोष्टीच असतात असें दिसून आलें आहे. अशा दंग्यापासून तसेंच सामाजिक, राजकीय वगैरे पक्षांपक्षांमधील [illegible] भांडणापासून लोकांना शक्य तर निवृत्त करावें अशा हेतूनें वरील लेख लिहिला आहे, आणि त्यांत खरें सौजन्य हें विशिष्ट वेष, भाषा, जाति [illegible] पंथ, मतें इत्यादिकांवर अवलंबून नसून तें सद्बुद्धीवर अवलंबून आहे आणि ज्यानें त्यानें आपल्या प्रामाणिक समजुतीला अनुसरून वागावें आणि इतरांच्या प्रामाणिक समजुतीबद्दल आदर बाळगावा इ. इत्यादि गोष्टी यथाशक्य सांगितल्या आहेत. व त्यांतील ग्राह्यांश घेऊन इतर

अंशाची उपेक्षा करावी, [ किंवा विरोध करावयाचा असल्यास तोहि करावा, पण कुचेष्टेच्या दृष्टीनें किंवा वैरभावानें करूं नये. ] एवढीच विनंति आहे.

# विचार-विलास

## विजापूरकरांचें स्मरण



इतका वेळ अण्णांचा स्तुतिपाठ आपण गाइला, पण ते म्हणजे अगदीं निर्दोष होते, त्यांच्या हातून कांहीं चुका झाल्या नाहींत, असें समजण्याचें कारण नाहीं. दोष कोणांत नाहींत ? चंद्रावरच नव्हे तर सूर्यावरदेखील डाग आहेत. अण्णांचा दोष म्हणजे गुणातिरेक ! माझ्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं कांहीं गुणांचा अतिरेक झाला म्हणजे ते दोष-स्वरूप होऊं लागतात. उदाहरणार्थ, समर्थविद्यालयांत केंस ठेवणें वगैरे सुधारकी प्रकार चालूं न देणें चांगलें असेल व होतां होईतों आपल्या चालीरीतींना धरून शिक्षण द्यावयाचें हा एक हेतु धरून काढलेल्या संस्थेंत अशा प्रकारचें धोरण असलें तर त्यांत कांहीं वाईट नाहीं. परंतु एखाद्या केंस ठेवलेल्या मुलाला बळजबरीनें केंस काढावयास लावणें हें कसेंसेंच वाटतें. विदेशी माल तुम्ही घेऊं नका, पण एखाद्या पालकाला आपल्या आजारी मुलाला कॉडलिव्हर ऑईल द्यावेंसें वाटलें तर त्याबद्दल विशेष आग्रहाची हरकत घेणें हा तरी दुराग्रहच. आपल्या बंधूंवर प्रेम असणें चांगलें, त्यांच्यावर विशेष विश्वास असणें चांगलें, पण या बंधु-प्रेमांत इतरांनीं भागीदार व्हावें, झालेंच पाहिजे अशा आग्रहपूर्वक इच्छेला 'दुराग्रह' असें सुटसुटीत नांव दिलें तर काय चूक ? वरील दोष सत्यकथनाच्या दृष्टीनें सांगितले खरे; पण सत्यकथनाची दृष्टीच लेखणीला पुढें जाऊं न देतां लेखकाला सांगते कीं, " आपल्या प्रामाणिक मतांप्रमाणें वागणें याला दोष म्हणणारे तुम्ही कोण ? ज्यानें त्यानें आपल्या मताप्रमाणें वागावें, आपल्या शक्तीप्रमाणें कार्य करावें, असाच जर धर्माचा सिद्धान्त आहे, तर स्वमतानुसार वागणाऱ्याला व स्वशक्तीची पराकाष्ठा करून ध्येयसिद्ध्यर्थ सोत्साह व साग्रह परिश्रम करणाऱ्याला तुम्हीं दोष कां देतां ?

अगदीं खरें आहे. अण्णांसारख्यांचे गुण हे कित्येक वेळां दोषस्वरूप होत हें म्हणणें व्यर्थ आहे. जगांत ज्यानें त्यानें आपलें ध्येय निश्चित करून तन्निष्ठ रहावें व यथामति यथाशक्ति तत्सिद्ध्यर्थ कार्य करीत रहावें, हाच धर्मशास्त्रांचा अन्तिम सिद्धान्त. अण्णांसारख्यांचें स्मरण आपणास पुनीत करतें, त्यांचीं चरित्रें आपणांस " दुःखांना भितां काय ? दुःखें येतील आणि जातील; प्राण देखील जावयाचे आहेत, मग सुखदुःखांचें काय ? जगांत कोठें चिरंतनत्व असेल तर तें सद्बुद्धींत व सत्कार्यांत आहे." असें सांगतात व आपलें अंगीकृत कार्य उत्साहानें, नेटानें, चिकाटीनें, संकटांना धैर्यानें तोंड देऊन, नैराश्याला कधीं बळी न पडतां, शांतपणें, धिम्मेपणानें, निरभिमानपूर्वक, चंद्रसूर्यांप्रमाणें ( **without haste, without rest** ) करीत रहावें असें बजावतात, तेव्हां हा उपदेश वंद्य समजून स्वकृत उचित कार्याला लागावें हें बरें.

× × ×

## स्वधर्माचें पालन

२

**दुपारीं**—चहा घेतांना विनायकरावांनीं काळोबा बोरवणकरांशीं बोलतांना जे कांहीं विचार सांगितले ते मला चांगले सांगतां येणार नाहींत, पण ते फार उच्च होते. आणि ऐकतांना फार मौज वाटली. आपला समाज बिघडला आहे, जगाची सामाजिक घटनाच चुकीची झालेली आहे म्हणून मनुष्याला आपली सर्वांगीण उन्नति करून घेतां येत नाहीं, असा त्यांच्या म्हणण्याचा रोख होता. मनुष्यामध्यें हरतऱ्हेच्या वासना, सहज–प्रेरणा, आवडी–निवडी, आकांक्षा वगैरे आहेत, पण समाजरचनेमुळें सगळ्यांची यथायोग्य एकवाक्यता होत नाहीं, एखाददुसऱ्या अंगालाच भलतेंच महत्त्व येऊन स्वभाव "एकारतो आणि बेढब होतो" असें ते म्हणाले, मनुष्याला सगळं कांहीं पाहिजे आहे. त्याला नीति पाहिजे, कलाहि पाहिजे, द्रव्य पाहिजे; मानसन्मानहि पाहिजे. स्वार्थीपणा त्याच्यांत आहे, परोपकारबुद्धिहि आहे. भोग पाहिजे, त्यागहि पाहिजे; तात्पर्य, मनुष्याचें कोणत्याहि एक

गोष्टीनें पूर्ण समाधान व्हावयाचें नाहीं. त्याला द्रव्य पाहिजे, अधिकार पाहिजे, बायकोचें सुख पाहिजे, मुलें–बाळें पाहिजेत; आणि ज्ञान, देशभक्ति, कलोपासना वगैरेहि पाहिजेत. या सगळ्या वासनांची तृप्ति होणें सध्यांच्या समाजांत शक्य नाहीं, म्हणून त्याला कांहीं वासनांची लपवा-छपवी करावी लागते, कांहींची मुस्कटदाबी करावी लागते, कांहीं दाबून दडपून ठेवाव्या लागतात आणि कांहीं वासना माराव्या लागतात. पण वासना कधींच पुरत्या मरत नाहींत. त्यांची फार तर मुस्कटदाबी आपण करूं शकूं. आणि पोटांत त्यांना कोंडून ठेवूं. पण वेताच्या पेटाऱ्यांत ठेवलेल्या सापाप्रमाणें संधि सांडतांच या वासना फणा बाहेर काढतात ! जगांतलीं दुःखें, कांहीं वासना (––वाईट तशा चांगल्या वासना––) दाबाव्या किंवा बाह्यतः तरी माराव्या लागल्यामुळें उत्पन्न झालीं आहेत. समाज–घटना सुधारल्याशिवाय वासनांची घातुक मुस्कटदाबी, चेपाचेपी, लपवाछपवी, चेंगराचेंगरी, थांबावयाची नाहीं आणि पूर्ण सुख कधीं मिळावयाचें नाहीं. तोंपर्यंत कोणी केवळ नीतीचे उपासक, कोणी केवळ कलेचे उपासक, कोणी त्याग करणारे, कोणी भोग उपभोगणारे; कोणी ज्ञानाच्या पाठीमागें, कोणी द्रव्याच्या पाठीमागें; कोणी राजकारणी, कोणी समाजसुधारक; कोणी सीतासावित्रींची स्तुतिस्तोत्रें जपणारे तर कोणी घटस्फोट आणि कंत्राटी लग्नं मागणारे–असे एकांगी एकारलेले, बेढब, विद्रूप, असमाधानी, दुःखीकष्टी लोक दिसावयाचे ! अशा स्थितींत ज्यानें त्यानें आपल्या शरीरप्रकृतीला मानवेल, मनःप्रकृतीला आवडेल, आर्थिक परिस्थितीला जुळेल, भावनांना रुचेल, मताला पटेल, असा एखादा मार्ग स्वीकारावा आणि तोच आपला ‘ स्व-धर्म ’ मानून त्यांत रममाण व्हावें. आपला हा ‘ स्व-धर्म ’ इतरांनाहि ‘ स्व-धर्म ’ वाटलाच पाहिजे, असा आग्रह धरण्यांत अर्थ नाहीं. प्रत्येक जण आपआपला ‘ स्व-धर्म ’ आचरूं लागला आणि इतरांच्या स्वधर्मांत ढवळाढवळ करण्याचें किंवा त्याची निंदा-नालस्ती करण्याचें टाळूं लागला तर जगांतलीं निम्याहून अधिक भांडणें कमी होतील, असें त्यांनीं शेवटीं सांगितलें.

× × ×

## वाङ्मयनिर्मितीची मीमांसा ३

विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट समाजांत जें वाङ्मय असतें त्याला एक कारण नसून अनेक कारणें असतात. त्या समाजाचा पूर्वेतिहास, तत्कालीन धर्म, चालीरीती, सांस्कृतिक दर्जा, इतर लोकांशीं असलेला संबंध, नैतिक आचारविचार, धार्मिक भावना, आर्थिक आकांक्षांना मिळत असलेला वाव किंवा त्याचा अभाव, तत्कालिन समाजांत युगप्रवर्तक व अलौकिक व्यक्तीचें अस्तित्व किंवा त्याचा अभाव, त्याचप्रमाणें त्या त्या वाङ्मयसेवकाची मनाची ठेवण, त्याचें शिक्षण, त्याचा सामाजिक दर्जा, त्याच्या इच्छा–आकांक्षा, त्याची तृप्ति-अतृप्ति, त्याच्या सुप्त किंवा नेणिवेंत दडलेल्या किंवा दाबलेल्या इच्छा–आकांक्षा, त्याच्या सहजप्रेरणांचें सापेक्ष बलाबल, त्याच्या जाणीवयुक्त भाव-भावना, त्याच्या नेणिवेंतील मनोगंड (complexe-) इत्यादि अनेक व अनेकविध कारणांवर त्या त्या वाङ्मयसेवकाचें वाङ्मय अवलंबून असतें. त्यांतील एखाद दुसरें कामवासनात्मक किंवा आर्थिक अंग घेऊन त्याच्या आधारेंच सर्व कारणमीमांसा करावयाची यांत यथार्थ प्रतीतीपेक्षां अपूर्ण विचारोत्पन्न अभिनिवेश अधिक दिसतो. आधीं मन ही चीज काय आहे हें अद्यापि कळलेलें नाहीं. त्याचे व्यापार कांहीं कळले आहेत. पण अज्ञात, प्रच्छन्न, सुप्त, नेणिवेंत दडलेले व दडपलेले असे व्यापारहि त्याचे असतात हेंहि आतां थोडेंबहुत कळलें आहे. मनांत क्रोधलोभादि अनेक मनोविकार आहेत, कामप्रेरणादि अनेक बऱ्यावाईट प्रेरणा आहेत, त्यांची गुंतागुंत विलक्षण आहे, इत्यादि गोष्टी ज्याला कळल्या आहेत, तो सामान्य व्यक्तीच्या मनोव्यापारांचीहि निश्चित व परिपूर्ण मीमांसा आपणांस झालेली आहे असें म्हणणार नाहीं; मग प्रतिभावान् लोकांच्या मनोव्यापारांची मीमांसा छातीठोकपणें करणें तर दूरच राहिलें, आणि सामाजिक मनोरचनेचें निरपवाद व निःशंक शास्त्र बनवूं पाहणें हें तर त्याहूनहि दूर! तोतरें बोलणारा मनुष्य मोठा वक्ता होईल असें आपणांस वाटतें काय? पण ग्रीस देशांतील प्रसिद्ध वक्ता डेमॉस्थेनिस हा तोतरा होता तरी देखील नव्हे, तर तोतरा होता म्हणून, प्रसिद्ध वक्ता झाला हें अॅडलर या मानसशास्त्रज्ञाचें मत आहे आणि तें खरें दिसतें. पुरुषविषयक प्रेम असतें म्हणूनच कांहीं स्त्रिया पुरुषद्वेष करि-

तात, त्या भीरु असतात म्हणूनच कित्येकवेळां उद्धटपणें वागतात, धाडसी गुन्हेगार हेहि खरोखर भित्रे असतात, धर्ममठांत जाणाऱ्या सच्छील जोगिणींच्या मनांत सुप्त कामवासना असते, अशा प्रकारचे दाखले आहेत. एखाद्या मोठ्या किल्ल्यांत दिवाणखाने, हिरें-माणकें, झुंबरें, गाद्यागिरद्या, सुवासिक तेलें व अत्तरें असतात आणि त्याचबरोबर घाणेरडें पाणी वाहून नेणारे नळ, गटारें, पायखाने. वगैरेहि असतात. उत्तम कलावंत आणि सच्छील ब्राह्मणहि तेथें दिसतात; त्याचप्रमाणें कलावंतिणी व बदमाष लोक यांचीहि तेथें कमतरता नसते; त्याचप्रमाणें मनाची स्थिति आहे. किल्ल्यांत गुप्त भुयारें असतात, गुप्त दारूखाने असतात, गुप्त पोलिस असतात, त्याप्रमाणें मनांतहि अनेक बरींवाईट गुप्तें असतात. अशा या मनाची पूर्ण मीमांसा कोण करणार? प्रतिभावान् मनुष्याबद्दल तर फारच मौजेचें गहन-गूढत्व. कांहीं त्यांना 'दैवी' म्हणणार, तर ड्रायडन हा कवि 'Genius to madness is near allied' असें म्हणणार! शेक्सपिअर तर कामिजन, कवि आणि वेडे यांना एका पंक्तींत बसवून श्वा, युवा व मघवा यांना एका सूत्रांत ओंवणाऱ्या पाणिनीवर ताण करतो! पॅव्लाव्ह ( Pavlov ) व इतर वर्तनवादी ( Behaviourists ) मनाला नियमाच्या कक्षेत आणूं पाहात आहेत, पण अद्यापि हें अणूहून अणु असलेलें मन त्यांना झुकांड्या देत आहे. अशा या लोकविलक्षण मनाची मीमांसा करतांना अनेक सहज-प्रेरणा, अनेक सुप्त-गुप्त व प्रकट वासना, अनेक इच्छा-आकांक्षा, त्यांचें अस्तित्व, त्यांच्या गुंतागुंती आणि अंतःकलह इत्यादि सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्या पाहिजेत. केवळ प्रकट किंवा सुप्त काम किंवा लोभ, अशा प्रकारच्या एकाच तत्त्वाच्या आधारें विवेचन करणें धाडसाचें व धोक्याचें आहे.

'कारणानामनेकता' ( Plurality of causes ) हें तत्त्व मान्य केल्यास ललितवाङ्मय हें खऱ्या जगाला विसरण्याकरतां आहे (It is an escape from life ) खऱ्या जगांत जें सुख मिळत नाहीं तें कल्पनासृष्टींतल्या मनोराज्यांत तरी उपभोगूं या; अशा भावनेनें सेविलें जातें, तें केवळ आनंदाकरितां असतें, ती एक प्रकारची क्रीडा आहे, ती अफू आहे, इत्यादि प्रा. फडके, प्रभृतींच्या मतांचाहि एकांगीपणा दिसून येईल. विशिष्ट व्यक्तींच्या विशिष्ट

मनोवस्थेला ही उपपत्ति बरोबर लागू पडेल; ती सर्वत्र सर्वदा आणि सर्व व्यक्तींच्या बाबतींत लागू पडेल असें नाहीं. इतर उपपत्तींचें असेंच आहे. मौज अशी आहे कीं, वाङ्मयाला क्रीडा ठरविणाऱ्या प्रा. फडक्यांनीं 'प्रतिभा-साधन' नामक आपल्या सुंदर ग्रंथांत भाषाशैलीविषयीं लिहितांना लेखकाला अंतःकरण पाहिजे, तरच त्याला उत्तम भाषाशैली साध्य करतां येईल असें म्हटलें आहे आणि वाङ्मय म्हणजे केवळ क्रीडा नव्हे असें सूचित केलें आहे. मला वाटतें त्याच प्रकरणांत त्यांनीं 'विचार-सौंदर्या'चा उल्लेख केला आहे. हें सौंदर्य विचारांच्या मांडणीचें असून तें त्यांच्या गहनत्वावर अवलंबून नाहीं असें ते म्हणतील. अपक्व किंवा अयथार्थ विचाराची मांडणी कितीहि सुंदर केली, तरी तिनें ललित-वाङ्मयाचें 'आनंद' हें जें ध्येय तें परिपूर्णतेनें साध्य होईल काय ? आणि दोन ललितकृतींत मांडणी सारखीच सुंदर आहे आणि विचारांच्या गहनतेंत मात्र मूल्यभेद आहे, तर या ललित कृतींच्या मूल्यमीमांसेंत अधिक गुण गहनविचारात्मक कृतीला प्रा. फडके देणार नाहींत काय? तसेंच कलेचें ध्येय 'आनंद' हें ठरल्यावर या आनंदामध्यें माती किंवा विष कालविणारा भाग ललितवाङ्मयांत येणें अप्रशस्त; अर्थात् नैतिक दृष्ट्या आनंदाला कलुषित किंवा शबलित करणारा भाग ललितकृतीला गौणत्व आणणारा आहे हें देखील प्रो. फडके यांना मान्य करण्यास हरकत नसावी. ज्ञानप्रिय, नीतिप्रिय व कलाप्रिय असे मनाचे तीन भाग आपण मानतों, पण हे विभाग आपण सोईसाठीं कल्पिलेले आहेत एवढेंच. वास्तविक हे 'विभाग' विभिन्न नाहींत, तर अन्योन्यसापेक्ष, अन्योन्याश्रयी व अन्योन्यसंस्कारक आहेत. अर्थात् एका विभागाचा किंवा अंगाचा विचार करतांना इतर अंगांकडे सोईसाठीं दुर्लक्ष करणें वेगळें, आणि दुसऱ्या अंगांना दुखापत झाली व हायहाय असे उद्गार तोंडांतून बाहेर पडूं लागले तरी त्या अंगांवर बेफिकीर वृत्तीनें आणि जाणून उमजून प्रहार करीत राहणें निराळें. आतां एवढी मात्र गोष्ट खरी कीं मनाच्या संसारांत कलेला, नीतीला आणि सत्याला एकत्र नांदावयाचें आहे, आणि त्यांचीं पूर्णावस्थेंतील ध्येयें सुसंवादी असलीं तरी अपूर्णावस्थेंतील ध्येयें विशिष्ट मर्यादेनंतर विसंवादी होऊं लागतात, तेव्हां होतां होईतों त्यांनीं आपापल्या क्षेत्राबाहेर फारसें पाहूं नये आणि आपण बरे आणि आपला मार्ग बरा अशी वृत्ति स्वीकारावी. तसेंच शेजारधर्म म्हणून होतां होईतों दुसऱ्यांशीं जुळवून घ्यावयाचें;

निदान जाणून उमजून त्याला दुखवावयाचें नाहीं, यदाकदाचित् दुखवावें लागलेंच तर अगतिक स्थितींतच, कष्टानें, दुःखी अंतःकरणानें, क्षमायाचनापूर्वक आणि शक्य तेवढ्या अल्प प्रमाणांत दुखवावयाचें अशी वृत्ति स्वीकारल्यास कला-लालसेला, नीतिप्रियतेला आणि सत्यजिज्ञासेला—सर्वांनाच हें धोरण हितावह आणि भूषणावह होईल.

× × ×

## ही आपली समाजव्यवस्था ४

लोणावळें

प्रिय तात्या यांस सा. न. वि. वि.—

आपण व आई मला भेटून गेल्यापासून शारीरिक दृष्ट्या माझी खुशाली आहे; पण मनांत फार गोंधळ माजून राहिला आहे. मी मनानें बाटत आहें—म्हणजे क्रिस्ती धर्माकडे माझा ओढा अधिक होत आहे असें नव्हे तर हल्लींच्या सर्व धर्मांचा व प्रचलित समाजव्यवस्थेचा (म्हणजे, 'अव्यवस्थे'चा) मला तिटकारा येत चालला आहे. प्रत्येक धर्मांतील तत्त्वें चांगलीं असतात, पण त्या तत्त्वांचा व्यवहारांत कांहींच उपयोग होत नाहीं, उलट हे धर्म कांहीं वाईट चालीरीतींना व नामधारी समाज 'व्यवस्थे'ला पाठिंबा देऊन गरिबांच्या नाशाला कारणीभूत होत आहेत असें माझें मत होत चाललें आहे. एकच गोष्ट पाहून माझें मत बदलत चाललें आहे असें नाहीं. जगांतील अनेक व्यवहार पाहून मला असें वाटूं आगलें आहे कीं, एक अजिबात विचार करण्याचें तरी टाळावें किंवा धार्मिकदृष्ट्या क्रान्तिकारक तरी बनावें. ही वृत्ति नुकतीच फार बळावली आहे आणि त्याला कारण पुढील अनुभव.

आमच्या वसतिगृहाच्या शेजारीं रेल्वेवर मातीखडी वगैरे गाढवांवर वाहून नेणाऱ्या वडारी लोकांचीं पालें आहेत. इतके दिवस आम्हीं येथें आहोंत पण त्या पालांत कधीं अम्हीं गेलों नव्हतों! त्या लोकांशीं कधीं बोललोंहि नाहीं. जणुं कांहीं त्यांचीं गाढवं आणि ते यांमध्यें फरक नाहीं असें आम्ही त्यांना

लेखीत होतों! आणि खरोखर म्हणावयाचें म्हणजे तेहि गाढ्यासारखेच वागत होते! दहा-बारा दिवसांपूर्वी एकाला कांहीं रोग झाला, तेव्हां त्याच्या बायका-मुलांनीं रडण्यास आरंभ केला आणि पुरुष मंडळी कांहीं तरी अघोरी उपाय करूं लागली! एकजण अगदीं जवळच असलेल्या डॉक्टरकडे गेला पण त्या साहेबाच्या क्रिस्ती धर्मानें त्याला कांहीं बुद्धि दिली नाहीं कीं फी मिळण्याची आशा नाहीं तरी आपण गरिबांना औषध द्यावें! मागाहून हिन्दु वैद्य, मुसलमानी हकीम, पारशी डॉक्टर, सगळयांकडे तो गेला, पण कोणी कांहीं आलें नाहीं. शेवटीं तो आमच्या मिसेस स्वीटबाईकडे भीतभीत आला. आणि हातांपायां पडून कांहीं तरी औषधपाणी द्या म्हणून म्हणूं लागला. मी, मास्टर काफ नांवाचा माझा एक शाळेंतला मित्र, आणि दोन चार मुली व मुलगे त्या दिवशीं बॅडमिंटनच्या मॅचिस खेळून झाल्यावर मिसेस स्वीटबाईनें प्रेमपूर्वक बोलावलें होतें म्हणून चहा पिण्यास येथें गेलों होतों. आम्हीं ती सगळी हकीगत ऐकली व या गरिबाला मदत करण्याला जाऊं या असें म्हटलें. स्वीटबाईहि तयार होत्याच. त्यांनीं सामान्य घरगुती औषधाच्या दोनतीन बाटल्या घेतल्या व आम्ही सगळींजणं वडाऱ्याच्या पालाकडे निघालों तों तेथें काय, जिकडे तिकडे आकांत चालला होता. रोगी ज्या पालांत होता त्यांत स्वीटबाई आणि मी वांकून कसा तरी शिरलों. उभं राहण्यास जागा नव्हती. आंत देखील एवढीशी जागा, पण त्यांत तो रोगी आणि त्याच्या भोंवतीं दोन पुरुष आणि दोन म्हाताऱ्या बाया, आणि आसपास घाणेरड्या गोधड्यांवर बसलेलीं तीन मुलें आणि निजलेलें अंगावरचें मूल! रोग्याच्या उशाशींच एक चूल! त्यांत गोंवऱ्या घातल्या होत्या आणि त्यामुळें त्या पालांत धूर भरून राहिला होता. मिसेस स्वीटबाईनें आरडणाऱ्या त्या सगळ्यांना आधीं गप्प बसविलें आणि मग त्या चौकशी करूं लागल्या. त्या वडाऱ्याची दहाबारा वर्षांची मुलगी होती तिनें आपल्या धाकट्या भावांना जवळ घेतलें होतें. तिची आई नुकतीच वारली होती आणि एवढ्या वयांत त्या पोरांचा सांभाळ करण्याचा भार तिच्यावर पडला होता! तिनें प्रथम माझे आणि मग स्वीटबाईचे पाय धरले आणि ओक्साबोक्सी ती रडूं लागली. रोग्याजवळ बसलेल्या बायांनीं तिची हकीकत सगळी सांगितली. आम्हीं तिला उगी केलें आणि विचारपूस करून कांहीं औषध देण्याच्या उद्योगाला लागलों. पिण्याच्या पाण्यांत परमॅगॅनेट

( Permanganate ) घालून द्यावें म्हणून स्वीटबाईनीं मोठें भांडें भरून पाणी मागितलें. पण घरांत भांडेंच रिकामें नव्हतें ! अखेरं एक कटोरें मिळालें; पण पाणीच मिळेना ! एका मातीच्या गाडग्यांत बुडाशीं थोडें राहिलेलें गढूळ पाणी शेवटीं मिळालें. त्यांत तें परमँगॅनेट किंचित् घालून लाल करून रोग्याला पिण्याकारितां दिलें व मग औषधाची एक बाटली देऊन आम्ही बाहेर पडलों. मिसेस स्वीट अगदीं घाबरलेल्या दिसल्या. त्या म्हणाल्या, " ही कॉलऱ्याची केस आहे. तुम्ही माझ्याबरोबर उगाच आल्यात. आतां घरीं गेल्याबरोबर डिसइन्फेक्टंट घालून आंघोळ करा आणि कपडे वाफारून परटाकडे द्या." मास्टर 'काफ'नें शेजारच्या पालांत रहाणाऱ्या वडाऱ्यांकडून माहिती काढिली होती त्यावरून त्याला ही कॉलऱ्याची केस आहे असें कळून चुकलें होतें; पण तो स्वतःविषयीं न घाबरतां ज्या समाजव्यवस्थेनें या लोकांना अशा अज्ञानांत आणि दारिद्र्यांत ठेविलें त्या समाजव्यवस्थेला रागारागानें शिव्याशाप देऊं लागला. "ही पहा आमची भांडवलशाही; हा पहा तुमचा हिंदुधर्म; यांना तुम्ही अस्पृश्य समजतां ना ?" तो मला म्हणाला.

"यांना नाहीं आम्ही अस्पृश्य समजत,—महार मांग वगैरेंना अस्पृश्य समजतों" मीं उत्तर दिलें.

"पण अस्पृश्यांप्रमाणें वागवतां तर खरें ना? मी तुम्हां हिंदूंनाच दोष नाहीं देत,—भांडवलशाहींतले सगळे धर्म आणि सगळे लोक सारखेच. युरोपियन, पारशी, मुसलमान-कोणी तरी डॉक्टर येथें आला का ? माणसाची किंमत नाहीं, पैशाची किंमत आहे या जगांत. "This must be done away with. I am going to be a social revolutionary." अशा रीतीनें तो चेवाचेवानें बोलूं लागला, तेव्हां मिसेस स्वीटनें त्याला दाबलें व तोहि मग बराच गप्प राहिला ( पूर्णपणें गप्प राहणें काफच्या स्वभावांतच नाहीं !) या काफबद्दल मी घरीं आलें होतें तेव्हां पुष्कळ गोष्टी मी तुम्हांला सांगितल्या आहेत. त्याचा उतावळेपणा, घायकुतेपणा, प्रेमळपणा व रागीटपणा हे सर्व गुण अतिरेकामुळें हास्यास्पद होतात, पण मला तरी तो आवडतो. आणि म्हणूनच त्याच्याशीं मी स्नेह करत्यें. त्याला सुट्टीमध्यें आपल्या घरीं बोलवूं काय ? त्याची इच्छा आहे, पण मिसेस स्वीट पाठवितील किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. पण या

पुढच्या गोष्टी आहेत. वडाऱ्यांबद्दल लिहीत होतें ती हकीगत राहिलीच ! औषधपाणी देऊन व पाणी तापवून पिण्यास सांगून आम्ही तेथून निघालों.

घरीं आल्यावर आम्ही आंघोळी करून कपडे बदलले. पण त्या वडाऱ्यांना आणि त्यांच्या मुलांबाळांना कोण आंघोळ घालतो आणि त्यांचे कपडे कोण बदलतो ? अखेर जें व्हावयाचें तेंच झालें. ७०–८० वडारी एका आठवड्यांत पटकीला बळी पडले ! ' पटकीला बळी पडले ' म्हटलें, पण हे पटकीला बळी पडले का आपल्या ' समाजव्यवस्थेला ' हा मला व काफला प्रश्न पडला आहे. याचें उत्तर, तात्या, तुम्ही द्याल काय ? ही समाजस्थिति बदलतां येणार नाहीं काय ? काफ आणि मी दोघांनीं तरी बदलण्याची प्रतिज्ञा केली आहे. पोरपण-ची प्रतिज्ञा म्हणून हंसाल तुम्ही, पण हंसण्यावारी दवडण्याचा हा प्रश्न नाहीं. सध्यां अधिक लिहीत नाहीं.

बळवंतरावांना व सुनंदरावांना नमस्कार कळविणें. बळवंतरावांच्या पत्नीला थोडा ताप येत असतो असें मागील पत्रांत लिहिलें होतेंत. ताप कसा आहे तो कळवावा.

सुशीला

*ता. क.—*

*वडाऱ्याची मुलगी व तिचे धाकटे तीन भाऊ यांना भाड्याचे पैसे देऊन मी पुण्यास एका मिशनमध्यें पाठविलें आहे. हीं मुलें बाटतील व हिंदुधर्माला मुकतील हें खरें; पण हिंदुधर्मानें त्यांच्याकरितां काय केलें आहे ? मुलीच्या शिक्षणाचा खर्च मी सोसणार आहें. लहान मुलांचा मिशनमार्फत होईल असें मिसेस् स्वीटबाई म्हणाल्या. असल्या मुलांची सोय कशी लावावयाची या बद्दल समाज विचारच करीत नाहीं. कादंबऱ्या-नाटकांना प्रेमाशिवाय विषयच नाहींत ! राजकारणी पुरुषांना ' स्वराज्या 'शिवाय सुचत नाहीं. समाज-सुधारकांना विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, ब्राह्मणब्राह्मणेतर असलेच विषय सुच-तात ! गरीब महार–मांग, वडारी–डोंबारी यांची स्थिति कशी असेल, ही स्थिति अशी कां, ती कशी सुधारावयाची, याचा कोणीच विचार करीत नाहीं ! मला तर काफप्रमाणेंच वाटूं लागलें आहे कीं, सर्व समाज किडलेला–सडलेला* ' **rotten** ' *झालेला आहे. तो सुधारण्याला उपाय म्हणजे पूर्वीची मूर्खपणाची*

*'धर्म-व्यवस्था' व 'समाज-व्यवस्था' मोडून टाकली पाहिजे. माझीं हीं मतें चुकीचीं असतील-'आहेतच' अशी मी आपली सध्यां समजूत करून घेत्यें. पण तुमच्याशीं याविषयीं बोलूं नये तर कोणाशीं बोलूं? सुट्टीमध्यें तुम्ही बळवंतराव, सुनंदराव, काफ वगैरे मंडळी एकत्र जमून आपण जर चर्चा केली तर किती चांगलें होईल! पण या पुढच्या गोष्टी! असो ताजा कलम फारच वाढला, पण इलाज नव्हता.*

*सुशीला*

× × ×

## साक्रेटीस ५

साक्रेटीस हा केवळ परोपदेश करण्यांत पंडित होता असें नाहीं तर 'आधीं केलें, मग सांगितलें' अशा कोटींतला होता. त्याचा इंद्रियनिग्रह फारच वाखाणण्यासारखा होता. अमुक एक गोष्ट पापाची किंवा अहितकारक असें कळल्यावर ती गोष्ट करण्याची त्याला प्रवृत्तिच होत नसे, इतकी त्याच्या अंगीं नीतिमत्ता बाणलेली होती. त्याच्या शत्रूंनीं त्याचीं मतें पाखंडीपणाचीं आहेत व उपदेश घातुक आहे असा त्याच्यावर आरोप ठेवला, पण त्याचें अमुक एक आचरण पापाचें आहे असा त्याच्यावर त्यांनाही आरोप ठेवतां आला नाहीं, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. त्याची वृत्ति सात्त्विक होती व त्याची रहाणी साधी होती. द्रव्याची किंवा मानमान्यतेचीहि अपेक्षा त्याला नव्हती; मग छानछोकी लोकांच्या पोशाखाची किंवा स्वादिष्ट अन्नाची त्याला आवड नव्हती, यांत कांहींच नाहीं. त्याची रहाणी साधी होती असें वर म्हटलें; पण तसें न म्हणतां ती 'कंगालपणाची' होती असें म्हटलें असतें तर तें अधिक यथार्थ झालें असतें. पायांत तो कधीं कांहीं एक घालीत नसे. देशांतील पोषाखाच्या रिवाजाप्रमाणें अंगांत कोटाखालीं सदरावजा कांहीं तरी घालणें आवश्यक होतें; पण साक्रेटीसच्या अंगांत उन्हाळ्यांत किंवा हिंवाळ्यांत फक्त एकच कोट असावयाचा! तो अन्नहि अगदीं जाडेंभरडें खात असे. साक्रेटीस ज्या काटकसरीनें रहात असे त्या काटकसरीनें जर एखाद्या गुलामाला कोणीं वाग-

विलें असतें, तर तो गुलामही वैतागानें निघून गेला असता. अशा अर्थाचें एक वाक्य झेनोफोननें लिहिलेलें आहे.

शरीराचे हाल करून घेण्यांत कांहीं मोठा पुरुषार्थ आहे, असें मात्र साक्रेटीस समजत नसे. गरिबीनें रहावें, पण परावलंबित्व टाळावें, हा एक त्याचा हेतु होता; व दुसरा असा कीं, खाण्यापिण्यासंबंधानेंहि एखाद्या गोष्टीविषयीं अडून राहण्याची संवयच वाईट, असें त्याला वाटत असे. अन्नपाण्याची शरीराला जरूर आहे तव्हां त्याचें सेवन केलेंच पाहिजे, पण या गोष्टींचेंही प्रमाण जितकें कमी होईल तितकें चांगलें, असें त्याला वाटे. 'कशाचीहि जरूर नसणें हें देवपदाप्रत जाण्यासारखें आहे; शक्य तेवढ्या कमी गोष्टींची आवश्यकता असणें म्हणजे जवळ जवळ देवतुल्य होण्यासारखें आहे' असें त्यानें एके टिकाणीं म्हटलें आहे. याचा अर्थ मुद्दाम शरीराचे हाल करून घ्यावेत असा मात्र तो करीत नसे; इतकेंच नव्हे, तर उचित प्रसंगीं तो इतरांप्रमाणें-किंबहुना इतरांहून अधिक—सुखोपभोग घेत असे. ज्या सुखोपभोगांत कांहीं पाप नाहीं किंवा कोणताही दोष नाहीं, त्याचा त्याग करण्यांत विशेष भूषण नाहीं. तर उलट तसें करणें म्हणजे एक प्रकारच्या आढ्यतेचें व अभिमानाचें लक्षण आहे, व तसें नसलें तर तें इंद्रियदमन कमी असल्याचें तरी चिन्ह आहे, असें त्याला वाटत असे. आपल्या तऱ्हेवाईकपणाचाच अभिमान बाळगणाऱ्या डाओजेनेझचा अभिमान त्याच्या फाटक्या कोटाच्या छिद्रांतून जसा डोकावत होता, किंवा आपल्या इकडील एखाद्या दांभिक ब्राह्मणाच्या कांदे लसूण वगैरेच्या त्यागांतच भोंदूपणाचा जसा वास येतो, तशी साक्रेटीसची स्थिति नव्हती.

साक्रेटीसच्या पूर्वी जनरूढि, कविवचनें, देशोत्साह, मनोविकार इत्यादि अतात्त्विक गोष्टींवरच अथेनिअन-अथवा ग्रीक लोकांचाही विचार अवलंबून होता. पण साक्रेटीसनें त्यांना प्रत्येक गोष्टीचें 'तत्त्व काय' हें शोधण्यास शिकविलें. अमुक गोष्ट चांगली व अमुक वाईट, अमुक न्यायाची व अमुक अन्यायाची अशा प्रकारचा भेद आपण कोणत्या तत्त्वावर करतों, व आपण कोणत्या अर्थानें हे शब्द उच्चारतो, याचा विचार केल्याशिवाय वरील प्रकारचीं वाक्यें उच्चारणाऱ्याची चूक व त्याचा मूर्खपणा लोकांच्या निदर्शनास आणून देण्याचा त्याचा प्रयत्न होता. प्रत्येकानें आपली विवेकबुद्धि चाल-

वावी व विवेकबुद्धीप्रमाणें चालावें, अशी त्याची इच्छा होती. जी गोष्ट विवेकास योग्य दिसत नाहीं, जी संयुक्तिक आहे असें दाखवितां येत नाहीं, ती गोष्ट अनुचित व अग्राह्य होय, असें त्याचें मत होतें. मनुष्य हाच प्रत्येक गोष्टीस प्रमाणभूत आहे ( Man is the measure of all things ) हें त्याचें मूलतत्त्व असल्यामुळें स्वतःच्या बुद्धीला जें पटणार नाहीं, तें अग्राह्य समजणें, हें साहजिकच आहे. आतां वरील मूलतत्त्वावरून ज्याला जें वाटेल तें खरें, असेंही एक अनुमान निघेलच हें साक्रटीसला एका अर्थीं मान्य होतें. संपूर्ण परमसत्य कोणासही कळलें नसल्यामुळें अमक्याचें मत खरें व अमक्याचें खोटें म्हणतां येणार नाहीं; पण कांहीं मतें सत्य धरून चालल्यास तीं इतर मतांहून अधिक उपयुक्त आहेत, या अर्थानें मतांची निवडानिवड करतां येईल असें तो म्हणत असे, व या दृष्टीनें विचार करण्यास तो लोकांना आग्रह करीत असे. 'आत्मज्ञान करून घ्या' असें त्याचें एक आवडतें, उपदेशात्मक सूत्र होतें. 'आपण बोलतों काय व चालतों कसें यांची तात्विक दृष्टीनें जो अंतःपरीक्षा करीत नाहीं, त्याचें जीवित निरर्थक होय,' असें तो म्हणत असे. अनिश्चितार्थ शब्द वापरणें किंवा अपरीक्षितहेतु कर्म करणें, याच्यांत त्या त्या वेळेपुरताच दोष आहे, असें नव्हे, तर हीं कर्में अंतरात्म्याला दूषित करतात, असें त्याला वाटत असे. अनिश्चितार्थ शब्द वापरण्यानें विचार व अनुमानें चुकीचीं होतात, हें तर उघड आहे; पण त्यापासून परिच्छेदही व विवेकशून्य विचार करण्याची आलस्यात्मक दुष्ट संवय लागते व जिज्ञासा जडत्व पावते, हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे. अपरीक्षितहेतु कर्म केल्यानें आपल्या वृत्तींत अविवेकित्व येऊन न्यायबुद्धि व कर्तव्यनिष्ठा यांच्यांत वैगुण्य आल्याशिवाय रहात नाहीं.

हीं तत्त्वें नुसत्या शाब्दिक संभाषणांनींच नव्हे, तर आपल्या आचरणानें त्यानें शिकविण्याचा यत्न केला. असें करणें हें आपलें पवित्र व ईश्वरनिर्दिष्ट कर्तव्यकर्म आहे, असें तो समजत असे, व या शुद्ध परंतु लोकविरुद्ध, -किंबहुना लोकविद्विष्ट, कार्याच्या पायीं प्राणहानि होण्याचा बिकट प्रसंग आला, तरी त्यानें आपलें अंगीकृत कर्तव्यकर्म सोडलें नाहीं. तो तत्त्वज्ञानी नसला, तरी, 'ज्ञान' म्हणजे काय हें तो जाणत होता, तें कोणत्या मार्गानें व पद्धतीनें मिळेल याचा त्यानें पूर्णनिश्चय केला होता, आणि तो ज्ञान मिळवण्याकरितां व लोकांत ज्ञानलालसा पसरण्याकरितां प्राणाची आहुति देण्यासही तयार होता, या गोष्टी

ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. तो तत्त्ववेत्ता व तत्त्वशास्ता दर्शनकार जरी नसला, तरी त्याची तीव्र तत्त्वजिज्ञासा, त्याचें उत्साहपूर्ण तत्त्वप्रेम, त्याची अचल सत्यभक्ति व त्याची दृढ कर्तव्यनिष्ठा, या गुणांनीं तो सत्यान्वेषणी व सत्यप्रिय लोकांना नेहमींच आदरणीय वाटणार !

साक्रेटीसच्या तत्त्वांचें एक पद्धतशीर 'दर्शन' नसलें, 'मी अज्ञ आहें' असें त्यानें अगदीं मनापासून अनेकदां जरी म्हटलेलें असलें तरी त्यानें कोणत्याच तत्त्वाचा आपल्या मनाशीं निश्चय केला नव्हता, किंवा कोणत्याच मतावर त्याची श्रद्धा नव्हती असें मात्र नव्हे. 'ज्ञाना' चें त्याला इतकें महत्त्व वाटत असे कीं 'सदाचार म्हणजे ज्ञान' व 'दुराचार म्हणजे अज्ञान' असें तो म्हणत असे. 'धर्मनिष्ठा म्हणजे ईश्वरविषयक ऋणांचें ज्ञान; न्याय म्हणजे मनुष्यांमनुष्यांमधील कर्तव्यांचें ज्ञान; धैर्य म्हणजे भयास्पद गोष्टी कोणत्या व कोणत्या नाहींत याचें ज्ञान; संयम म्हणजे ग्राह्य गोष्टी कोणत्या व अग्राह्य कोणत्या याचें ज्ञान अशा प्रकारच्या साक्रेटीस व्याख्या करीत असे, असें झेनोफाननें म्हटलें आहे.

साक्रेटीसच्या तत्त्वांपासून आपणांस आतां काय घेण्यासारखें आहे ? लक्षणाची किंवा व्याख्येची माहिती साक्रेटीसपासूनच आपण शिकली पाहिजे असें नाहीं; पण आपलें ज्ञान आपण विसरलों आहोंत. हल्लीं आपण धर्मजागृतीविषयीं, देशाभिमानाविषयीं, भक्तीविषयीं, प्रेमाविषयीं वगैरे पुष्कळ बोलतों, पुष्कळ भाषणें ऐकतों व पुष्कळ लेख वाचतों. पण या शब्दांचें साक्रेटीसच्या पद्धतीनें बरोबर लक्षण करण्याचा फारसा प्रयत्न दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. 'शिक्षण' पाहिजे, धर्माभिमान पाहिजे, नीति सुधारली पाहिजे, देशाची सेवा केली पाहिजे इत्यादि वाक्यें वाक्चापल्यानें बोलणाऱ्यांपैकीं किती लोकांना, खरें शिक्षण म्हणजे काय, धर्म कशास म्हणतात, धर्म व नीति यांमध्यें फरक काय, देशाची सेवा करावयाची म्हणजे काय इ० प्रश्नांचीं उत्तरें देतां येतील ? साक्रेटीस जर आपल्या देशांत जन्मास आला, तर त्याला ग्रीससारखीच स्थिति दृष्टीस पडणार नाहीं काय ? साक्रेटीससारखा एखादा अंजन देणारा व विशद विचार करावयास लावणारा तत्त्ववेत्ता सध्यां जन्माला आल्यास त्याची फार आवश्यकता आहे, यांत शंका नाहीं. प्राण गेला तरी मी आपलीं प्रामाणिक मतें बोलून दाखवीन, अशा निर्धा-

राचा हिंदी साक्रेटीस आपणांस पाहिजे आहे. प्रक्षुब्ध व अज्ञ जनमनाला तसेंच अहंमन्य व जबरदस्त सत्तेला न जुमानतां आपली न्यायबुद्धि जें सांगेल तें बोलणारा व करणारा एखादा हिंदी साक्रेटीस या काळीं आल्यास, तो नको आहे असें कोण म्हणेल ?

× × ×

## स्त्री देशसेवा घरींच सुरू झाली पाहिजे ६

वसंतराव म्हणाले, " हल्लींच्या सुशिक्षित बायकांना या घरगुती गोष्टींतला रस कळत नाहीं, यावर तर माझा मुख्य कटाक्ष आहे. अलीकडच्या बायकांना पोषाखांतील, केश-रचनेंतील आणि खोलींतील सामानाच्या मांडणींतील सौंदर्य अधिक कळतं, पण लहान मुलांच्या खस्ता खाण्यांतलं, सासूसासऱ्यांची सेवा करण्यांतलं, त्यांचा जाच सोसण्यांतलं, सौंदर्य कळत नाहीं. माझ्या मतें या साध्या घरगुती गोष्टींत सौंदर्य, नव्हे काव्य, भरलेलें आहे. तें जाणण्याची मार्मिकता मात्र पाहिजे आहे. अलीकडच्या बायकांना गाण्यांतलं मर्म कळतं, गाणीं म्हणावींशीं वाटतात; पण पाळणा हलवितांना म्हटलेल्या ओव्यांतलं मर्म चांगलंसं समजत नाहीं, आणि म्हणूनच मुलांचा पाळणा हालवीत बसण्याचा त्यांना कंटाळा येतो. त्यांना पेटींतले सूर समजतात; पण मुलांना खेळविण्याकरितां खुळखुळे, नाहींतर पळी-पंचपात्री वाजविण्यांत जें माधुर्य आहे, त्याची त्यांना फारशी आवड नाहीं. त्या गातांना तालसूर संभाळतील; पण दीरांचं किंवा सासू-सासऱ्यांचं मन त्यांना संभाळतां येत नाहीं याचं कारण अर्थात् त्याची त्यांना आवड नाहीं, त्यांत किती काव्य आहे, हें त्यांना कळत नाहीं. त्या आपल्या अधिकाऱ्यांना आणि हक्कांना फार जपतात; पण मुलांकरितां किंवा सासू-सासऱ्याकरितां किंवा दीराकरतां कष्ट करणें, त्यांचं दु:ख हलकं करणें, त्यांना बरं वाटेल असं वागणें हें आपलें कर्तव्यच नव्हे तर हा आपला हक्क आहे ही त्यांना कल्पना नसते. व्याख्यानं ऐकण्याला जाण्याची त्यांना फार हौस; व्याख्यानांतल्या वक्तृत्वापेक्षां मुलांच्या बोबड्या बोलांत अधिक रस आहे हें त्या विसरतात!"

" मुलांच्या बोबड्या बोलांत अधिक रस असतो, कबूल आहे; कारण या वयांत तीं मुख–रस फार पाघळत असतात." नलिनी हंसत हंसत म्हणाली.

" ही कोटि चांगली आहे, पण शाब्दिक कोट्यांचा हा प्रश्न नाहीं. " वसंतरावांनीं उत्तर दिलें. " बायकांनीं व्याख्यानाला मुळींच जाऊं नये असें म्हणत नाहीं मी–पण, मुलांना मोलकरणीच्या ताब्यांत देऊन, केवळ शोभेकरतां व्याख्यानाला जाणाऱ्या आणि चित्रासारख्या खुर्च्यांवर बसणाऱ्या 'सुशिक्षित' बायकांना पाहून माझ्या पायाची आग मस्तकाला जाते. त्यांना व्याख्यानांतलं कांहीं समजत नसतं. व्याख्यानाच्या विषयाची गोडी नसते, विषय कोणता आहे हें देखील कित्येकींना ठाऊक नसतं. पण चांगलं लुगडं नेसून आणि जोडे घालून त्या खुर्ची अडवायला यायच्याच. मुलांचं घरीं काय होत असेल याची त्यांना पर्वा नाहीं. मोठ्या मोठ्या लोकांसमोर खुर्चीवर बसण्यांत त्यांना मोठं भूषण वाटतं. त्यांच्याकडे टक लावून पाहत राहणाऱ्या पुरुषांना बायका दोष देतात. पण ज्या बायकांना व्याख्यानांतलं कांहीं कळत नाहीं, आणि ज्या केवळ शोभेकरितांच लोकांनीं आपणाला पहावं म्हणूनच आलेल्या असतात त्यांच्याकडे पुरुष टक लावून पाहूं लागले तर त्यांनीं वास्तविक धन्यताच मानावी ! "

" न्याय चांगला आहे " गोविंदराव हंसत म्हणाले, " जहाल पक्षाला अगदीं शोभण्यासारखा आहे ! "

" माझ्या म्हणण्याचा अर्थ एवढाच " वसंतराव म्हणाले, " कीं, मुलाबाळांचें काम किंवा घरांतलीं अशींच दुसरीं कामें करण्यांत जें सौंदर्य, जें माधुर्य, जें काव्य आहे त्याचें अलीकडच्या बायकांना विशेष माहात्म्य वाटत नाहीं. आणि म्हणून त्या खुळ्यासारख्या व्याख्यानाला जातात आणि चित्रासारख्या तेथें खुर्चीं अडवून बसतात. ज्या बायकांना मुलेंबाळें नसतील. किंवा ज्यांना व्याख्यानांतलें बरेंच गम्य असेल, त्यांनीं पाहिजे तर व्याख्यानांना जावें. "

" पुरुषांनीं मात्र सगळ्यांनीं जावं. खरं ना ? " कमळाताईनीं विचारलें. " सगळ्या पुरुषांना तरी समजत असतो का व्याख्यानांतला विषय ? "

" मी कुठें म्हणतोय् कीं, सगळ्या पुरुषांनीं सभांना जावं म्हणून ? माझं तर उलट असं म्हणणं आहे कीं, पुरुषांनीं सुद्धां सभांमध्यें जाऊन उगाच

गर्दी करूं नये. सभांमध्यें हे लोक राष्ट्रकार्य करूं पाहात असतात, सर्व देश-बांधवांवर प्रेम करण्याच्या गोष्टी ऐकत असतात आणि स्वार्थत्यागाच्या वाता मागीत असतात, पण ज्या पुरुषांचें किंवा बायकांचें आपल्या मुलांवर पुरें प्रेम नाहीं, त्यांना, कधीं न पाहिलेल्या देशबांधवांवर प्रेम करण्यास सांगण्यांत मतलब कोणता? ज्या बायका मुलांना घरीं रडत ठेवून सभेंत फक्त मिरवायला येतात, त्यांना देश प्रेमाच्या आणि स्वार्थ त्यागाच्या गोष्टी कशाला सांगाव्यात? मी तर म्हणतों कीं, या असल्या पुरुषांनीं आणि बायकांनीं घरांतल्या माणसांशीं प्रेमानें वागण्याला आधीं शिकावें, आणि मग देशावर प्रेम करण्याच्या गोष्टी ऐकाव्यात: घरांतल्या माणसांना मर्मभेदक वाक्यें बोलण्याचें सोडावें आणि मग 'देशाकरितां सर्वांनीं भेदभाव विसरून एकजुटीनें वागावें' असा उपदेश करावा किंवा ऐकावा; आपल्या मुला-बाळांकरितां आपल्या चैनीचा स्वार्थत्याग करण्यास आधीं शिकावें आणि देशाकरितां स्वार्थत्याग किंवा प्राणत्याग करण्याच्या गोष्टी सांगाव्यात मला स्वतःला सुद्धां हें राजकारण आणि या सभा विशेष आवडत नाहींत. सभांना हजर राहाण्यापेक्षां कुटुंबांतलं काम केल्यानं मी देशाचं हित अधिक करीन असं मला वाटतं. हल्लींच्या बऱ्याच लोकांना असं वाटतं कीं, जो सभांना जातो, व्याख्यानें देतो किंवा लेख लिहितो, तोच देशाचें हित करतो. पण मला तर वाटतं कीं, जो मनुष्य निरोगी, मजबूत, मनानें सरळ, प्रामाणिक, प्रेमळ दुसऱ्यांचें दुःख पाहून कळवळणारे, मर्मभेदक वाक्यें कधीं न उच्चारणारे असे दोन चार मुलगे किंवा मुली देशाला अर्पण करतो, तो व्याख्यानें देणाऱ्या बऱ्याच वाक्पंडितांपेक्षां देशाची पुष्कळच अधिक सेवा करतो. देशांत सच्छील माणसांचा कुटुंबें वाढवा; नामधारी समाजसेवेच्या किंवा राजकीय चळवळींच्या संस्था किंवा संघ, किंवा त्यांच्या तर्फे झालेलीं व्याख्यानें यांनीं काय होणार आहे?"

*'जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः*
*जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः'*

बायबलमध्यें म्हटल्याप्रमाणें 'The soul is willing but the flesh is weak' असें म्हणण्याची कांहीं लोकांना वारंवारपाळी असल्यामुळें असमाधानाच्या नरकांत त्यांना दिवस कंठावे लागतात. ज्ञानगंगा हीच त्यांना या नरकांतून मुक्त करूं शकेल, पण हें ज्ञान म्हणजे केवळ बौद्धिक नव्हे तर हाडांमासांत, रक्तांत शिरलेलें, मिसळलेलें व भिनलेलें ज्ञान. जग म्हणजे काय, आपलें ध्येय काय, इत्यादि गोष्टींचें केवळ बौद्धिक ज्ञान हें खरोखर ज्ञानच नव्हे. जें बुद्धीला समजलें इतकेंच नव्हे तर पटलें, जें बुद्धीलाच पटलें इतकेंच नव्हे तर जें आत्म्याच्या भावनादि इतर अंगांनाहि पटलें व प्रिय झालें; जें आत्म्याच्या सर्वांगांना पटलें व प्रिय झालें इतकेंच नव्हे तर जें चांगल्या संवयीमुळें म्हणा, तपामुळें म्हणा किंवा योगाभ्यासानें म्हणा, अगदीं हाडांमासांत उतरून रोमरोमीं भरून गेलें व जें कर्मेंद्रियांच्या द्वारें आपलें रम्य, प्रसन्न व उज्ज्वल स्वरूप सदैव व्यक्त करूं लागलें तेंच खरें ज्ञान. आपल्या इकडील तत्त्वविवेचकांनीं शाब्दिक अथवा बौद्धिक ज्ञानास ज्ञानच म्हटलें नाहीं आणि खऱ्या ज्ञानामध्यें अमानित्व, अदंभित्व, स्थैर्य, वैराग्य, अहंकार इत्यादि गुणांचा अंतर्भाव केलेला आहे तो फारच मार्मिक आहे. अध्यात्मामध्यें केवळ तार्किक तत्त्वनिश्चय होऊन उपयोगाचा नाहीं; हा तत्त्वनिश्चय अंगीं बाणला पाहिजे, तो स्थिर झाला पाहिजे, तो नित्य असला पाहिजे, तरच त्याला 'ज्ञान' हें उच्च नामाभिधान मिळेल. तत्त्वदर्शन झालें आहे, पण तें नित्य नाहीं अशा स्थितींतल्या माणसाला धर्मशून्य असेंहि म्हणतां येणार नाहीं व धर्मनिष्ठ असेंहि म्हणतां येणार नाहीं. त्याची धर्मावर अनन्य अथवा अव्यभिचारी भक्ति तर नसते, पण अधर्महि त्याला प्रिय नसतो. तेव्हां काय नांव द्यावें हें ठरविणें कठीण आहे.

धर्मचर्चेचा प्रदेश अंधकारानें आणि खांचाखळग्यांनीं भरलेला आहे. तथापि या अरण्यांत ठेंचा खात खात फिरतां फिरतां सत्यस्वरूपी सूर्याचीं कांहीं किरणें झाडांमधल्या किंवा पालवीमधल्या फटींतून कशीं तरी ओझरतीं येऊन आपला मार्ग थोडाबहुत प्रकाशित करूं लागलीं आहेत. मनुष्य अगदीं रानटी असो,

नाहीं तर तो मोठा सुसंस्कृत असो, तो जगाकडे प्रथम आश्चर्ययुक्त अथवा गीतेंत म्हटल्याप्रमाणें, 'आश्चर्यवत्' दृष्टीनें पाहतो. पण ही दृष्टि कायम ठेवून त्याचें भागत नाहीं, व तो कांहीं तरी–त्या क्षणापुरता तरी निदान–निश्चय करतो. या बौद्धिक निश्चयाला त्याचें 'तत्त्वज्ञान' म्हणतात. या बौद्धिक तत्त्वज्ञानाला भावनांची ऊब मिळाली आणि त्याला कांहीं रंग चढून तें हालचाल करूं लागलें म्हणजे याच तत्त्वज्ञानाला 'धर्म' अशी संज्ञा प्राप्त होते. अर्थात् धर्म हा 'व्यक्ति तितक्या प्रकृति' या न्यायानें प्रत्येकाचा भिन्न भिन्न असूं शकेल, व असतोहि. तसेंच कित्येकांचा धर्म स्थिर व नित्य असतो, कित्येकांचा नसतो. बहुतेक लोक दुसऱ्याच वर्गांत मोडतील असें म्हणण्यास हरकत नाहीं. या वर्गांतील लोकांमध्यें दोन प्रकार आहेत:–एक संशयात्म्यांचा किंवा विसंगतात्म्यांचा, व दुसरा इन्द्रियनिग्रह-शून्यांचा. संशयात्म्यांना व्यवहाराकरितां त्या त्या क्षणापुरता का होईना कांहीं तरी निश्चय करावा लागतोच; व या अर्थानें त्यांना त्या त्या क्षणापुरता कांहीं तरी धर्म स्वीकारावा लागला तरी क्षणोक्षणीं धर्मांतर करणाऱ्या या बाटग्यांना धर्मशून्य म्हटलें तरी त्यांत कांहीं वावगें होणार नाहीं. या लोकांना 'बाटगे' म्हटलें, परंतु ते अनीतिमान् असतात किंवा निंद्य असतात असें मला भासवावयाचें नाहीं. ते असमाधानाच्या नरकांत असतात व त्यांची स्थिति, शोचनीय असते हें उघड आहे. पूर्ण इन्द्रियनिग्रह नसलेल्या, परंतु धर्मश्रद्धा असलेल्या लोकांचीही स्थिति कमी शोचनीय असते असें नाहीं. दोघांच्याहि नशिबीं नरकच; अर्थात् ज्ञानगंगेंत स्नान झालें नाहीं तोंपर्यंतच केवळ बौद्धिक अथवा तार्किक ज्ञानाला अशी पावनशक्ति नाहीं, तर भावनांना पटलेल्या, त्यांना प्रिय झालेल्या व म्हणून त्यांनीं वरलेल्या व आपलेंसें करून घेतलेल्या, ज्ञानामध्येंच हें तेज आहे.

---

## साहित्यिकांचें अवतारकृत्य ८

वाङ्मय हें केवळ छायात्मक नाहीं. तें जिवंत, नवनिर्मितिशील व सामर्थ्यवान् आहे आणि उच्चतम जीवनाचें तें एक अंग आहे हें सर्व मला मान्य

आहे; वाङ्मयाचें महत्त्व मी कमी करूं इच्छीत नाहीं. वाङ्मय हें जीविताचें आवश्यक अंग आहे. त्याच्या योगानें जीविताला पोषण मिळत, योग्य मार्ग दिसतो, इष्ट वळण लागतें, सामर्थ्य वाढतें व शोभा आणि तेज यांचा लाभ होतो, हें सर्व मला कबूल आहे. पण हें सर्व केव्हां, तर वाङ्मय आपलें खरें अवतारकृत्य विसरणार नाहीं तेव्हां. सत्य, सौजन्य व सौंदर्य यांची उपासना हें जीविताचें ध्येय आहे, पण याकडे दुर्लक्ष करून केवळ दुसऱ्यांच्या पुस्तकांचें किंवा शब्दांचें चर्वितचर्वण किंवा पृथक्करण किंवा संशोधन करणारें परोपजीवी पोपट-पंची वाङ्मय विशेष महत्त्वाचें नाहीं. सृष्टि हा एक काव्यग्रंथ आहे, असें कल्पिलें तर हा काव्यग्रंथ निर्माण करणारा कवि आपणांस ध्येयभूत असावा. भीष्माच्यासारखें सच्छील व पराक्रमी जीवन असल्यावर मग शांतिपर्वांत वगैरे जें तत्त्वज्ञान सांगितलें आहे तसें तत्त्वज्ञान वाङ्मयाला भूषणावह होतें. रामाचें किंवा सीतेचें चरित्र काव्यमय होतें तसें आपलें चरित्र व्हावें अशी इच्छा धरावी; वाल्मीकीप्रमाणें रामायण लिहिण्याची आकांक्षा धरणें हें त्याहून कमी दर्जाचें ध्येय होय; व अशा ग्रंथांवर टीका, भाष्यें, वगैरे लिहिणें हें तर त्याहून कमी दर्जाचें ध्येय होय. केवळ पुस्तकांचीच कढी व पुस्तकांचाच भात या योगेंकरून वाङ्मयात्मक जीवनाचें खरें पोषण होणार नाहीं; त्याला सात्त्विकता, तेजस्विता, धैर्यशीलता इत्यादि गुण आवश्यक आहेत.

तात्पर्य, सरस्वतीची भक्ति करूं पाहणाऱ्यानें स्वतःस केवळ सारस्वतांत गुरफटून घेऊं नये. प्रत्यक्ष सरस्वतीमातेला आपले भक्त रांगत्या अर्भकाप्रमाणें आपल्या भोंवतीं घिरट्या घालीत आहेत हें पाहून बरें वाटेल कीं काय ह्याबद्दल मला शंका वाटते. माझ्या भक्तांनीं जन्मभर माझ्या भोंवतालींच न फिरतां बाह्य विश्वांत जाऊन तेथील हरतऱ्हेची शोभा पाहावी, आपल्या सवंगड्यांचे बरोबर हरतऱ्हेचा आनंदोपभोग घ्यावा, हरतऱ्हेचा पराक्रम करावा, तेज दाखवावें, सत्य-सौजन्य-सौंदर्यादिक ध्येयानुसार नवनिर्मिति करावी, किंबहुना विश्वामित्राप्रमाणें अपर-सृष्टीच निर्माण करावी, साहस करून श्री मिळवावी, व मग कलाविलासाकरतां, काव्यशास्त्रविनोदाकरतां, सुखदुःखाच्या गोष्टी बोलण्याकरतां, माझ्या भोंवतीं सर्वांनीं जमावें असें ती म्हणेल. मातेला काय, किंवा पत्नीला काय, बाह्य विश्वांत पराक्रम करणारा पुत्र किंवा पति प्रिय असतो. या न्यायानें पाहतां आपण वाङ्मयभक्तांनीं वारद्वांतल्या

मुंग्यांप्रमाणें शब्द-क्षेत्रांतच डोकें खुपसून शाब्दिक वारूळ निर्माण करण्यापेक्षां सत्यान्वेषणाच्या, सौजन्यपोषणाच्या व सौंदर्योपासनेच्या बाबतींत पौरुष, तेज, स्वतंत्रता, नवनिर्मितिकुशलता इत्यादि गुण दाखविले तर आपण सरस्वती मातेला प्रिय होऊं, व विविध प्रकारची सात्त्विक श्री ही 'साहसे श्रीः प्रतिवसति' या न्यायानें आपणांस वरील. आपण वाङ्मयभक्तांनीं आतां शब्द-क्रीडा किंवा शब्दशौर्य हें आपलें ध्येयच नाहीं हें स्पष्टपणें, निर्भीडपणें व निर्भयपणें ओळखलें पाहिजे. वाङ्मयसेवक म्हणजे पुष्कळांना असें वाटतें कीं, तो शब्दांशीं खेळणारा किंवा शब्दांचा कीस काढणारा गरीब बिचारा प्राणि आहे. ही लोकांची कल्पना दूर केली पाहिजे. 'शब्द-पांडित्य' हें आपलें ध्येय राहिलें नाहीं हें जगाच्या निदर्शनास आणून दिलें पाहिजे. आपण शब्द वापरावेत पण त्या शब्दांचे पाठीमागें आचारविचारांचें तेज व पावित्र्य पाहिजे. वाङ्मयसेवक हे गरीब बिचारे, भोळे-भाबडे, व्यवहार न समजणारे, समाजाशीं संबंध न ठेवणारे, व श्रीमंतांच्या आश्रयावर कसे तरी पोसले जाणारे, निरुपद्रवी व निरुपयोगी लोक आहेत अशी कांहीं लोकांची जी कल्पना झालेली आहे ती दूर केली पाहिजे. त्यांना आपल्याबद्दल आदर वाटूं लागला पाहिजे. दुर्जन असतील त्यांना आपली भीति वाटली पाहिजे !

असत्य, दुर्जनता व हरतऱ्हेची कुरूपता यांचा विनाश करणें व सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचें संस्थापन करणें हें आपलें अवतार–कृत्य आहे. अर्थात् कंसादिकांना ज्याप्रमाणें कृष्णाची भीति वाटत होती त्याप्रमाणेंच दुर्जनादिकांना आपली भीति वाटली पाहिजे. दौर्जन्य कोठेंहि व कोणत्याहि क्षेत्रांत असो, तें आपणांस असह्य झालें पाहिजे. अन्याय हा सरकारचा असो किंवा संस्थानाधिपतींचा असो, हिंदूंचा असो किंवा मुसलमानांचा असो, ब्राह्मणांचा असो किंवा ब्राह्मणेतरांचा असो, तो नाहींसा करण्याकडे वाङ्मयाची प्रवृत्ति झाली पाहिजे. हें काम निर्भयपणें झालें पाहिजे. परतंत्रता कोठल्याही क्षेत्रांतली असो, ती सामाजिक असो, धार्मिक असो, वाङ्मयात्मक असो, आपणांस ती अवंद्य असली पाहिजे व सर्वांना ती अवंद्य होईल अशी आपली वाङ्मय-प्रवृत्ति पाहिजे. दास्य राजाचें असो, संस्थानिकांचें असो, रूढीचें असो, किंवा पुरातन शास्त्रांचें असो, त्याचें निर्मूलन करण्यास आपण प्रवृत्त झालें पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सत्य, सौजन्य आणि सौंदर्य या त्रिमूर्तींचेंच ध्यान-

भजन व पूजन आपण केलें पाहिजे व कृत्रिम रूढि, परंपरा, संकेत, इत्यादिकांचें दास्य, वर्चस्व किंवा बंधकत्व पार झुगारून दिलें पाहिजे व झुगारून देण्यास लोकांना शिकविलें पाहिजे. हें व्रत आपण स्वकारलें व आपली वाङ्मयात्मक तपश्चर्या या ध्येयाला अनुसरून झाली तर तुष्टि, पुष्टि व शांति यांचा लाभ आपणांस व जगास मिळून जगांत दैवी संपत्तीचें साम्राज्य होईल व उच्चतम कलाविलासांत रममाण होऊन अलौकिक अशा सात्त्विक आनंदाचे आपण वांटेकरी होऊं.

---

दा. क. ८५७५
REFBK-0008575